# अजरालयग्राम

म्हणजेच

# आमचं आंजलं

म. ग्रं. सं. ठाणें

: संपादक :

गणेश बाळकृष्ण नित्सुरे

REFBK-0008488

मूल्य तीन रुपये


# निवेदन



ग. बा. नित्सुरे

सरकारी नोकरींत असतांना अगदीं एका चकोरींतून चालण्याची संवय लागल्यामुळें, सेवानिवृत्त झाल्यानंतर आपला रिकामा झालेला वेळ कसा घालवावा याची फार जणांना मोठी काळजी पडते; व त्याचा परिणाम मनावर व शारिरावर होऊन इहलोकची यात्रा लौकर संपते, अशी आमची समजूत असल्यामुळें, आमचें सरकारी नोकरीचें आयुष्य संपत येतांच, वरील आपत्ति आपल्यावर येऊं नये म्हणून आम्हीं अगदीं पहिल्यापासून कांहीं योजना आंखून ठेविल्या व त्याप्रमाणें सेवानिवृत्त झाल्यावर लौकरच **नित्सुरे कुलवृत्तान्त** लिहिण्याचें काम हातीं घेतलें, व तें काम सवडीनें चालू ठेवून त्यांत सेवानिवृत्तिनंतरचीं सुमारें पहिलीं पांच वर्षें घालविलीं व श्रावण शु. १५ शक १८६९ चे सुमारास सदर काम हातावेगळें झालें.

कुळानंतर ग्राम अगर आपली जन्मभूमि असा क्रम आम्हीं योजून ठेविलेला असल्यामुळें आमच्या ध्येयावर दृष्टि ठेवून मुलाबाळांचे गैरसोयींची तसेंच स्वतःचेहि गैरसोयीची पर्वा न करितां आमची जन्मभूमि आंजर्लें, तालुका दापोली, जिल्हा रत्नागिरी या ठिकाणीं येऊन तेथें चालू असलेल्या इंग्रजी शाळेत अत्यंत अल्प वेतनावर काम करून त्या शाळेला सरकारमान्यता मिळवून देण्याचें ठरवून त्याप्रमाणें इ. स. १९४७ चे नवंबर महिन्यांत आंजर्लें येथें येऊन शाळेचीं सूत्रें हातीं घेतलीं व अगदीं



भालचंद्र गजानन नित्सुरे

अल्पावधींत सदर कामगिरी ईशकृपेनें पुरी होऊन शाळेला सरकारमान्यता मिळून सरकारी मदतहि आतां भरपूर मिळूं लागली आहे. फार वर्षांनीं गांवांत रहावयास आल्यामुळें, गांवांत पूर्वपरिचित व बरोबरीचीं अशीं माणसें फार अल्प, म्हणून आरंभीचे दिवस निवळ शाळेचे कामांत गेले. पुढें हळुहळु जसजसा मुक्काम वाढला त्याप्रमाणें आमचे कुलबंधू ती. रा. भालचंद्र गजानन तथा बाबा नित्सुरे यांचा परिचय वाढला. त्यांना जुने कागदपत्र पहाण्याची व ग्रामासंबंधींचे व इतरहि सार्वजनिक गोष्टींचे माहितीचा संग्रह करण्याची आवड असल्यामुळें त्यांचीं बाडें आमच्या वाचण्यांत आलीं, व एके दिवशीं तीं बाडें वाचून व त्यांतील माहिती-चा उपयोग करून आंजर्लें गांवासंबंधीं माहितीचें छोटेसें पुस्तक छापून प्रसिद्ध व्हावें अशी मनीषा त्यांनीं प्रकट केली व त्यांना डोळ्यांनीं आतां मुळींच दिसत नाहींसें झालें असल्यामुळें, त्यांचे वतीनें सदर कामगिरी आम्ही हातीं घ्यावी अशी त्यांनीं इच्छा दर्शविली. परंतु विपरीत परिस्थितींत इंग्रजी शाळेचें काम हातीं घेतलेलें असल्यामुळें ही नवीन जबाबदारी हातीं घेण्यास मन धजेना; पण सदर काम आम्ही न पत्करलें तर ती. बाबांची मेहनत जवळजवळ फुकट जाणार असा एक प्रकारचा पेंचप्रसंग निर्माण झाला. परंतु ज्या ध्येयानें प्रेरित होऊन आम्ही आमचीं मुलेंबाळें सोडून आजर्लें येथें आलों त्या ध्येयाशीं ही नवीन काम-गिरी सुसंगत असल्यामुळें, तसेंच श्रीदुर्गादेवी यात्रेंत **चांभारास** रथाच्या बऱ्याच जवळ जाऊन व समोर उभें राहून स्वहस्तानें **धुपारती ओंवाळण्याचा ५०० वर्षांपूर्वींच मान** देऊन केलेलें खरें **अस्पृश्यतानिवारण** तसेंच **इस्राइल तेली व मुसलमान ताशेकरी यांस** यात्रेंत कामें देऊन व **दायतें** व मानाचा विडा देऊन दाखविलेला लोकसंग्रह, तसेंच अंगण खणणें, मांडव घालणें इत्यादि गोष्टींत निरनिराळ्या लोकांकडे निरनिराळीं कामें सोंपवून केलेली श्रमविभागाची योजना, तसेंच ढोलाची दोरी, रथाच्या डेलक्या इत्यादिसारख्या बारीकसारीक गोष्टींचीही केलेली घटनाबद्ध योजना, ह्या गोष्टी पाहून या यात्रेचें वर्णन लिहून प्रसिद्ध करावें असें आमच्या मनांत अनेक वेळां आलें होतें एवढेंच नव्हे तर त्याची पूर्वतयारी म्हणून, ( १ ) गांवगाडा ( २ ) आडिवऱ्यांची महांकाळी ( ३ ) परशुरामक्षेत्र-वर्णन ( ४ ) तुळजापुरची भवानी ( ५ ) श्री. ना. गो. चापेकरकृत "बदलापूर" ( आमचा गांव ) इत्यादि पुस्तकें वाचून कांहीं टांचणेंहि आम्हीं करून ठेविलीं होतीं; परंतु इतकी तयारी असली तरी ज्या परिस्थितींत आम्हीं आपणांला

अनुक्रमांक ........... वि: ...................
क्रमांक ..................... नों: दि: ...............

# अजरालयग्राम
## म्हणजेच
# आमचं आंजलं

: संपादक :

**गणेश बाळकृष्ण नित्सुरे, बी. ए.**
सेवानिवृत्त मुख्याध्यापक, नॉर्थकोट आंग्ल महाविद्यालय, सोलापूर.
वास्तव्य : ११९।५ सदाशिव पेठ, पुणें २.

: प्रकाशक :

**गणेश बाळकृष्ण नित्सुरे, बी. ए.**
११९।५ सदाशिव पेठ, पुणें शहर.

: मुद्रक :

**द. शं. गोखण,**
अक्षर मुद्रणालय, ४३८अ सदाशिव, पुणें २.

ग्रंथालय ८५८८

*　　*　　*

न ]

REFBK-0008488

*

शक १८७७ ]　　मूल्य तीन रुपये　　[ इ. स. १९५५


# निवेदन



ग. बा. नित्सुरे

सरकारी नोकरींत असतांना अगदीं एका चकोरींतून चालण्याची संवय लागल्यामुळें, सेवानिवृत्त झाल्यानंतर आपला रिकामा झालेला वेळ कसा घालवावा याची फार जणांना मोठी काळजी पडते; व त्याचा परिणाम मनावर व शारिरावर होऊन इहलोकची यात्रा लौकर संपते, अशी आमची समजूत असल्यामुळें, आमचें सरकारी नोकरीचें आयुष्य संपत येतांच, वरील आपत्ति आपल्यावर येऊं नये म्हणून आम्हीं अगदीं पहिल्यापासून कांहीं योजना आंखून ठेविल्या व त्याप्रमाणें सेवानिवृत्त झाल्यावर लौकरच **नित्सुरे कुलवृत्तान्त** लिहिण्याचें काम हातीं घेतलें, व तें काम सवडीनें चालू ठेवून त्यांत सेवानिवृत्तिनंतरचीं सुमारें पहिलीं पांच वर्षें घालविलीं व श्रावण शु. १५ शक १८६९ चे सुमारास सदर काम हातावेगळें झालें.

कुळानंतर ग्राम अगर आपली जन्म-भूमि असा क्रम आम्हीं योजून ठेविलेला असल्यामुळें आमच्या ध्येयावर दृष्टि ठेवून मुलाबाळांचे गैरसोयीची तसेंच स्वतःचेहि गैरसोयीची पर्वा न करितां आमची जन्मभूमि आंजर्लें, तालुका दापोली, जिल्हा रत्नागिरी या ठिकाणीं येऊन तेथें चालू असलेल्या इंग्रजी शाळेंत अत्यंत अल्प वेतनावर काम करून त्या शाळेला सरकारमान्यता मिळवून देण्याचें ठरवून त्याप्रमाणें इ. स. १९४७ चे नवंबर महिन्यांत आंजर्लें येथें येऊन शाळेचीं सूत्रें हातीं घेतलीं व अगदीं



भालचंद्र गजानन नित्सुरे

अल्पावधींत सदर कामगिरी ईशकृपेनें पुरी होऊन शाळेला सरकारमान्यता मिळून सरकारी मदतहि आतां भरपूर मिळूं लागली आहे. फार वर्षांनीं गांवांत *रहावयास आल्यामुळें, गांवांत पूर्वपरिचित* व बरोबरीचीं अशीं माणसें फार अल्प, म्हणून आरंभीचे दिवस निवळ शाळेचे कामांत गेले. *पुढें हळुहळु जसजसा मुक्काम* वाढला त्याप्रमाणें आमचे कुलबंधू ती. रा. भालचंद्र गजानन तथा बाबा निल्सुरे यांचा परिचय वाढला. त्यांना जुने कागदपत्र पहाण्याची व ग्रामासंबंधींचे व इतरहि सार्वजनिक गोष्टींचे माहितीचा संग्रह करण्याची आवड असल्यामुळें त्यांचीं बाडें आमच्या वाचण्यांत आलीं, व एके दिवशीं तीं बाडें वाचून व त्यांतील माहिती-चा उपयोग करून आंजर्लें गांवांसंबंधीं माहितीचें छोटेसें पुस्तक छापून प्रसिद्ध व्हावें अशी मनीषा त्यांनीं प्रकट केली व त्यांना डोळ्यांनीं आतां मुळींच दिसत नाहींसें झालें असल्यामुळें, त्यांचे वतीनें सदर कामगिरी आम्ही हातीं घ्यावी अशी त्यांनीं इच्छा दर्शविली. परंतु विपरीत परिस्थितींत इंग्रजी शाळेचें काम हातीं घेतलेलें असल्यामुळें ही नवीन जबाबदारी हातीं घेण्यास मन धजेना; पण सदर काम आम्ही न पत्करलें तर ती. बाबांची मेहनत जवळजवळ फुकट जाणार असा एक प्रकारचा पेंचप्रसंग निर्माण झाला. परंतु ज्या ध्येयानें प्रेरित होऊन आम्ही आमचीं मुलेंबाळें सोडून आजर्लें येथें आलों त्या ध्येयाशीं ही नवीन काम-गिरी सुसंगत असल्यामुळें, तसेंच श्रीदुर्गादेवी यात्रेंत **चांभारास** रथाच्या बऱ्याच जवळ जाऊन व समोर उभें राहून स्वहस्तानें **धुपारती ओंवाळण्याचा ५०० वर्षांपूर्वीच मान** देऊन केलेलें खरें **अस्पृश्यतानिवारण** तसेंच **इस्राइल तेली व मुसलमान ताशेकरी यांस** यात्रेंत कामें देऊन व **दायतें** व मानाचा विडा देऊन दाखविलेला लोकसंग्रह, तसेंच अंगण खणणें, मांडव घालणें इत्यादि गोष्टींत निरनिराळ्या लोकांकडे निरनिराळीं कामें सोंपवून केलेली श्रमविभागाची योजना, तसेंच ढोलाची दोरी, रथाच्या डेलक्या इत्यादिसारख्या बारीकसारीक गोष्टींचीही केलेली घटनाबद्ध योजना, ह्या गोष्टी पाहून या यात्रेचें वर्णन लिहून प्रसिद्ध करावें असें आमच्या मनांत अनेक वेळां आलें होतें एवढेंच नव्हे तर त्याची पूर्वतयारी म्हणून, ( १ ) गांवगाडा ( २ ) आडिवऱ्यांची महांकाळी ( ३ ) परशुरामक्षेत्र-वर्णन ( ४ ) तुळजापुरची भवानी ( ५ ) श्री. ना. गो. चापेकरकृत "बदलापूर" ( आमचा गांव ) इत्यादि पुस्तकें वाचून कांहीं टांचणेंहि आम्हीं करून ठेविलीं होतीं; परंतु इतकी तयारी असली तरी ज्या परिस्थितींत आम्हीं आपणांला

शब्दांत आभार मानावे हेंच आम्हांस समजत नाहीं. अशा तऱ्हेनें गेलीं कित्येक वर्षें रेंगाळत पडलेलें हें कार्य आज शेवटास जात आहे, याबद्दल जो आनंद होत आहे तो शब्दांनीं वर्णन करितां येत नाहीं. हा योग ती. शिवरामकाका व ती. बाळूकाका यांचे हयातींत आला असता तर दुधांत साखर पडल्याप्रमाणें झालें असतें. पण ईश्वरी नेमानेम तसा नव्हता ! !

पुणें,
जुलै १९५५

ग. बा. नित्सुरे
संपादक

**सूचनाः**— या पुस्तकांतील वरीचशी माहिती, वृद्ध, तरुण, सुशिक्षित, अर्धशिक्षित, अशिक्षित, स्त्रिया व पुरुष यांजकडून जशी मिळाली तशी घेऊन व आमचे तारतम्यानें तींत जरूर तो फेरफार करून संग्रहित केलेली आहे, यामुळें तिचेबद्दलचें **उत्तरदायित्व** ( Legal responsibility ) आमचेवर, आद्य-संग्राहक कै. भालचंद्र गजानन यांजवर अथवा त्यांचे लेखक कै. सखाराम विनायक तथा शिवरामकाका यांपैकीं कोणावरहि नाहीं. आमच्या या लिखाणांत चुका आढळल्यास त्या मात्र आमचे वाचकांनीं आमचे निदर्शनास अवश्य आणाव्या अशी प्रार्थना आहे.

ग. बा. नित्सुरे
संपादक

क्रमांक २०५ नों: दि...

# परिशिष्ट ( आयव्ययव्यवस्था )

## आय

ज्या ग्रामस्थांनीं, त्यांची मदत आगाऊ दिली, त्यांची यादी खालीं कुलवार व व्यक्तिवार अकारविल्ह्यानें दिली आहे. यांत पुस्तकांच्या प्रतींची किंमत, टपालखर्च व देणगी इतक्यांचा अंतर्भाव आहे.

| नांव | रक्कम |
|---|---|
| **" अभ्युदय मंडळ आंजर्लें " मुंबई** | १००–० |
| १ **प्रसिद्धिविन्मुख आंजर्लेकर** | ८०–० |
| २ **कै. भालचंद्र गजानन नित्सुरे यांचे पुत्र व पौत्र** | १००–० |
| ३ **करंदीकर**— ( कै. त्र्यंबक वासुदेव वर्तक–फौजदार–यांचे नातू ) २५ दिगंबर दामोदर १३ वसंत दामोदर | ३८–० |
| ४ **काळे**— १० अवधूत गोविंद ५ दत्तात्रेय गोविंद | १५–० |
| ५ **केळसकर**— सदानंद गणपत | ५–० |
| ६ **कोल्हटकर**— ८ बाळकृष्ण नारायण ५ यशवंत गणेश | १३–० |
| ७ **खांबेटे**— १० अच्युत गोविंद १३ अनंत माधव ५ गणेश मोरेश्वर ६ धोंडो बाळकृष्ण ६ रामकृष्ण गोविंद ३-१२ वामन बाळकृष्ण | ४३–१२ |
| ८ **गोरे**— एकनाथ विनायक | १०–० |
| ९ **घाणेकर**— १० दत्तात्रेय गणेश ८ नारायण विनायक | १८–० |
| १० **जोशी**— ३-१२ अनंत रामचंद्र ५ भिकाजी परशुराम ८ पांडुरंग कृष्णाजी ११ वामन रामचंद्र १० शंकर रामचंद्र ६ सदाशिव मोरेश्वर | ४३–१२ |
| ११ **दांडेकर**— ५ दीनानाथ शंकर ५ विश्वनाथ शंकर | १०–० |
| १२ **नित्सुरे**— ११ अनंत दत्तात्रेय १३ कृष्णाजी हरि ३३ केशव गोपाळ ३ गणेश हरि १० गोपीनाथ भिकाजी ३-१२ दिनकर सीताराम ३ पांडुरंग हरि ३३ पुरुषोत्तम गोपाळ ११ भास्कर गजानन ६ रघुनाथ गजानन १० रामकृष्ण पुरुषोत्तम १८ रंगनाथ जनार्दन २५ **वामन भालचंद्र** ५० विश्वनाथ सीताराम ४ विष्णु मधुसूदन १० विष्णु महादेव | २४३–१२ |

| नांव | रकम |
|---|---|
| १३ पटवर्धन— दत्तात्रेय परशुराम | ५—० |
| १४ परांजपे— विष्णु शंकर | ३—० |
| १५ पेंडसे— १३ अनंत गोविंद १३ वामन गणेश | २६—० |
| १६ बापट— १५ गोपाळ विष्णु ३ रंगनाथ शिवराम १० श्रीनिवास विश्वनाथ | २८—० |
| १७ महाजन— ११-४ मनोहर, कमलाकर व बाळकृष्ण गंगाधर ३-१२ मोरेश्वर कृष्ण ५ हरि व कृष्णाजी गोपाळ | २०—० |
| १८ वर्तक— ६ गजानन दत्तात्रेय ४ माधव पुरुषोत्तम | १०—० |
| १९ विद्वांस— ७ अनंत सखाराम १८ गोपाळ गजानन ८ जगन्नाथ त्र्यंबक ५ बाळकृष्ण काशीनाथ ३-१२ रामचंद्र बाळकृष्ण ५ श्रीधर बाळकृष्ण ४ सुधाकर महादेव | ५०—१२ |
| २० वैद्य— महादेव वासुदेव | ४—० |
| २१ शित्रे— ५ रामकृष्ण चिंतामण ८ शिवराम चिंतामण | १३—० |
| २२ साठये— ३-१२ केशव दामोदर ५ पांडुरंग नारायण ५ यशवंत भार्गव ३-१२ हरि विष्णु | १७—८ |
| एकूण | ८९७—८ |

## व्यय ( ठोकळ आंकड्यांत )

| | | |
|---|---|---|
| १ | स्टेशनरी ... | ५-०-० |
| २ | टपालखर्च पूर्वतयारी व पुस्तकें पाठविणें ... | ७५-०-० |
| ३ | कागद ( पुस्तकाकरितां ) ... | ८०-०-० |
| ४ | खिळे—जुळणी ... | ४६८-०-० |
| ५ | छपाई ... | ६०-०-० |
| ६ | पुस्तकें—बांधणी ... | ७०-०-० |
| ७ | फोटो काढणेकरितां प्रवास व फोटो काढणें ... | ७०-०-० |
| ८ | फोटो ब्लॉक्स, कागद, छपाई ... | १५०-०-० |
| ९ | इतर किरकोळ व अनपेक्षित ... | १०-०-० |
| | एकूण | ९८८-०-० |

(५८८)

# परिशिष्ट २

## अपरिचित शब्दसूची

या आमच्या लहानशा पुस्तकांत पुष्कळांच्या परिचयाचे नसणारे असे कांहीं शब्द आले आहेत. वाचकांच्या सोयीकरितां ते अकारविल्हानें खालीं दिले आहेत व त्यांचे समोर त्यांचा अर्थ दिला आहे तो वाचकांनीं लक्षांत ठेवण्याचा प्रयत्न करावा.

१ **आवारी**—आवरणें, तसेंच हिशेब वगैरे लिहून, तसेंच वादाचे मुद्दे असल्यास त्यांचा निकाल लावून यात्रेची समाप्ति करणें, २ **खुम**—वतनदार; जुने. ३ **गावाण**—हा गांवठाण (ग्रामस्थान) याचा अपभ्रंश असावा. आजमितीला, गांवाची आजची रचना करणारे शिर्के यांचे घराचे जोत्याला व त्याचे जवळचे भूभागाला हा शब्द लावितात. ४ **चौकश्राण**—श्रीभैरवापुढें मानकरी लोकांना देण्याकरितां मांडिलेले विडे. ५ **झिगटी**—शाळांतून ठोके, आरंभींचा गजर इत्यादींकरितां ज्याचा उपयोग करितात तो विशिष्ट मिश्रणाचा धातूचा गोल पत्रा. ६ **दायतें**—दातव्य. श्रीदुर्गादेवी यात्रेंतील विशिष्ट कामगिरीबद्दल मिळणारा मेहनताना. ७ **नक्कल**—निर्वंश. ८ **नेमावणी**—"नेम" म्हणजे झाड लावण्याकरितां केलेला खड्डा, म्हणून "नेमावणी केली" याचा अर्थ, खड्डे खणून झाडें लावून बाग केली. ९ **पंचमाने**—हा पंचमान्य याचा अपभ्रंश. याचा अर्थ गांवांतील पांच सामाजिक व धार्मिक प्रमुख. १० **बादावा**—बाजा. ढोलावर निदान पांच वेळां काठ्या मारून आवाज काढणें. ११ **बाधेकरी**—उपरी, बाहेरून नवीन आलेला. वतनदार नव्हे असा मनुष्य. १२ **बैला**—गवताचा भारा वाहून नेतांना जरूरीप्रमाणें विश्रांतीकरितां थांबतांना व पुन्हां डोक्यावर भारा घेतांना दुसऱ्याचे मदतीची जरूर न पडूं देणारें सुलभ साधन. १३ **भैरवाचा सांड**— भैरवापुढें मानकरी लोकांना देण्याकरितां मांडिलेले विडे. १४ **मानस्कीचें गंध**—उपाध्ये, जोशी, वेळासकर, विद्वांस-धर्माधिकारी व भट या पांच मंडळीस "पंचमाने" म्हणतात. कोणत्याहि कार्यांत गंध लावण्याचे वेळीं या पांच हक्कदारांना वर दिलेल्या क्रमानेंच प्रथम गंध लावण्यांत येतें व त्यांचेनंतर गृहस्थांमधील "पंचमाने" महाजन, वर्तन, कुळकर्णी—लिमये, व चौगुले—पेंडसे व साठे यांस गंध लावण्यांत येतें. या गंध लावण्याचे प्रकारास "मानस्कीचें गंध" म्हणजेच मानाचें गंध म्हणतात. १५ **रसई**—भाताची रास अथवा ढीग. १६ **लागलागाठा**—गवताचें कुरण. १७ **श्राण, श्राणेचा दगड**—मानपान इत्यादींची विशिष्ट जागा दाखविणारा खुणेचा दगड. १८ **होळीचें शीत**—होळीचे मध्यभागीं भोंवतालचे जळणास आधार म्हणून पुरलेली झाडाची फांदी. १९ **सडा**—उंच पठार.

# म. म. द. वा. पोतदार यांचा आशीर्वाद

" आमचं आंजर्ले " दोन भागांत लिहिलेलें ( हस्तलिखित ) समग्र वाचलें. श्री. ग. बा. नित्सुरे यांनीं हें लेखन करून एक अत्यंत उपयुक्त कामगिरी पार पाडली आहे. कसेंहि करून हें पुस्तक छापून प्रसिद्ध व्हावें. या कामीं सर्व स्थानिक संस्था व सरकार यांची मदत झाली तर कारणींच लागेल. श्री. नित्सुरे यांनीं सर्व माहिती अत्यंत परिश्रमानें व तपशिलवार अशी जमा करून एकत्र दिली आहे.

आतां देशधुरीणांचें लक्ष्य परत खेडेगांवांकडे वळूं लागलें आहे. गत्यंतरच नाहीं. अशा वेळीं गांवागांवांचे साधार व सविस्तर इतिहास तयार व्हावयास पाहिजेत. श्रीयुत नित्सुरे यांनीं आयतें ताट वाढून आणलें आहे. मग त्यांचें ऋण किती मोठें आहे बरें ? शें-दोनशें वर्षांपूर्वीं ही बुद्धि कोणास होती तर कितीतरी कागदपत्रें व पुरावे मिळाले असते. अजूनही पेशवे दप्तर व रत्नागिरी येथील जुनें दप्तर यांत शोध घेतल्यास अधिक माहिती मिळण्याचा पुष्कळ संभव आहे. तथापि तो भविष्यकाळचा विषय आहे. प्रथम मिळविली आहे ती माहिती प्रसिद्ध व्हावी, भर मागाहून पडेल.

मी केळशीचा उत्सव फार बारकाईनें पाहिला. त्या उत्सवाचे व आंजर्ल्यांचे उत्सवाचे मांडणींत पुष्कळ सारखवटपणा आहे... पूर्वकाळाच्या उत्सवांची योजना किती शिस्तबद्ध होती तें कळून येऊन आम्ही भारतीय म्हणजे भोळे, भोंगळ, गैरशिस्त हा आमचा स्वभाव सार्वकालिक नव्हे हें ध्यानांत येईल...श्री. नित्सुरे यांनीं आंजर्ल्यांच्या उत्सवाचें सविस्तर वर्णन दिल्यानें, चांभारालाही मान होता, इत्यादि फार उद्बोधक माहिती मिळते. कांहींतरी माणुसकी तरी आम्ही नांदवीत आलों आहोंत हें कळून येऊन किती समाधान वाटतें. लोकशिक्षणाचा हा सप्ताहच आम्ही पूर्वीं साजरा करीत होतों. समाज अशा योजनांनींच तयार राहतो. आतां नव्याकाळीं नवा विकास करण्याला मागील अनुभव नेहमींच उपयोगी वाटेल म्हणून नित्सुरे यांच्या सारख्यांचे प्रयत्न यांस आपलें उत्तेजन पाहिजे.

फाल्गुन व. १०।७५
२९।३।५४

**दत्तो वामन पोतदार**

# अनुक्रमणिका


| प्रकरण | विषय | | पृष्ठें |
|---|---|---|---|
| १ | प्राथमिक व ऐतिहासिक | ... | १–४ |
| २ | भौगोलिक | ... | ४–१० |
| ३ | दळणवळणमार्ग व साधनें | ... | १०–११ |
| ४ | गांवाचे निरनिराळे भाग | ... | १२–१३ |
| ५ | ग्रामसंघटना | ... | १४–२५ |
| ६ | वैद्य व औषधांचे कारखाने | ... | २५–२६ |
| ७ | शिक्षणसंस्था | ... | २७–३१ |
| ८ | लोकसंख्या, लोक व त्यांच्या चालीरीति | ... | ३१–५१ |
| ९ | शेतीवाडी | ... | ५१–५३ |
| १० | पाळीव व रानटी पशुपक्षी व सरपटणारे प्राणि | ... | ५३–५५ |
| ११ | सामाजिक व धार्मिक कृत्यें | ... | ५५–८२ |
| १२ | देव, देवालयें उत्सव इत्यादि | ... | ८२–९८ |
| १३ | आंजर्ल्यांची श्रीदुर्गादेवी | ... | ९८–१३२ |
| १४ | आमचं आंजर्लें–आजचें व ५०-६० वर्षांपूर्वीचें | ... | १३३–१३८ |
| १५ | कांहीं आवश्यक सुधारणा | ... | १३९–१४४ |

# म. म. द. वा. पोतदार यांचा आशीर्वाद

" आमचं आंजलें " दोन भागांत लिहिलेलें ( हस्तलिखित ) समग्र वाचलें. श्री. ग. बा. नित्सुरे यांनीं हें लेखन करून एक अत्यंत उपयुक्त कामगिरी पार पाडली आहे. कसेंहि करून हें पुस्तक छापून प्रसिद्ध व्हावें. या कामीं सर्व स्थानिक संस्था व सरकार यांची मदत झाली तर कारणींच लागेल. श्री. नित्सुरे यांनीं सर्व माहिती अत्यंत परिश्रमानें व तपशिलवार अशी जमा करून एकत्र दिली आहे.

आतां देशधुरीणांचें लक्ष्य परत खेडेगांवांकडे वळूं लागलें आहे. गत्यंतरच नाहीं. अशा वेळीं गांवागांवांचे साधार व सविस्तर इतिहास तयार व्हावयास पाहिजेत. श्रीयुत नित्सुरे यांनीं आयतें ताट वाढून आणलें आहे. मग त्यांचें ऋण किती मोठें आहे बरें ? शें-दोनशें वर्षांपूर्वीं ही बुद्धि कोणास होती तर कितीतरी कागदपत्रें व पुरावे मिळाले असते. अजूनही पेशवे दप्तर व रत्नागिरी येथील जुनें दप्तर यांत शोध घेतल्यास अधिक माहिती मिळण्याचा पुष्कळ संभव आहे. तथापि तो भविष्यकाळचा विषय आहे. प्रथम मिळविली आहे ती माहिती प्रसिद्ध व्हावी, भर मागाहून पडेल.


मी केळशीचा उत्सव फार बारकाईनें पाहिला. त्या उत्सवाचे व आंजर्ल्यांचे उत्सवाचे मांडणींत पुष्कळ सारखवटपणा आहे... पूर्वकाळाच्या उत्सवांची योजना किती शिस्तबद्ध होती तें कळून येऊन आम्ही भारतीय म्हणजे भोळे, भोंगळ, गैरशिस्त हा आमचा स्वभाव सार्वकालिक नव्हे हें ध्यानांत येईल...श्री. नित्सुरे यांनीं आंजर्ल्यांच्या उत्सवाचें सविस्तर वर्णन दिल्यानें, चांभारालाही मान होता, इत्यादि फार उद्बोधक माहिती मिळते. कांहींतरी माणुसकी तरी आम्ही नांदवीत आलों आहोंत हें कळून येऊन किती समाधान वाटतें. लोकशिक्षणाचा हा सप्ताहच आम्ही पूर्वीं साजरा करीत होतों. समाज अशा योजनांनींच तयार राहतो. आतां नव्याकाळीं नवा विकास करण्याला मागील अनुभव नेहमींच उपयोगी वाटेल म्हणून नित्सुरे यांच्या सारख्यांचे प्रयत्न यांस आपलें उत्तेजन पाहिजे.

फाल्गुन व. १०।७५
२१।३।५४

दत्तो वामन पोतदार

# अनुक्रमणिका


| प्रकरण | विषय | | पृष्ठें |
|---|---|---|---|
| १ | प्राथमिक व ऐतिहासिक | ... | १–४ |
| २ | भौगोलिक | ... | ४–१० |
| ३ | दळणवळणमार्ग व साधनें | ... | १०–११ |
| ४ | गांवाचे निरनिराळे भाग | ... | १२–१३ |
| ५ | ग्रामसंघटना | ... | १४–२५ |
| ६ | वैद्य व औषधांचे कारखाने | ... | २५–२६ |
| ७ | शिक्षणसंस्था | ... | २७–३१ |
| ८ | लोकसंख्या, लोक व त्यांच्या चालीरीति | ... | ३१–५१ |
| ९ | शेतीवाडी | ... | ५१–५३ |
| १० | पाळीव व रानटी पशुपक्षी व सरपटणारे प्राणि | ... | ५३–५५ |
| ११ | सामाजिक व धार्मिक कृत्यें | ... | ५५–८२ |
| १२ | देव, देवालयें उत्सव इत्यादि | ... | ८२–९८ |
| १३ | आंजर्ल्यांची श्रीदुर्गादेवी | ... | ९८–१३२ |
| १४ | आमचं आंजर्लें–आजचें व ५०-६० वर्षांपूर्वींचें | ... | १३३–१३८ |
| १५ | कांहीं आवश्यक सुधारणा | ... | १३९–१४४ |


आंजर्ले गांवाचा नकाशा
स्केल:- १ इंच= ४०साखळ्या
लोणवडीस
कादिवलीस
गावठाण
चिखल खले
गावठाण
रवा डी
नं १ श्री नारायण मंदीर व सिध्देश्वर मंदीर
२ कड्यावरील श्री गणपती मंदीर
३ श्री दुर्गादेवी मंदीर
४ श्री राम मंदीर. गणपती व हरिहरेश्वर मंदीर
५ श्री दत्त मंदीर
६ श्री विठ्ठल मंदीर
७ श्री बहिरी मंदीर व दारवटकरीण मंदीर
८ श्री सावणें करीण मंदीर
९ भुसारभाट
१० नवा नगर
११ पेठकरीण मंदीर
१२ हनुमान पंचायतन
मराठी शाळा
+ इंग्रजी शाळा

आंजर्लं आलं!! (तरीबंदर) [पृष्ठ १]



श्रीराम [पृष्ठ ९२]




कड्यावरचा गणपति [ पृष्ठ ९० ]



श्री नारायण [ पृष्ठ ८५ ]



सिद्धेश्वर मंदिर [पृष्ठ ८९]




कड्यावरचा गणपति मंदिर [पृष्ठ ९०]



श्री दुर्गादेवी–पूजेनंतर [ पृष्ठ १०३ ]



श्री दुर्गादेवी पाषाणमूर्ति–उघडी [ पृष्ठ १०३ ]



श्री दुर्गादेवी मुखवास चढविल्यावर [पृष्ठ ११४]




श्री दुर्गादेवीमंदिर सभामंडप [पृष्ठ १०२]



श्री दुर्गादेवी उत्सव–भालदार [पृष्ठ ११० ]




श्री दुर्गादेवी उत्सव–विडेवांटणी [पृष्ठ १२३ ]



श्री दुर्गादेवी रथयात्रा-रथसिद्ध [पृष्ठ १२३]



श्री दुर्गादेवीरथ-विश्रांति [पृष्ठ १२६]



श्री दुर्गादेवी रथयात्रा–चांभार धुपारति ओंवाळतो [पृष्ठ १२६]



श्री भैरव [पृष्ठ ८२]



# प्रकरण १ लें

## प्राथमिक व ऐतिहासिक

आंजर्ले हा गांव रत्नागिरी जिल्ह्याचे अगदीं उत्तर टोंकाला असलेल्या दापोली तालुक्यांत वसलेला आहे. रत्नागिरी जिल्ह्याची उत्तर सीमा सावित्री नदी अथवा बाणकोटची खाडी ही आंजर्ल्यापासून अवघी बारा मैल अंतरावर आहे. आंजर्ले गांवाला आगबोटीचें नजीकचें बंदर हर्णै हें आहे. आंजर्ले व हर्णै बंदर यांमधील अंतर फक्त दोन अडीच मैलच आहे. आंजर्ले गांवाचे उत्तर अक्षांश सुमारें १७°–४२ व पूर्व रेखांश ७३–°८ असे आहेत.

**चतुःसीमाः**—पूर्वेस मुर्डी व मुकोंडी हीं गांवें, पश्चिमेस अरबी समुद्र, **दक्षिणेस** जोग नदी अथवा आंजर्ल्याची खाडी व उत्तरेस आडे–पाडले व लोनवडी हीं गांवें. तात्पर्य, आंजर्ले हा गांव पूर्वेस डोंगर (सह्याद्रीचे फांटे) व पश्चिमेस अरबी समुद्र यांमधील अरुंद पट्टींत वसलेला आहे.

**'आंजर्ले' हें नांव कसें पडलें?**—अजरालय याचा अपभ्रंश होऊन आंजर्ले हें नांव तयार झालें असें पुष्कळ लोक सांगतात व तें शक्यहि आहे. कारण कोंकणांतील वसाहत बाहेरून कोठून तरी चित्तपावन लोक येऊन त्यांनीं केली ही गोष्ट निर्विवाद आहे. तसेंच हे वसाहत करणारे लोक हप्त्या हप्त्यानें निरनिराळ्या वेळीं आले असणार. त्यांत आंजर्ले येथें वसाहत करणारे लोक कदाचित् इतरांचे मागून आल्यामुळें त्यांचे वसाहतींत इतरांस वृद्ध माणसें न दिसल्यामुळें, तत्कालिन लोकांनीं त्यांचे वसाहतीस 'अजरालय' म्हणजे ज्या ठिकाणीं वृद्ध नाहींत तें ठिकाण असें नांव दिलें असावें असें आम्हांस वाटतें. परंतु कांहीं लोक असें म्हणतात कीं आज मितीला समुद्रगर्क असलेल्या 'अजरालयेश्वर' या श्रीशंकराचे देवालयावरून या गांवास आंजर्ले हें नांव पडलें. परंतु स्वाभाविक प्रश्न असा येतो कीं आधीं गांवाची वसाहत कीं आधीं देऊळ. केव्हांहि परस्थ लोक वसाहत करण्यास गेले म्हणजे आपलीं घरेंदारें इत्यादि बांधून स्थिरस्थावर झाल्यावर मगच देवळें बांधण्याची खटपट करणार. तेव्हां अजरालयेश्वर या महादेवाचे देवळावरून

आंजर्लें हें नांव पडलें नसून उलट, प्रथमपासूनच गांवाचें नांव 'अजरालय' असलें पाहिजे व त्याचा अपभ्रंश होऊन आंजर्लें झालें असावें व 'अजरालय' या गांवाचे नांवावरून तेथील महादेवाचे देवळाला 'अजरालयेश्वर' हें नांव मिळालें असलें पाहिजे असें आमचें मत आहे. आजमितीला वरील अजरालयेश्वर व त्याचें देऊळ व त्याचेच शेजारीं असलेलें श्रीगणपतीचें देवालय अशीं दोन्हीहि समुद्रगर्क आहेत. पैकीं श्रीगणपतीस त्याचे जागेवरून हालवून यापुढें कधींहि समुद्राचे तडाक्यांत सांपडणार नाहीं इतक्या उंचीवर एका टेंकडीवर आणून बसविला आहे. परंतु श्रीअजरालयेश्वर हें स्वयंभुस्थान म्हणजेच तेथें हालवितां येण्यासारखी मूर्ति वगैरे नसल्यामुळें, अजरालयेश्वर समुद्रांतच राहिला असावा.

**आंजर्लें गांव कोणी वसविला ?**:—— या महत्त्वाचे बाबतींत दुमत दिसतें. कै. गणेश नारायण तथा अण्णा शिंत्रे यांचे तोंडून ऐकलेले दंतकथेप्रमाणें पहातां, एका योगी बावानें आंजर्लें, मुरुड व केळशी हीं गांवें वसविलीं असें दिसतें. व या तिन्ही गांवचे चैत्री यात्रेंतील रचनेंतील साम्य व यात्रेचे निमित्तानें या गांवचे लोकांनीं एकत्र जमणें व एकमेकांनीं एकमेकांचा मानसन्मान करणें या आजतागायत चालू असलेले प्रथेवरून वरील दंतकथेस पुष्टीच मिळते. गांव कोणी वसविला या बाबतींत खालील दोन उतारे महत्त्वाचे आहेतः—— "तकरीर हरी रघुनाथ व गणेश नारायण भट महाजन कसबे आंजर्लें तर्फ केळशी सुभा दाभोळ, सुरू सन सीत सितेन मया व अलफ ( शक १६८७ ) कारणें श्रीमंत राजश्री ...... स्वामीचे शेवेसी लिहून दिली तकरीर ऐसाजेः—— ...... प्रारंभीं वसाहत शिर्के यांचे हातून. राजवाडी म्हणोन हलीं ठिकाणाचें नांव चालत आहे ते जागां शिर्के यांनीं पाट आणून घर बांधून बागायत नेमाणी केली. त्यानंतर बिरवाडी येथें श्रीबहिरी व श्रीहनुमंतपंचाइतन यांची स्थापना केली आणि मुरडी पाखाडीमध्यें बागायत लावणी करावयासी प्रारंभ केला; त्यामध्यें आधीं श्रीबहिरीस बागायत ठिकाण आगर नेमून गुरवास घर बांधावयास स्थळ केलें. उपरांत दक्षिणभागीं ब्राह्मणांची वसाहत ठिकाणें नेमून दिलीं व शिर्के यांनीं आपणांस सालबादेवी आहे तें ठिकाण करून ठेविलें...... चांभारास जागा गांवाणाखालीं नेमून दिली. व सोनार व कुंभार व न्हावी व परीट व सुतार लोहार यांस बिरवाडी ठिकाणामध्यें ठिकाणें नेमून दिलीं. ... पुढें पाखाडी, कोंपरी उभागर वसाहत केली....उत्तरभागीं कोणी वली मुसलमान होता त्यानें मार्ग बंदिस्त करून आपणांस जागा बागशाई, ५० पावेतों माड वगैरे झाडें ऐसी नेमावणी करून रम्यस्थान केलें. ...

" **शिर्के यांचें ठिकाण मुर्डीत आहे कीं काय ?**:—— या प्रश्नास गणेश-राम खांवेटे उमर वर्षे पंचावन–समान मया व अलफ–यांनीं उत्तर दिलें तें:— ठिकाण घाटीवरी आहे, आगर जमीनींत नाहीं. प्रथम शिर्के आले ते तेथें राहिले. रहावयास कारण काय तरी, इदिलशाईचे अखेर कारकीर्दीस बंदर किनारेयाचे गांव समुद्रांतील गनीम येऊन मारीत, तेव्हां पातशाई यांणीं हुजूरनें बंदरकिनारा जागोजाग रखवालीस राखणार ठेविले. ते समयीं शिर्के आले ते मुर्डीत राहिले व आंजर्ल्यांतहि राहिले त्यामुळें ठिकाणाचें नांव शिर्के यांचें पडलें. **शिर्के वतनदार नव्हत...गांवची रचना शिर्के यांनीं केली नाहीं गांव मोकासे चालत होते.**

वरील परस्परविरोधी विधानांवरून ही गोष्ट स्पष्ट होते कीं, शिर्के येण्यापूर्वी आंजर्लें गांव अस्तित्वांत होता, तथापि आज दिसणारी गांवाची बहुतेक रचना आदिलशाहींतील सरदार शिर्के यांचे कारकीर्दींत झालेली असावी.

आंजर्लें हा गांव इतिहासप्रसिद्ध नाहीं तथापि समुद्रकिनाऱ्यालगत असल्यामुळें, येथें कधीं वर्चस्व शिद्दीचें तर कधीं आंग्र्यांचें तर कधीं मराठ्यांचें म्हणजे पेशव्यांचें अशा तऱ्हेनें एकसारखे हेलकावे खाणारें व अस्थिर असें येथील जीवित होतें व यामुळें अस्थिर जीवनदर्शक अनेक वाक्प्रचार इकडील भागांत रूढ होते. त्यांपैकीं हबशी यांचे जुलमामुळें " आजबाई सारवा उद्यांबाई तारवा " ही म्हण प्रचारांत आलेली होती. याचा अर्थ आज घराची सारवासारव, वगैरे कामें चालू आहेत परंतु उद्यां काय प्रसंग येईल याचा नेम नाहीं. " उद्यांबाई तारवा " म्हणजे उद्यांला पाहिजे तरी हबशी सरकारचे सैनिक येऊन पकडून तारवांत घालून घेऊनहि जातील असा आहे.

## केशव जाधवकृत आंजर्लें गांवचा पोवाडा

आंजर्ल्यांची रैना ऐका । तरी बंदरचा है नाका ॥
शेहेर आंजर्लें बहु विलासी । जशी हरीची द्वारका ॥
खाडीमध्यें येति गलबतें बंदर वसविला है बाका ॥
मिठागराची वखार याचा सौकार नारायण तोडणकर ॥
दारू गुत्त्याचें लायसन करितो तरीचा मक्ता आंगावर ॥
पुढें वडाचें झाड भंडारवाडा घरें हो बाजुला ॥
दहा वाजतांचा बाजार जाणा । दहा वाजतांचा बाजार जाणा ॥
तेथें मशीद आहे छान । तेथें मशीद आहे छान ॥

नामदेवाची पादुका जाण । नामदेवाची पादुका जाण ॥
कासारवाडा मोठा आखाडा विठोबाचें मधें देऊळ ॥
दोहीं बाजुनी पेठ वसविली तीन रस्त्यांचा एक पूल ॥
पुलापासुनी दीडहांकेवर नारायणाचें देऊळ ॥
स्नान नंदी महादेवाचा भगत बाळा जऊळ ॥
ताडाकोंडाची वाट घाटी । बांधिली कातळ फोडून ॥
दर्या वाढला तेव्हां राहिला । सयंभु गणपती वर जाऊन ॥
देवळाजवळची जाती वाट । देवळाजवळची जांती वाट ॥
फरसबंदी दगडाचा कोट । फरसबंदी दगडाचा कोट ॥
बकुळी बगिचा दाट दाट । बकुळी बगिचा दाट दाट ॥
आंबियाचा न्यारा थाट । जाईजुई मोगरा बेट ॥
जाईजुई मोगराबेट । आंजर्ल्यांची रैना ऐका ॥
भाऊशेट गुजर नाकेवाला । भाऊशेट गुजर नाकेवाला ॥
रत्नाभटची कोरटवाला । नवलॉ मारवाडी पेटीवाला ॥
येसाभाई फैसल झाला । येसाभाई फैसल झाला ॥
बाजारपेठ दिसे घनदाट मोठें मोठे शेटसावकार ॥
एकापेक्षां एक सवाई नवलक्षाचा व्यापार ॥
आंजर्ल्यांची रैना ऐका ॥
नार चातुर बोले उत्तर दादल्यास म्हणे तुम्ही ऐका ।
शहर आंजर्लें बहु विलासी जशी हरीची द्वारका ॥

---

# प्रकरण २ रें

## भौगोलिक

**भूगर्भ** :— सबंध महाराष्ट्रांतील सह्याद्रीचे फांटे ज्वालामुखी पर्वतांतून बाहेर आलेल्या रसाचे बनलेले आहेत. आजमितीला जवळपास कोठेंहि ज्वलत् ज्वालामुखी नसला तरी या भागाखालचे पृथ्वीचे पोटांत खळबळ सुरू झाली म्हणजे इकडील भागांत भूकंपाचे धक्के बसतातच. अशाप्रकारें भूकंपाचे तीन वेळचे धक्क्यांची हकीगत आमचे संग्रहीं आहे ती अशी :—

१. तारीख १८ फेब्रुवारी १९२९ रोजीं सकाळीं ६ ते ७ च्या दरम्यान उत्तरेकडून दक्षिणेकडे जमिनीच्या पृष्ठभागाखालून दोन धरणीकंपाचे धक्के बसले. पायांखालची जमीन चांगली हादरली. कित्येक लोक आंथरुणावर होते ते दचकून जागे झाले. समुद्रावर पुळणीवरून चालत असलेल्या लोकांसहि पायांखालची जमीन चांगली हालल्याचा अनुभव आला. सर्र, सर्र असा आवाज करणारे बंदुकीचे अगर तोफेचे आवाज एकामागून एक व्हावे तसे एकामागून एक दोन मोठे आवाज एक एक सेकंदाचे अंतरानें जमिनीखालून झाल्याचा भास झाला. हे दोन धक्के श्रीवर्धनपासून दाभोळच्या खाडीपर्यंत झाल्याचें समजतें. तसेंच पूर्वेकडेहि कित्येक गांवांत धक्क्यांचा अनुभव आला, मात्र कोठें घरें पडून नुकसान झाल्याचें ऐकिवांत नाहीं.

२. ता. ७ जुलै १९३३ या दिवशीं दिवस उगवण्यापूर्वी म्हणजे सुमारें ५ वाजतां एक अतिशय लहान असा धरणीकंपाचा धक्का बसला. माडीवर निजलेल्या, तसेंच बाजेवर निजलेल्या मनुष्यांना हा धक्का समजला. यापूर्वी म्हणजे १८।२।२९ या दिवशीं जसे स्पष्ट व जोरदार धक्के बसले तसा हा नव्हता यामुळें पुष्कळ लोकांस हा समजला नाहीं.

३. ता. ९ एप्रिल १९५१ ( चैत्र शु. ३, शक १८७३ ) या दिवशीं पहांटेस २॥ वाजतां सुमारें एक मिनीट दीड मिनीटपर्यंत धरणीकंपाचा धक्का भासला. बाज, माचा, पलंग इत्यादींवर झोंपलेल्यांस तो चांगला जाणवला. घरावरील पत्रे हालून आवाज देऊं लागले व कौलारू सबंध घरेंहि हालून त्यांचाहि करकर आवाज ऐकूं आला.

**भयंकर वादळें** :— वर दर्शविल्याप्रमाणें आंजर्लें हा गांव जसा धरणीकंपाचे पट्ट्यांत आहे तसाच तो मोठमोठ्या वादळांचे टापूंतहि आहेच. नमुन्याकरितां म्हणून अशाप्रकारच्या एक दोन वादळांचें वर्णन खालीं दिलें आहे:—

**१. शक १७६७ ( इ. स. १८४५ ) सालांतील भयंकर वादळ**—
" वैशाख शु. १ सोमवार रोजीं रत्नागिरी जिल्ह्यांत समुद्रकिनारीं भयंकर वादळ झालें व मागून मोठा पर्जन्य पडला. वादळ सुमारें एकप्रहरपर्यंत होतें. त्याची सुरुवात प्रातःकाळीं ४ घटका दिवसास झाली. वारा दक्षिणेकडून वाहूं लागला. घरांवरील कौलें झाडांच्या पाल्याप्रमाणें उडून गेलीं. मोठमोठे वृक्ष समूळ उपटून बरेच लांबीवर जाऊन पडले. समुद्रांत शेंकडों गलबतांचा माणसांसुद्धां नाश

झाला. वारा एवढा जोराचा होता कीं पूर्णगडचे बंदरांतील एक कोठा (मालवाहू मोठें जहाज) तडीस येऊन वाऱ्याचे व समुद्राचे लाटांचे जोरानें पाण्याचे बाहेर सुमारें २०० हातांवर वाळूंत जाऊन पडला. वारा कमी झाल्यावर पर्जन्य सुरू झाला. तो इतका कीं नद्यांस मोठाले पूर आले. विहिरी व तळीं पाण्यानें पूर्ण भरलीं. व पुराच्या योगानें पुष्कळ बंदिस्तीचा नाश झाला. या वादळाचे वेळीं मोठमोठीं झाडें आदळल्यामुळें तीं पुढें पहिल्याप्रमाणें उत्पन्न देत नाहींशीं झालीं. ”

[ शिवराम भास्कर काणेकृत रत्नागिरी जिल्ह्याचें भूवर्णन यांतील पृष्ठ २०-२१ वरून ]

सदरहू वादळ आंजर्लें गांवींहि याच तारखेला झालें. या वादळाला ‘ थोरलें घडकवणी ’ असें नांव दिलेलें आहे. कै. वे. केशवभट गोपीनाथ नित्सुरे यांनीं स्वतः पाहिल्यावरून हकीगत सांगितली कीं त्यावेळीं पाखाडींत पुष्कळ मुंजी होत्या. या मुंजींकरितां उभागरांतून पाखाडीस जाण्याची सोय नव्हती. याचें कारण वादळामुळें झाडें मोडून रस्त्यावर पडलीं होतीं, म्हणून वाट बंद झाली होती. लोकांचीं घरें फारच गळलीं. गांवांत दोन अग्निहोत्री होते त्यांचेकडील अग्नि विझून गेल्यामुळें नवीन अग्नि सिद्ध करावा लागला.

२. वरीलप्रमाणेंच ता. ३१ आक्टोबर १९३४ या दिवशींहि रात्रभर भयंकर वादळ होऊन, पोफळी, माड, आंबे वगैरे मोडून बरेंच नुकसान झालें. असें वादळ गेल्या ४०।५० वर्षांत कधींच झालें नव्हतें.

३. तारीख ९ मे सन १९४४ रोजीं रात्रौ १२ वाजतां मेघगर्जना होऊन भयंकर वारा सुटून एक तास पाऊस पडला. वारा इतका भयंकर होता कीं घरांवरील कौलें, पत्रे, गवती छपरें वगैरे वाऱ्यानें उडून गेलीं. शेंकडों पोफळी व कांहीं माड मोडले. तसेंच पुष्कळ केळीहि मोडल्या. आंब्यांचें तर फार नुकसान झालें. हा प्रकार दिवसा झाला असता तर माणसांसहि इजा झाली असती. श्रीगणपतीचे धर्मशाळेचे आढ्यावरील कौलेंहि उडून गेलीं. बकुळीच्या फांद्या मोडल्या. वरील प्रकार फक्त आंजर्लें गांवांतच झाला. या गांवांपासून दोन कोसांवरहि हा प्रकार झाला नाहीं.

**ऊष्णतामान:—** आंजर्लें हा गांव अगदीं समुद्रकिनाऱ्यावर वसलेला असल्यामुळें निरनिराळ्या ऋतूंतील ऊष्णतामानांत तसेंच एकाच दिवसांतील निर-

निराळ्या वेळच्या ऊष्णतामानांत देशावरील ठिकाणांप्रमाणें फार चढउतार होत नाहींत. समुद्राचें पाणी बरीचशी ऊष्णता सांठवून ठेवतें व जरूर तेव्हां ती देतें, यामुळें येथील हवामानांत असह्य होतील असे फार मोठाले फेरफार होत नाहींत. इ. स. १९२९ सालीं कमींत कमी ऊष्णतामान सरासरी ६०° व जास्तींत जास्त ऊष्णतामान ९०° अशी नोंद आहे. पावसाळ्यांत हें ऊष्णतामान ७५°–८०° असतें. इ. स. १९४१ मधील अधिकांत अधिक व कमींत कमी ऊष्णतामानाचे आंकडे अनुक्रमें ९०° व ६०° असे आहेत. एकाच दिवसांतील ऊष्णतामानांतहि येथें फारच अल्प चढउतार होतो. याची कल्पना येण्याकरितां, एप्रिल १९२९ मधील चढउताराचे आंकडे खालीं दिले आहेत. ते असे :—

| आठवडा | सकाळ | माध्याह्न ( १२ वा. ) | दुपारीं २ वाजतां |
|---|---|---|---|
| १ ला | ८२° | ८४° | ८६° |
| २ रा | ८४° | ८६° | ८८° |
| ३ रा | ८०° | ८८° | ९०° |
| ४ था | ८०° | ८६° | ९०° |

प्रत्येक नियमाला अपवाद हा असतोच; येवढेंच नव्हे तर अपवादांनींच नियम सिद्ध केले जातात अशी इंग्रजी भाषेंत एक म्हण आहे व त्याला अनुसरून इ. स. १९३५ चे जानेवारी महिन्याचे चार दिवस म्हणजेच ता. १४, १५, १६ व १७ या दिवशीं सकाळीं सात वाजतां हवेचें ऊष्णतामान अनुक्रमें ६३°, ६१°, ५६° व ६१° असें होतें. या वेळीं वारा फार असल्यामुळें तो अंगास झोंबून त्यापासून सर्वांनाच फार त्रास झाला.

**पर्जन्यमान** :— हा गांव पश्चिमेस अरबी समुद्र व पूर्वेस सह्याद्रीचे फांटे यांचे मध्यांत वसलेला असल्यामुळें येथें एकंदरींत पाऊस पुष्कळच पडतो. गेल्या कित्येक वर्षांचे पर्जन्यवृष्टीचे वर्षवार, महिनावार व नक्षत्रवार आंकडे खालीं दिले आहेत त्यांवरून वरील विधानाची सत्यता सहज पटण्यासारखी आहे :— ( १ ) १९४८ ( १०४–७५ ); ( २ ) १९४६ ( १६०–० ); ( ३ ) १९४५ ( ९०–६० ); ( ४ ) १९४४ ( १००–० ); ( ५ ) १९४३ ( १००–९० ), एकूण सरासरी १११–५.

## २ नक्षत्रवार पावसाचे आंकडे

| नक्षत्र | सन ( पाऊस ) १९३९ | १९४० | १९४१ | १९४२ | एकूण | सरासरी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ मृग | ७–५० | ४–१० | १०–३० | १६–२० | ३८–१० | ९–५२ |
| २ आर्द्रा | १८–२५ | २१–५ | ४–३० | २७–६० | ७१–२० | १७–८० |
| ३ पुनर्वसु | ३६–७० | ३–२० | ५–६५ | १०–३० | ५५–८५ | १३–९६ |
| ४ पूष्य | ५–९५ | २१–६० | १–६० | २२–८५ | ५२–०० | १३–०० |
| ५ आश्लेषा | ०–७५ | १०–३६ | २–२० | ६–४८ | १९–७९ | ४–९५ |
| ६ मघा | ९–५ | २५–१० | २– ० | ४–७५ | ४०–९० | १०–२२ |
| ७ पूर्वा | ११–५६ | १–० | ३–४० | १३–८५ | २९–८१ | ७–४५ |
| ८ उत्तरा | ५–६४ | ४–५ | ३–३० | ३–६५ | १६–६४ | ४–१६ |
| ९ हस्त | २–० | ०–० | ३– ० | ०–२५ | ५–२५ | १–३१ |
| १० चित्रा | – | ३–६० | – | – | ३–६० | ०–९० |
| एकूण | ९७–४० | ९४–६ | ३५–७५ | १०५–९३ | ३३३–१४ | ८३–२८ |

## ३ महिनावार पावसाचे आंकडे

| महिना | पाऊस – सन १९३२ | १९३३ | १९३४ | १९३५ | १९३६ |
|---|---|---|---|---|---|
| १ मे | – | १–७७ | – | – | २–३५ |
| २ जून | २०–६७ | २७–३१ | ५८–७६ | ३३–९२ | ४८–५६ |
| ३ जुलै | ४५–९२ | ४४–६० | ३१–७९ | २६–११ | २०–१५ |
| ४ ऑगस्ट | १८–४५ | ३९–८६ | ३३–५१ | २४–३८ | १७–३० |
| ५ सप्टेंबर | २४–४१ | २०–१५ | १०– ० | ३४– ९ | २६–६० |
| ६ आक्टोबर | ६–७० | ६–७० | – | – | – |

एकूण—६२४–६ ; सरासरी—१२४–९

वरील तीनहि कोष्टकांतील पर्जन्यमानाचे सरासरीचे आंकडे हे इ. स. १९३२–१९४८ या कालखंडांतील पर्जन्यवृष्टीचे आंकडे आहेत. त्यांची सरासरी काढल्यास १०६–१४ येते व ती सुमारें १७ वर्षांचे पर्जन्यवृष्टीचे आंकड्यांवरून काढलेली असल्यामुळें पुष्कळच बरोबर आहे हें उघड आहे.

**अवर्षणावर दैवी उपाय :—** एका बाजूला समुद्र व दुसऱ्या बाजूला सह्याद्रीचे फांटे यांच्या चिमट्यांत आमचा गांव वसलेला असल्यामुळें येथें पावसाचा

पूर्ण अभाव होऊन वर्ष कोरडें गेलें. भयंकर दुष्काळ पडला असें सहसा कधींच होत नाहीं. तथापि सतत १५।२० दिवस पाऊस अजिबात बंद होऊन कडक ऊन पडलें तर हळवीं भातशेतें, सड्यावरील नाचणी वगैरे पिकांस धोका निर्माण होतो.

अशा तऱ्हेची भीति निर्माण झाली असतां उभागरकर मंडळी कड्यावरील श्रीगणपतीचे शेजारचें 'श्रीहरिहरेश्वराचें' देवालय पाण्यानें भरून काढितात. सुमारें ८०० घागरी पाण्यानें हें देवालय भरतें. पाऊस पडेपर्यंत, रोज सकाळीं देऊळ भरावयाचें व सायंकाळीं सोडावयाचें असा सुमारें ३।४ दिवस क्रम चालतो. पाखाडींतील मंडळीहि त्यांचे आळींतील महादेवाचें देऊळ वरीलप्रमाणेंच भरितात. यास कांहीं शास्त्राधार दिसत नाहीं. तथापि रूढि मात्र आहे.

वरील दैवी उपायांप्रमाणेंच महादेवावर संततधार व रुद्राभिषेक ब्राह्मण मंडळीकडून करण्यांत येतो, तर अब्राह्मण मंडळी नामसप्ताह करितात.

पूर्वींच्या काळीं जुने लोक शृंगऋषीच्या मृण्मय मूर्तींची स्थापना करून तिची खालील मंत्रानें आराधना करीत असत. इ. स. १८९६ सालीं अशाप्रकारें मूर्तींची स्थापना केल्याचें आम्हांस चांगलें आठवतें. खालील मंत्राचा एक लक्ष जप करण्यांत आला होता. जपयज्ञ मंत्र :— ऋष्यशृंगाय मुनये विभांडक सुतायवै ॥ नमः शांताधिपतये सद्यः सुवृष्टि हेतवे ॥ १ ॥

वरील उपायांप्रमाणेंच श्रीक्षेत्र परशुराम येथें मेळाव्यानें पाऊस मागण्यास जाणें हाहि एक उपाय योजण्यांत येत असे. इ. स. १८९६ व १८९९ या सालीं कोंकणांत भयंकर दुष्काळ पडला होता; तेव्हां आंजर्लें गांवांतून प्रत्येक वेळीं सुमारें ५० लोक श्रीक्षेत्र परशुराम येथें पाऊस मागण्यास गेले होते. वाटेंतील कोणताहि गांव जवळ आला म्हणजे भजन करण्याची वहिवाट असे. मार्गावरील गांवकरी लोक सामोरे येऊन मुक्काम करण्याचा आग्रह करीत. अशातऱ्हेनें इ. स. १८९६ सालीं पहिला मुक्काम आसूद येथें, दुसरा खेडास, तिसरा लवेल येथें व चौथा खुद्द परशुराम येथें पडला होता. इ. स. १८९९ सालीं पहिला मुक्काम कै. हरीभाऊ बापट यांचे दापोली येथील बोर्डिंगांत पडला होता. परशुराम येथें गेल्यावर महारुद्र करण्यांत येत असे. परशुराम येथेंहि गांवकरी सर्व प्रकारें मदत करीत. तीन दिवस राहून सांगता झाल्यावर लोक परत फिरत.

ही प्रथा आतां बंद झाली आहे. तथापि बरेच दिवस पाऊस न पडल्यास लोक गांवांतल्या गांवांतच पाऊस मागत फिरतात अगर फार तर आडें येथील परशुरामास जातात.

## पावसाचे बाबतींत पाहण्यांत आलेला एक चमत्कार

ता. १०-७-४० रोजीं सकाळीं उजाडण्याचे सुमारास पावसाची मोठी सर आली पण ती फारच थोडा वेळ म्हणजे २।३ मिनिटेंच टिकली. पण चमत्कार असा कीं हें पावसाचें पाणी पांढऱ्या रंगाचें होतें. झाडांचे पानांवर, पऱ्यावर व गवतावर ज्या ठिकाणीं हें पावसाचें पाणी पडलें तो भाग पांढुरका दिसत होता.

---

# प्रकरण ३ रें

## दळणवळणमार्ग व साधनें

आंजर्लें गांव अगदीं समुद्रकांठीं असल्यामुळें व शिवाय त्याचे अगदीं लगत दक्षिणचे बाजूस चांगली मोठी व जीस कधींच पायउतार होत नाहीं अशी खाडी असल्यामुळें, व्यापारी मालाची ने-आण लहान-मोठ्या गलबतांतून होते. अगदीं अलीकडे कलमी आंब्यांचे करंड्यांची वाहतुक तेलावर चालणारे 'लॉंचेस' मधून व मोटार लाऱ्यांतून होऊं लागली आहे. आंजर्लें गांवास हर्णै हें अतिशय जवळचें बंदर असल्यामुळें, खुद्द आंजर्लें गांवांतील व जवळपासचे गांवांतील मंडळी मुंबई वगैरे ठिकाणीं जाण्यास याच बंदराचा उपयोग करितात. या बंदरांत मुंबईहून येणाऱ्या दोन व जाणाऱ्या दोन बोटी वर्षाचे आठ महिने चालू असतात. तसेंच आंजर्ल्यांचे दक्षिण बाजूस असलेले थेट खाडीपर्यंत मोटारी येण्यासारखा रस्ता असल्यामुळें, मुंबई, पुणें, कोल्हापूर, रत्नागिरी वगैरे भागांत जाणारे प्रवासी बाराहि महिने या मोटारीचे साधनाचा उपयोग करितात. आंजर्ल्यांचे पश्चिमेस अरबी समुद्र असल्यामुळें त्याबाजूचे वाहतुकीचा प्रश्न नाहीं. पूर्वेकडील भाग डोंगराळ व वस्ती लहान लहान गांवांतून वांटलेली असल्यामुळें या भागांत रस्ते चांगलेसे नाहींत. कांहीं मर्यादेपर्यंत कै. गजानन हरि साठ्ये यांचे पुरस्कारानें तयार झालेली लोकल-बोर्डाची सडक गेलेली आहे व कांहीं भागांत ग्रामस्थांचे प्रयत्नानें साधारण स्वरूपाच्या सडका झालेल्या आहेत व त्यां-

आ.क्र. 20962 दि: ११-१२-४
क्रमांक 204 नों: दि: 9.12.4

वरून बैलगाड्या चालतात. बाकी सर्व व्यवहार पायीं चालून व डोक्यावर ओझें वाहूनच करावा लागतो. अशक्त, दुबळे, आजारी वगैरे मंडळीस डोलींत घालून नेण्यांत येतें.

कोंपरीपासून उभागरांतून थेट गांवाचे उत्तर टोंकास असलेले सतीचे तळ्यापर्यंतचा रस्ता कृष्णाजी महादेव, राघो महादेव व मोरो सदाशिव कोल्हटकर यांनीं शक १७३० चे सुमारास त्यांस गांवांत रहावयास व आगरवाडीस दिलेले ठिकाणाचे मोबदल्यांत बांधिला. हाच रस्ता आंजर्ल्यांचे उत्तरेस असलेले, आडें, पाडलें, केळशी, वेळास, बाणकोट वगैरे गांवांवरून थेट मंडणगडपर्यंत गेला असल्यामुळें या रस्त्यावरून रात्रंदिवस रहदारी चालू असते. परंतु आंजर्ल्यांचे सीमेंत हा रस्ता अरुंद असल्यामुळें आंजर्लें गांवांतून बैलगाड्यांची जा–ये पूर्वीं नव्हती, परंतु शक १८५८ सालीं रस्ता ज्या ज्या ठिकाणीं अरुंद होता त्या त्या ठिकाणीं तो रुंद करण्यांत आला. तसेंच वाटेंत बैलगाडीस अडचण करणारा एक तिठा अथवा पूल होता तो गाड्यांचे वाहतुकीस अडचण करणार नाहीं असा उंगभा करण्यांत आला व अशा तऱ्हेनें आंजर्ल्यांतून बैलगाड्यांची वाहतूक नव्हती ती सुरू झाली. आतां याच रस्त्यावरून टुरिंग मोटारगाड्याहि जा–ये करूं लागल्या आहेत.

याच रस्त्यावर देवीचे देवळाचे उत्तरेस लिमये यांचे घरासमोर असलेली पाखाडी ( जांभ्या दगडाची फरसबंदी ) लिमयांपैकीं 'कृष्ण' या इसमानें बांधिली. तसेंच हाच गाडीरस्ता नमाजगण्यावर जेथें चढतो त्याचे पश्चिमेकडील बाजूस पूर्वींचा पाखाडीचा पादचारी लोकांकरितां बांधिलेला रस्ता या लिमयांपैकींच एका पुरुषानें बांधिला. याच पुरुषानें लागाठ्यांत जाण्याची पाखाडीहि बांधली अशी आख्यायिका आहे.

**पोष्ट व तार ऑफिस** :— आमचे गांवांत स्वतंत्र पोष्ट ऑफिस आहे, पण प्रत्यक्ष तार ऑफिस मात्र नाहीं. तथापि हर्णै येथें तार ऑफिस असल्यामुळें कांहीं ठराविक वेळांत, स्थानिक पोष्टमास्तरांकडे तार नेऊन दिल्यास ते पुढील तजविजीकरितां ती हर्णैस रवाना करितात. तसेंच हर्णै ते आंजर्लें अंतर ३ मैलांचे आंत असल्यामुळें, आंजर्ल्यांकरितां हर्णैस आलेली तार, तारेचा शिपाई आंजर्ल्यांस आणून पोंचवितो व त्याबद्दल जादा आकार द्यावा लागत नाहीं.

# प्रकरण ४ थें

## गांवाचे निरनिराळे विभाग

१. बिरवाडी :— हा सर्वांत आधीं वसलेला गांवाचा भाग होय. कारण सर्वांत महत्त्वाची ग्रामदेवता याच भागांत असून त्या देवतेचे नांवावरून या भागास वरील नांव मिळालें असावें. कारण 'बिरवाडी' हा बहिरववाडी याचा अपभ्रंश आहे. ब्राह्मण खेरीज करून अन्य सर्व जातींचे मानकऱ्यांचीं सर्व मानस्थानें याच भागांत आहेत. श्रीदुर्गादेवीचे यात्रेसंबंधीची विडेवांटणीहि याच भागांत होते. यावरून बिरवाडी अथवा बहिरववाडी हेंच मूळ आंजर्लें होय. या भागांत मुख्यतः सुतार, कुंभार, न्हावी, चांभार व थोडे मराठे अशा लोकांची वस्ती आहे.

२. कातळकोंड :— वरील बिरवाडीपासून निघून पूर्व-पश्चिम जाणारे मुख्य मार्गानें पश्चिमेकडे आलें म्हणजे रस्त्याचे उजव्या बाजूला टेंकडीचे उतारावर वस्ती आहे. या भागाला कातळकोंड म्हणतात. हा बहिरववाडीपेक्षां नवा पण ब्राह्मण वस्तीचे उभागर, पेठपाखाडी वगैरे भागांचे आधीं वसलेला भाग असावा. या भागांत मुख्य वस्ती तेली व गावडे मराठे लोकांची आहे.

३. पेठपाखाडी :— वरील पूर्व-पश्चिम रस्त्यानें कातळकोंडाच्या थोडें पुढें आलें कीं एक रस्ता डाव्या हातास दक्षिणेस वळतो. त्या भागास पेठपाखाडी म्हणतात. हा भाग बराच अलीकडे म्हणजे आदिलशाहींतील शिर्के यांचे अमदानींत वसलेला आहे. या भागांत मुख्य वस्ती ब्राह्मणांची असून कांहीं थोडीं तेल्यांचीं घरेंहि या भागांत आहेत.

४. कोंपरी :— बहिरीचे देवळापासून पूर्व-पश्चिम जाणारे रस्त्यानें आपण आतांपर्यंत पेठपाखाडीचा रस्ता फुटेपर्यंत आलों. तसेंच थेट पश्चिमेकडे त्याच रस्त्यानें आणखी पुढें गेलें म्हणजे रस्त्याचे दुतर्फा असलेले व तेथून पुढें दक्षिणेकडे तरीबंदराकडे जाणारे रस्त्यावरील भागाला कोंपरी ही संज्ञा आहे. हा भागहि शिरके यांचे वेळींच वसलेला भाग होय. या भागांतहि मुख्य वस्ती ब्राह्मणांची असून थोडीं शिंप्यांचींहि घरें याच भागांत आहेत.

५. भंडारवाडा :— कोंपरी भाग सोडून आपण आपली पश्चिमेकडे जाण्याची गति कायम ठेविल्यास वाटेंत एका बाजूला मारवाडी, गुजर वगैरेंचीं दुकानें येतात व आणखी पुढें गेलें म्हणजे आपण बहिरीचे देवळापासून धरलेला रस्ता थेट समुद्रापर्यंत जातो. या रस्त्यावरील वस्तीस, तसेंच याच रस्त्यांतून फुटून दक्षिणेकडे तरीबंदरापर्यंत जाणारे भागास भंडारवाडा असें नांव आहे. तथापि आरंभीं मारवाडी, गुजर वगैरेंचीं दुकानें असल्यामुळें या भागाला बाजारपेठ, असेंहि कधीं कधीं म्हणण्यांत येतें. हल्लीं कोंपरींतून थेट तरीबंदरपर्यंत जाणारे रस्त्यावरहि बरींच दुकानें झालीं आहेत. विठोबाचे देवळाचे जवळपास सोनार व कांसार या लोकांची वस्ती असल्यामुळें त्या भागास सोनार व कासारआळी असें म्हटलें तरी चालेल. या दक्षिणेकडे जाणारे रस्त्यानें पुढें गेलें कीं मुसलमानांची मशीद व थोडी मुसलमान वस्ती आहे. तात्पर्य, या भागांत सोनार, कांसार, मुसलमान यांची व मुख्यतः भंडारी लोकांची वस्ती आहे. या भंडारी लोकांची वसाहत वरील पेठपाखाडी, कोंपरी, उभागर वगैरे भागांचे मानानें बरीच अलिकडचे काळांतील असावी असें दिसतें.

६. नवानगर ( भाटवाडी ) :— भंडारवाड्याचे उत्तरेस व उभागराचे पाठीमागचे भागांत नैऋत्य कोंपऱ्यांत जी वस्ती आहे तिला ' नवानगर ' असें म्हणतात. या अगदीं चिमट्यांत असलेल्या भागांत बहुतेक वस्ती मराठे लोकांची व थोडी कुणबी लोकांची आहे.

७. उभागर :— बाजारपेठेचे तिठ्यावरून एक रस्ता सरळ उत्तरेकडे गेलेला असून त्याचे दुतर्फा घरें आहेत. गांवाचा सर्वांत व्यवस्थित वसलेला हा भाग आहे. याला उभागर म्हणतात. यांतील सर्व वस्ती ब्राह्मणांची असून, श्रीदुर्गादेवीचें गांवांतील प्रमुख देवालयहि याच भागांत आहे.

८. ताडाचा कोंड :— उभागराचे पूर्व बाजूस असलेले टेंकडीवरील वस्तीचे भागास ताडाचा कोंड म्हणतात. या भागांतील सर्व वस्ती कुणबी अथवा कुळवाडी लोकांची आहे.

९. चिखलतळें :— बिरवाडीचे ईशान्येस एका उंचवट्यावर ही वस्ती आहे. या भागांत जवळ जवळ होरून गेलेलें एक तळें आहे. त्यास चिखलतळें हें नांव असल्यामुळें येथील वस्तीस ' चिखलतळें ' असेंच म्हणतात. या भागांत सर्व वस्ती कुळवाडी लोकांचीच आहे.

# प्रकरण ५ वें

## ग्रामसंघटना

हल्लींच्याप्रमाणें पूर्वींच्या काळीं निवडणुका व त्यासंबंधाच्या विशेष भानगडी आजच्या स्वरूपांत नसल्या तरी, गांवाचीं सामाजिक, धार्मिक वगैरे सार्वजनिक व खाजगीहि कृत्यें व्यवस्थित चालण्याकरितां गांवचे प्रमुख, त्यांचे दुय्यम वगैरे मंडळी, वतनदार व वंशपरंपरागत असत व त्यांच्या प्रत्यक्ष निवडणुका होत नसल्या तरी, एखाद्या मानकऱ्याचा निर्वंश झाला म्हणजे तो मान दुसऱ्या एखाद्या योग्य घराण्याकडे गांवाचे संमतीनें देण्यांत येत असे. तसेंच एखादे कार्यकारी अथवा मानकरी कुळांत त्या कुळाकडे असलेलें काम चालविण्यास योग्य माणूस नसेल तर त्या कुळांतील मंडळीस आपले वतीनें दुसऱ्या कोणत्याहि कुळांतील लायक माणूस बदली द्यावा लागत असे. मात्र मान व त्याबरोबर येणारें काम हें वंशपरंपरागत असल्यामुळें कुळांत कामाला लायक माणूस निर्माण होतांच त्या त्या कुळांतील मान व तदंगभूत कामगिरी त्या त्या कुळांत परत येत असे. अर्थात् मनुष्यस्वभावास अनुसरून क्वचित् प्रसंगीं बदली नेमलेला माणूस व त्याचे वंशजच हक्क लाटून बसत व कटकटी करीत अशीं कांहीं उदाहरणें आहेत.परंतु एकंदरींत तीं फार थोडीं आहेत.

फार प्राचीन काळापासून आजतागायत चालत आलेली आमचे गांवांतील संघटना खालीलप्रमाणें आहे :— ( १ ) धार्मिक प्रमुख म्हणजेच पंचमाने व ( २ ) सामाजिक प्रमुख. धार्मिक प्रमुख अथवा पंचमाने म्हणजे– ( १ ) उपाध्ये ( २ ) जोशी ( ३ ) वेळासकर-जोशी ( ४ ) धर्माधिकारी-विद्वांस ( ५ ) भट-महाजन हे होत. सामाजिक प्रमुख म्हटले म्हणजे ( १ ) महाजन ( २ ) वर्तक हे कारभारी व ( ३ ) कुळकर्णी-लिमये व ( ४ व ५) चौगुले (पेंडसे व साठे) हे होत. या मानकरी मंडळींतहि अग्रपूजा कोणाची तसेंच कोणत्या कृत्यांत यांपैकीं कोणास आमंत्रण देणें अत्यंत आवश्यक यासंबंधी बंधनें आहेत तीं अशीं :—

**पंचमान्यांस बोलावणें केव्हां आवश्यक :—** ज्या कृत्यांत ‘ पुण्याह-वाचन ’ आवश्यक आहे अशीं सर्व कृत्यें त्याचप्रमाणें, सीमांतपूजन, वाग्निश्चय,

पंचमी व षष्ठीपूजन, ऐरणीपूजन आणि लक्ष्मीपूजन इतक्या सर्व प्रसंगीं, उपाध्ये, जोशी, वेळासकर-जोशी, धर्माधिकारी-विद्वांस, भट-महाजन व महाजन वर्तक कारभारी या सर्व मानकऱ्यांस आमंत्रण देणें जरूर असतें.

## सामाजिक प्रमुख यांचे मान, कामें व हक्क इत्यादि

**१. महाजन कारभारी** :— सर्व गांवाचे प्रमुख या दृष्टीनें, सार्वजनिक स्वरूपाचे धार्मिक व सामाजिक कृत्यांचेवेळीं तसेंच देवस्थानांच्या यात्रा, उत्सव वगैरे प्रसंगीं उपस्थित राहून सर्व कार्यक्रम पूर्वापार वहिवाटीप्रमाणें यथासांग पार पाडणें. लग्न-मुंज इत्यादि समारंभांत दक्षिणा वांटणें इत्यादि महाजनांची कामगिरी होय. वरील कामगिरीबद्दल महाजनांस क्रमप्राप्त झालेले हक्क व मान :– (१) अग्र-पूजा म्हणजेच कोणत्याहि सभेंत गृहस्थमंडळींत प्रथम गंध (२) नारळवांटणी असेल तेव्हां नारळांची जोडी (३) पुण्याहवाचन असलेले किंवा पंचमीपूजन व षष्ठीपूजन वगैरे कृत्यांत उपाध्ये यांनीं 'निरोप' असे शब्द उच्चारून कृत्य समाप्तीची परवानगी मागितली असतां ती 'चालूं द्या' या शब्दांनीं देणें (४) श्री-दुर्गादेवी यात्रेंत गुरवाकडून ढोलाचें मुद्दाम आमंत्रण, (५) गांवांतील प्रथम पंचांग श्रवण (६) रथाची मानाची विशेष पूजा (७) श्रीदुर्गादेवीचे प्रयोजनांत पानें प्रोक्षण करून उदक सोडणें.

**महाजनांची परंपरा** :— उपलब्ध माहितीप्रमाणें जुन्यांत जुनें महा-जनाचें नांव 'साराप्पा' महाजन असें मिळतें. त्यानंतर आदिलशाहींत 'दातीर' व शिर्के हे महाजन होते व त्यानंतर आजकालचे महाजन 'भट' हे झाले. या बाबतींत अंताजी गोविंद खांबेटे यांची व कृष्णाजी नारायण (शिंत्रे) सुकोंडकर खोत, मौजे कोंगळें यांची अशा दोन साक्षी व तानाजी बिन सकोजी राजे शिर्के यांचीं दोन पत्रें फार महत्त्वाचीं आहेत.

**सुकोंडकर खोत यांची साक्ष** :— भट यांस केतकर वरित आंजलें असें लिहिलें महाजन लिहिलें नाहीं याचें कारण— शिर्के यांचे कारकीर्दीस केतकीहून महादेवभट याचा निपणजा आला तो शिर्के यांचें उपाध्येपण करून होता. शिर्के यानें ग्रामस्थांजवळून सहावें (पांचवें पाहिजे) गंध व सहावा (पांचवा पाहिजे) मान करून दिला. शिर्के गांवचे वतनदार नव्हत. पातशाकडून मोकासा होता. शिर्के यांचें मोडल्यावर मागें भट कारभार करूं लागले. पूर्वीं शिर्के यांचे वेळेस महाजन दातीर होते.

अंताजी गोविंद खांबेटे यांची साक्ष :— 'भट' हे शिर्के यांचे पुरोहित, शिर्के इदिलशाईपुढें रखवालीस होते त्यानंतर मोकासा गांव झाले तेव्हां येथील महाजनकी दातीर चालवीत असत. विजापुरची सनद दातीर यांणीं आणिली महाजनकीचा पांचवा मान भटांस शिर्के यांनीं ग्रामस्थांपासून करून देऊन ठिकाण देऊन देवविला. शिर्के मोडले त्यावर अलीकडे भट निमे व दातीर निमे चालवूं लागले. भटांचे व दातीर यांचे अगोदर 'साराप्पा' महाजन होता. त्याचें ठिकाण आहे तेथें अद्यापि... ढोल मान देतात. मूळ महाजन 'सारापा' याचें ठिकाण गण जोशी म्हणजे हरीभाऊ जोशी पाखाडी हें होय.

## शिर्के यांचीं पत्रें

[ श. १७२७ फाल्गुन शु. ३; सन १८०६ फेब्रुवारी २१ ]

......श्री समस्त कारभारी व समस्त...... तर्फ केळशी अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य ...... स्ने॥ ...... तान्हाजी राजे शिर्के महाजन कसबे मजकूर दंडवत व रामराम विनंति येथील कुशल जाणून स्वकीये कुशेल लिहित असले पाहिजे. विशेष आपणांकडून पत्र येऊन सविस्तर कलवण्या नंतरी श्रीदेव याणीं वडिलोपार्जित वृत्तिस्थानाचे दर्शनास येण्याविसी मनास संचार केला त्यावरून पेशजी आमचे निसबतीनें वृत्तीचें काम ...... व राजवाडी आगराची वो वहिवाट करीत होते त्यांचे वौसिक महादेवभट व गोपाळभट भट हे येथें पुणियाचे मुक्कामीं सन इसने मयातैनात उभयेता आले होते. त्यास भेटीस बलाविलें. त्याणी भेटीस न येतां आम्हासी नौदिगरीच्या गोष्टी सांगूं लागले. त्याजवरून सरकारचे कानावर घालून, राजश्री बालोजी बाबा कुंजीर सुभेदार तालुके सुवर्णदुर्ग यास ताकीद जाहली कीं आमचें वतन आमचे हावाली करावे त्याचा फडशा होऊन उलगड्यांत यावे तो आम्हीं सरकारचे आज्ञे प्रो स्वारींत गेलों. मागें भटजी निघोन गेले. पुढें दंगा होऊन आजपर्यंत तसेच राहिले. साल मजकुरीं; सदर वतनाचे फडशाकरितां माहाजनकीचे व राजवाडी आगराचे वगैरे जसी सरकारांतून करऊन भट यास पुणीयास आणविले आहेत तरी फडशांत लौकरच येईल हालीं श्रीदेवाकरितां पोशाख सनगे येणे प्रो.

श्रीलक्ष्मी नारायणदेव यास धोत्र जोडे दोन दरसाल पेशजी आमचे वडील परागंदा जाले ते समई आमचे निसबतीनें कारभारावर भट ठेविले होते, त्यांस द्यावयास सांगितले होते त्या प्रो पावतच आले असतील. हाली येथून श्रीदेवास धोत्र जोडा येक प॥ आहे हा नेसवावा. कलम १.

श्रीदुर्गाभवानी देवीस लुगडें व चोळखण पाठविला आहे. हा नेसवावा कलम १.

श्रीकालभैरव देवास पागोटें व फडकी येकूण सनग दोन पा। आहेत कलम १.

सदरहू पांच सनगे श्री देवास पाठविलीं आहेत ही सर्वत्र......भाऊ वगैरे बालगोपाल मिळोन देवास नेसऊन श्रीचा कौल घेऊन पत्राचें उत्तर पाठवून द्यावें. मि॥ फाल्गुन शु॥ ३ शके १७२७ बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विनंति.

सदरहू वस्त्रें श्री देवास चैत्र मासीं दिनकरपंत कारकून......याणें दिल्ही असेत. शके १७२८ क्षयनाम संवत्सरी.

[ श. १७२१–२२ ; स. १७९९–१८०० ]

श्रीमंत राजश्री पंतप्रधान साहेबांचे शेवेशीं पो बो तानाजी बिा सकोजी राजे सिरके माहाजन को आंजरले तर्फ केळशी सुभा सन मया तैन व अलफ. आपले वडील को मजकुरी राजवाडी ठिकाण वतनीं आपलें आहे तेथें राहून माहाजनकीचे वतनाचा अनुभव करीत होते ते परागंदा जाहाल्यास बहुत दिवस जाहाले. त्यापासून को मजकूरीं आपले वतनावर यावे हे आपले बापापासून आज पावतों घडलें नाहीं आतांही गांवीं यावयाचें प्रयोजन पडलें नवते परंतु आपला कुलदेव श्रीकालभैरव को मजकूर याचा उपद्रव होऊं लागला त्यावरून वडिलांचें मुखचें ऐकीव मागील कुळकटीचा शोध पाहातां आपले वतनाचा देव व गाव आहे त्यास वतनावर जावें असें जाहालें त्यावरून येविसिंचा शोध आपले वडील को मजकुरी नांदत होते त्यावेळेस मौजे कोंगळे ता। मजकूर येथें ब्राह्मण उपनाम भट होते त्यास आपले वडिलांनीं आपले घरचे पुरोहित को मजकूरचें दिलें होतें त्यास येणें जाणें दूर पडो लागले सा। को मजकूरीं ब्राह्मणाकडील पांचवा मान व आगर ठिकाण देवऊन गांवीं आणून ठेविले होते त्यास वडील गावीहून गेल्यावर मागें पुरोहित भट आमची आगरवाडी महाजनकी देखील झाडून वतनाची वैवाट करूं लागले त्यावरून हालीं वे राजश्री महादेव भट व गोपाळ भटाचे वंशज्य वतनाची वैवाट करितात त्यांस भेटीस येण्याविसीं वगैरे बोलण्यास रा॥ बाबुराव सुरवे यांस पाठविलें त्यांस मा॥र निल्हेनीं नौदिगर गोष्टी बोलून सरकारांत फीर्याद येऊन आमचे वतनाचा लोप करो पाहतात त्यास बहुत दिवस परागंदा सा। आपण क्रियाजल येविसीची चौकशी करून पांढरीच्या मुखें आम्हीं वतनदार महाजन को मजकूर हे खरे जाहाल्यास आमचे वतन आमचे हवालीं करावें आम्ही सदरहू लिहिल्या-

प्रमाणें को॥ मजकूरचे वतनदार याचे सही साक्षीनिसी खरें करून देऊं. न देऊं तर सरकारचे गुनेगार.

पो॥ बो॥ भगवतराव गुजर खोत मौजे सेवसी तर्फ खेड ता॥ सुवर्णदुर्ग सुमा सन मया तैन अलफ लिहून दिल्हा जामीन कतबा ऐसीजे राजश्री तानाजी बि॥ सकोजी राजे सिरके महाजन को॥ आंजर्ले तर्फ केळशी यासी वेदमूर्ती राजश्री महादेव–भट भट हे महाजनकी व आगर ठिकाणासी वाद सांगतात सा॥ येविसीची पंचाईत पडली आहे यास राजे मजकूर...यांणीं कतबे लिहून दिल्हे आहेत त्यांची चौकशी को॥ मजकूरच्या वतनदारांचे सडीसाक्षी निसी मनास आणून वाजवीचे रीतीनें इनसाफ होऊन आज्ञा होईल त्याप्रमाणें यानें मारनिल्हे वर्तणूक करतील न करतील तर आपण खुद नि॥ वर्तऊन देऊं.

भट महाजन यांचें नवें वर्ष ज्येष्ठ शु. १५ चे दिवशीं वडाची पूजा झाल्यावर सुरु होतें.

२. **वर्तक कारभारी** :— महाजन व वर्तक हीं गांव गाड्याचीं जणूं दोन चाकेंच होत. सार्वजनिक कामांत दोघांचाहि मान सारखाच. तरतमभाव कांहीं नाहीं. महाजनांप्रमाणेंच सर्व गांवचे प्रमुख या दृष्टीनें, सार्वजनिक स्वरूपाचे धार्मिक व सामाजिक कृत्यांचे वेळीं तसेंच देवस्थानांच्या यात्राप्रसंगीं उपस्थित राहून सर्व कार्यक्रम पूर्वापार वहिवाटीप्रमाणें यथासांग पार पाडणें, लग्न–मुंज इत्यादि समारंभांत नारळ वांटणें, यात्रांचे प्रयोजनांत तूप वाढणें इत्यादि, हीं वर्तक यांचीं कामें होत. वरील कामगिरीबरोबर वर्तक यांस क्रमप्राप्त मिळालेले हक व मानः—( १ ) अग्रपूजा म्हणजेच कोणत्याहि सभेंत गृहस्थ मंडळींत महाजनांनंतर दुसरें गंध ( २ ) नारळ वांटणी असेल तेव्हां, नारळांची जोडी ( ३ ) श्रीदुर्गादेवी यात्रेंत गुरवाकडून महाजनांप्रमाणेंच मुद्दाम ढोलाचें आमंत्रण (४) महाजनांनंतर क्रमांक दोनचें पंचांगश्रवण (५) महाजनांप्रमाणेंच मानाची विशेष रथपूजा ( ६ ) कांहीं ठराविक घराण्यांत रथपुतळी, रथांत बसविण्याचा व पुन्हा जाग्यावर आणून ठेवण्याचा मान इ०

**वर्तकांची परंपरा** :—आजचे विद्यमान वर्तक खाडीलकर उपनांवाचे आहेत. त्यांचे वतनासंबंधानें कांहीं वाद झालेला आढळांत नाहीं. तथापि हरी रघुनाथ व गणेश नारायण भट महाजन, यांनीं, त्यांचे महाजनकीचे वादांत शक १६८७ मध्यें केलेले एका ‘तकरीरींत’ ‘खाडीलकर वर्तक व शिंत्रे वर्तक’ असा उल्लेख केलेला आहे, यावरून एका काळीं खाडीलकर व शिंत्रे असे दोनो

वर्तक असावे असें मानावयास जागा राहते. मृग नक्षत्राचे सुरुवातीपासून यांचें नवें वर्ष सुरू होतें.

३. कुळकर्णी (लिमये) :—गृहस्थांपैकीं हे तिसऱ्या क्रमांकाचे मानकरी होत. महाजन वर्तकांप्रमाणेंच यांस अग्रपूजा म्हणजे तिसऱ्या क्रमांकाचा गंधाचा मान आहे; तसेंच नारळ वांटणींत नारळांचे जोडीचा मानहि आहेच. तथापि सार्वजनिक कामांत महाजन वर्तकांप्रमाणें यांची नजरेंत भरण्यासारखी कामगिरी आजमितीला तरी कांहींच दिसत नाहीं. पूर्वीचे काळचे गांवाचा वसूल करणारे व त्याचा जमाखर्च ठेवणारे सरकारी अधिकारी म्हणून त्यांचा मान सुरू झाला व तो आजतागायत चालू असावा असें दिसतें. श्रीदुर्गादेवीचे यात्रेंत ते वसुलाचें व लिहिण्याचें काम अद्यापिहि करितात. मध्यंतरीं कांहीं दिवस ह्यांचा मान बंद होता. तो इ. स. १९१२ पासून पुन्हां सुरू झाला आहे.

४. चौगुले—पेंडसे व साठे :—गृहस्थांपैकीं हे चौथ्या क्रमांकाचे मानकरी होत. यांसहि अग्रपूजेचा व नारळांचे जोडीचा मान आहे. सार्वजनिक कार्यांत यांची कामगिरी आजमितीला कांहींच दिसत नाहीं. यांचाहि मान कुळकर्ण्यांप्रमाणेंच सरकारी नोकर म्हणूनच पूर्वीचे काळीं सुरू झाला असावा.

चौगुल्यांची परंपरा :—हरी रघुनाथ व गणेश नारायण भट महाजन यांनीं शक १६८७ मध्यें दाखल केलेले 'तकरीरींत' "चौगुले चार, त्यास पहिले चोपडे, दुसरे पेंडसे, तिसरे खाडीलकर व चौथे सांप्रत साठे" असें म्हटलें आहे. यांतील 'सांप्रत' या शब्दावरून साठे चौगुले बऱ्याच अलीकडील काळांत ग्रामस्थांनीं निर्माण केले असावे. व या विधानास थोडासा आधार खालील उताऱ्यांत मिळतो तो असा—कै. धोंडो केशव साठये यांनीं शक १७०५ शोभन नाम संवत्सरे या वर्षीं बाळाजी विश्वनाथ व गणेश विश्वनाथ साठे, चौगुले यांस अजीद ऊर्फ बेदावा पत्र लिहून दिलें आहे त्यांत—"विसाजी गोविंद यानें श्रीदेवीस कोठार देऊन ग्रामस्थांपासून चौघुलकीचा मान करून घेतला" असें म्हटलें आहे. आजमितीला चोपडे या उपनांवाचे कोणीहि गृहस्थ गांवांत नाहींत; गांवांत खाडीलकर आहेत परंतु त्यांत कोणी चौघुले नाहींत. सर्व वर्तकच आहेत. तेव्हां राहतां राहिले चौगुले दोन, पेंडसे व साठे व त्या दोघांत जोडी फोडून देण्यांत येते.

## धार्मिक प्रमुख यांचे मान, हक्क, कामें इत्यादि

१. उपाध्ये (नित्सुरे) :—अब्राह्मणांपैकीं कांहीं अपवाद सोडून गांवांतील सर्व हिंदूंकडील जन्मापासून मरेपर्यंतचे सर्व धार्मिक कृत्यांचें पौरोहित्य यांच्या

कडे आहे. वैदिक मंडळींत अग्रपूजा म्हणून सर्व कृत्यांत यांस प्रथम गंध लावण्यांत येतें. श्री दुर्गादेवी प्रयोजनाचें फक्त आमंत्रण करणें व श्रीनारायण, श्रीरामजी इत्यादि देवस्थानांचे सार्वजनिक प्रयोजनांचे वेळीं भोजनाचें आमंत्रण करून भोजनास आरंभ होण्यापूर्वीं पानें प्रोक्षण करून उदक सोडणें ही कामगिरी यांचेकडे आहे. श्रीशंकराचार्य अथवा एखाद्या देवतेची स्थापना इत्यादि प्रसंगीं सर्व गांवकऱ्यांचे वतीनें म्हणून जेव्हां जेव्हां पूजा व्हावयाची असेल तेव्हां ती उपाध्यायच करितात. लग्न-मुंज इत्यादि कार्यांत जेव्हां सभादक्षिणा वांटण्यांत येते तेव्हां सभेचें आमंत्रण खालील वैदिक मंत्रानें हेच करितात. तसेंच सभा दक्षिणेंत जी उत्तमप्रत ठरली असेल तिच्या दुप्पट दक्षिणा यांस मिळते. वैदिक प्रार्थना— [ ऋक्संहिता अष्टक ४, अध्याय ७, वर्ग २१, मंत्र ४ ]

अश्वीरथी सुरूपऽ इद्गो मॉँऽइदिं द्रतेसखा ।
श्वात्रभाजावयसा सचते सदा चंद्रो यातिसभामुप ॥

नित्सुरे उपाध्ये मंडळीकडे आंजर्लें धरून शिवाय सुकोंडी, कोंगळें, तुरवडें व सातांवें अशा एकंदर पांच गांवची उपाध्येपणाची वृत्ति चालू आहे. व मुर्डी गांवचीहि वृत्ति यांचेकडेच होती परंतु यांचे पडते काळांत ती विद्वांस-धर्माधिकारी यांनीं बळकावली असें दिसतें. ही उपाध्येपणाची वृत्ति आजमितीला नित्सुऱ्यांपैकीं महादेव, गोविंद, आणि रामचंद्र या तीन जणांचे वंशांत दर तिसरे वर्षीं याप्रमाणें समजली जाते. महादेवाचे वंशापैकीं आजमितीला आंजर्लें येथें कोणी नाहीं. शक १७८५-८६ सालचे विनायक बल्लाळ यांचे जमाखर्चाचे वहीवर (१) जालगांवकर व जांभूळपाडकर ( महादेवाचे वंशज ) (२) भटांचें कूट (गोविंदाचे वंशज) आणि खुद्द (३) ( रामचंद्राचे वंशज ) याप्रमाणें उपाध्येपणाचे पाळीची नोंद आहे. व आजहि ती त्याच क्रमानें चालते. सिंहस्थ हें साल तिन्ही कुटांचें मिळून समाईक समजलें जातें आणि त्याचें उत्पन्न सर्वांचे विचारें खर्चिलें जातें. रामचंद्राचे वंशांत पोटहिस्सेदार चार- (१) रुद्र (आनुबाई) (२) नारायण भटाचें कूट (३) रघुनाथ भट इ. गोविंदाचें कूट व (४) शिवाचें कूट-असल्यामुळें सुमारें १२ वर्षांनीं प्रत्येकाची पाळी येते. यांत रुद्राचा म्हणजेच आनुबाईचा वंश शिल्लक नाहीं, परंतु क्रमाचा गोंधळ टाळण्याकरितां तिचें साल बाकीचे तीन कुटांत समाईक समजून उत्पन्न त्या तीन कुटांत वांटलें जातें.

वरील माहिती चटकन लक्षांत यावी म्हणून वृत्तीपुरता वंशवृक्ष खालीं दिला आहे.

केशव
|
हरभट
|
[illegible] — गोविंद — रामचंद्र

| [illegible] | गोविंद | रामचंद्र |
| --- | --- | --- |
| जांभूळपाडकर व पुणेंकर | १ गजानन रामकृष्ण<br>२ सिताराम गणेश | १ रुद्र २ नारायण<br>३ गोविंद ४ शिव |

**उपाध्यांची परंपरा** :—(१) गांवांतील आपस्तंब शाखीयांचें उपाध्येपण ' भाभे ' यांजकडे होतें. पुढें त्यांचा निर्वंश झाल्यावर आपस्तंब शाखीयांसुद्धां सर्व गांवचें उपाध्येपण नित्सुरे यांजकडे आलें.(२) शिवाजी महाराजांचे वेळेपासून नित्सुरे उपाध्ये म्हणून नांदत असल्याचा पुरावा असला तरी त्यांचे पूर्वीं पाटणकर उपाध्ये असल्याचा कांहीं कागदांत उल्लेख आहे येवढेंच नव्हे तर एका जुन्या कागदांत पाटणकर, नंतर वेळासकर व नंतर नित्सुरे सोमभट त्याचे पुत्र नारंभट उपाध्ये असाहि उल्लेख आहे.

नित्सुरे यांचे वृत्तीचा वर्षारंभ कार्तिक शु. १ पासून होतो.

२. **ग्रामजोशी** :— उपलब्ध माहितीप्रमाणें कोणी एक पांगा जोशी, सर्व गांवाचा जोशी होता. त्याचे पश्चात् त्याची वृत्ति हल्लींचे शांडिल्य गोत्री जोशी यांजकडे आली. या पांगा जोश्यासंबंधी बरीच माहिती हरी रघुनाथ व गणेश नारायण भट-महाजन यांचे जबानींत आली आहे ती अशी— " जोशी यांचे मूळ पूर्व ' पांगा ' जोशी म्हणोन पूर्वीं होता. तो सारे गांवची वृत्त चालवीत होता. व वेलाटीचे गांव वृत्ति चालवित होता. तो मृत्य पावला. त्याचें ज्योतिषपण, वरवडे-कर शांडिल्य गोत्री यांस दिलें. त्याचीं आगर ठिकाणें शांडिल्य गोत्री यांचे हवालीं केलीं. त्याल उपरांतिक पांगा जोशी ग्रह झाला जोशी यास व सारे गांवास उपद्रव करूं लागला. बायकांस पानवटा मना झाला. व घागरी फोडूं लागला. तो ग्रह बोलूं लागला कीं, माझे वृत्तीचा मला घुमाव पावीजे. मला श्री बहिरीचे...माझी स्थापना करावी. बहिरीस राखण बकरें एक द्यावें. आणि गांवांत पहिलें लग्न होईल त्याची पाठवणी श्रीबहिरीस द्यावी म्हणजे मला पावेल. याप्रमाणें सगळे

ग्रामस्त देवळीं जाऊन अभिमान्य करून ग्रह देवळीं स्थापिला. साल दरसाल गांवापैकीं देवास बकरें राखण, जोशी यास पहिले लग्नाची पाठवणी देत आले."

आजमितीला आजर्लें गांवांत जोशी यांचीं पेठकर, कोंडकर आणि वाळके अशीं तीन कुटें आहेत.

पेठकर कुटांतील बहुतेक सर्व घरें पाखाडी आळींत आहेत. एक अग्निहोत्री या नांवानें संबोधिलें जाणारें काय तें उभागरांत आहे. तसेंच कोंडकर जोश्यांचींहि सर्व घरें पाखाडीसच आहेत. वाळके जोशी यांचीं घरें उभागरांत देवीचे देवळासमोर आहेत.

**वृत्तिसंबंधी माहिती** :—तिन्ही कुटांच्या वृत्तीचीं खालील गांवें आहेत:— (१) आंजर्लें (२) पिचलोड (३) चांदिवणें (४) तुरवडें (५) सुकोंडी, (६) म्हसोंडा (७) अडखल, (८) पाज कोळ्यांची व (९) हर्णै.

एका घरीं दोन सासुरवासिणी असल्यास पहिलें वाण उपाध्यांचें व दुसरें वाण जोशी यांचें. श्रीगणपतिपूजन जोशी यांचें तसेंच ग्रह, घटकापूजन वगैरेंहि जोश्यांचेंच. ब्राह्मणांशिवाय इतर जातींतील लग्नें जोशी यांनीं चालवावयाचीं, व सोनार कासार व ब्राह्मण यांजकडे उपाध्ये व जोशी या दोघांनीं चालवावयाचीं.

जोशी हे वैदिकांपैकीं दुसऱ्या क्रमांकाचे गंधाचे मानकरी होत. लग्नमुंज इ. कार्यांत सभादक्षिणा देण्यांत आल्यास जी उत्तम–प्रत म्हणून ठरली असेल, तिच्या दुप्पट दक्षिणा यांस मिळते. यांचे वृत्तीचा वर्षारंभ मृगनक्षत्रापासून होतो.

**शांडिल्य गोत्री जोशी यांस सनद** :— संभाजी आंग्रे सरखेल यांनीं शक १६५२ वेदमूर्ति राजश्री गणज्योतिषी व चिंतामण ज्योतिषि बिन आदित्य ज्योतिषि यांस योगक्षेमासाठीं वडिलोपार्जित पदरींचे आश्रित म्हणोन इनाम करून दिला तो येणेप्रमाणें—मौजे आंजर्लें येथील मुरडीचा आगर व सेत 'नसर' शेत येक व मौजे सारंग येथील 'दारसेत' येक याप्रमाणें नुतन इनाम करून दिलीं.

**वेळासकर (जोशी)** :—वैदिकांपैकीं हे तिसऱ्या क्रमांकाचे मानकरी होत. यांचेंहि गोत्र शांडिल्यच व मूळ उपनांव जोशीच परंतु यांस वेळासहून गांवकऱ्यांनीं मुद्दाम आणिलें म्हणून त्यांस वेळासकर असें म्हणतात. हरी रघुनाथ व गणेश नारायण भट महाजन यांचे शक १६८७ चे तकरीरींत यांचेबद्दल माहिती दिली आहे ती अशी:— "जोशी (क्रमांक दोनचे मानकरी) यांचे वंशीं कोणी पंचांग करून मुहूर्त सांगे ऐसा कोणी विद्यावान नाहीं सारे ग्रहस्थ झाले ज्योतिषपण न चाले ऐसे जाले या करितां मौजे वेळास तर्फ वेशवी येथील रुद्र जोशी यांसी

मागें मजकुरीं आणून आगरटी करून रहावयास स्थळ करून दिलें ज्योतिषपणाची वृत्त सांगितली त्यास ते बोलिले कीं आपले गांवांत मान करून द्याल तर वृत्त चालवूं. त्यास लग्नास गांवकरी यांनीं लहारी एक व मुंजीस चवल व गंध जोशी, याप्रमाणें करून दिलें. कांहीं वर्षे वेळासकर यांनीं वृत्ति चालविली. उपरांतिक जोशी विद्यावान झाले. आपली वृत्त चालवूं लागले. वृत्तीचा वर्षारंभ ज्येष्ठ शु. १५ वडाचे पूजेनंतर.

**४. धर्माधिकारी (विद्वांस):–** वैदिकांपैकीं हे चवथ्या क्रमांकाचे मानकरी होत. आरंभींचे धर्माधिकारी 'भाभे' हे होते. यांचेपैकीं शेवटचे पुरुषाची नक्कल झाली बायकोनें अग्निप्रवेश केला व विद्वांस यांस धर्माधिकारीपण दिलें.

या घराण्याचें मूळचें उपनांव थत्ते, मूळ ठिकाण केतकी बिवली, सुमारें ३०० वर्षांपूर्वी थत्ते घराण्यांतील यांचे मूळ पुरुष आंजर्लें येथें रहावयास आले. यांतील सतत कांहीं पुरुष विद्वान् निघाल्यामुळें यांना विद्वांस असें म्हणूं लागले. पुढें या घराण्याकडे आंजर्लें व मुर्डी गांवची धर्माधिकारीपणाची 'वृत्ति' आली. यांचें गोत्र शांडिल्य.

या घराण्यांतील कृष्णाजी केशव थत्ते ( विद्वांस ) हे हरीपंत तात्या फडके यांजकडे होते. यांस वर्षासन २०० रु. मिळत असे तें त्यांचे घराण्यांत अद्याप चालू आहे. सातारा ट्रेझरीमधून १८९ रुपये मिळतात. ११ रुपये वटावाबद्दल कमी केले.

**धर्माधिकारी यांचीं कामें :—** हरितालिका, ऋषिपंचमी सत्यनारायण वगैरेंचे पूजाप्रसंगीं पोथी वाचणें ( कथा सांगणें ) सर्व गांवचे उपाध्ये नित्सुरे, यांचें उपाध्येपण यांचेकडे आहे. यांचे वृत्तीचा वर्षारंभ, ज्येष्ठ शु. १५ चे दिवशीं वडाची पूजा झाल्यानंतर होतो.

**५. भट–महाजन :—** वैदिकांत हे पांचव्या क्रमांकाचे मानकरी होत. गृहस्थ मानकऱ्यांत यांचा दर्जा पहिला तर वैदिकांत शेवटचा, यावरून हे प्रथम शिरक्यांचे पुरोहित म्हणून गांवांत आले व शिरक्यांचे वशिल्यानें वैदिकांतील शेवटचे मानकरी झाले व पुढें शिरके मोडल्यावर शिरक्यांचा कारभार आपणच पहावयास लागून दातीर यांचे मागून महाजन–कारभारी झाले असावे असा लोकप्रवाद आहे व तो बरोबर दिसतो. यांचे वृत्तीचा आरंभ ज्येष्ठ शु. १५ चे दिवशीं वडाची पूजा झाल्यावर होतो.

**ग्रामपंचायत :—** इ. स. १९३८ सालीं मुंबई प्रांतिक सरकारी कारभार कांग्रेस पक्षाचे लोकांचे हातीं असतां ग्रामपंचायतीचा कायदा मंजूर झाला. त्याअन्वयें आंजर्ले येथें इ. स. १९४० सालीं ग्रामपंचायत स्थापन झाली. या ग्रामपंचायतींत लोकांनीं निवडून दिलेले पुरुष सभासद १० व १ स्त्री सभासद, मिळून एकंदर ११ सभासद आहेत. या नवीन घटनेपासून गांवाचा कांहीं फायदा झाला कीं काय, कीं नुसता लोकांवर एक नवीन कराचा बोजा आला हा विचाराचा प्रश्न आहे. पूर्वींच्या काळीं अशाच प्रकारची संस्था गांवोगांव असे. परंतु ती, कार्यक्षम असे याची आधुनिकांस कल्पना यावी म्हणून खालीं उतारा दिला आहे तो असा :—

श्री

**यादी कसबे आंजर्ले तर्फ केळशी येथील गांवसंबंधी ठरावाची—**
सुरू सन इहिदे ख समसीन मया तेन व आलफ इसवी सन (१८३०). कलमें.

१ मजुरी बाप्यास एक आणा व बायकोस ०॥. प्रमाणें द्यावी व एक वेळ जेवावयास घालावें. प्रहर दिवसास (कामावर) यावें. जास्ती उशीर केल्यास कामावर लावूं नये......दहा रोजचे शिस्तीप्रमाणें मजुरी द्यावी. कमी रोज देउं नये... कलम एक.

वरंड २ पैसे बाणकोटी देऊन घ्यावी. जास्ती देउं नये.

गोयले २ पैसे बाणकोटी देऊन बायकोचा घ्यावा. बाप्याचा असल्यास ३ पैसे बाणकोटी द्यावे ज्यास्ती देऊं नये. कलम एक.

१ लोटे, बाणकोटी पैशाचे, तीन व दुधंडी पैशाचे चारप्रमाणें. लोटा... ......चांगला असावा; पाणी चार शेर राहील असा. कलम एक.

१ तरीबंदरपासून गोरे यांचे घरापर्यंत पैशाच्या दोन खेपा घालाव्या. व महाजन यांचे घरापावेतों अडीच खेपा घालाव्या. कलम एक.

१ घाण्या गाळावयाच्या गोड्या व कडव्या, त्यांस ६ घाणीस पैसे तीन दुधांडी. कलम १.

येणेप्रमाणें सर्वांनीं सदरील लिहिण्याप्रमाणें चालावें. त्यांत कमीजास्ती कोणी करील त्यास श्रीदुर्गेची शपथ असे त्याजपासून देवीकडे येक रुपया दंड घ्यावयाचा याप्रमाणें ठराव. मिती पौष व॥ ७ शके १७५२............ नाम संवत्सरे यास नांव निशी ज्याचे त्याचे हातची.

[ खालीं खूप सह्या. ]

**लग्न-मुंज इत्यादींतील सभादक्षिणेचे वेळची टक्केवारणी :—** श्रीदुर्गादेवीस चार आणे टक्का व इतर ग्रामदेवतांस दर देवास अर्धा आणाप्रमाणें. हा अर्धा आणा त्या त्या देवतेचे पुजाऱ्यास मिळतो. श्रीदुर्गादेवीचा टक्का मात्र पुजाऱ्यास न मिळतां चैत्रीचे उत्सवाकडे खर्च करण्यांत येतो. पात्रावर-जेवतांना-दक्षिणा असली तरीहि वरीलप्रमाणेंच टक्के देण्याची वहिवाट आहे.

# प्रकरण ६ वें

## वैद्य व औषधांचे कारखाने

(१) या बाबतींत कै. गु. गणेश नारायण तथा अण्णा शिंत्रे यांचें नांव सर्वांत पहिलें येतें. हे खरे निष्काम कर्मयोगी होते. यांनीं सतत ५० वर्षे आपला देह झिजवून व कोणाकडूनहि प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षहि मोबदला न घेतां गांवांतील व जवळपासचे गांवचे लोकांस उत्तमप्रकारें वैद्यकीय मदत केली. थोडक्यांत म्हणजे गु. अण्णा शिंत्रे हे आंजर्ल्यांचे " अण्णासाहेब पटवर्धन " होत.

( २ ) जाहिराती देऊन औषधें विकण्याचा पहिला उपक्रम विष्णुपंत रानडे यांनीं केला; परंतु तो त्यांस फारसा साधला नाहीं. त्यांचेंच अनुकरण कृष्णशास्त्री बिवलकर यांनीं केलें व अप्रतीम यश मिळविलें. हिंदुस्तानांतील सर्व प्रांतांतील व सर्व भाषांतील वर्तमानपत्रें, व नियतकालिकें यांत सतत धडाकेबाज जाहिराती दिल्यामुळें त्यांचें औषधांचा खप खूपच होत असे व त्यामुळें त्यांना संपत्तीहि खूप मिळाली. त्यांचे चिरंजीव रंगनाथशास्त्री बिवलकर यांनीं सशास्त्र अध्ययन करून तो कारखाना तसाच चालू ठेविला आहे; येवढेंच नव्हे तर आपले एकुलते एक मुलासहि पुणें येथील आयुर्वेद वैद्यकशाळेंत शिकावयास ठेवून त्यांचे कुळांत निदान आणखी एक पिढी तरी वरील धंदा चालू राहण्याची सोय केली आहे.

( ३ ) कृष्णशास्त्री बिवलकर यांचें अनुकरण मुरुडी येथील रहिवासी कृष्णशास्त्री पेंडसे यांनीं केलें परंतु गुरुइतकें त्यांत त्यांना यश आलें नाहीं.

( ४ ) बिवलकर यांना पैसा मिळतो असें पाहून के. आर. आणि कंपनी या नांवाची एक कंपनी निघाली होती परंतु एकंदरींत ती अल्पायुषीच ठरली. यांत कृष्णाजी रामचंद्र महाजन व कृष्णाजी रामचंद्र नित्सुरे, असे दोन के. आर. बुद्धिपुरःसर आणलेले असून सखाराम विनायक नित्सुरे हे औषधें तयार करणें, पत्रव्यवहार करणें इ. दृष्टीनें खरे सूत्रधार होते.

( ५ ) ताडाचे कोंडावरील तळवटकर घराण्यांत कांहीं माणसांना झाड-पाल्याचे औषधांची चांगलीच माहिती होती; परंतु त्यांचेपैकीं आतां गांवांत कोणीच राहत नाहीं.

( ६ ) कोंपरींतील बजाबा साठे यांस गुरांचे औषधांची तसेंच माणसांचे रोगांवरील झाडपाल्याचे औषधांची बरीच माहिती होती व ते त्यांचे माहितीचा फायदा लोकांस विनामूल्य देत असत; तोच उपक्रम त्यांचे चिरंजीव रा. पांडोबा साठे यांनीं तसाच चालविला आहे.

( ७ ) श्रीनारायणाचे पुजारी रा. रामचंद्र शिंत्रे हेहि वरीलप्रमाणेंच चांगले माहितगार असून, ते आपल्या ज्ञानाचा फायदा सर्वांस विनामूल्यच देतात.

( ८ ) औषधी मदत देणारी विद्यमान धंदेवाईक मंडळीः—

( अ ) रंगनाथ कृष्ण बिवलकर हे देशी, विलायती व होमिओपाथी अशी तिहेरी औषधयोजना जाणतात. व ज्यावेळीं जो मार्ग रोग्याचे हिताचे दृष्टीनें अधिक उपयुक्त असेल त्याचा ते अवलंब करतात. अशा तऱ्हेनें त्यांचेजवळ एक प्रकारचा सव्यसाचीपणा आहे.

( ब ) नारायण यज्ञेश्वर जोशी हे वंशपरंपरागत औषधतज्ञ असून ज्योतिषीहि आहेत.

( क ) वि. द. बर्वे मूळगांव खेड हल्लीं कित्येक वर्षें वस्ति आंजर्लें हे पढिक व वंशपरंपरागत देशी औषधज्ञ आहेत. यांना मधुमेहावरील औषधाची विशेष माहिती आहे.

# प्रकरण ७ वें

## शिक्षणसंस्था

पूर्वींचे काळीं शिक्षण म्हटलें म्हणजे त्यांत मोडी व बाळबोध लिहावयास व वाचावयास शिकणें, हिशोब करणें व जमाखर्च लिहिणें व नंतर संस्कृत भाषेचें अध्ययन अथवा वेदाध्ययन करणें येवढ्याच गोष्टी येत असत; लेखन-वाचन शिकविण्याकरितां गांवठी तात्या पंतोजींच्या शाळा असत व नंतर मुख्य शाळा म्हणजे वेदाध्ययनाचीच होय. यांतहि हल्लींप्रमाणें कांहीं तांत्रिक कामचलाऊ शिक्षण देणाऱ्या शाळा, कांहीं गुरुजी चालवीत व कांहीं उच्च शिक्षण देणाऱ्याहि शाळा असत. या सर्व शाळांतील शिक्षण विनाशुल्क असे. याप्रमाणें तांत्रिक शिक्षण देण्याच्या शाळा आमचे गांवांत पाखाडीस, कै. र. वि. नित्सुरे उपाध्ये अग्निहोत्री; कै. सखाराम भट विद्वांस व मुरडी येथें विश्वनाथ पुरुषोत्तम परांजपे यांजकडे होत्या. उच्च शिक्षणाची वेदशाळा नित्सुरे-उपाध्ये भट यांजकडे सतत २५० वर्षे चालू होती.

**आंजर्ले येथील मुख्य वेदशाळाः**—आद्यसंस्थापक हरभट नित्सुरे. स्थापना शक सुमारें १६४६. श्रीगणपतीनें स्वप्नांत दर्शन देऊन हरभट यांस, तूं विद्वान् होशील व तुझे कुळांत सात पिढ्या वेदविद्या चालेल असा आशीर्वाद दिला होता व त्याप्रमाणेंच ती चालली. ज्या गुरुजींनीं ही वेदशाळा विनावेतन अगदीं निःस्वार्थ बुद्धीनें चालविली त्यांचीं नांवें :— ( १ ) हरभट ( २ ) रामकृष्णभट ( ३ ) मोरभट भाऊ ( ४ ) रामभट नाना ( ५ ) गजानन दादा ( ६ ) त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव मोरभट ( ७ ) व मोरभटांचे चिरंजीव धोंडभट.

या वेदशाळेंत शिक्षण घेतलेले व शाळेचे उत्कर्षास कारणीभूत झालेले ग्रामस्थ व परस्थ विद्यार्थ्यांपैकीं कांहीं ठळक विद्यार्थीः- ( १ ) राघूभाऊ नित्सुरे अग्निहोत्री ( २ ) वासुकाका उपाध्ये ( ३ ) जनभट उपाध्ये ( ४ ) हरीभाऊ जोशी ( ४ अ) सखाराम अण्णा विद्वांस ( ५ ) दामूअण्णा जोशी ( ६ ) लखूनाना जोशी

( ७ ) सदूअण्णा जोशी ( ८ ) रामभट उपाध्ये ( ९ ) रामभट विद्वांस ( १० ) विष्णुअण्णा काशीकर ( ११ ) केसूकाका उपाध्ये ( १२ ) भिकंभट उपाध्ये ( १३ ) गोविंदभट गोरे ( १४ ) परसुभाऊ जोशी ( १५ ) विनूमामा वेळासकर ( १६ ) कृष्णंभट उपाध्ये ( १७ ) विनायकभट उपाध्ये ( १८ ) वासुदेवभट वैद्य ( १९ ) लंबोदरभट वेळासकर ( २० ) तुकारामभट जोशी ( २१ ) रामभट जोशी ( २२ ) महादेवभट परांजपे मुर्डीकर, पदपाठी, निगमसंपुटी मार्तंड ( २३ ) महादेवभट केळकर ( २३ अ) रामकृष्णभट वरवडेकर ( २४ ) लखुभट ओगले ( २५ ) पुरुषोत्तमभट सोहोनी ( २६ ) लखुभट जोगळेकर ( २७ ) वैदिक तिलक विष्णुभट जोशी मुरुडकर ( २८ ) वासुदेवभट तांत्रे ( २९ ) जनार्दनभट गोडसे ( योगमार्गी ) ( ३० ) भिकंभट तथा भाऊभट हळवे ( ३१ ) विनायक बल्लाळ तथा विनुदादा नित्सुरे उपाध्ये व ( ३२ ) दत्तात्रय जनार्दन नित्सुरे उपाध्ये इ.

**२. संस्कृत शिक्षण :—** वरील वेदविद्येचे शिक्षणाप्रमाणेंच, पुराणवाचन व हरिकीर्तन यांस उपयुक्त अशा संस्कृत शिक्षणाची सोय आमचे गांवांत होती. अशा तऱ्हेच्या शाळा म्हटल्या म्हणजे मुर्डी येथील गणेशशास्त्री पेंडसे व त्यांचेच शिष्य बाळशास्त्री नित्सुरे व जगन्नाथशास्त्री वर्तक यांनीं चालविलेल्या ह्या होत.

आजमितीला देशकालवर्तमानाप्रमाणें वरील वेदशाळा व संस्कृत पाठशाळा नामशेष झाल्या असून त्यांची जागा लोकलबोर्ड मराठी मुलामुलींची शाळा ( स्थापना इ. स. १८६० ) व इंग्रजी शाळा यांनीं घेतली आहे. आमचे गांवांतील मुला-मुलींची मराठी शाळा ही पूर्ण प्राथमिक शाळा असून तेथून दरसाल मुलगे व मुली सातवीचे प्रमाणपत्र परीक्षेस जातात.

कै. माधवराव लक्ष्मण खांबेटे यांनीं शाळेला लहानशी इमारत बांधून दिली असल्यामुळें त्यांचे नांवानें **एम्. के. इंग्लिश स्कूल** म्हणून चालू असलेली इंग्रजी शाळा गेलीं सुमारें २५।३० वर्षे रा. सदाशिव कृष्ण बागुल यांचे नेतृत्वाखालीं खाजगी सरकारमान्यता नसलेली शाळा म्हणून इंग्रजी शिक्षणाचें काम करीत होती. रा. बागुल हे सेवानिवृत्त झाले असून त्यांची जागा आतां येथील एक ग्रामस्थ, रा. गणेश बाळकृष्ण नित्सुरे, बी. ए., पेन्शनर हेडमास्तर सरकारी हायस्कूल सोलापूर यांनीं घेऊन त्यांचे खटपटीनें शाळेला आतां सरकारमान्यता मिळाली असून सरकारी मदतहि मिळूं लागली आहे. सध्यांची बिकट अन्नधान्य परिस्थिति सुधारून, बाहेरील विद्यार्थ्यांकरितां येथें एखादें वसतीगृह काढल्यास

शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या वाढून शाळेचें रूपांतर पूर्ण दुय्यम शाळेंत होऊन गांवांतले मुलांची मॅट्रिकपर्यंतचे शिक्षणाची सोय गांवांतले गांवांत होणें अगदीं शक्य आहे.

**वाचनालयें व ग्रंथसंग्रहालयें** :—शाळांप्रमाणेंच वाचनालयें व ग्रंथसंग्रहालयें हीं विद्यादानाचीं उत्कृष्ट साधनें आहेत. अशा तऱ्हेचें एक ग्रंथालय इ. स. १८८७ चे सुमारास वामन गोपाळ केळकर त्यावेळचे मुख्याध्यापक मराठी शाळा यांचे पुरस्कारानें स्थापन करण्यांत आलें होतें. सदर संस्था केळकर आंजर्लें येथें होते तोंपर्यंत व्यवस्थित चालली व नंतर बंद झाली. त्यानंतर इ. स. १९३८ मध्यें " लोकमान्य वाचनालय " उघडून पुनः एकवार लोकशिक्षणाचें काम करण्याचा प्रयत्न झाला, पण तोहि अयशस्वीच ठरला.

**कीर्तन व पुराण** :—आधुनिक काळांतील शाळा, वाचनालयें इत्यादींप्रमाणेंच प्राचीन काळचे कीर्तनकार व पुराणिक हेहि बहुजन समाजास ज्ञानदान करीत असत. अशा तऱ्हेचे पूर्वीच्या काळचे कीर्तनकार म्हटले म्हणजे मुर्डी येथील गणेशशास्त्री पेंडसे, नानाबुवा व गणपतिबुवा क्रिडमिडे व उभागरांतील बाळशास्त्री नित्सुरे, विष्णुपंत तथा अण्णा रानडे, कृष्णशास्त्री विवलकर हे होत. कृष्णशास्त्री विवलकर हे 'करताल' वाजविण्यांत फारच निपुण होते. आजमितीला उभागरांत कुशाभाऊ करंदीकर, दत्तोपंत काळे व गणेशभट जोशी ही प्रसंगविशेषीं कीर्तन करणारी मंडळी विद्यमान आहेत.

**पुराण सांगणें** :— याबाबत चांगला लौकिक मिळविलेल्या पूर्वीच्या काळच्या व्यक्ति म्हटल्या म्हणजे उभागरांतील बाळशास्त्री नित्सुरे, जगन्नाथशास्त्री वर्तक व पाखार्डीतील कमळाकरशास्त्री विद्वांस या होत. आजकालचे पौराणिक नारायणशास्त्रीं जोशी, कै. गोविंदशास्त्री पेंडसे व कै. वासुदेवशास्त्री वर्तक हे होत.

**स्त्री-शिक्षण** :—आंजर्ल्यांत सुरू झालेलें सक्तीचें प्राथमिक शिक्षण, व कायद्यानें वाढलेली मुलींच्या लग्नाची वयोमर्यादा, यामुळें सर्व शिक्षणसंस्थांत मुलींची संख्या पुष्कळच वाढली आहे. इंग्रजी शाळेंत तर मुलींचें शेंकडा प्रमाण ४० चे जवळ पोहोंचलें आहे. व वाढत्या शिक्षणाचा सुपरिणाम म्हणून कांहीं निव्वळ स्त्रियांच्या म्हणून संस्था स्थापन झाल्या आहेत. त्यांची माहिती खालीं दिली आहे:—

**राष्ट्रसेवा समिती आंजर्लें शाखा**:—दिनांक १ एप्रिल १९४५ सालीं उभागरांतील मुलींनीं श्रीदुर्गादेवी मंदिरांत ही समिती-शाखा स्थापन केली. आज-

तागायत शाळेचें काम व्यवस्थित चालू आहे. शाळेंत सर्व वयाच्या मुली व प्रौढाहि उत्साहानें भाग घेतात.

**महिला मंडळ आंजर्लें** :—आंजर्लें गांवांतील शिक्षित व नवविचारांच्या स्त्रियांनीं एकत्र जमून स्त्रीवर्गाच्या शारीरिक, मानसिक, व सामाजिक उन्नतीसाठीं मनमोकळा विचारविनिमय करावा, व संघटना करावी या हेतूनें दिनांक २ आक्टोबर १९४३ रोजीं श्री. बागुल गुरुजी यांचे सूचनेवरून वरील संस्था स्थापन झाली. पहिल्या अध्यक्ष श्रीमती पार्वतीबाई बापट व कार्यवाहिका श्री. सौ. इंदिराबाई साठये ह्या होत. या मंडळामार्फत चैत्र महिन्यांत एकदां व आश्विन महिन्यांत एकदां अशी वर्षांतून दोनदां हळदी कुंकवाची व्यवस्था होते; खर्चाची व्यवस्था उदार धनिकांनीं करून ठेविलेले द्रव्यसहाय्याचे योजनेंतून होते. याखेरीज योग्य व्यक्ति गांवांत उपलब्ध होतांच कथा, प्रवचन, काव्यगायन, पोवाडे म्हणणें इ. विविध कार्यक्रम अनेक वेळां होतात. मंडळाचें काम आरंभापासून आजपावेतों फारच व्यवस्थित चालू आहे.

**कवनें करणाऱ्या (कवियित्री) स्त्रिया** :—पूर्वींच्या काळच्या स्त्रियांचें प्रत्यक्ष शाळेंत जाऊन शिक्षण झालेलें नसलें तरी, त्यांचें गृहशिक्षण म्हणून जें शिक्षण त्यांना मिळत असे त्यांतून कांहीं स्त्रिया स्वयंस्फूर्त कवनें अथवा स्त्री—गीतें तयार करीत असत. अशा प्रकारच्या कवनांचे एकदोन नमुने खालीं दिले आहेत.

[ कवियित्रि श्रीमती सत्यभामाबाई साठये तथा सत्यंकाकू ]

१

तुलसी जननी मज पाव निरंतर । तुलसी जननी मज पाव ॥ धृ० ॥
हात जोडूनि उभी दासी ही । वृंदावनीं दे ठाव निरंतर ॥१॥
भवभयांतुनि मुक्त कराया । संकटिं घेसि धांव निरंतर ॥२॥
फल देशी तूं तैसें त्याला । जैसा ज्याचा भाव निरंतर ॥३॥
करिन तुझी मीं सेवा भावें । हीच असो मज हांव निरंतर ॥४॥

२

रावणासि करी विनंति । सत्य मंदोदरी राणी । ऐका चित्त देऊनि शुरपाणि । कांचननगरी त्यांनीं वेढिली । सुचना देतें तुम्हांला । माता सीता परतुनि द्यावी शरण जा तुम्ही रामाला । संगति येईल कामाला ॥धृ०॥ कायहो तुमचा पराक्रम । नेम धर्म अंतरले । काय म्हणुनि पुण्य सरलें । रात्रीं मजला स्वप्न पडलें । भास

कर्म हें सरलें । राम राजे चालुनि आले । शस्त्र तुम्हांवरि धरिलें । कांचन नगरी त्यांनीं वेढिली सुचना देतें तुम्हांला । संगति येईल कामाला ॥१॥ अभिलषि परि हो ललनेकरितां । आंगींची हो रांगोळी । होईल लंकेची होळी । दशानन म्हणे हो मुक्तिसाठीं । जानकि आणिली या स्थळीं । आम्ही विरोधि भक्तमोळी । ज्योतिस ज्योति तिसऱ्या जन्मीं ॥२॥

## आधुनिक शिक्षण घेतलेल्या कांहीं स्त्रिया

१. रा. महादेव वासुदेव वैद्य यांच्या कन्या— (१) काशीताई, एम्. ए., एलएल. बी., टाटा इन्स्टिटयूट स्पेशल ॲडमिनिस्ट्रेशन डिप्लोमा, B. Musio, भातखंडे कॉलेज, लखनौ. (२) द्वारका, इन्टर आर्ट्स. २. रा. मुकुंद बाळकृष्ण नित्सुरे यांच्या कन्या–(१) कृष्णाबाई, बी. ए., फर्स्ट क्लास ऑनर्स, एस. टी. सी. (२) कमल, बी. ए., सेकन्ड क्लास ऑनर्स, बी. टी., पी. टी., कांदिवली. (३) शकुंतला तथा प्रेमा, एफ. वाय. आर्ट्स. ३. कृष्णाजी हरी नित्सुरे यांच्या कन्या–(१) अंबू, मॅट्रिक (२) पद्मा, मॅट्रिक. ४. हरीभाऊ साठये यांची कन्या–कुमुदिनी, कर्वे मॅट्रिक, इंटर ग्रेड ड्रॉइंग आर्ट. ५. विश्वनाथ सीताराम नित्सुरे यांची कन्या– विमल, जी. डी. आर्ट्स. ६. धोंडोपंत खांबेटे यांची कन्या–सुशीला, टी. डी. ७. दत्तोपंत खांबेटे यांची कन्या, कुसुम, मॅट्रिक. ८. कै. गंगाधरपंत महाजन यांची कन्या प्रमिला, एम. बी. बी. एस. ९. गजानन विष्णु बापट यांची कन्या– इंदु, मॅट्रिक. १०. गोविंदभट कोंकणे यांची कन्या–विमल, मॅट्रिक. ११. कै. चिंतामण शिंत्रे यांची कन्या–कुसुम, मॅट्रिक.

---

# प्रकरण ८ वें

## लोकसंख्या, लोक व त्यांच्या चालीरीति

इ. स. १९५१ सालचे खानेसुमारीप्रमाणें पहातां आंजर्लें गांवाची एकंदर लोकसंख्या २३१९ असून त्यांपैकीं १०६४ पुरुष व १२५५ स्त्रिया आहेत. या लोकसंख्येंत खालील जातींचे लोकांचा समावेश होतो :— ब्राह्मण,

गुजर, मारवाडी, सोनार, कांसार, शिंपी, तेली, सुतार, कुंभार, गुरव, न्हावी, धोबी, मराठे, कुळवाडी, चांभार, भंडारी, मुसलमान, बांगडीवाले कांसार, डोंगरकोळी इ. वरील लोकसंख्येचे आंकड्यावरून पुरुषांपेक्षां स्त्रियांची संख्या जवळ जवळ २०० नीं जास्त दिसते व हीच परिस्थिति रत्नागिरी जिल्ह्यांतील बहुतेक सर्व गांवांत आढळते; मात्र याचा अर्थ रत्नागिरी जिल्ह्यांत पुरुषांपेक्षां फार अधिक स्त्रिया जन्माला येतात असा नव्हे. बरेच पुरुष चाकरी-नोकरी निमित्त बाहेर राहतात व बेताबेताची वेतनांची नोकरी असल्यामुळे शहरांत बिऱ्हाड करणें परवडत नाहीं म्हणून बऱ्याच मंडळींची स्त्रिया व मुलें त्यांचे त्यांचे खेड्यांतच ठेविलेलीं असतात व यामुळेंच स्त्रियांचा आंकडा पुरुषांचे आंकड्यापेक्षां फार अधिक वाटतो.

**१. ब्राह्मण :—** आमच्या गांवांत सर्व ब्राह्मण वस्ती एकजात चित्तपावन कोंकणस्थांची आहे. ब्राह्मणांच्या पोटजातींपैकीं अन्य कोणत्याहि जातीचें एकहि कुटुंब आंजर्ल्यांत नाहीं. या सर्व कोंकणस्थ कुटुंबांपैकीं अगदीं जुन्यांत जुन्या कुटुंबांचा फार तर १३।१४ पिढ्यांचा म्हणजे सुमारें ४०० वर्षांचा थोडाबहुत इतिहास उपलब्ध आहे. या पलीकडचा संबंध कोंकणस्थांचा विश्वसनीय इतिहासच अद्याप उपलब्ध झालेला नाहीं. कोंकणस्थ बाहेरून कोठून तरीं या जिल्ह्यांत रहावयास आले येवढी गोष्ट निश्चित झालेली आहे परंतु ते केव्हां आले, कां आलें व कसे आले या गोष्टींबद्दल अनेकांनीं अनेक तर्क चालवून मोठमोठालीं लिखाणें तयार केलेलीं आहेत पण शेवटीं ते तर्कच होत. आजमितीला आंजर्ले गांवांत पुढील आडनांवाचीं कोंकणस्थ चित्तपावन कुटुंबें नांदत आहेत :— (१) कोल्हटकर (२) दांडेकर (३) खांबेटे (४) नित्सुरे (५) जोशी (पंचनदीकर) (६) वर्तक (खाडीलकर) (७) गोरे (८) जोशी (आसूदकर) (९) जोशी (वरवडेकर) (१०) काळे (जोशी, पुजारी) (११) काळे (१२) रानडे (१३) पेंडसे (१४) घाणेकर (१५) जोशी (वेळासकर) (१६) खरवले (डोंगरे) (१७) भट (महाजन) (१८) साठये (१९) बिवलकर (२०) बापट (२१) काणे (हवालदार) (२२) गोरे (इळणे) (२३) शिंत्रे (२४) कानीटकर (२५) विद्वांस (२६) मोडक (२७) गोखले (२८) पटवर्धन इत्यादि. पूर्वीच्या काळीं या गांवांत होतीं पण आज नामशेष अशा कुटुंबांचीं आडनांवें:— (१) राणे (२) भाभे (३) पाटणकर (४) खिचडी (५) फाटक (६) आठवले (७) मायले (८) करमरकर

अ. क्र. 20972 वि: ३२
क्रमांक 2045 नों. दि: १६५

( ९ ) देवधर ( १० ) आपटे ( ११ ) शिधये ( १२ ) बेहेरे ( १३ ) लिमये ( १४ ) मायदेव ( १५ ) वैद्य–श्रीवर्धनकर ( १६ ) दातीर–महाजन ( १७ ) सहस्रबुद्धे ( १८ ) खरे ( १९ ) बेडेकर ( २० ) वैशंपायन ( २१ ) पर्वते ( २२ ) वायंगणकर. सर्व ब्राह्मण वस्ती, उभागर, कोंपरी व पेठपाखाडी या तीन भागांत आहे. यांचीं एकंदर घरें सुमारें १०० असून त्यांची लोकसंख्या सुमारें ५०० आहे. गांवांत राहणारे या लोकांचा मुख्य धंदा म्हटला म्हणजे बागाईत व शेती होय. कांहीं थोडी मंडळी व्यापार व त्याहूनहि थोडी मंडळी अन्य व्यवसाय म्हणजे ज्योतिषी, वैद्यकी व भिक्षुकी करणारे आहेत. सबंध ज्ञातीबद्दल बोलावयाचें म्हटलें तर यांपैकीं शेंकडा ५० मंडळी सांपत्तिक दृष्ट्या अगदीं निकृष्टावस्थेंत आहेत. शेंकडा ४० खालच्या पायरीवरील मध्यमवर्गीय असून शेंकडा ५ वरच्या पायरीचे मध्यमवर्गीय आहेत व राहिलेले शेंकडा ५ सांपत्तिक दृष्ट्या सुस्थितींत आहेत असें म्हटलें तरी चालेल. ज्यांचा जमीनजुमला, रोकड, सावकारी मिळून सर्व एक लाखाचे जवळपास येईल असा एकहि ब्राह्मण माणूस गांवांत नाहीं. यावरून या ज्ञातीचे सांपत्तिक स्थितीची कल्पना उत्तम बांधितां येईल. या मंडळींचे जननापासून मरणापर्यंतचे सर्व संस्कार सनातन वैदिक पद्धतीप्रमाणें होतात. पूर्वीच्या काळीं म्हणजे गेल्या ५०–६० वर्षांचे पूर्वींचे काळापर्यंत गांवांत विद्वान् वैदिक पट्टीचे म्हणणारे ब्राह्मण पुष्कळ असत. परंतु वेदविद्येला आतां मान न राहिल्यामुळें, पट्टीचे विद्वान् गांवांत हाताचे बोटांवर मोजण्याइतकेहि राहिले नाहींत. ही अत्यंत अल्पसंख्य मंडळी दिवंगत झाल्यावर, गांवांतील धार्मिक कृत्यांची व्यवस्था काय होणार हें बुद्धिगम्य नाहीं. गांवांतील ब्राह्मण मंडळींत निरक्षर कोणी नाहीं. गेलीं कित्येक वर्षें गांवांत थोड्याफार इंग्रजी शिक्षणाची सोय असल्यामुळें कांहीं थोडी मंडळी इंग्रजी ३-४ इयत्ता शिकलेली असून मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण व गांवांत वास्तव्य अशांची संख्या फारतर ४।५ भरेल. उच्च शिक्षण घेतलेले व गांवांत वास्तव्य असे कोणी नाहींत.

## ब्राह्मण समाजांतील गणनीय व्यक्ति

इंग्रजी राज्यांत वेदविद्येचें महत्त्व नाहीसें झाल्यावर, आधुनिक तऱ्हेचें शिक्षण घेऊन सरकारी चाकरीनोकरींत, शिक्षणांत व आधुनिक काळचे इतर

कार्यक्षेत्रांत नांव कमावलेल्या माजी व आजी मंडळींची त्रोटक माहिती कुळवार अकारविल्ह्यानें खालीं दिली आहे.

**१ काणे (हवालेदार)**:— ( १ ) कै. गणेश रामकृष्ण— बी. ए. एलएल. बी. नोकरीं मुंबई हायकोर्ट. कवि व ग्रंथकार.

**२ काळे**:— ( १ ) कै. गोविंद पांडुरंग— ज्योतिषी (२) दत्तात्रेय गोविंद —होतकरू पुढारी ( ३ ) अवधूत गोविंद— डेप्युटी इंजिनिअर.

**३ कोल्हटकर** :— ( १ ) कै. बापूराव — गायनवादनपटु, गणपति मूर्तिकार. पहिलवान. वजन उचलण्यांत पटाईत. निस्सीम दत्तभक्त. ( २ ) कै. लक्ष्मण विठ्ठल— बॉइलर इंजिनिअर ( ३ ) वामन गणेश— कंट्राक्टर. ( ४ ) वासुदेव शिवराम— राष्ट्रीय कीर्तनकार. संस्थापक धर्मचैतन्य संस्था, पुणें. अनेक कीर्तनोपयोगी आख्यानांचे लेखक. अभंग भारत, भागवत, वाल्मिकी रामायण व अभंग गीताकर्ते.

**४ खांबेटे** :— ( १ ) कै. केशव लक्ष्मण— वैदिक, शास्त्री, कीर्तनकार. ( २ ) दत्तात्रेय बाळकृष्ण— थर्ड इयर ट्रेन्ड प्राथमिक शिक्षक, लेखक, सामाजिक कार्यकर्ते. ( ३ ) धोंडो बाळकृष्ण— माजी अध्यक्ष आंजर्लें शिक्षणसंस्था, मुंबई. ( ४ ) माधवराव लक्ष्मण—नामांकित वकील, सराफ, लेखक, अनेक सार्वजनिक संस्थांस देणग्या. ( ५ ) अनंत माधवराव—वकील.

**५ गोरे** :— ( १ ) एकनाथ विनायक— एम. एससी. प्रोफेसर सांगली कॉलेज.

**६ गोखले** :—(१) कै. बापूराव— बडोदें येथील प्रसिद्ध सावकार गोपाळराव मैराळ यांचे कारभारी (२) कै. हरिपंत— पेठ पाखाडींतील "हरिहरेश्वर" मंदिर बांधिलें.

**७ घाणेकर** :— ( १ ) कै. गणेश वासुदेव— रेकॉर्डकीपर सेक्रेटरिअट, मुंबई. ( २ ) कै. गोपाळपंत— मामलेदार (३) दत्तात्रेय गणेश— बी. एससी., शेतीतज्ञ, शेतीसंशोधक. ( ४ ) पुरुषोत्तम सदाशिव— बी. ए. एलएल. बी. पोलिस प्रॉसिक्युटर. ( ५ ) महादेव गणेश— बी. ए. (ऑनर्स), हायस्कूल शिक्षक. ( ६ ) कै. लक्ष्मण वासुदेव— थर्ड इयर ट्रेन्ड मराठी शिक्षक. ( ७ ) शंकर गणेश— आर्किटेक्ट, शाहीर. ( ८ ) कै. सदाशिव गोपाळ— बी. ए. शाळातपासनीस, वऱ्हाड. ( ९ ) कै. हरी लक्ष्मण— विरक्त. रामदासपंथी.

८ **जोशी** :— (१) नारायणशास्त्री–वैदिक, ज्योतिषी, पौराणिक, लेखक. (२) पांडुरंग कृष्णाजी–बी. ए., नोकरी मुंबई सेक्रेटरिअट (३) कै. बाळाजी पांडुरंग–जुन्या काळचे सर्व्हेयर (४) कै. भालचंद्र लक्ष्मण– शीघ्र कवी, गोड माणूस (५) मुकुंद वासुदेव– स्टाटिस्टीशिअन, एस. टी. सर्व्हिस, मुंबई राज्य (६) रामचंद्र वासुदेव तथा बाबूराव– गांवकींतील ठणठणीत चर्चा व टीकाकार.

९ **डोंगरे** :— (१) अनंत वासुदेव— बी. ए. दुय्यम शिक्षक. अल्पायुषी.

१० **नित्सुरे** :— (१) कृष्णाजी हरी– बी. ए. बी. टी. दुय्यम शिक्षक, दीर्घ व्यासंगी, चिकाटीचे गृहस्थ. आंजर्ले येथील सहकारी संस्थांचे जनक (२) केशव गोपाळ–एम. ए. बी. टी., आजीव सदस्य डेक्कन एज्युकेशन सोसायटी, पुणें (३) गजानन महादेव– बी. ए. एस. टी. सी. सेवानिवृत्त दुय्यम शिक्षक. (४) गणेश धुंडिराज– टी. एम. सार्वजनिक कार्यकर्ता. (५) गणेश बाळकृष्ण– बी. ए. एस. टी. सी. डी. फर्स्ट क्लास. सेवानिवृत्त मुख्याध्यापक, निष्काम ग्रामसेवक, संपादक " नित्सुरे कुलवृत्तान्त " व प्रस्तुत ग्रंथ. (६) गोपाळ गजानन– मॅट्रिक थर्ड इयर ट्रेन्ड, सेवानिवृत्त दुय्यम शिक्षक (७) कै. दत्तात्रेय चिंतामण, बी. ए. दुय्यम शिक्षक, लेखक (७ अ) दत्तात्रेय शंकर, एम्. एस्सी. संशोधक (८) कै. दामोदर गोपीनाथ–सोनार, कासार, भंडारी व ब्राह्मण यांतील तंट्यांचेवेळीं गाजलेले पुढारी (९) नारायण बाळकृष्ण–सेवानिवृत्त क्लार्क ऑफ दी कोर्ट, अनेक सार्वजनिक संस्थांस देणग्या (१०) नारायण विष्णु– बी. एससी. (११) पुरुषोत्तम गोपाळ– एम्. ए. बी. टी. टी. डी. (लंडन), नोकरी दुय्यम शिक्षण खातें, मध्यप्रांत–वऱ्हाड (१२) कै. बाळशास्त्री (बाळकृष्ण दाजी)– विद्वान् बहुश्रुत पौराणिक, वक्तृत्वकलानिपुण, चौरसबुद्धि (१२) कै. भालचंद्र गजानन— मॅट्रिक, सेवानिवृत्त रेव्हन्यु खातें, अनेक सार्वजनिक संस्था व निधी यांचे जनक व पालक. या ग्रंथांतील माहितीचे आद्यसंग्राहक (१४) भास्कर गजानन— बी. कॉम. नोकरी सहकारी बँक (१५) मधुसूदन आबाजी— प्राथमिक ट्रेन्ड शिक्षक, कवि, शाहीर (१६) कै. महादेव बाळकृष्ण, नामांकित थर्ड इयर ट्रेन्ड मराठी शिक्षक (१७) यशवंत गोपाळ— बी. ए. संस्थापक, " कुमार उत्कर्ष मंडळ, " संपादक, कुमारवय नियतकालिक. प्रभावी लेखक व वक्तृत्वकला-निपुण (१८) रघुनाथ गजानन— बी. एससी. नोकरी, प्राप्तीकर खातें,

मुंबई ( १९ ) कै. विनायक गणेश— सेकन्ड इयर ट्रेन्ड मराठी शिक्षक, उत्साही सार्वजनिक कार्यकर्ते ( २० ) विश्वनाथ सीताराम— एल. सी. पी. एस. डॉक्टर, आफ्रिका (२१) विष्णु हरी— बी. ए. एस. टी. सी. डी., सेवानिवृत्त दुय्यम शिक्षक, जगन्नाथ शंकरशेट संस्कृत स्कॉलर, बहुश्रुत, विद्वान्, व्यासंगी लेखक, वक्ते, प्रवचनकार, देशी व्यायामप्रेमी ( २२ ) शंकर गोपाळ— बी. ए. टी. डी. ( मुंबई ), दुय्यम शिक्षक ( २३ ) कै. शिवराम रामकृष्ण— फार जुने मॅट्रिक, शिक्षक, नामांकित कवि व ग्रंथकार ( २४ ) कै. सीताराम गोविंद— थर्ड इयर ट्रेन्ड मराठी शिक्षक ( २५ ) पद्माकर विनायक— बी. ए. एलएल. बी. नामांकित वकील, एका काळचे गांवासंबंधीचे सार्वजनिक कार्यकर्ते.

११ पेंडसे :— कै. गोविंद गणेश— पौराणिक, आस्थेवाईक सार्वजनिक कार्यकर्ते.

१२ बागुल :— सदाशिव कृष्ण— मूळगांव मुरूड. गेलीं ४० वर्षे आंजर्ले गांवांत इंग्रजी ज्ञानदान व ग्रामसेवा.

१३ बापट :— ( १ ) कृष्णाजी लक्ष्मण— बी. ए. एलएल. बी. सेक्रेटरी चिपळूण म्युनिसिपालिटी ( २ ). कै. गजानन विष्णु— डॉक्टर सेन्ट्रल इंडिया सरकार ( ३ ) गोपाळ विष्णु— बी. ए. एलएल. बी., वकील, वर्धा ( ४ ) गोविंद बाळकृष्ण तथा गोविंदमामा— सार्वजनिक कार्यकर्ता ( ५ ) चिंतामण दामोदर— बी. ई. सिव्हिल, नोकरी बाम्बे कॉर्पोरेशन ( ६ ) कै. दामोदर रामकृष्ण— बी. ए. सेवानिवृत्त डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर ( ७ ) कै. नरहर चिंतामण तथा कुशाभाऊ— सेवानिवृत्त डेप्युटी इंजिनिअर. ( ८ ) कै. वामन चिंतामण— मेकॅनिकल इंजिनिअर, फर्स्ट क्लास फर्स्ट, अल्पायुषी ( ९ ) कै. नारो बचाजी— वकील, पुणें ( १० ) कै. बाळकृष्ण लक्ष्मण तथा बाळकृदादा— पूर्वीच्या पिढींतील कर्तबगार, आदर्श ग्रामस्थ. ( ११ ) बाळाजी गोविंद— बी. एससी. खाजगी नोकरी ( १२ ) रंगनाथ शिवराम— बी. एससी., दुय्यम शिक्षक ( १३ ) कै. लक्ष्मण नारायण तथा लखुअण्णा पेठ पाखाडींतील एका काळचे गाजलेले पुढारी ( १४ ) कै. वामन गंगाधर— वकील ( १५ ) विश्वनाथ गोविंद— बी. एससी. खाजगी व्यापारी नोकरी ( १६ ) श्रीपति रामकृष्ण— कंट्राक्टर ( १७ ) नारायण विश्वनाथ, कंट्राक्टर

(१८) कै. शिवराम नारायण— बी. ए. पहिला वर्ग मॅजिस्ट्रेट (१९) कै. हरी गणेश— बी. ए. नोकरी ओरिएन्टल ट्रान्सलेटर ऑफिस.

१४ **बिवलकर** :—(१) कै. कृष्णशास्त्री, प्रसिद्ध आर्यौषधि कारखानदार, करतालपट्ट (२) रंगनाथ कृष्ण— आर्यांग्ल व होमिओपाथिक डॉक्टर, आर्यौषधि कारखानदार.

१५ **भट-महाजन** :— (१) कै. गणेश सखाराम— पोलिस सब-इन्स्पेक्टर (२) कमलाकर गंगाधर— बी. कॉम. कॉलेज प्रोफेसर (३) कै. कृष्णाजी रामचंद्र तथा बळवंतराव— उभागर आळीचे एका काळचे गाजलेले पुढारी (४) कै. गोपाळ पांडुरंग— अत्यंत निरलस निरभिमानी देशभक्त व सार्वजनिक कार्यकर्ता (५) कै. गंगाधर रंगनाथ— बी. एजी. ऊंसतज्ञ (६) कै. त्र्यंबक महादेव— सदर अमीन, पुणें (७) मनोहर गंगाधर— बी. ई. सिव्हिल, नोकरी खाजगी कंपनी (८) कै. पांडुरंग आपाजी— वकील (९) कमलाकर विष्णु— बी. ए. नोकरी, आयसेन फार्मसी (१०) पांडुरंग विष्णु— एम. एससी. मॅनेजिंग डायरेक्टर आयुर्वेद रसशाळा, पुणें (११) विष्णु महादेव— बी. ए. एम. बी. बी. एस. क्रांतिवीर व लेखक (१२) कै. शंकर पांडुरंग— सन्मित्र समाज मेळा चालक व पालक (१३) कै. सखाराम नारायण— बी. ए. एलएल. बी. वकील हायकोर्ट, मुंबई.

१६ **रानडे** :— (१) अच्युत सीताराम— निरभिमानी सार्वजनिक कार्यकर्ता. व्यापारी (२) कै. सीताराम विष्णु— थर्ड इयर ट्रेन्ड, मराठी शिक्षक, शेवटीं अ. डेप्युटि ए. इन्स्पेक्टर.

१७ **वर्तक** :— (१) कै. जगन्नाथ विष्णु— पौराणिक (२) पांडुरंग विष्णु— बी. एजी. (३) कै. पुरुषोत्तम नारायण—थर्ड इयर ट्रेन्ड, मराठी शिक्षक (४) कै. विष्णुशास्त्री— विद्वान् पौराणिक व दानशूर ग्रामस्थ (५) कै. वासुदेव जगन्नाथ— पौराणिक.

१८ **विद्वांस** :—(१) अनंत सखाराम— बी. ई. सिव्हिल, खाजगी नोकरी (२) गोपाळ गजानन— बी. ए. खाजगी नोकरी (३) जगन्नाथ त्र्यंबक— *B. Sc., A. M. & S. (B. H. U.)* डॉक्टर, उमरावती (४) कै. त्र्यंबक विष्णु— थर्ड इयर ट्रेन्ड, मराठी शिक्षक (५) बाळकृष्ण काशिनाथ— गुजराती कवी व साहित्यिक (६) भास्कर गजानन— बी. ए. खाजगी नोकरी (७) मोरेश्वर

सखाराम— नोकरी रजिस्ट्रेशन खातें (८) कै. रामचंद्र सखाराम तथा रामभाऊ— लोकप्रिय प्राथमिक शिक्षक व कवि (९) कै. सखाराम विष्णु— मॅट्रिक, थर्ड इयर ट्रेन्ड, असिस्टंट डेप्युटि इन्स्पेक्टर.

**१९ शित्रे** :— (१) कै. गणेश नारायण— नामांकित वैद्य व गणितज्ञ. खरे निष्काम कर्मयोगी (२) कै. बळवंतराव— सल्लागार तुकोजी होळकर.

**२० साठये** :— (१) कै. गोविंद विष्णु— एम. ए. सरकारी दुय्यम शिक्षक (२) कै. अनंत दामोदर— बी. ए. एलएल. बी. वकील (३) केशव दामोदर— बी. ए. एलएल. बी. वकील (४) कै. गोपाळ दामोदर— बी. ए. एलएल. बी. पोलिस प्रॉसिक्युटर (५) कै. दत्तात्रेय रामचंद्र—वरिष्ठ अधिकारी जंगल खातें, मुंबई राज्य (६) परशुराम भिकाजी— एम. ए. कॉलेज प्राध्यापक (७) पांडुरंग नारायण— निरलस सार्वजनिक कार्यकर्ता (८) रामचंद्र गोविंद— मरीन इंजिनिअर (९) कै. विनायक दामोदर— बी. ए. सरकारी दुय्यम शिक्षक, अल्पायुषी (१०) शरद् गोपाळ— बी. बी. सी. रेडियो वक्ता (११) कै. शिवराम विष्णु— बी. एससी., जंगल खात्यांतील भावी वरिष्ठ अधिकारी, अल्पायुषी.

**गांवांतील पुरुषांसंबंधानें माहिती देणारी एक जुनी म्हण** :— आठवले यांची टकली मोठी, शित्रे यांची खोती मोठी, करमरकरांची बात आणि कोल्हटकरांचा हात.

**दिवंगत दीर्घायुषी मंडळी** :— (१) मोरभट भाऊ नित्सुरे, वय ९२. (२) गजानन रामकृष्ण नित्सुरे, वय ८८. (३) नाना विद्वांस, वय ९०. (४) हरी रामकृष्ण नित्सुरे, वय ८६. (५) सखाराम विनायक तथा शिवरामकाका नित्सुरे, वय ८९.

**आंजर्ले गांवांतील उंच पुरुष** :— महाजनो रंगनाथो । शिधू बाबाच बाळकू ॥ वेलातटिर्गणपतिः । पंचमः पुरुषोत्तमः ॥ १ ॥— इतिजमालवर्गः

कै. रंगनाथ मोरेश्वर महाजन, श्रीधर वामन पेंडसे तथा शिधूबाबा पेंडसे, बाळकृष्ण लक्ष्मण तथा बाळकूदादा बापट, गणेश वामन वेळासकर व पुरुषोत्तम सारंगकर हे पांच इसम सहाफूट खास व कदाचित् जास्तहि उंच होते, तसेंच आंजर्लें तरीवरील खलाशी ‘ जमाल ’ हाहि असाच खूप उंच होता. त्याचें नांव श्लोकांतील व्यक्तींचे पंक्तींत आणण्याकरितां “ इति जमालवर्गः ” अशी फार मार्मिक योजना केलेली आहे.

**२ सोनार** :—आमच्या गांवांतील सोनार आपणांस दैवज्ञ ब्राह्मण म्हणवितात. दैवज्ञ म्हणजे ज्योतिषी असा अर्थ आहे. हे आपणांस ब्राह्मण म्हणवीत असले तरी ते निवळ शाकाहारी नाहींत. हे लोक गळ्यांत जानवें घालतात व मुंजहि करितात. यांच्यांतील वेदक या आडनांवावरून हे एकाकाळीं वेदाधिकारीहि असावे असें दिसतें. कदाचित् यांचें मूळचें आडनांव वेधक, म्हणजे आकाशस्थ ग्रहांचा वेध घेणारे, असेंहि असणें शक्य आहे; व तें त्यांचे दैवज्ञपणाशीं सुसंगतहि आहे. यांची रहाणी बरीच स्वच्छ व ब्राह्मण या नांवास साजेल अशीच असते. यांच्यांतहि इतर सामान्य ब्राह्मणांप्रमाणेंच पतिनिधनानंतर स्त्रियांचें वपन करण्याची चाल होती. उच्चवर्णीयांतील सोळा संस्कारांपैकीं यांचे षष्ठीपूजन, नामकरण (पाळण्यांत घालून नांव ठेवणें), मौंजीबंधन व मरणोत्तर उत्तरक्रिया इतके संस्कार होतात व ते सर्व ब्राह्मणांचे पौरोहित्याखालीं चालतात. येथील सर्व सोनार वस्ति बाजारपेठेंत बिठोबाचे देवळाचे जवळपास आहे. यांचीं एकंदर घरें ७ असून त्यांत नांदतीं पांचच आहेत. लोकसंख्या सुमारें ३६ आहे. अगदीं अलीकडे येथें रहावयास आलेले पोतदार सोडल्यास बाकी सर्व सोनार वेदक आडनांवाचे आहेत. एका काळीं यांतील बहुतेकांची चांगली सुस्थिति होती. त्यांचा मुख्य धंदा म्हटला म्हणजे चांदीसोन्याचे दागिने घडविणें हा होय. परंतु आतां चांदी व सोनें फार दुर्भिळ झाल्यामुळें यांचा धंदा फारसा चालत नाहीं; यामुळें यांची सांपत्तिक स्थिती हळुहळू खालावत आहे. बाजारपेठेंत राहणारे या सोनार मंडळीची वस्ती फार जुनी असावी असें दिसत नाहीं. वतनदार सोनार आंजर्लेकर आडनांवाचे असून त्यांचे मानाची जागा ब्रिरवाडींत इतर मानकरी लोकांचे वस्तींत आहे.

कै. आपाशेट सोनार व रामूशेट पालवणकर हे पूर्वींचे पिढींतील नामवंत पुढारी होत. या ज्ञातींतील आजच्या गणनीय व्यक्तिः— (१) भालचंद्र विष्णु वेदक सेवानिवृत्त रेल्वेखातें (२) कृष्णकुमार भालचंद्र वेदक इंटर आर्ट्स (३) प्रभाकर गोविंद वेदक, कारागीर, दापोली येथें सोनें, चांदी व त्यांच्या वस्तु यांचें विक्रीचें दुकान (४) एकनाथ सखाराम वेदक, मॅट्रिक, कारागीर.

**३ कासार ऊर्फ तांबट** :—या गांवांत कासारांचीं ५ घरें असून त्यांची लोकसंख्या २० आहे. सर्व कांसार वडके आडनांवाचे आहेत. हे लोक गेलीं सुमारें १००–१५० वर्षें येथें असले तरी मूळचे रहिवासी खास नव्हेत. हे

कोठून येथें आले हेंहि आजमितीला कोणासच सांगतां येत नाहीं. विश्वकर्म्याचा मुलगा त्वष्टा याच्यापासून आपल्या जातीची उत्पत्ति झाली असें हे लोक मानतात व म्हणून आपणांस त्वष्टा कासार असें म्हणवतात. ब्राह्मणांप्रमाणेंच यांनाहि गोत्रें आहेत. हे लोक गौरवर्ण असून शरीरानें एकंदरींत मजबूत असतात. तांब्यापितळेचीं भांडीं करणें व विकणें, भांड्यांस कल्हई लावणें हा या लोकांचा मुख्य धंदा आहे. यांपैकीं कित्येकांनीं चांदीचीं भांडीं करणें व नक्षीकाम करणें यांत पुष्कळ नैपुण्य मिळविलें आहे.

ब्राह्मण सोनार इत्यादींप्रमाणेंच यांच्यांतहि केशवपनाची चाल होती. हे निव्वळ शाकाहारी नाहींत. उच्चवर्णीयांतील सोळा संस्कारांपैकीं यांचें षष्ठीपूजन ( सठी ), नामकरण ( पाळण्यांत घालून नांव ठेवणें ), मौंजीबन्धन व मरणोत्तर उत्तरक्रिया इतके संस्कार होतात व ते सर्व ब्राह्मणांचे पौरोहित्याखालींच होतात. या ज्ञातींतील पूर्वींचे काळचे पुढारी— ( १ ) धोंडशेट ( २ ) आत्माराम सुन्दर व ( ३ ) भार्गव सुन्दर हे होत. या ज्ञातींतील आजकालच्या गणनीय व्यक्तिः— ( १ ) दत्तात्रेय भार्गव, कारागीर, तांबापितळ भांड्याचे कारखानदार ( २ ) रामचन्द्र आत्माराम, पंच श्रीविठ्ठल देवस्थान ( ३ ) विश्वनाथ हरि, चांदीच्या भांड्यांचा कारखाना, अहमदाबाद.

**४ मारवाडी गुजरः—** आंजर्लें येथें मारवाड्यांचीं एकंदर ४ घरें असून त्यांची लोकसंख्या ३२ आहे. त्यांचीं चिपाडे, बोरी व जैन हीं आडनांवें आहेत. हे लोक सोटा व लोटा घेऊन येथें आले व त्यांनीं व्यापार करून पुष्कळ पैसा मिळाविला. त्यांचेपैकीं कित्येकांच्या पुष्कळ पिढ्या येथेंच झाल्या. या सर्वांना मारवाडी हें एकच नांव स्थानिक लोकांनीं दिलें असलें तरी ते सर्व अगदीं ऐनजिनसी एक जातीचे नसून त्यांचा आपसांत रोटीबेटी व्यवहार होतोच असें नाहीं. हे लोक आपसांत बोलतांना व घरांत मारवाडी भाषा बोलतात.

**गुजर**—वरील मारवाड्यांबद्दलचीं बहुतेक सर्व विधानें गुजरात्यांसहि बऱ्याच अंशीं लागू आहेत. त्यांचीं एकंदर घरें ५ असून त्यांची एकंदर लोकसंख्या २५ आहे. हे लोक घरांत गुजराती भाषा बोलतात. यांपैकीं बऱ्याच जणांचें आडनांव शहा आहे.

**५ भंडारी :—**यांस भावगुणाहि म्हणतात. भंडारी हा शब्द संस्कृत ‘ मंदारक ’ या शब्दावरून निघाला असावा असें कांहींचें मत आहे. मंदारक

याचा अर्थ भट्टी लावणारा असा आहे. यावरून हे मूळचेच दारू काढणारे असावे असा कित्येकांचा तर्क आहे. तथापि कांहींचें मत भाण्डार म्हणजे खजिना या शब्दावरून भंडारी म्हणजे खजिनदार हा शब्द निर्माण झाला असावा असें आहे. खुद्द भण्डारी लोकांस पहिल्या व्युत्पत्तीपेक्षां दुसरीच अधिक आवडते व तें अगदीं स्वाभाविक होय.

मराठी राज्यांत आणि कंपनी सरकारच्या सैन्यांत हे लोक पायदळांत व आरमारांत नोकर असत असें इतिहासावरून दिसतें. शिवाजीचें हेटकरी सैन्य याच लोकांचें होतें.

भण्डारी आणि मराठे यांच्यामध्यें बऱ्याच बाबतींत साम्य आहे व तें सहज नजरेंत भरण्यासारखें आहे. इ. स. १८७७ सालीं माडांवरील कर वाढल्यामुळें यांच्यापैकीं बरेच लोक शेती, बागायत व व्यापार करूं लागले. या लोकांमध्यें चित्रकला, गायनवादन इ. ललितकला यांची विशेष आवड दिसून येते. आमच्या इकडच्या प्रांतांत भंडारी म्हणजे माडी असें समीकरण झालें असलें तरी हे लोक ज्या प्रांतांतून इकडे आले त्या प्रांतांतील यांचे मूळचे भाऊबंद माडीचा धंदा मुळींच करीत नाहींत असें म्हटलें तरी चालेल. त्यांचा मुख्य धंदा शेती व दर्यावर्दीपणा हाच आजमितीलाहि आहे. भंडाऱ्यांमध्यें आठ पोटजाती आहेत त्या अशाः— (१) कित्ते (२) भेरले (३) गावडे (४) बंदे (५) कळत (६) स्थळे (७) शिंदे (८) किरपाल. या पोटजातींमध्यें रोटी व्यवहार होतो परंतु बेटी व्यवहार सररहा होत नाहीं. आमच्या गांवांतील सर्व भंडारी कित्ते भंडारी आहेत.

वरील पोटभेदांपैकीं कांहीं धंद्यावरून, तर कांहीं विशिष्ट देवकांवरून निर्माण झालेले असावे असें दिसतें. यांपैकीं कित्येकांचीं (१) वड (२) पिंपळ (३) कळंब (४) उंबर (५) आंबा हीं देवकें आहेत. वडाचें कूळ म्हणजे त्या कुळांतील लोकांनीं वडाचें लांकूड तोडतां अगर जाळतां कामा नये असा निर्बंध असतो. ह्यांतील बहुतेक लोक माडीचा धंदा करीत असत पण ते स्वतः माडी अगर दारू बिलकूल पीत नसत ही विशेष ध्यानांत ठेवण्याजोगी गोष्ट आहे. मुंबई सरकारचे दारूबंदीमुळें यांचा धंदा आतां साफ बसला असून त्यांच्यामध्यें बेकारी, सारखी वाढत आहे. हे लोक आंजर्लें येथें बऱ्याच अलीकडे रहावयास आले असें दिसतें.

आंजर्ले गांवांत यांचीं एकंदर घरें सुमारें ७५ असून यांची लोकसंख्या सुमारें ४२५ आहे. पुढील आडनांवें असलेले भंडारी या गांवांत आहेत:–(१) केळसकर (२) मयेकर (३) तोडणकर (४) आरेकर (५) भाटकर (६) देवकर (७) खेडेकर (८) महाडिक (९) पाटील (१०) जाधव (११) बोरकर (१२) भोळे (१३) आंजर्लेकर (१४) घोपावकर (१५) बागकर (१६) करंदेकर (१७) भोंसले (१८) चांदवीटकर (१९) मालगुंडकर इत्यादि.

पूर्वींच्या काळीं ज्यांचें नांव सर्वतोमुखीं झालें होतें असे पुढारी म्हटले म्हणजे नारायण पांडुरंग तथा नारबा तोडणकर, चेंड्या भाटकर व बंधु सुर्वे हे होत. आधुनिक पुढारी, गणपत महादेव केळसकर; सखाराम गोविंद महाडिक; भिकाजी गणपत खेडेकर, सखाराम फकिरा जाधव व सखाराम बापू तोडणकर हे होत. यांपैकीं शेवटचे गृहस्थ गांवचे पोलिस पाटील आहेत. या ज्ञातींतील शिक्षणांत पुढारलेली मंडळी खालीलप्रमाणें:–– (१) सदानंद गणपत केळसकर, मॅट्रिक. (२) परशुराम धोंडू केळसकर, बी. ए. (३) सदानंद सखाराम जाधव. (४) लीलाधर रघुनाथ घोपावकर, बी. एससी. (५) विनायक गणपत केळसकर, मॅट्रिक. (६) मुरलीधर जगन्नाथ केळसकर, मॅट्रिक. (७) कृष्णाजी महादेव पाटील, मॅट्रिक. (८) रघुनाथ कृष्ण पाटील, मॅट्रिक. (९) दामोदर सखाराम म्हाडिक, मॅट्रिक. (१०) रघुनाथ बाळा घोपावकर, मॅट्रिक.

६ **शिंपी** :—या लोकांचीं गांवांत एकंदर ८ घरें असून त्यांची लोकसंख्या ५० आहे. यांचीं आडनांवें डोळस, कोरडे, मेलवसे व राऊत अशीं आहेत. यांचा मुख्य धंदा म्हटला म्हणजे शिवणकाम करणें हा आहे. यांच्या बायकाहि शिवणकाम करून संसाराला हातभार लावितात. यांची राहणी स्वच्छ व टापटिपीची असते. श्रीदुर्गादेवीचे यात्रेंत रथाचें कापड दुरुस्त करून तें सुस्थितींत ठेवणें ही कामगिरी डोळस घराण्याकडे आहे व त्याबद्दल त्यांस दायतें मिळतें. यांचेपैकीं विठोबाशेट डोळस यांजकडे श्रीदुर्गादेवीचें शेटेपण असून श्रीदुर्गादेवीचे यात्रेंतील वसुलाचे वेळीं देवीचे तांदूळ मोजण्याचें काम ते करितात व त्याबद्दल त्यांनाहि दायतें आहे. उच्चवर्णीय हिंदूंचे सोळा संस्कारांपैकीं यांचे बरेच संस्कार होतात. यांचेकडील सर्व धार्मिक कृत्यें ब्राह्मणांचे पौरोहित्याखालीं होतात. धार्मिक कृत्यांचे वेळीं हे लोक सोंवळें नेसतात. पूर्वींचे पिढींतील गणपतशेट शिंपी हे

सुपारीचा व्यापार करीत असत. विद्यमान व्यक्तींपैकीं गोपूशेट राऊत, वामन दामोदर डोळस व त्यांचे बंधु हे श्रीगणपतीच्या फारच सुबक मूर्ति करणार म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांतल्या त्यांत यांचें गणपतींचें रंगाचें काम फारच वाखाणण्याजोगें असतें. अनंत गोपीनाथ राऊत हे लिथो आर्टिस्ट म्हणून प्रसिद्ध आहेत.

७ सुतार :— आमचे गांवांत सुतारांचीं १२ घरें असून एकदर लोकवस्ती ६० आहे. या १२ घरांपैकीं ९ जुनीं म्हणजे वतनदारांचीं असून बाकीचीं तीन बाधेकरी यांचीं आहेत. हे लोक काळे असून शरीरप्रकृतीनें ठीक दिसतात. कुळवाडी लोकांप्रमाणेंच यांच्यांतील बऱ्याच लोकांना दारू, माडी पिण्याचा शोक असे. हे लोक आपणांस पांचाळ म्हणवितात व आपली उत्पत्ति देवांचा सुतार " त्वष्टा " याच्यापासून झाल्याचें सांगतात. हे लोक जानवें घालतात व एकाकाळीं श्रावणीहि करीत असत. कळंब, कोचा, जांभूळ, आंबा, उंबर इत्यादि झाडांचीं देवकें हे लोक मानतात. आपआपल्या देवकांचें झाड तोडूं नये, दुखवूं नये, असा यांच्यामध्यें दंडक आहे.

वतनदार सुतार यांचें मूळ गांव " वासी ", संगमेश्वर, जि. रत्नागिरी, नजिक आहे. थोरले दिवाळीचे दिवशीं वतनदार सुतार आपल्या मूळ पुरुषास हरी सुताराचे घराचे मागील बाजूस चिंच आहे तीखालीं नारळ व कोंबडा देतात.

आंकडे टोंचण्याचें काम तसेंच आंकड्यांचे गळ करण्याचें काम त्यांजकडे मूळपासून होतें. तसेंच रथाची दुरुस्ती— खिळा कोयंडा करणें— बीड कुटणें, दारूकामाकरितां व पानसुपारीकरितां चुना भाजून देणें हीं कामेंहि त्यांचेचकडे होतीं. व त्यांतील बहुतेक आजहि त्यांचेकडेच आहेत. निरनिराळ्या प्रसंगीं यांना मानाचा विडा व जेवण मिळतें. त्यांचेकडील विवाह, उत्तरक्रिया व सर्व धार्मिक कृत्यें ब्राह्मणांचे पौरोहित्याखालीं होतात. यांच्यामध्यें यांचे कलेमध्यें नांव कमावलेले पुष्कळ लोक होऊन गेले, त्यांपैकीं कै. विश्राम सुतार व रामभाऊ आंजर्लेकर हे फार नामांकित होते. विद्यमान व्यक्तींत नारायण हरी, धोंडू हरी, राघो कान्हू हे कुशल कारागीर आहेत. मुरूडकर, चिंचघरकर, तांबूटकर, व वतनदार आंजर्लेकर इतक्या आडनांवाचे सुतार या गांवांत आहेत. आमच्या गांवचें लोहारकामहि सुतारच करितात. पूर्वीच्या काळीं हरबा सुतार हें काम करीत असे व हल्लीं धोंडशेट सुतार तें करितात. मारुती पंचायतनाचे देवळाजवळ त्यांची लोहारशाळा आहे.

आंजर्लें गांवांत यांचीं एकंदर घरें सुमारें ७५ असून यांची लोकसंख्या सुमारें ४२५ आहे. पुढील आडनांवें असलेले भंडारी या गांवांत आहेतः—(१) केळसकर (२) मयेकर (३) तोडणकर (४) आरेकर (५) भाटकर (६) देवकर (७) खेडेकर (८) महाडिक (९) पाटील (१०) जाधव (११) बोरकर (१२) भोळे (१३) आंजर्लेकर (१४) धोपावकर (१५) बागकर (१६) करंदेकर (१७) भोंसले (१८) चांदवीटकर (१९) मालगुंडकर इत्यादि.

पूर्वींच्या काळीं ज्यांचें नांव सर्वतोमुखीं झालें होतें असे पुढारी म्हटले म्हणजे नारायण पांडुरंग तथा नारबा तोडणकर, चेंड्या भाटकर व बंधु सुर्वे हे होत. आधुनिक पुढारी, गणपत महादेव केळसकर; सखाराम गोविंद महाडिक; भिकाजी गणपत खेडेकर, सखाराम फकिरा जाधव व सखाराम बापू तोडणकर हे होत. यांपैकीं शेवटचे गृहस्थ गांवचे पोलिस पाटील आहेत. या ज्ञातींतील शिक्षणांत पुढारलेली मंडळी खालीलप्रमाणें:—— ( १ ) सदानंद गणपत केळसकर, मॅट्रिक. ( २ ) परशुराम धोंडू केळसकर, बी. ए. ( ३ ) सदानंद सखाराम जाधव. ( ४ ) लीलाधर रघुनाथ धोपावकर, बी. एससी. ( ५ ) विनायक गणपत केळसकर, मॅट्रिक. ( ६ ) मुरलीधर जगन्नाथ केळसकर, मॅट्रिक. ( ७ ) कृष्णाजी महादेव पाटील, मॅट्रिक. ( ८ ) रघुनाथ कृष्ण पाटील, मॅट्रिक. ( ९ ) दामोदर सखाराम म्हाडिक, मॅट्रिक. ( १० ) रघुनाथ बाळा धोपावकर, मॅट्रिक.

६ **शिंपी** :—या लोकांचीं गांवांत एकंदर ८ घरें असून त्यांची लोकसंख्या ५० आहे. यांचीं आडनांवें डोळस, कोरडे, भेलवसे व राऊत अशीं आहेत. यांचा मुख्य धंदा म्हटला म्हणजे शिवणकाम करणें हा आहे. यांच्या बायकाहि शिवणकाम करून संसाराला हातभार लावितात. यांची राहणी स्वच्छ व टापटिपीची असते. श्रीदुर्गादेवीचे यात्रेंत रथाचें कापड दुरुस्त करून तें सुस्थितींत ठेवणें ही कामगिरी डोळस घराण्याकडे आहे व त्याबद्दल त्यांस दायतें मिळतें. यांचेपैकीं विठोबाशेट डोळस यांजकडे श्रीदुर्गादेवीचें शेटेपण असून श्रीदुर्गादेवीचे यात्रेंतील वसुलाचे वेळीं देवीचे तांदूळ मोजण्याचें काम ते करितात व त्याबद्दल त्यांनाहि दायतें आहे. उच्चवर्णीय हिंदूंचे सोळा संस्कारांपैकीं यांचे बरेच संस्कार होतात. यांचेकडील सर्व धार्मिक कृत्यें ब्राह्मणांचे पौरोहित्याखालीं होतात. धार्मिक कृत्यांचे वेळीं हे लोक सोंवळें नेसतात. पूर्वींचे पिढींतील गणपतशेट शिंपी हे

सुपारीचा व्यापार करीत असत. विद्यमान व्यक्तींपैकीं गोपूशेट राऊत, वामन दामोदर डोळस व त्यांचे बंधु हे श्रीगणपतीच्या फारच सुबक मूर्ति करणार म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांतल्या त्यांत यांचें गणपतींचें रंगाचें काम फारच वाखाणण्याजोगें असतें. अनंत गोपीनाथ राऊत हे लिथो आर्टिस्ट म्हणून प्रसिद्ध आहेत.

**७ सुतार :—** आमचे गांवांत सुतारांचीं १२ घरें असून एकंदर लोकवस्ती ६० आहे. या १२ घरांपैकीं ९ जुनीं म्हणजे वतनदारांचीं असून बाकीचें तीन बाधेकरी यांचीं आहेत. हे लोक काळे असून शरीरप्रकृतीनें ठीक दिसतात. कुळवाडी लोकांप्रमाणेंच यांच्यांतील बऱ्याच लोकांना दारू, माडी पिण्याचा शोक असे. हे लोक आपणांस पांचाळ म्हणवितात व आपली उत्पत्ति देवांचा सुतार "त्वष्टा" याच्यापासून झाल्याचें सांगतात. हे लोक जानवें घालतात व एकाकाळीं श्रावणीहि करीत असत. कळंब, कोचा, जांभूळ, आंबा, उंबर इत्यादि झाडांचीं देवकें हे लोक मानतात. आपआपल्या देवकांचें झाड तोडूं नये, दुखवूं नये, असा यांच्यामध्यें दंडक आहे.

वतनदार सुतार यांचें मूळ गांव "वासी", संगमेश्वर, जि. रत्नागिरी, नजिक आहे. थोरले दिवाळीचे दिवशीं वतनदार सुतार आपल्या मूळ पुरुषास हरी सुताराचे घराचे मागील बाजूस चिंच आहे तीखालीं नारळ व कोंबडा देतात.

आंकडे टोंचण्याचें काम तसेंच आंकड्यांचे गळ करण्याचें काम त्यांजकडे मूळपासून होतें. तसेंच रथाची दुरुस्ती— खिळा कोयंडा करणें— वीड कुटणें, दारूकामाकरितां व पानसुपारीकरितां चुना भाजून देणें हीं कामेंहि त्यांचेचकडे होतीं. व त्यांतील बहुतेक आजहि त्यांचेकडेच आहेत. निरनिराळ्या प्रसंगीं यांना मानाचा विडा व जेवण मिळतें. त्यांचेकडील विवाह, उत्तरक्रिया व सर्व धार्मिक कृत्यें ब्राह्मणांचे पौरोहित्याखालीं होतात. यांच्यामध्यें यांचे कलेमध्यें नांव कमावलेले पुष्कळ लोक होऊन गेले, त्यांपैकीं कै. विश्राम सुतार व रामभाऊ आंजर्लेकर हे फार नामांकित होते. विद्यमान व्यक्तींत नारायण हरी, धोंडू हरी, राघो कान्हू हे कुशल कारागीर आहेत. मुरूडकर, चिंचघरकर, तांबूटकर, व वतनदार आंजर्लेकर इतक्या आडनांवाचे सुतार या गांवांत आहेत. आमच्या गांवचें लोहारकामहि सुतारच करितात. पूर्वीच्या काळीं हरबा सुतार हें काम करीत असे व हल्लीं धोंडशेट सुतार तें करितात. मारुती पंचायतनाचे देवळाजवळ त्यांची लोहारशाळा आहे.

८ **कुंभारः**— आंजर्ले गांवांत एकंदर कुंभारांचीं घरें सुमारें १० आहेत व एकंदर वस्ति ५० आहे. ही सर्व वस्ति वहिरीचे देवळाजवळ म्हणजेच बिरवाडीस आहे. कुंभारांत कळंब, उंबर, कोचा, वारुळाची माती व मोराचीं पिसें अशीं देवकें आहेत. कुंभारांची वस्ति ब्राह्मणादि मंडळीचे बरीच आधींची असावी. कारण यांतील कांहीं लोक अद्यापि कित्येक देवळांत पूजेचें काम करितात. उपाध्येपण करितात. व शूद्रांची अंत्यक्रियाहि करितात; या क्रियेला "कुंभारक्रिया" म्हणतात. या लोकांचा मुख्य धंदा म्हटला म्हणजे मातीचीं भांडीं, म्हणजेच लोटे, घागरी, मडकीं, कौलें इत्यादि जिन्नस करणें व ते विकणें हा होय. परंतु, आंजर्ल्यांचे लोट्यांपेक्षां, केळशी व जालगांव येथील लोटे चांगले अशी लोकांची भावना असल्यामुळें, लोक तेच जास्त घेतात. तसेंच घरांवर घालावयाचीं कौलेंहि आतां सर्व लोक मंगलोरीच वापरूं लागल्यामुळें यांचे धंद्यावर व पर्यायानें सांपत्तिक स्थितीवर बराच परिणाम झाला असून यांचे घरचे मंडळीला वेळपरत्वें मोलमजुरीस बाहेर जावें लागतें. यांचेकडील विवाह, सत्यनारायण इत्यादि धार्मिक कृत्यें ब्राह्मण पौरोहित्याखालीं होतात. उत्तरक्रिया मात्र कुंभारांकडूनच होते. आंजर्लेकर, पाटील वतनदार, पालशेतकर, जालगांवकर व शिरकर इतक्या आडनांवाचे कुंभार या गांवांत आहेत. पुढारी— काशीनाथ पाटील, केशव तुकाराम आंजर्लेकर हे विद्यमान, व मागील पिढींतील नारायण कुंभार, हे होत. या ज्ञातींतील उच्च शिक्षण घेऊन पुढें आलेले गृहस्थ म्हटले म्हणजे काशीनाथपंत आंजर्लेकर ( पेन्शनर ) व त्यांचे चिरंजीव गजाननराव हे होत.

९ **डोंगर कोळीः**— डोंगर कोळी घरें ३ पैकीं चालू एकच म्हटलें तरी चालेल. यांत सक्पाळ व खामकर हीं दोन आडनांवें आहेत. यांपैकीं खामकर हे शिरके ग्रामरचनाकार यांचे निकटवर्ती म्हणून, श्रीदुर्गादेवी यात्रेंत व इतरत्रहि त्यांस बराच मान आहे व त्याबरोबर कामगिरीहि आहे. बापूजीशेट सक्पाळ, वास्तव्य मुंबई यांनीं व्यापारांत चांगलेंच द्रव्यार्जन केलें आहे.

१० **न्हावीः**— या जातीच्या उत्पत्तीबद्दल निरनिराळ्या दंतकथा आहेत. कोणी म्हणतात शंकराचे मानेभोंवतीं असलेले शेषापासून यांची उत्पत्ति झाली तर कोणी ते शिवाचे नाभीपासून म्हणजेच बेंबीपासून उत्पन्न झाले असें सांगतात. नापित, नाभिक असे शब्दहि या जातीबद्दल योजिलेले आढळतात व त्यांपासूनच

' न्हावी ' हा अपभ्रष्ट शब्द झाला असावा असा कित्येकांचा तर्क आहे. न्हावी लोकांचे समाजधर्म, आचारविचार, आडनांवें वगैरेवरून हे लोक मूळचे क्षत्रीय मराठेच असावे असें दिसतें. अद्यापहि उच्च मराठे लोकांकडील लग्नकार्यांतील जेवणावळींत पाणी वाढण्याचें काम न्हावी करितात. खानदेश, नाशीककडेहि मोठ्या समारंभांत पोळ्या लाटण्याचें काम तरी या लोकांकडेच असतें. गुजराथेंत न्हावी लोक हरकाम्याचें व मशालजीचें काम करितात. आंजर्लें गांवचे श्रीदुर्गादेवीचे महोत्सवांतहि, मंडपांतील पणत्या, समयांच्या वाती सारणें, विडे वांटणीनंतर मशाल घेऊन महाजन वर्तक कारभारीमंडळी व इतर ग्रामस्थ यांस श्रीदुर्गादेवीचे देवालयापर्यंत नेऊन पोंचविण्याचा मान न्हाव्याचाच आहे. पूर्वींचे काळीं सैन्याबरोबर असलेले न्हावी आजच्या डॉक्टरांप्रमाणें शस्त्रक्रिया करीत असत असें कित्येक उल्लेखांवरून दिसतें. हजामती करणें हा यांचा मुख्य धंदा असला तरी, वर दर्शविल्याप्रमाणें शस्त्रक्रिया करणें, जळवा लावणें हीं कामेंहि हे लोक आवडीनें करितात. आंजर्लें गांवांत न्हाव्यांचीं ५ घरें आहेत व एकंदर वस्ति ३० आहे. या सर्वांचीं घरें ब्रिरवाडींतच आहेत. सुमारें ७५।८० वर्षांपूर्वीं यांचेकडील स्त्रिया केशवपन करीत असत. हे लोक रोज जानवें घालीत नसले तरी, उत्तरक्रिया करितांना रेशमाचें जानवें घालतात. पंचमी व षष्ठीपूजन, विवाह, उत्तरक्रिया इतके संस्कार यांचेवर होतात. यांचेकडील सर्व धार्मिक कृत्यें ब्राह्मण पौरोहित्याखालीं होतात. उंबर, आंबा इत्यादि यांचीं देवकें आहेत. सरनौबत, इंदुलकर, मोहिते, जाधव इतक्या आडनांवाची न्हावी मंडळी या गांवांत असून त्यांत सरनौबत हे वतनदार मानकरी आहेत. कांहीं वर्षांपूर्वीं यादवांचेंहि एक मोठें कुटुंब या गांवांत होतें पण आतां तें नामशेष झालें आहे. आजचे वतनदार व पुढारी भिकाजी पांडुरंग सरनौबत हे आहेत. पूर्वींचे काळीं गणपत न्हावी, रामा न्हावी इत्यादि मंडळी बरीच लोकप्रिय होती. पूर्वींच्या काळांतील लक्ष्मण न्हावी दापोलीस राहून थोडें इंग्रजी शिकला होता, व आजचा रघुनाथ पांडुरंग सरनौबत मॅट्रिक होऊन कलकत्ता येथें नोकरीस असतो.

**११ गुरव**:— हे सर्व लिंगायत पंथाचे आहेत. यांचा मुख्य धंदा शंकरादि देवांची पूजा करणें व मंगलप्रसंगीं वाद्यें वाजविणें व कथाकीर्तनांतून मृदंग वाजविणें हा होय. सर्व गुरव घाटावरून इकडे आलेले असून, जेजुरी येथील खंडोबा हें

त्यांचें कुलदैवत आहे असें ते सांगतात. येथील ग्रामदेवता श्रीभैरव, श्रीहनुमंत, कड्यावरील गणपतीशेजारील हरिहरेश्वर, कोंपरींतील श्रीनारायणाचे शेजारचा सिद्धेश्वर, पाखाडींतील गोखले यांचा श्रीहरिहरेश्वर, व भंडारवाड्यांतील श्रीविठोबा इतक्या देवांची पूजा, गांवांतील गुरव करितात. श्रीदुर्गादेवीचे यात्रेंतील १८ दिवसांत कथेसंबंधीं व इतर वेळीं वाद्यें वाजविण्याचें काम गुरव करितात. या कामगिरीबद्दल त्यांना श्रीदुर्गादेवी संस्थानांतून भरपूर बिदागी मिळते. गुरव ज्या देवांची पूजा करितात त्या देवांना सरकारी खजिन्यांतून मिळणारी नेमणूक गुरवच घेतात. गुरवांकडे त्यांचे कामगिरीबद्दल कांहीं इनाम जमिनीहि होत्या, परंतु त्या बहुतेक त्यांनीं विकून अगर गहाण टाकून जवळजवळ त्यांस नाहींशा केल्या आहेत. अशा तऱ्हेनें निव्वळ त्यांचे धंद्यावर उपजीविका करणें आतां त्यांना अशक्यप्राय झालें आहे. यामुळें कित्येक इसम गांवाबाहेर अन्य धंद्यास गेले व जे गांवांत आहेत तेच गांवकीचीं व इतर कामें कशींबशीं पार पाडीत आहेत.

गांवांत गुरवांचीं कुटें ३ आहेत. त्यांपैकीं एक कूट पांडलिंग गुरव याचें, व हेंच काय तें ठाकठिकीनें चालू आहे. राहिलेल्या २ कुटांत एक एक मुलगा असून त्यांत होतकरू कोणीच दिसत नाहीं. गुरवांत पुनर्विवाहाची चाल नव्हती ती आतां सुरू झाली आहे. स्त्रियांचा पोशाख, दागदागिने, कुंकू लावणें इ. बहुतेक आचार ब्राह्मण कुटुंबियांप्रमाणेंच पाळण्यांत येतात. पूर्वीं देवाची पूजा करितांना, जेवतांना व घरोघरचे नैवेद्य गोळा करितांना गुरव सोंवळें नेसत असत. गुरवांत प्रेतें जाळीत नाहींत. स्मशानांत नेतांना बसवून नेतात व तशींच पुरतात. पुरतांना गळ्यांतील लिंग काढून हातावर देतात. गुरवांचे गुरु, उपाध्याय इ. जंगम असतात व तेच त्यांचेकडील शुभाशुभ सर्व धार्मिक कृत्यें चालवितात. नुकताच कैलासवासी झालेला लक्ष्मण गुरव हा वादनकलेंत निष्णात असून सर्व बिरवाडीचा पुढारी होता. गांवांतील गुरवांची लोकसंख्या सुमारें १० आहे.

**१२ धोबी अथवा परीटः—** यांचें या गांवांत एकच घर असून त्यांची लोकसंख्या ५।६ आहे. यांचें आडनांव सावंत आहे. यांचा मुख्य धंदा कपडे धुण्याचा आहे व पूर्वींचे काळापेक्षां सर्व जातींत कपडे जास्त वापरण्याची

व ते धोब्याकडे धुवावयास देण्याची प्रवृत्ति आतां वाढली असल्यामुळें, त्यांचा धंदा आतां चांगला चालूं लागला आहे. व त्यांची सांपत्तिक स्थिति हळूहळू सुधारत आहे. हे गांवांतील मानकऱ्यांपैकीं एक असून श्रीदुर्गादेवीचे यात्रेंत दिव्यांचे वातीं-करितां वातेरूं पुरविणें व छताची व्यवस्था लावणें इत्यादि कामांबद्दल यांस दायतें मिळतें. पूर्वीच्या काळीं हे वटपौर्णिमेचे दिवशीं वडास पातळ नेसवीत असत व त्याबद्दल त्यांना वडाचे पूजेंतील कांहीं अंश मिळत असे. स्त्रियांचे प्रसूतीनंतर ११ वे दिवशीं सोहेर काढण्याचें काम यांजकडे असतें. यांचेकडील विवाह, सत्य-नारायण हीं शुभ धार्मिक कृत्यें ब्राह्मणांचे पौरोहित्याखालीं होतात परंतु उत्तर-क्रिया मात्र कुंभाराकडून होते.

१३ तेली:-- गांवांत तेल्यांचीं सुमारें १५ घरें असून त्यांची लोकसंख्या सुमारें ८० आहे. यांची वस्ती बरीच अलीकडची असून त्यांच्यापैकीं कोणीहि मानकरी व वतनदार नाहीं. गांवचा वतनदार मानकरी तेली इस्माइल असून अगदीं नुक्ता तो श्रीदुर्गादेवीचे यात्रेंतील तेल पुरविण्याची कामगिरी जातीनें हजर राहून बजावीत असे व त्याबद्दल मिळणारें दायतेंहि घेत असे. गुहागरकर, वायंगणकर, करमळकर, घाणेसरकर या आडनांवांचे तेली आमचे गांवांत आहेत. या मंडळीची मुख्य वस्ती कातळकोंडावर असून कांहीं घरें पेठपाखाडींत व कांहीं तरीबंदरचे रस्त्यावर आहेत. यांचा मुख्य धंदा तेल गाळण्याचा आहे, तथापि बाहेरून येणारे गिरणीचे तेलामुळें व पेंडीमुळें, यांचा धंदा बराच बसल्या-सारखा आहे. एकाकाळीं यांची सांपत्तिक स्थिति चांगली होती हें त्यांचे नांवापुढें जोडण्यांत येणारे "शेट" या पदवीवरून दिसून येतें. तेल गाळण्याचे धंद्याखेरीज हे लोक शेती, बागायत व गाडीवाला इत्यादि धंदेहि करितात. सर्व तेली चांगले उंच व प्रकृतीनें सुदृढ असतात व यामुळें त्यांची इच्छा असल्यास त्यांना सैन्यांत सहज दाखल होतां येईल. दर सोमवारीं व अमावास्येस घाणा बंद ठेवणारे तेल्यांस "सोमवारे" तेली किंवा मराठे तेली म्हणतात. हे लोक शिवोपासक आहेत. यांचेपैकीं जे लोक देशावर राहतात त्यांचे गळ्यांत लिंग असतें, व ते मद्यमांस यांस स्पर्श करीत नाहींत. षष्ठीपूजन, नामकरण, विवाह व अंत्यविधि इतके धार्मिक संस्कार यांचेवर होतात व ते सर्व ब्राह्मण पौरोहित्याखालींच होतात. यांच्यांतील पूर्वींचे काळचे पुढारी सखाराम भिकशेट म्हाडिक हे होते व

आजचे पुढारी बजाबा गणपतशेट म्हाडिक व परशुराम धोंडशेट म्हाडिक हे होत. हे लोक लग्नकार्यादि प्रसंगीं ब्राह्मणी पगडी घालतात.

**१४ मराठेः—** रत्नागिरी जिल्ह्यांतील व त्यांतल्या त्यांत अगदीं उत्तर-भागांतील मराठे मंडळीस 'राव' म्हणतात. राव हा राजा याचा अपभ्रंश आहे. तात्पर्य हे एका काळचे क्षत्रिय असावे. अशा प्रकारचे मराठे आमच्या गांवांत नाहींत. कुळवाड्यांहून किंचित् निराळे दिसणारे व ज्यांच्या बायकांच्या लुगडें नेसण्याचे तऱ्हेंत व ब्राह्मणांचे बायकांचे लुगडें नेसण्याचे तऱ्हेंत बरेंच साम्य आहे असे मराठे आमच्या गांवांत आहेत. त्यांची वस्ती नवानगर, चिखलतळें, ब्रिरवाडी व कातळकोंड या भागांत आहे. निरनिराळ्या भागांत मिळून या लोकांचीं घरें सुमारें १५।१६ आहेत व त्यांची लोकसंख्या अदमासें ७५।८० आहे. कुळवाडी लोकांप्रमाणेंच, शेतीवाडी व मजुरी हेच या लोकांचे मुख्य धंदे आहेत. यांच्याकडील सर्व धार्मिक कृत्यें ब्राह्मण पौरोहित्याखालीं होतात.

**१५ कुळवाडीः—** कुळवाडी या शब्दाची व्युत्पत्ति नीटशी माहीत नाहीं. कांहीं लोकांच्या मतें " वाडींतील कुळ ते कुळवाडी " या व्युत्पत्तिप्रमाणें खुद्द रत्नागिरी वगैरे ठिकाणीं त्यांचीं घरें दुसऱ्यांचे वाडींतच असतात. घराखालची जमीन त्यांची नसतेच; व दुसऱ्याचे जागेंत घर बांधून राहिल्याबद्दल जमीनमालकाची त्यांना कांहीं सेवाहि करावी लागते. आमच्या गांवांतहि स्वतःची मालकीची जमीन व तींत घर असे फार थोडेच लोक आढळतील. हे लोक शुद्ध शूद्र असले तरी मूळचे या गांवचे रहिवासी खास नसावे हें वरील त्यांचे जमीन जुमल्याचे वर्णनावरून सहज ध्यानीं येईल. तथापि हे लोक केव्हां व कोठून आले याबद्दल कांहींच माहिती उपलब्ध नाहीं. आंजलें गांवांत यांची मुख्य वस्ति ताडाचा कोंड या समुद्रसपाटीपासून ३०।४० फूट उंचीच्या एका लहानशा टेकडीवर आहे. व कांहीं वस्ती चिखलतळें व नवानगर अथवा भाटवाडी या भागांत आहे. हे सर्व लोक आजमितीला एकजिनसी व एकमेकांत ज्यांचा रोटी-बेटी व्यवहार होतो असे असले व त्या सर्वांचीं लग्नें व बहुतेक सर्व धार्मिक कृत्यें ब्राह्मणांकडून केलीं जात असलीं तरी त्यांच्या उत्तरक्रिया, ब्राह्मण, कुंभार, जंगम, गोंधळी अशा निरनिराळ्या ज्ञातीचे लोकांकडून केल्या जातात. हे सर्व शेती-बागाईत व मोलमजुरी करून आपली उपजीविका करितात. यांपैकीं बहुते-

कांची सांपत्तिक स्थिति फारच निष्कृष्ट आहे. यांपैकीं बहुतेक तरुण लग्नाचे वेळीं कर्ज काढितात व सावकाराकडे नोकरी करून तें फेडितात. आजकालच्या शिधा-वांटप पद्धतीमुळें सर्व उच्च नीच वर्णीयांचा आहार जवळ जवळ एकच झाला असला तरी पूर्वीच्या काळीं यांचा मुख्य आहार म्हणजे नाचणी, वरी, कण्या इत्यादींची भाकरी व हरकाचा व सणावाराला तांदुळांचा भात व मासे हा होता. हे लोक माडी पिण्याचे फार शोकी. यांच्या बायका फार कष्टाळू असतात. त्या ब्राह्मण, भंडारी, सोनार, कांसार इत्यादि मंडळीकडे दळण, कांडण, नित्याचीं भांडीं घासणें, धुणें धुणें, झाड फेड करणें इत्यादि कामें करून पैसे मिळवितात व शिवाय शेतीचीहि सर्व प्रकारचीं कामें करितात. अलीकडे यांच्यापैकीं पुष्कळ तरुण कुणबी मंडळी मुख्यतः मुंबईंत व देशावर इतर शहरीं गिरणींत शेटसावकारांकडे खाजगी नोकराचें काम करितात. तेथें त्यांस "बाल्या", "कोकण्या" अगर "रामा" म्हणतात. नोकर या नात्यानें प्रामाणिकपणा, नीटनेटकेपणा, हुशारी, टापटीप इत्यादि त्यांचे अंगचे गुणांमुळें त्यांनीं चांगलें नांव कमाविलेलें आहे. आंजर्लें गांवांत यांचीं सरासरी १०० घरें असून, लोकसंख्या अदमासें ५०० आहे. हे शिक्षणांत फार मागासलेले आहेत. तथापि अलीकडे खास त्यांचे वस्तींत लोकलबोर्ड शाळा झाली असल्यामुळें त्यांचे मुलांत साक्षरतेचा प्रसार झपाट्यानें चालू आहे. तसेंच वाढलेले मजुरीचे दर व मद्यपानबंदी यांमुळें यांची सांपत्तिक स्थिति हळुहळु सुधारत आहे. ताडाचे कोंडावर खालील आडनांवाचे लोक आहेतः— पारधुळे (पाटील), अबगुल, बांईत, उजळ, भोगल, उंड्रे, जोशी, एखे, महादलेकर, धनवडे, पवार, शिगवण, दोडकडे, चिखले, धाडवे, बेलकर, चोरगे, घरवे, कातळे, कांडगे, खोपटकर, पाथ्ये, रहाटवळ, महाबदी, डिंगणकर, वीर, तळवटकर इत्यादि. यांच्यांतील आजची पुढारी मंडळी, नारायण धोंडू पारधुळे, महादेव बाबाजी उजळ, विठ्ठल सखाराम भोगल, भिकोबा बेलकर, धोंडिबा पवार, महादबा म्हाबदी, गणपत बांईत हे आहेत. गणपत बांईत यांचा एक मुलगा नारायण व्हर्नाक्युलर फायनल परीक्षा उत्तीर्ण होऊन मराठी शाळेंत शिक्षक आहे व दुसरा इंग्रजी शिकत आहे. तसेंच अनंत गोविंद राहटवळ हा दिवसास नोकरी करून मुंबई येथें इयत्ता ९ वींत इंग्रजी शिकत आहे.

१६ **बांगडीवाले कासार**:— यांचें एक घर या गांवांत असून एकंदर लोकसंख्या ५-६ आहे. यांच्यापैकीं स्त्रिया व पुरुष या सर्वांचा मुख्य धंदा बांगड्या भरणें व विकणें हा आहे. हे लोक निवळ शाकाहारी असून त्यांची रहाणी बरीच निर्मळ असते. ही मंडळी गेलीं कित्येक वर्षें येथें असली तरी स्वतःचें घरदार, शेतीवाडी करून स्थायिक झालेली नाहीं. यांचेकडील सर्व धार्मिक कृत्यें ब्राह्मणच करितात. पूर्वींच्या काळीं या गांवांत रहात असलेले कांसारांचें आडनांव मोहरीर होतें व त्यांपैकीं क्रोंडिबाशेट बरेच प्रसिद्ध होते. विद्यमान मंडळीचें आडनांव वाचासिद्ध असें आहे.

१७ **चांभार**:— गांवांत चांभारांचीं एकंदर ८ घरें असून त्यांची लोकसंख्या सुमारें ४० आहे. हे लोक त्यांचे धंद्यामुळें अस्पृश्य मानले गेले असले तरी ते मूळचे आर्यवंशांतीलच असावे असें त्यांचा गौरवर्ण, विशिष्ट चेहरेपट्टी व शरीररचना यांवरून स्पष्ट होतें. आंजर्लेकर, मुरुडकर व केळशीकर या आडनांवांचे लोक आंजर्ले गांवांत आहेत त्यांपैकीं आंजर्लेकर वतनदार असून श्रीदुर्गादेवीचीं सणगें म्हणजे ढोल, नगारे, ताशा हीं मढवून देण्याची कामगिरी त्यांची आहे. यांस "चांभाराचे मानाचे" शेतांत रथ आला कीं रथासमोर उभें राहून रथाजवळ जाऊन धुपारती ओंवाळण्याचा मान आहे. हे लोक जोडधंदा म्हणून शेतीहि करितात. यांचेकडील शुभ धार्मिक कृत्यें जंगम पुरोहित करितात पण उत्तरक्रिया कुंभाराकडे आहे. एकदोन वर्षांपूर्वीं यांचेपैकीं एकाकडील सत्यनारायण, ब्राह्मण पौरोहित्याखालीं झाला.

१८ **महार**:— "गांव तेथें म्हारवडा" अशी एक म्हण आहे, पण आमचें आंजर्लें त्यास अपवाद आहे. आमचे गांवांत म्हार वस्ती नाहीं.

१९ **बुरूड**:— महारांप्रमाणेंच आमचे गांवांत बुरुडहि नाहींत.

२० **मुसलमान**:— एका काळीं या गांवांत सावणें, नमाजगणा, ताडाचा कोंड, आजचा भंडारवाडा, खाडीचा कांठ या भागांत म्हणजेच एकंदरींत सर्व समुद्रकिनाऱ्यावर मुसलमान लोकांची पुष्कळच वस्ती असावी; परंतु आजमितीला आमचे गांवांत फक्त १० च मुसलमानांचीं घरें आहेत व त्यांची एकंदर लोकसंख्या ४५ असून सुस्थितींत असलेली अशी एक मशीदहि त्यांचे मोहल्ल्यांत आहे. यांच्या बायका विकच्छ लुगडीं अगर पातळें नेसतात व जुन्या काळचे बुरख्याचा

अवशेष म्हणून भली मोठी पांढरी चादर पांघरतात. यांची भाषा विशिष्ट प्रकारची मराठी असून यांना ऊर्दूचा गंधहि नाहीं. एका काळीं येथें पुष्कळ असलेली यांची वस्ती आपल्यावर ‘ देवी ’ कोपली म्हणून लोक पटकीनें मरतात व देवीनें सोडलेले वाघाचे भक्षस्थानीं पडतात अशा समजुतीनें आंजर्ले सोडून खाडीच्या पलीकडे दक्षिण तीरावर गेली. आंजर्ल्याहून आलेले हे लोक याचें द्योतक म्हणून ते ज्या भागांत राहतात त्या भागाला “ आंजर्ले तरीबंदर ” म्हणतात.

---

# प्रकरण ९ वें

## शेतीवाडी

आमच्या गांवाचें एकंदर क्षेत्रफळ १३७८॰२०॰१२ एकर आहे. त्यांपैकीं भातशेती १४१॰१७॰१२ एकर असून तिचें उत्पन्न सुमारें १४२ खंडी आहे. वरकस जमीन ८६॰३९ एकर असून तींत नाचणी २६ खंडी व फार थोडी वरी, हरीक व तीळ अशीं पिकें येतात. खाजगी मालकीचे लाग ७७॰१४॰८ एकर आहेत. सरकारी बिन आकारी गुरचार १५८॰८॰११॰४ एकर आहे व गांवकऱ्यांचा सार्वजनिक स्वरूपाचा आकारी गुरचार ६०॰३४ एकर आहे. भातशेतीचा पेंढा व वरील लागांतील गवत वर वर्णन केल्याप्रमाणें असलें तरी तें गांवांतील जनावरांना अपुरें पडतें व जवळपासच्या वरकशींतील येणारें गवत गांवकऱ्यांना विकत घ्यावें लागतें. गांवचा एकंदर जमीन महसूल ( लोकल फंड धरून ) रु. २६३२८॰९ आहे.

**गांवाची अन्न–धान्य परिस्थितिः—** वर दिल्याप्रमाणें गांवांतील भातशेतीचें उत्पन्न १४२ खंडी आहे. आंजर्ले गांवांतील बऱ्याच लोकांची शेती, मुरडी, माळवी, लोनवडी, सुखोंडी, बोरथळ, इळणें इत्यादि गांवीं आहे व तिचें उत्पन्न गांवांतल्या इतकेंच आहे. म्हणजे आमच्या ग्रामस्थांचें भातशेतीचें उत्पन्न २८४ खंडी झालें. त्यांत नाचणी, वरी, हरीक यांचें उत्पन्न २६ खंडी मिळविलें कीं गांवचें एकंदर उत्पन्न सुमारें ३१० खंडी म्हणजेच ६२०० मण झालें व

त्यास लोकसंख्येनें भागलें असतां माणशीं सरासरी वार्षिक उत्पन्न दोन पूर्णांक तीन-चतुर्थांश मण झालें. दर डोई दरमहा निदान पाऊण मण अन्नधान्य जरूर. यावरून पाहतां गांवचें अन्न-धान्याचें उत्पन्न फार फार तर ३।४ महिन्यांना पुरण्याइतकें ठरतें व बाकीचे अन्न-धान्याकरितां गांव परावलंबी आहे. हें परावलंबित्व घालविण्याकरितां पडित जमीन लावगडीखालीं आणणें जरूर आहे. तसेंच उभागरांतील व पेठपाखाडींतील पोफळींचे, बांडरोगाला कंटाळलेले बागायतदारांनीं आपल्या, फारसें उत्पन्न न देणाऱ्या, बागा मोडून त्या ठिकाणीं भातशेती केल्यास अन्न-धान्य परिस्थिति थोडी तरी सुधारण्यास मदत होईल असें आमचें मत आहे. ही सूचना अगदींच अव्यवहार्य मानण्याचें कारण नाहींच; कारण यांपैकीं पूर्व बाजूकडील रहिवाश्यांचे बरेच जणांचे बागांचे पलीकडे लहान लहान शेतें आहेतच.

**बागायतः**— मुख्य उत्पन्नाचीं झाडें म्हणजे नारळी ( माड ), पोफळी, आंबे ( रायवळ व कलमी ), फणस, पपनस, लिंबारे, रामफळ, केळी व पानवेली हीं होत. गांवांतील बागायत जमिनीचें एकंदर क्षेत्र सुमारें ११५ एकर असून त्यांत सुपारीबाग ३२८६८५८, नारळीबाग ४८८२५८८, केळी ६८२४८८ व कलमी आंबे २८८२३८४ या प्रमाणें आहेत. यांपैकीं नारळी–पोफळीच्या बागा मुख्यतः उभागर व भंडारवाडा या अगदीं समुद्रकांठचे भागांत आहेत. माड अथवा नारळीचें झाड हा कोंकणांतील लोकांचा कल्पवृक्षच आहे.

**पोफळीः**— वरील नारळीचे खालोखाल उपयुक्त व उत्पन्नाचें झाड म्हटलें म्हणजे पोफळ होय. समुद्रालगतचे भागांत जसे माड तशा जरा डोंगराकडचे भागांत पोफळी चांगल्या होतात. नारळी–पोफळींचे खालोखाल उत्पन्नाचे जिन्नस म्हटले म्हणजे, विंवळा अथवा पानवेली, केळी, रायवळ आंबे, फणस, अननस, कोकंब हे होत. याखेरीज बागांतून आढळणारीं व थोडी-फार उत्पन्नांत भर घालणारीं झाडें म्हटलीं म्हणजे भेंड, सोनचांफा, उंडीण, आमस्या जांब, गोडा जांब, बदाम, विलायती जांब, विलायती फणस, लव, नीव, शेवगा इत्यादि होत.

**कलमी आंबेः**— वरील नारळी पोफळींप्रमाणेंच गेले ५०।६० वर्षांत ज्या झाडांचे उत्पन्नानें गांवाचे संपत्तींत चांगलीच भर पडली अशीं झाडें म्हणजे कलमी आंब्याचीं व त्यांचे खालोखाल चिकूचीं होत. समुद्रापासून जरा दूर पण जेथें खारी हवा येऊन पोहोंचते अशा डोंगराचे उताराचर कलमी आंब्याचीं झाडें

चांगलीं होतात. यांची पहिलीं २।३ वर्षें पाणी घालून जोपासना केल्यावर मग यांचें उत्पन्न काढून घेण्याखेरीज दुसरें विशेष कांहींच करावें लागत नाहीं.

---

# प्रकरण १० वें

## पाळीव व रानटी जनावरें, पक्षी व सरपटणारे प्राणी

**१ पाळीव जनावरें:**— पूर्वींच्या काळीं म्हणजे चहाचें बंड माजण्यापूर्वी लोकांची प्रवृत्ति गाई बाळगण्याकडे जास्त असे; परंतु चहामुळें आतां, विशेषतः ब्राह्मण मंडळींत म्हशी बाळगण्याची प्रवृत्ति फार वाढली आहे, व त्यामुळें पुष्कळ घरीं भरपूर दूध दिसतेंहि. परंतु त्यापैकीं बराच मोठा भाग चहांत खलास होतो व फारच अल्प अंश, मुलांचे वांटणीला येतो व त्याहूनहि अल्प अंश ताक, दहीं रूपानें प्रौढांचे पोटांत जातो. सरकारनें दारूबंदी करून आमचे गांवचे भंडारी-बंधूंस बेकार केलें व समाजांत गुन्हेगारी वाढविली; त्याचे ऐवजीं सरकार जर चहाबंदी करील तर तें सर्वतोपरी अधिक हितकर होईल. उन्हाळ्यांत नारळी-पोफळींचे शिंपण्याकरितां बहुतेक घरीं एक-दोन बैल बाळगतात व त्यांचे जोडीला एखादी गायहि बऱ्याच घरीं आढळते.

**कुत्रे व मांजरें:**— या गांवांत ग्रामकेसरी अगर कुत्रे याची संख्या अगदींच थोडी नाहीं. परंतु त्यांत ज्यांस पाळीव म्हणतां येईल असे फारच थोडे, कांहींतरी खाऊन जिवंत असणारे अशांचीच संख्या एकंदरींत ज्यास्त. चांगले जातिवंत कुत्रे राखणदार म्हणून पाळण्याकडे येथील लोकांची प्रवृत्ति नाहीं. परंतु ह्या कसेंतरी जिवंत राहणाऱ्या कुत्र्यांपैकीं मधून मधून एखादा तरी पिसाळून बऱ्याच माणसांना उपद्रव करितो येवढेंच नव्हे तर कांहीं मृत्यूहि घडवून आणतो. कुत्रे पाळण्याची लोकांना आवड नसली तरी मूषकसंहारासाठीं मांजरें मात्र घरोघर पाळतात.

**घोडे व गाढवें:**— अब्राह्मणांचे वरातीकरितां लागणारे १-२ घोडे गांवांत आहेत व वडार वगैरे फिरते लोक गांवांत आले म्हणजे त्यांचीं गाढवें गांवांत दिसतात. एरव्हीं दिसत नाहींत.

**बकरीं:**— देशावरचे बहुतेक शेतकरी घरोघर एकदोन बकऱ्या तरी पाळितात पण आमच्या गांवच्या शेतकऱ्यांत ती प्रथा नाहीं.

**रानटी जनावरांपैकीं** काळमांजर, कोल्हा, तरस व क्वचित् डुक्कर व वाघ येवढे प्राणीच येथें आढळतात. पैकीं कोल्हे कुत्रीचीं पिलें व कोंबडीं मारून खातात, तरस गाई-म्हशींचीं लहान वांसरें मारतात व क्वचित् फिरत येणारे वाघोबा गाई-बैलांचीहि शिकार करितात. शाकाहारी जंगली प्राणी, काळ्या तोंडाचे रामदूत म्हणजेच वानर हे टोळ्या टोळ्यांनीं बागांवर हल्ला करून आंबे, केळीं, जांब, पेरू इत्यादींचा फन्ना उडवितात. तथापि बंदुकीचे सहाय्यानें, मध्यंतरींचे काळांत त्यांचा बराच संहार केल्यामुळें त्यांचा उपद्रव आतां बराच कमी झाला आहे. याचें श्रेय रा. हरीभाऊ साठये व रामकृष्ण हरी नित्सुरे यांस आहे. अगदीं अलीकडे तांबड्या तोंडाचीं फार उपद्रवी माकडेंहि गांवांत दिसूं लागलीं आहेत. हे प्राणी फार हुशार व बंदुकीसहि दाद न देणारे असल्यामुळें वेळींच त्यांचा योग्य बंदोबस्त करणें अत्यंत जरूर आहे.

**पक्षी:**— बहुतेक सर्व अब्राह्मण मंडळींत घरोघर कोंबडीं बाळगण्याची प्रथा आहे. देशावरच्याप्रमाणें अगर मोठ्या शहरांतील सुखवस्तु लोकांप्रमाणें आमचे गांवांतील लोकांना पोपट पाळण्याची आवड नाहीं.

**रानटी पक्षांत** सर्वांत मोठे व मांसाहारी पक्षी म्हटले म्हणजे गिधाड व घार हे होत. यांचे खालोखाल आकार असलेला पक्षी म्हटला म्हणजे कांकण हा होय. त्याच्या विशिष्ट आवाजावरून त्याला हें नांव मिळालेलें आहे. याखेरीज येथें आढळणारे पक्षी म्हटले म्हणजे मोर, पोपट, मैना, खेकाड्या अथवा कोळणी, निरनिराळ्या प्रकारच्या चिमण्या, डिसा, सुतार, तांबट, कुरलाक, परीट, कोकमकावळा अथवा भारद्वाज पक्षी, दोन प्रकारचे कावळे, कवडा ( मांसाहारी लोक हा मारून खातात), कबुतर, बगळा, करकोचा, गण्या अथवा पाणबुड्या, कोकिळा बोलाडी, व कधीं कधीं फिरत येणारे गरूड. कोकिळेपेक्षांहि सुंदर गाणारे पक्षी येथें आहेत. परंतु इंग्रज लोकांप्रमाणें आमच्या लोकांना पशु-पक्षी इत्यादींची अभ्यासपूर्वक माहिती गोळा करण्याची संवय नसल्यामुळें, अशा पक्ष्यांबद्दल विशेष माहिती सांगणारा माणूसच भेटत नाहीं. कावळ्यापेक्षां लहान आकाराचे सर्व पक्ष्यांना "चिमणी" म्हणून संबोधण्यांत येतें, ही दुर्दैवाची गोष्ट आहे.

अनुक्रमांक 20942 दि: ... क्रमांक 205 नों: दि: ...

**सरपटणारे प्राणी**:— कोंकण म्हटलें कीं सरपटणारे विषारी प्राण्यांचें आगर असा सर्वत्र समज आहे; परंतु त्यामानानें आमचे गांवांत या प्राण्यांचा उपद्रव बराच कमी आहे. सरासरी दहावीस वर्षांनींच एखादा मृत्यु झाल्याची नोंद गांवांत आहे. खालीं दिलेले सरपटणारे विषारी प्राणी आमचे गांवांत मधून मधून आढळतातः— ( १ ) दहाचा आंकडावाला नाग ( २ ) कांबळ्या ( ३ ) अकरमाश्या ( ४ ) फुरसें ( ५ ) मणेर ( ६ ) कांडोर ( ७ ) घणस ( ८ ) अधेला ( फक्त रविवारीं चावला तरच विषबाधा होते, इतर दिवशीं नाहीं अशी समजूत आहे ). विषारी सर्पाचे दंशावर खात्रीलायक उपाय नाहीं. तथापि " कोंबडी लावण्यानें " माणसें बरीं झाल्याचीं कांहीं उदाहरणें आमचे गांवांत आहेत. सर्पदंश होतांच कोंबडीचें गुदद्वार जखमेवर टेंकावयाचें म्हणजे जखमेंतील विष कोंबडीचे शरीरांत शोषलें जातें व कोंबडी तात्रडतोब मरते. अशा तीनचार कोंबड्या मेल्यावर सर्पदंशांतील विष संपून जाऊन विषबाधा झालेला माणूस बरा होतो. या प्रकारास " कोंबडी लावणें " म्हणतात.

---

# प्रकरण ११ वें

## सामाजिक व धार्मिक कृत्यें

### १ महिना चैत्र

**वर्षप्रतिपदा अथवा गुढी पाडवा**:— घरोघर गुढ्या उभ्या करण्यांत येतात. महाजन वर्तक कारभारी यांजकडे व श्रीदुर्गादेवीचे देवालयांत सार्वजनिक पंचांगश्रवण होतें. श्रीदुर्गादेवी महोत्सव सुरू. तसेंच गांवांत घरोघर हळदीकुंकू सुरू. भैरव, सावणेकरीण, पेठकरीण व दारवटकरीण या ग्रामदेवतांस नैवेद्य.

**चैत्र शु. ९ ( रामनवमी )** :— पाखाडींतील श्रीरामजीचा उत्सव, कथाकीर्तन इत्यादि.

**चैत्र शु. १५ ( हनुमान जयंति )**:— बिरवाडी येथील, हनुमान पंचायतनाचे देवालयांत सुतार, कुंभार, गुरव इत्यादि मंडळींनीं अलीकडे सुरू

केलेला उत्सव भजन पूजन इत्यादींनीं साजरा करण्यांत येतो. दुसरा अगदीं खाजगी स्वरुपाचा उत्सव श्रीयुत राजश्री अच्युत सीताराम रानडे व शिंत्रे यांजकडील होय. सदर उत्सव विष्णु बाळकृष्ण रानडे यांनीं सुरु केला व तो अद्यापि यथाशक्ति चालू आहे. हा मारुति त्यांना एका रामदासी बावाकडून कार्तिक व. १३ या दिवशीं मिळाला म्हणून त्या दिवशीं या मारुतीचा वाढदिवस, रानडे व शिंत्रे यांचे आपसांतील ठरावाप्रमाणें शिंत्रे यांजकडे साजरा होतो.

## २ महिना वैशाख

**वैशाख शु. ३ अथवा अक्षय्य तृतीया:—** आमचे गांवांत श्रीपरशुरामाचें देवालय नसल्यामुळें हा उत्सव होत नाहीं. तथापि नजीकचे आडें या गांवीं वरील उत्सव मोठ्या प्रमाणावर साजरा होतो. आंजर्लें गांवांतून ब्राह्मण व अब्राह्मण शेंकडों मंडळी या उत्सवास जातात.

या दिवशीं सकाळीं सुवासिनी स्त्रिया थोडे तांदूळ, **नवी** सुपारी व पैसा असें **वाण** (वायन) ब्राह्मणास देतात. एकाच घरचीं अनेक वाणें असलीं म्हणजे तीं सर्व एकट्या उपाध्यास न देतां उपाध्ये, जोशी, वेळासकर, विद्वांस, भट अशा क्रमानें तीं देण्याची वहिवाट आहे. वरील व्यवस्था सासुरवासिनी स्त्रियांसंबंधाची झाली. परंतु माहेरवासिनी स्त्रियांचीं वाणें मात्र सर्वच्या सर्व उपाध्यांसच देण्याची वहिवाट आहे. वर्णसठीं; शिळसप्तमी; अदु:ख नवमी; व मकरसंक्रांत या दिवशींचे वाणांची व्यवस्थाहि वरील म्हणजे अक्षय्य तृतीयेचे दिवशींचे वाणांप्रमाणेंच असते. परंतु शिळसप्तमींचें वाण म्हणजे दहींभात व कांकडीचे पानावर उकडांबा; तसेंच अदु:ख नवमीचें वाण म्हणजे कांकडीचे गोड नऊ घावन. हीं वाणें सोंवळ्यानें नेणें जरूर असल्यामुळें तीं वाणें मधुकऱ्यांस अगर दुसरे कोणास तरी देऊन टाकण्याची वहिवाट आहे. वरील मानकरी मंडळी हीं वाणें गोळा करीत हिंडत नाहींत.

ज्याप्रमाणें आंबा शिवरात्र झाल्याशिवाय; ऊस, चिंचा, आंवळे व बोरें हीं तुळशीचें लग्न झाल्याशिवाय खात नाहींत त्याचप्रमाणें नवी सुपारी अक्षय्य तृतीया झाल्यावांचून म्हणजे त्या दिवशीं देवाब्राह्मणांस अर्पण केल्यावांचून खात नाहींत. म्हणून या दिवशींचे वायनांत नव्या सुपारीला महत्त्व जास्त आहे.

वैशाख शु. १०, श्रीमच्छंकराचार्य जयंती; वैशाख शु. १४ सायंकाळ नृसिंह जयंति, आणि शु. १४ प्रातःकाळ कूर्म जयंति व वैशाख शु. १५ श्रीगणेश जयंती ह्यांपैकीं कोणताच उत्सव आंजलें गांवांत होत नाहीं.

### ३ महिना ज्येष्ठ

१ दशहराः— ज्येष्ठ शु. १स दशहरारंभ होतो. शु. १०स दशहरा-समाप्ति होते. या दहा दिवसांचे काळांत, बहुतेक घरीं ब्राह्मणास, दहा खाद्यवस्तूंचें वायन सुवासिनी स्त्रिया देतात.

२ वटसावित्रीः— ज्येष्ठ शु. १३ पासून ज्येष्ठ शु. १५ पर्यंत, एकंदर तीन दिवस वटसावित्रीचें व्रत गांवांत पाळण्यांत येतें. हे तीन दिवस वट-सावित्रीचें जुनें गाणें ऐकण्याकरितां आळींतील स्त्रिया कांहीं घरीं गटागटानें जमतात. ज्या सुवासिनी स्त्रीस हें गाणें पाठ येत असेल ती तें गाणें तीन दिवस-पर्यंत दररोज म्हणते. शेवटच्या दिवशीं म्हणजे पौर्णिमेचे दिवशीं गाणें म्हणणारे सुवासिनीची, गाणें संपल्यावर, व्रताची समाप्ति म्हणून खण, नारळ, आंबे, गरे यांनीं ओंटी भरण्यांत येते. याच दिवशीं म्हणजेच पौर्णिमेचे दिवशीं सकाळीं सुवासिनी स्त्रिया, पाखाडीस 'होळखाचरानजीक साठे यांनीं बांधलेले नवीन धर्म-शाळेजवळ जो वड आहे त्याची पूजा करितात. तेथें सर्व स्त्रियांस ग्रामोपाध्याय पूजा सांगतात. या दिवशीं सुवासिनी स्त्रिया आंबे, गरे इत्यादींचीं जीं वाणें देतात तींहि वैशाखांतील अक्षय्य तृतीयेचे दिवशींचे वाणांप्रमाणेंच निरनिराळ्या मानकऱ्यांस देण्यांत येतात.

वडाचे पूजेचे पूर्वीं गांवांतील धोबी वडास कोरें पातळ नेसवीत असे व त्याबद्दल त्याला वडापुढील उत्पन्नापैकीं एक-चतुर्थांश हिस्सा मिळत असे व तीन-चतुर्थांश हिस्सा गुरव यास मिळत असे. हल्लीं धोबी आपलें काम करीत नसल्यामुळें सर्व उत्पन्न एकटा गुरवच घेतो.

### ४ महिना आषाढ

**पालेजत्राः—** मुर्डी येथील काणे यांचे वाड्यानजिक बकुळीचे वृक्षा-खालीं " न्हावणकरीण " म्हणून देवता आहे. बहुधा आषाढ महिन्यांत भाताचीं रोपें लावणी करण्यालायक होतांच, एके दिवशीं सायंकाळीं सर्व मानकरी लोकांस

श्रीभैरवाचे देवळांत ओत्र्यावर उभें राहून "पालेजत्रेस चला हो," असें औपचारिक बोलावणें करितात. खाजगी रीतीनें हा दिवस लोकांस खामकर यानें आधींच कळविलेला असतो. नंतर सर्व मंडळी ढोलकें वाजवीत न्हावण-करणीस जातात. तेथें खामकर तीन कोंबडीं देवीस देतात व मंडळी परत श्रीभैरवाचे देवळांत येतात व तेथें ४ कोंबडीं देवास देतात. नंतर प्रसाद घेऊन मंडळी घरोघर जाते. श्रीभैरव व न्हावणकरीण इत्यादि देवतांस शेतीभाती चांगली पिकून गुराढोरांस आरोग्य प्राप्त व्हावें अशा तऱ्हेची प्रार्थना खामकर करितो. अशातऱ्हेनें पालेजत्रा झाल्यावर लोक भाताचे लावणीस सुरुवात करितात, तत्पूर्वी करीत नाहींत.

**आषाढ शु. १०पासून चातुर्मासास** सुरुवात होते. या दिवशीं श्रीनारायणाचे मंदिरांत सार्वजनिक पुराणास सुरुवात होते. त्याबद्दलचें बोलावणें नारायणाचा पुजारी आंजर्लें व मुर्डी गांवांत करितो. पुराणिकाची योजना, गांवांतील कारभारी व पुढारी लोकांचे संमतीनें होते. पुराणिकास कायम स्वरूपाची बिदागी देतां यावी म्हणून योजना आंखलेली आहे. शु. ११ चें उपोषण आबाल-वृद्ध करितात.

**लोकमान्य पुण्यतिथीः**— आषाढ व. १ या दिवशीं ही पुण्यतिथी असते. या दिवशीं श्रीदुर्गादेवी मंदिरांत प्रथम वैदिकांकडून मंत्रश्रवण, नंतर प्रवचन अगर पुराण व नंतर सभा होऊन टिळक गुणवर्णनपर भाषणें होतात. आरंभीं आंजर्लें व मुर्डी गांवांत बोलावणें करण्यांत येत असे. परंतु अलीकडे १०।१२ वर्षें मुर्डी गांवांत स्वतंत्र पुण्यतिथी साजरी होऊं लागल्यापासून, मुर्डीस बोलावणें करीत नाहींत. कै. विनायक गणेश नित्सुरे यांचे हयातींत त्यांचेकडून व त्यांचे नंतर त्यांचे कुटुंबीयांकडून सुमारें एक रुपाया किंमतीचे नारळ प्रसादा-करितां येतात. त्यांचा प्रसाद वांटण्यांत येतो.

**श्रीदेव बहिरी याची सार्वजनिक राखणः**— ही राखण मिती आषाढ व. ३० या दिवशीं सर्व गांवची म्हणून देण्यांत येते. यांतील पशु (बकरा) हननाचें काम खामकर यांजकडे आहे. तसेंच हननानंतर नैवेद्य शिजविणें व भैरवास नैवेद्य समर्पण करणें हा मान मानकरी कुंभार यांचा आहे. नैवेद्य दाख-विल्यानंतर सर्वांना प्रसाद देण्यांत येतो. या राखणेचे कामांत, मांसाशन, पशुहनन

इत्यादि भानगडी असल्यामुळें त्यांत प्रत्यक्ष भाग घेण्याचे कामांत फक्त अब्राह्मण मंडळीच असतात व यात्राबतचा सर्व खर्चहि तेच करितात.

## ५ महिना श्रावण

**१ श्रावण शु. ५ ( नागपंचमी )** :— या दिवशीं घरोघर गंधांत हळद घालून त्यानें पाटावर एक नागीण व तिचीं पिलें काढण्यांत येतात व त्यांची गोमेटा, उपटलेल्या दुर्वा, फुलें यांनीं पूजा करितात. तसेंच नागांस लाह्या व भाजलेले कडवे वाहून खिरीचा नैवेद्य दाखवितात. या दिवशीं जमीन नांगरणें, खणणें, लहानमोठीं झाडें उपटून जमीन दुखविणें इत्यादि क्रिया वर्ज्य मानितात.

**२ या महिन्यांत सार्वजनिक श्रावणी**, श्रीदुर्गादेवी मंदिर, कड्यावरचा गणपति मंदिर– आतां श्रीलक्ष्मी-नारायण-पाखाडींतील श्रीगणपति मंदिर, व श्रीराम मंदिर इतक्या ठिकाणीं होते.

श्रीदुर्गादेवीचे मंदिरांतील श्रावणी मुख्यतः ‘ सावणें ’ भागांतील मंडळी-करितां असते. सावणें म्हणजे ‘[ सतीच्या तळ्यापासून घाणेकरांचे घराजवळील पऱ्ह्या ( लहान ओढा ) पर्यंतचे वस्तीचा भाग होय. ] या श्रावणीचें बोलावणें वरील भागांत श्रीदुर्गादेवीचा पुजारी करितो. श्रावणीचे सामानाची तयारी पुजारी ठेवितो. या खर्चाबद्दल श्रावणीस येणारे प्रत्येक व्यक्तीकडून एक पैसा ( आतां आणा ) घेण्याची वहिवाट आहे.

शक १८७० पर्यंत उभागर ( घाणेकरांचे पऱ्ह्यापासून बाजारपेठेपर्यंतची वस्ती ) व कोंपरी या भागांतील मंडळीची श्रावणी कड्यावरचे गणपतीचे देवा-लयांत होत असे. अगदीं अलीकडे म्हणजे शक १८७१ पासून सदर श्रावणी आतां कोंपरींतील श्रीनारायणाचे देवालयांत होऊं लागली आहे. या श्रावणीस लागणारे सामानाची व्यवस्था कोंपरींतील महाजन यांचे ठिकाणांवर आहे. सदर ठिकाणांपैकीं एका ठिकाणांत खुद्द सीताराम नारायण महाजन हे राहतात, व एका ठिकाणांत गजानन हरी साठये हे राहतात. म्हणून हे दोघे मिळून श्रावणीचे सामानाची व्यवस्था करितात.

पाखाडींतील गणपतीचे देवालयांतील श्रावणीचें बोलावणें उपाध्याय पाखाडीं-तील सर्व मंडळीस करितो व श्रावणीस लागणारें सामानहि विनामूल्य तोच पुरवितो.

आपस्तंब शाखीय ब्राह्मणांची श्रावणी पाखाडींतील श्रीराम मंदिरांत होते. ही श्रावणी कै. बा. ल. तथा बाळकृदादा बापट स्वतः चालवीत असत व सामानाचा खर्चहि तेच करीत. त्यांचे पश्चात् कै. गणेशभट ओक हे गिमवणें गांवाहून आंजर्लें येथें रहावयास आल्यावर, सदर श्रावणी ते पदरखर्चानें करीत असत. त्यांचे पश्चात् त्यांचा मुलगा विनायक गणेश ओक हाहि स्वतःचे खर्चानें ती करितो. श्रावणीचें बोलावणेंहि तोच करितो व श्रावणीहि तोच चालवितो.

**जागरी अथवा नारळी पौर्णिमा:**– श्रावण शु. १४ च्या दिवशीं रात्रीं श्रीबहिरीचे म्हणजे भैरवाचे देवालयांत सर्व ग्रामस्थ लोक जमतात. महाजन व वर्तक कारभारी यांस गुरव खास आमंत्रण करून बोलावून आणितो. नंतर देवाचीं ठरलेलीं देणीं दिलीं न दिलीं याबद्दल चौकशी होते. विड्यांचा मांड श्रीभैरवापुढें मांडतात. नंतर सर्व गांवचे कल्याणाबद्दल खामकर देवास कौल लावतो व कौल जाहल्यावर श्रीभैरवास पोतें देतात व नंतर महाजन व वर्तक कारभारी, तसेंच जोशी व इतर खुम मानकरी यांस विडे देऊन पोतीं देतात व नारळाची खिरापत वांटतात. या ठिकाणीं लागणारा खर्च– नारळ ५, विड्याचीं पानें १०० व सुपाऱ्या २५–मुर्डी येथील श्री भैरवाचे ठिकाणावर आहे. सध्यां सदर ठिकाण रा. नारायण शंकर जोशी व रा. भिडे यांजकडे आहे. पूर्वीं हें ठिकाण रा. सहस्रबुद्धे यांचेकडे होतें. यास बहिरीभाट म्हणतात. जाग्रणीनिमित्त रात्रीस जमलेल्या मंडळीसाठीं तमाखू व देवास धूप लावणेंस विस्तव, अशी तयारी ठेवण्याचें काम खामकर याचें आहे. जाग्रणीचे दिवशीं रात्रौ भैरवास "पोवतें" घालून झाल्यावर दुसऱ्या दिवशीं सर्व गांवभर गुरव घरोघर पोतीं वांटतो व सायंकाळीं समारंभपूर्वक समुद्रास नारळ अर्पण करण्यांत येतो.

**श्रीभैरवाचे देवालयांतील नामसप्ताह:**— अलीकडे म्हणजे सुमारें ६० वर्षांपासून श्रीभैरवाचे देवालयांत श्रावण व. प्रतिपदेपासून व. ८ पर्यंत अखंड नामसप्ताह करण्याची वहिवाट पडली आहे. या नाम-सप्ताहांत, भंडारी, सोनार, कांसार व शिंपी या जातीच्या लोकांखेरीज सर्व अब्राह्मण लोक भाग घेतात. अष्टमीच्या दिवशीं, सोनार, कांसार, भंडारीआळीसुद्धां सर्व गांवांत सूरसनई, भजनी मेळे यांसह मोठी मिरवणूक निघते. सदर मिरवणुकीचे वेळीं दर घरचा एक पैसा व थोडे तांदूळ मिळतात व शिवाय दिवाबत्ती व इतर खर्च यांसाठीं

वर्गणी गोळा करण्यांत येते. अष्टमीनंतर ४।५ दिवसांचे आंत एकादे दिवशीं श्रीचे देवळांत उद्यापन व शुद्धि उपाध्याकडून करण्यांत येते.

**श्रीकृष्ण जयंतिः**—श्रावण व. ८ रोजीं रात्रीस श्रीनारायणाचे देवालयांत कृष्णजन्माचें कीर्तन होतें. कीर्तन नच जमल्यास जन्माबद्दलचें पुराण होतें. त्याबद्दलचें बोलावणें पुजारी करितो. कीर्तन झाल्यावर श्रीनारायणाची पंचामृती पूजा सोंवळ्यानें रा. गणेश रामचंद्र वर्तक हे करितात व नंतर अच्युत रामकृष्ण गोरे अगर त्यांचे कुटांतील मंडळींपैकीं कोणीतरी पूजा करितो. पूजा उपाध्ये यांनीं सांगावयाची असते. नंतर वर्तक व गोरे यांच्या वसंतपूजा होतात. सदरहु वसंतपूजा व पूजा यांचा खर्च गोऱ्यांचा गोरे करितात व वर्तक यांचा गणेश रामचंद्र वर्तक यांचेमार्फत होतो. या खर्चाकारितां सर्व भाऊबंदांनीं सावणें येथील कामथाजवळील कुडई समाईक काढून दिलेली आहे, त्या उत्पन्नांतून खर्च होतो. या वेळीं होणारा खर्च म्हणजे दिवाबत्ती, माळ, बुका, प्रसाद, सुंठवडा इत्यादि याच उत्पन्नांतून होतो.

या दिवशीं कीर्तन झाल्यास कीर्तनाबद्दल बिदागी कार्तिकांत श्रीनारायणाचा जो उत्सव होतो त्या खर्चांतून देण्यांत येते.

**दहींकाला ( श्रावण व. ९ ) :**— कृष्णजन्म झाल्यावर दुसरे दिवशीं सकाळीं वे. शा. सं. वासुदेव जगन्नाथ वर्तक हे श्रीनारायणाचे पादुकांवर बारा ब्राह्मणांकडून पवमान पंचसूक्तांचा अभिषेक करवून त्यांस भोजन देतात. ही पद्धत कै. विष्णुशास्त्री वर्तक यांचे वेळेपासून चालू आहे. भोजनोत्तर आळीआळींतील मुलें आपसांत वर्गणी करून ध्वज-पताका म्हणजेच निशाणें यांची व वाद्यांची व्यवस्था करतात व नंतर आळीआळींत प्रत्येक घरीं समुदायानें नाचावयास जातात; तेथें घरोघर गरम पाणी, दहीं, पोहे, शेंगा हा प्रसाद बालगोपालांस देण्यांत येतो. कित्येक घरीं मुद्दाम हंडी बांधून फोडण्यांत येते. नंतर आळींतील सर्व घरें पुरीं झाल्यावर सर्व मंडळी निशाणें व वाद्यें यांसह मिरवणुकीनें कोंपरींतून पाखाडीला वळसा घालून श्रीनारायणाचे देवळांत येतात. त्याचप्रमाणें दुसऱ्या म्हणजे पाखाडी आळींतील मंडळी त्या आळींत घरोघर नाचून झाल्यावर वाद्यें, निशाणें घेऊन उभागरांत श्रीदुर्गादेवीचे दर्शनास जातात व तेथून परत श्रीनारायणाचे अंगणांत येतात. श्रीनारायणाचे अंगणांत मंडळी जमल्यावर, प्रथम

मल्लखांब, कुस्त्या, मुंडे ठोकणें हे शारीरिक खेळ होतात. नंतर श्रीचे सभामंडपांत हंडी बांधलेली असते तेथें नाचून हंडी फोडण्यास जमतात. खूप वेळ नाचून झाल्यावर व सपाटून पाणी अंगावर घेऊन झाल्यावर हंडी फोडण्यांत येते.

हंडीचें मडकें मानकरी कुंभार यानें श्रीनारायणाचे पुजाऱ्याकडे दहीं-काल्याचे दोन दिवस आधीं आणून द्यावयाचें असतें. पुजारी यानें हंडीकरितां दहीं व ताक जमवून हंडी ठराविक ठिकाणीं बांधून तयार ठेवावयाची असते. हंडी फोडल्यावर आरती होते व प्रसाद वांटण्यांत येतो.

या नंतर स्नानाकरितां मंडळी कड्यावरचे गणपतीचे तळयावर जातात व स्नानें आटोपल्यावर आपआपल्या घरीं जातात. यानंतर प्रत्येक आळीचा निर-निराळा असा फराळांचा कार्यक्रम असतो. सबंध उभागर आळीचे फराळ श्री-दुर्गादेवीचे देवालयांत होतात.

या कामाकरितां दर घरीं एक पायली भात वसूल करण्यांत येतें. तसेंच सध्यां महर्गता असल्यामुळें प्रत्येक घरीं १ नारळ व निठवेंभर कडवेंहि वसूल करण्यांत येतात. अलीकडे सुमारें २५-३० वर्षे आळींतील (उभागर) फराळांची तयारी करणें ती दर पांच घरच्या मंडळीनें क्रमानें करावयाची असें ठरलें आहे. काम करणारे मंडळींनीं हिशेब चोख ठेवून तो एका ठराविक चोपडींत लिहून द्यावयाचा असतो. फराळ म्हटले म्हणजे एखादें गोड पक्वान्न, निदान गोडाचे पोहे, फोडणीचे पोहे, मागाहून दहीं अथवा ताक-पोहे, कडवे-वालांची उसळ, पंचा-मृत अगर चटणी, लोणचें, तिखट इत्यादि असा बेत बहुधा असतो.

कोंपरींतील मंडळीचा फराळाचा बेत आळींतील एखादे इसमाचे घरीं करण्यांत येतो. या कामाकरितां घरोघर वर्गणी गोळा करण्यांत येते. खाण्याचे पदार्थ वर दिल्याप्रमाणेंच असतात.

पाखाडींतील फराळ श्री गणपतीचे मंदिरांत अगर एखाद्याचे घरीं घरोघर वर्गणी गोळा करून करितात. पूर्वीं हा सर्व खर्च कै. लक्ष्मण नारायण तथा लखु-अण्णा बापट करीत असत. कां तें मात्र कोणास ठाऊक नाहीं. कामाची व्यवस्था उभागर आळीप्रमाणेंच पाळीपाळीनें करितात. १९४७ सालापासून भंडारी लोकांचेंहि फराळ सुरू झाले आहेत.

**भुइलो श्रावण व. १३:—** श्रावण वद्य १३ चे दिवशीं सायंकाळीं सूर्यास्तानंतर घरोघर "भुयलो" नामक राक्षसाचें स्मारक म्हणून मातीची प्रतिमा करितात, अगर ओल्या मातीचे गोळ्यांत, सागाचे फुलांचे तुरे, तेरडे, केतकी-पत्रें उभीं करून त्या राक्षसाचें प्रतीक करितात. नंतर निरनिराळ्या आळींतील मुलें भुयलो डोक्यावर घेऊन त्या त्या आळींतील ठराविक देवळांत एकत्र जमतात. भुयलो देवळांत आणतांना व परत नेतांना "भुयलो हो, भुयलो हो" असा नामघोष चालू असतो. पाखाडींतील "भुयलो" श्रीरामाच्या देवळांत, कोंपरींतील "भुयलो" श्रीनारायणाचे देवालयांत व उभागरांतील "भुयलो" श्रीदुर्गादेवीचे देवालयांत गोळा होतात. तेथें सर्व भुयलो व्यवस्थितपणें समोरासमोर दोन ओळींत ठेवण्यांत येतात. नंतर भुयलोस नैवेद्य म्हणून भुयलोंचे प्रत्येक पाटावर खिरीचा एक एक द्रोण पुजाऱ्याकडून ठेवण्यांत येतो. त्याबद्दल पुजाऱ्यास एक पै (ही वहिवाट फक्त उभागर आळींत आहे) देण्याची वहिवाट होती. आतां महर्गता फार वाढल्यामुळें एक पैचेऐवजीं एक पैसा देतात. सर्व भुयलोंस खीर देऊन झाल्यावर आरती होते व भुयलो पुन्हां परत झांजा वाजवीत घरीं नेण्यांत येतात. घरांत शिरतांना पायरीवर कुमारिका ताम्हनांत निरांजन व कुंकुमाक्षता घेऊन ज्याचे हातांत भुयलो असेल त्याचे पायांवर दूध व पाणी घालतात, त्याला कुंकुमातिलक लावून त्यावर अक्षता लावतात व निरांजन ओंवळतात. नंतर भुयलो माजघरांत ठराविक ठिकाणीं ठेवतात त्याला नैवेद्य दाखवितात व नंतर घरांतील माणसांचें रात्रीचें भोजन होतें. भोजनोत्तर रात्रीं भुयलोपुढें खेळ खेळून कांहीं वरीं जागरणहि करण्यांत येतें. सकाळीं भुयलोचें विसर्जन करण्यांत येतें.

**भुयलोची प्रथा:—** बाणकोट ते दाभोळ या दोन खाड्यांच्या मधील समुद्रकांठच्या कांहीं गांवीं वर सांगितलेली भुयलो पूजनाची प्रथा आहे. भुयलो-संबंधीं खात्रीलायक अशी कांहींच माहिती उपलब्ध नाहीं कांहीं दंतकथा आहेत. कोणी म्हणतात तो बाणकोटच्या खाडींत बुडाला व दाभोळच्या खाडींत पुन्हां प्रकट झाला. हर्णैस पाणी प्याला म्हणून हर्णैस पाण्याचें दुर्भिक्ष आहे. तो एक राक्षस होता, मग या राक्षसानें गांवांतील लोकांवर असे काय उपकार केले कीं त्याचेबद्दल लोकांनीं त्याचें स्मरण ठेवून छोटासा समारंभ व उत्सव करावा ! याचें नीटसें उत्तर कोणीं देऊं शकत नाहीं. कोळथरें येथें "भौमासुर रे महादेवा पार्वति

वल्लभ सदाशिवा, " असें याचें भजन करण्याची चाल आहे. यावरून हा राक्षस म्हणजे श्रीशंकराचा लहानसा अवतार असावा असें दिसतें. शिवाय त्रयोदशी, हा प्रदोषकाळ भुयलोच्या स्मृतिदिनाचा काळ आहे यावरून वरील तर्कास पुष्टी येते.

बाणकोट, वेळास, आडें, पाडलें, हर्णै व दाभोळ येथें पूर्वीं मुसलमान वस्ति फार होती व तेथें त्यांचें प्राबल्य होतें अशा ठिकाणीं भुयलोची वहिवाट नाहीं. आसूद, गिम्हवणें व जालगांव या समुद्रकिनाऱ्यापासून जरा दूर असलेल्या गांवींहि, पुष्कळ घरीं भुयलो आणीत असत व अद्यापहि ही चाल साफ मोडली नसून कांहीं घरीं ती तशीच चालू आहे. तात्पर्य, या "भुयलो" उत्सवासंबंधानें अथवा स्मारकासंबंधानें नीटशी व विश्वसनीय माहिती उपलब्ध नाहीं.

**श्रावणी सोमवारः—** श्रावणांत दर सोमवारीं मुलाबाळांसह, सर्व मंडळी उपोषण करतों असें म्हणतात. यांपैकीं बरीच मंडळी धान्य-फराळावर भागवितात म्हणजे त्यांचा उपवास म्हणजे रोजचे खाण्याचे पदार्थांत बदल येवढाच असतो. कांहीं मंडळी ज्याला निरशनाचे पदार्थ म्हणतात ते खाऊन हें उपोषण करितात. सोमवारचें उपोषण कसेंहि केलेलें असो त्याचें पारणें सायंकाळीं फेडण्याची वहिवाट आहे. या दिवसांत घरोघरच्या विहिरी भरलेल्या असतात, त्यांत घरांतील मुलें सायंकाळचे भोजनापूर्वीं पोहावयास जातात. घरांतील वडील माणसेंहि सायंकाळीं पुन्हां एकवार स्नान करून, देवपूजा करितात. श्रीशंकरास महानैवेद्य समर्पण करून व एका ब्राह्मणास भोजन देऊन पुष्कळ लोक या उपोषणाचें पारणें करितात. घरोघरचे नैवेद्य गुरव गोळा करून घेऊन जातो. या दिवशीं कित्येक घरीं ब्राह्मणाकडून रुद्राभिषेक करून घेण्यांत येतो. नवीन लग्न झालेल्या मुली, शंकरास 'शिवामूठ' वाहतात, कोणी पोक्त स्त्रिया "फस्की" वाहतात. कोणी शंकरावर बेलाचें सहस्रनाम वाहतात अथवा लाखोली वाहतात. अशा निरनिराळ्या प्रकारांनीं हा दिवस साजरा करण्यांत येतो. या दिवशीं बेलाचें महात्म्य जास्त, त्याची तजवीज गुरवाकडून होते तसेंच या दिवशीं महादेवास महाळुंगहि बऱ्याच स्त्रिया समर्पण करितात.

**मंगळागौरी व्रतः—** लग्न झाल्यावर पहिलीं पांच वर्षें मुली हें व्रत करितात. श्रावण महिन्यांत दर मंगळवारीं, मंगळागौरीची पूजा करण्यांत येते. ही पूजा प्रत्येक घरीं स्वतंत्र न करितां सामुदायिक रीतीनें करण्यांत येते. नवीन

लग्न झालेल्या मुलींच्या सासरीं अगर माहेरीं अथवा ज्या मुलीच्या लग्नास पांचवें वर्ष लागलें त्या मुलीच्या सासरीं अथवा माहेरीं बहुधा ही पूजा असते व तेथें जवळपासच्या इतर मुलींना पूजेकरितां बोलावण्यांत येतें. ग्रामोपाध्याय पूजा सांगतात व जमलेल्या सर्व मुली मिळून एकाच वेळीं गौरीचें पूजन करितात व सकाळीं व रात्रौ आरती होते. तसेंच रात्रौ फुगड्या, झिम्मा, फेर धरणें आगिन-पासोडा इ. विविध खेळ खेळून गौरीपुढें जागरण करितात. या जागरणांत व खेळांत पूजेस नसलेल्या मुली व प्रौढ स्त्रियाहि भाग घेतात. पूर्वीच्या काळीं लहान मुलगेहि खेळांत भाग घेत असत. पूजेला जमलेल्या सर्व मुलींचें दुपारचें भोजन व रात्रीचा फराळहि, पूजेचे घरींच होतो. रात्रीचे फराळास पूजेचें वर्ष नसलेल्याहि लहानमोठ्या मुलींस व स्त्रियांस आमंत्रण असतें.

## ६ महिना भाद्रपद

**श्रीहरितालिकाः—** भाद्रपद शु. ३ या दिवशीं गांवांत श्रीहरितालिकांचें गटागटानें पूजन करितात. पूजा ग्रामोपाध्याय सांगतात व कथा धर्माधिकारी वाचतात. या दिवशीं स्त्रिया व लहानमोठ्या मुली उपोषण करितात. या उपोषणास शिजविलेला कोणताहि पदार्थ खावयाचा नाहीं असा निर्बंध आहे. यामुळें या उपोषणाच्या दिवशीं निरसं दूध, शहाळीं, केळीं, आंब्याचीं अथवा फणसाचीं साठें इत्यादि पदार्थांचाच उपयोग करण्यांत येतो.

**श्रीगणेश चतुर्थीः—** भाद्रपद शु. ४ या दिवशीं घरोघर श्रीगणपतीची मृण्मय मूर्ती आणून तिची पूजा करितात.

ही पूजा सांगण्यास उपाध्यायासच बोलाविलें पाहिजे असा निर्बंध नाहीं. इतर कोणाहि ब्राह्मणास बोलाविलें तरी चालतें अशी सवलत ठेविलेली आहे. ती कामगिरी मात्र उपाध्यायाचीच आहे. हा गणपति–उत्सव बहुतेक घरीं दीड दिवसाचाच असतो. म्हणजे दुसऱ्याच दिवशीं सायंकाळीं गणपति–विसर्जन होतें. कांहीं घरीं हा उत्सव पांच दिवसांचा असतो. कांहीं घरीं गौरी व गणपति यांचें विसर्जन बरोबर होतें. अगदीं एखाद-दुसऱ्या घरीं हा उत्सव अनंत चतुर्दशीपर्यंत चालू असतो. या उत्सवांत भक्ताचे इच्छेप्रमाणें गणपति अथर्वशीर्षाचीं आवर्तनें, दूर्वासहस्रनाम, भजन, कीर्तन, पुराणश्रवण, मंत्रजागर इष्टमित्रांस पानसुपारी असे विविध कार्यक्रम आंखण्यांत येतात.

**सार्वजनिक गणपति–विसर्जनः—** वर सांगितल्याप्रमाणें बहुतेक घरीं हा उत्सव दीड दिवसाचा असल्यामुळें भाद्रपद शु. ५ या दिवशीं, पाखाडचे परांजपे यांचे गणपतीचा प्रसाद वांटून झाल्यावर घरोघर श्रीगणपतीची उत्तरपूजा करून, उभागर व कोंपरी येथील गणपति नारायण घांटीनें, विसर्जनाकरितां कड्यावरचे गणपतीचे मंदिरांत नेण्यांत येतात. त्यांत ताडाचे कोंडावरील कुणबी मंडळीचे गणपति येऊन दाखल झाल्यावर ताडाचे कोंडावरील मंडळीचा गणपतींसमोर नाच होतो. ब्राह्मण मंडळींचें भजन होतें व सर्व मंडळीची आरती होते, प्रसाद वांटण्यांत येतो व नंतर कड्यावरील गणपतीचे तळ्यांत गणपति–विसर्जन होतें व मंडळी घरोघर जातात. गणपतींचें विसर्जन करितांना शिदोरी (पानांत घट्ट पुडी बांधलेला नैवेद्य) पण त्याचेबरोबर टाकण्यांत येते व तलावाचे तळाची थोडी माती खडे घरीं नेऊन घरावर उडविण्यांत येतात. असें केल्यानें घरांत उंदरांचा उपद्रव होत नाहीं अशी भावना आहे.

अलीकडे सुमारें पन्नास वर्षें पाखाडींतील गणपति समुद्रावर विसर्जन करण्यास नेतात. त्यापूर्वी कड्यावरचे गणपतीचे तळ्यांतच विसर्जन करीत असत.

**ऋषिपंचमीः—** भाद्रपद शु. ५ या दिवशीं ऋषिपंचमीव्रत घेतलेल्या स्त्रिया ऋषींची पूजा करितात. उपाध्याय पूजा सांगतात व धर्माधिकारी ऋषि-पंचमीची कथा वाचतात. ऋतु प्राप्त झालेल्या विवाहित वा अविवाहित स्त्रिया या दिवशीं उपोषण करितात. उपोषणास बैलांचे श्रमांचा कोणताहि पदार्थ खावयाचा नाहीं असा या उपोषणाचे व्रतींतील निर्बंध आहे.

**ज्येष्ठा गौरीः—** भाद्रपद शु. ८ चे दिवशीं ब्राह्मण मंडळींत घरोघर मुलींकडून जलाशयावरून पांच अगर सात खडे घरीं आणून त्यांची ज्येष्ठा गौरी म्हणून स्थापना करून दुसरे दिवशीं त्यांचें पूजन करून त्यांस घावन व घाटलें याचा नैवेद्य दाखवितात व एक कुमारिका व सुवासिनी यांस भोजन देतात. तिसरे दिवशीं त्यांचें, जेथून आणल्या तेथें नेऊन विसर्जन करितात. गौरी आणि-तांना आणणारे मुलीनें तोंडानें कांहींएक बोलावयाचें नसतें. हा निर्बंध कडक रीतीनें पाळला जावा म्हणून गौरी धरीं घेऊन येतांना बहुतेक मुली तोंडांत पाण्याचा चूळ घेऊन ठेवितात. गौरी आणतांना पांढऱ्या रांगोळीचीं, व विसर्ज-नास नेतांना हळदीचीं घरांतील जमिनीवर गौरींचे वाटेवरे यथाक्रम येणारीं वा

जाणारीं पावलें काढितात. अब्राह्मण मंडळींत गौरीचीं कागदाचीं चित्रें तेरडे या वनस्पतीला बांधतात अथवा मातीचे किंवा पितळेचे गौरींचे मुखवटे, मातीचे कोथ्यांवर बसवतात व त्यांस लुगडीं नेसवितात, दागदागिने घालतात व त्यांची मोठ्या थाटानें मिरवणूक काढून समुद्रावर वाजत-गाजत नेतात व विसर्जन करितात. गौरींबरोबरच कित्येक घरचे गणपतींचेंहि विसर्जन करण्यांत येतें.

**वामन द्वादशी ( भाद्रपद शु. १२ )** :— सर्वच स्त्रियांना हें व्रत नसतें. ज्यांनीं व्रत घेतलें असेल त्या स्त्रिया वामनाची शास्त्रोक्त पूजा करितात. पूजा ग्रामोपाध्याय सांगतात व कथा विद्वांस धर्माधिकारी वाचतात.

**अनंत चतुर्दशीः**— भाद्रपद शु. १४ चे दिवशीं रेशमाचे अनंताची पूजा करितात. अनंत चतुर्दशीच्या दिवशीं रेशमाचा जुना पूजा केलेला अनंत ज्यांना सांपडेल तेच ही पूजा घेतात. यामुळें ही पूजा घरोघर असत नाहीं. अनंताची पूजा उपाध्याय सांगतात व कथा विद्वांस धर्माधिकारी वाचतात.

**पितृपक्षः**— भाद्रपद व. १ ते ३० अखेरचे पंधरा दिवसांचे कालास पितृपक्ष म्हणतात. या कालांत पूर्वीच्या काळीं ब्राह्मणमंडळीचे घरोघर ‘ महालय श्राद्ध ’ अथवा ‘ पक्ष ’ होत असत. पितरांस पिंडप्रदान व आप्तेष्टांस भोजन असा याचा कार्यक्रम असे. आतां हा कार्यक्रम जवळ जवळ लुप्त झाल्यासारखाच आहे. कारण अन्नधान्याची बिकट परिस्थिती व सरकारी निर्बंध हें होय. ब्राह्मणांकडच्याप्रमाणेंच अब्राह्मणांत ब्राह्मणाला शिधा देऊन आपल्या पितरांचें महालय श्राद्ध अथवा “ महाळ ” करीत असत, परंतु शिधा देण्याला आतां धान्यच नसल्यामुळें त्यांचेकडेहि “ महाळ ” होत नाहींसे झाले होते. आतां सरकारी निर्बंध उठल्यामुळें पूर्वीचा कार्यक्रम सुरू होतो कीं काय पहावा ! !

**गजगौरीव्रतः**— हें व्रत म्हणजे, मातीचे हत्तीवरील अंबारींत शंकर, पार्वती ( गौर ) इत्यादि बसलेलीं आहेत अशी शक्य तितकी मोठी मूर्ति हस्त नक्षत्र निघण्याचे वेळीं करून ती मिरवीत घरीं आणून तिची पूजा करावयाची व हस्त नक्षत्र सरतांना श्रीगजाननाचे मूर्तीप्रमाणेंच तिचें थाटानें विसर्जन करावयाचें असें आहे. हें व्रत म्हणजे फार खर्चाचें काम असतें. कारण तें एकंदर १४ दिवस चालावयाचें असतें. दररोजची षोडषोपचार पूजा व १४ दंपत्यांस भोजन असा त्याचा विधि आहे. अशा तऱ्हेचें हें व्रत असल्यामुळें फार क्वचित्च

पहावयास मिळतें. पूर्वीच्या काळीं ज्यांचेकडे हें व्रत होत असे त्या मंडळीचीं नांवें:— ( १ ) हरीभाऊ खांबेटे यांची आजी ( २ ) केशवराव हवालदार यांची आजी ( ३ ) पाखाडींतील बाळाभाऊ नित्सुरे यांची बायको ( ४ ) चिंचबडकर जोशी ( उभागरांत ).

## ७ महिना आश्विन

**नवरात्र**:— आश्विन शु. प्रतिपदेपासून नऊ दिवस नवरात्राचा उत्सव श्रीदुर्गादेवीचे देवालयांत साजरा होतो. आश्विन शु. १ चे दिवशीं गांवसईची म्हणून घटस्थापना ग्रामोपाध्यायांचे हस्तें होते. गांवसईचा सप्तशतीचा देवळांतील पाठ नऊ दिवस उपाध्येच वाचितात. नवव्या दिवशीं पूर्णाहुती होऊन घटोत्थापन होतें. या वेळीं हवनांत विडे द्यावयाचे असतात ते महाजन कारभारी देतात. पूर्णाहुतीच्या वेळीं हवनांत तुपाची धार केळीचे सोपाचे पन्हळींतून पाडावयाची असते. त्यावेळीं पन्हळी महाजन कारभारी धरितात व त्यांत तूप वर्तक कारभारी ओतितात. पूर्णाहुतीहि महाजन कारभारी यांनींच द्यावयाची असते. यानंतर वाजत-गाजत बळी तिठ्यावर पोहोंचविण्यांत येतो. नंतर तीर्थ वांटण्यांत येऊन आरती होते व मंडळी घरोघर जातात. घटस्थापना व पूर्णाहुती यांचा खर्च पुजारी यानें करावयाचा असतो. नऊ दिवसांचे सप्तशतीचे पाठांबद्दल उपाध्यायास १।।। रुपये दक्षणा द्यावयाची असते तीहि पुजारीच देतो. नऊ दिवस दरघरची श्रीदुर्गादेवीवर एक व घटांवर एक अशी फुलांची माळ बांधितात. तसेंच नऊ दिवसांत सवडीप्रमाणें केव्हांतरी एक दिवस श्रीदुर्गादेवीस व घटांस मंदिरांत नेऊन नैवद्य समर्पण करण्याची वहिवाट आहे. या दिवशीं एक सुवासिनी व ब्राह्मण कांहीं घरीं कुमारिकाहि इतक्यांस भोजन देतात. देवीच्या नैवेद्यांची व्यवस्था पुजारी करितो. घटांपुढच्या नैवेद्यांची व्यवस्था उपाध्यानें पहावयाची असते. तसेंच नऊ दिवस घटांपुढें ठेवले जाणारे तांदूळ, पैसे, सुपारी व नारळ इत्यादि जिन्नस यांवर हक्क उपाध्यायाचा असतो. नवरात्राचे नऊ दिवस रोज सकाळीं देवळांत गुरव मंगलवाद्यें वाजवितात. श्रीदुर्गादेवीचे देवालयांत नवरात्रांत नऊ दिवस दररोज मोंगऱ्या, पत्ते हे खेळ पूर्वीच्या काळीं फार जोरांत चालत असत परंतु ही प्रथा आतां जवळजवळ बंद झाली आहे असें म्हटलें तरी चालेल. या खेळांबाबतचे दिवाबत्तीची व्यवस्था पुजाऱ्यानें करावयाची असते.

**महाजन व वर्तक, कारभारी यांचेकडील घटस्थापना :—** महाजन व वर्तक यांचेपैकीं रा. सीताराम नारायण महाजन व गणेश रामचंद्र वर्तक यांचे घरीं घटस्थापना होत असून दररोज सप्तशतीचा पाठ व नवव्या दिवशीं पूर्णाहुती असते. या कामगिरीबद्दल त्यांचे भाऊबंदांकडून भातशेतीचें उत्पन्न कायमचें तोडून दिलेलें आहे.

**महालक्ष्मी आश्विन शुद्ध ८:—**लग्न झाल्यापासून पहिलीं पांच वर्षे स्त्रिया महालक्ष्मीचें पूजन करितात. पूजा उपाध्याय सांगतो. घरोघरचा शिधा आणून दोनप्रहरीं सर्व व सोळ्या एकत्र भोजन करितात. सायंकाळीं महालक्ष्मीचा उकडीचा मुखवटा लावून व वस्त्रालंकार घालून श्रीमहालक्ष्मीची मूर्ती थाटण्यांत येते. रात्रौ महालक्ष्मीचे दर्शनास आबालवृद्ध पुरुष व स्त्रिया यांची गर्दी लोटते. महालक्ष्मीपुढें घागरी फुंकित सुवासिनी स्त्रिया नाचतात. एखादे स्त्रीचे शरिरांत महालक्ष्मी संचार करते. अशा स्त्रीला झाड म्हणतात. तिला अनेक प्रकारचे भविष्यकथनाचे प्रश्न विचारण्यांत येतात. पुष्कळ प्रश्नांचीं उत्तरें बरोबर येतात असा पुष्कळांचा अनुभव आहे.

**श्रीव्यंकटेशोत्सव:—** श्रीव्यंकटेशाचा उत्सव राजश्री केशव दत्तात्रय भट महाजन यांजकडे कित्येक पिढ्या चालू होता. अलीकडे तो बंद आहे. हा उत्सव आश्विन शु. १ पासून नऊ दिवस होत असे. शु. ५ पासून कीर्तन माडीवर होत असे. शु.८चे दिवशीं गांवप्रयोजन होत असे. प्रयोजनाचें आमंत्रण मुर्डीसहि करण्याची वहिवाट होती. हा उत्सव महाजन यांचा खाजगी होता. आतां तो बंद झाला आहे.

**खाजगी नवरात्रोत्सव :—** पेठपाखाडी येथें पूर्वीच्या काळीं अल्प प्रमाणावर सखारामभट विद्वांस यांजकडे खाजगी नवरात्र उत्सव साजरा होत असे. मध्यंतरीं कांहीं दिवस सदर उत्सव बंद होता परंतु आतां रा. हरी व केशव रामचंद्र विद्वांस या बंधुद्वयांनीं तो पुन्हां सुरू केला आहे.

२ वरीलप्रमाणेंच उभागरांतील डोंगरे तथा खरवळे यांच्याकडेहि नऊ दिवस रोज सप्तशतीचा पाठवाचन व महानैवेद्यसमर्पण इत्यादीनीं उत्सव (खाजगी) साजरा करण्यांत येतो.

**नवरात्रांतील जोगवा:—** नवरात्रांत आश्विन शु. १ ते शु. ९ असे नऊ दिवस निरनिराळ्या कोंडांवरचीं कुणब्याचीं लहान मुलें जोगवा मागावयास

येतात. त्यांस घरोघर तांदुळ घालितात. अलीकडे विकट अन्नधान्य परिस्थितीमुळें जोगवा मागावयास येणारांची व वाढणारांची संख्या बरीच घटली आहे. उच्च वर्णीयांतहि शालीनता शिकण्याकरितां नवरात्रांत एखादा दिवस निदान पांच घरीं जोगवा मागण्यांत येतो.

**विजयादशमी :—** आश्विन शु. १० (विजयादशमी) या दिवशीं सुमारें ४ वाजतां सर्व ब्राह्मण मंडळी कड्यावरचे गणपतीचे देवळांत जमते. नंतर देवाचे अंगणांत गणपतीचा पुजारी अश्मंतकाची (आपट्याची) खांदी पुरतो. तिची पूजा महाजन वर्तक कारभारी करितात. पूजा उपाध्याय सांगतो. नंतर सर्वजण तें सोनें लुटतात, व नंतर देवास अर्पण करून एकमेकांना वांटतात व आप्तेष्टांचे घरोघर जाऊनहि वांटतात. वरीलप्रमाणेंच श्रीभैरवाचे देवळासमोरहि समारंभ होतो. सर्व मानकरी जमल्यावर श्रीभैरवाचे अंगणांत आपट्याची फांदी पुरून गुरव पूजा करितो. नंतर खामकर कोयतीचा घाव मारतो व सर्व मंडळी सोनें लुटतात.

वर्षांचे ३॥ मुहूर्तांपैकीं हा एक असल्यामुळें शिक्षणास नवीन आरंभ करणारे मुलामुलींस या दिवशीं प्रथम शाळेंत पाठवितात. शाळेंत नवे व जुने सर्व मुलगे व मुली यांचें सरस्वतीपूजन होतें. नंतर प्रसाद वांटण्यांत येतो व नंतर सर्वजण घरीं परत येतात. या दिवशीं घरोघर श्रीभैरव व इतर ग्रामदेवतांस नैवेद्य समर्पण करितात. पाळीप्रमाणें गुरव नैवेद्य नेण्यास येतात.

**कोजागिरी पौर्णिमा—नवान्न पौर्णिमा:—** या दिवशीं रात्रीस श्रीदुर्गादेवीचे देवालयांत सोंगट्या, पत्ते हे खेळ खेळण्याकरितां मंडळी जमत. दिवाबत्तीकरितां लागणारे तेलाची पुजारी घरोघरचें गोळा करून व्यवस्था करी. अलीकडे शाळेंतील मुलगे, मुली व स्त्रिया पृथक्पणें रात्रौ गटागटानें जमून व आपसांत वर्गणी करून चहा, कॉफी, कांकडी इत्यादींची व्यवस्था करितात.

सुमारें २५।३० वर्षांपूर्वींपर्यंत गांवांतील कांहीं विवक्षित घरीं मंत्रजागरण करून व भिक्षुक मंडळीस व आमंत्रित मंडळीस दूध, केळीं, कांकडी, शहाळें, शहाळ्याचें पाणी इत्यादि देऊन हा उत्सव साजरा करीत असत, अलीकडे हें मान बरेंच कमी झालें आहे.

या पौर्णिमेस नवान्न पौर्णिमा असेंहि नांव असल्यामुळें घरोघर घराचे ओसरीवरील मुख्य दरवाज्यावर 'नवें'* बांधितात व त्यास नवान्नमिश्रित केलेल्या अन्नाचा नैवेद्य दाखवून त्याच अन्नाचें भोजन होतें.

**श्रीभैरवाचे देवळांतील जेवणी:—** या जेवणीसंबंधीं दंतकथा अशी आहे कीं, ही जेवणी पूर्वी साताईस जाऊन करीत असत. परंतु साताईस जाणें-येणें लांब व त्रासाचें वाटूं लागल्यामुळें लोक भैरवाचे देवळास जाऊन जेवणी करूं लागले. ही भैरवाचे देवळांतील जेवणीहि आतां बंद झाल्यासारखीच असून तिचें पुनरुज्जीवन करणें मात्र अत्यंत जरूर आहे. सर्व गांवांतील ब्राह्मण मंडळी आश्विन महिन्यांतील तिसरे रविवारीं ह्या जेवणीस जात असत. जेवणीची हांक मारणें, जेवणीकरितां श्रीभैरवाचे पारावरील, देवळांतील व भोंवतालची जागा साफ करणें व जेवणीकरितां लांकडें पुरविणें ही कामगिरी गुरवाकडे असे. त्याचे मोबदल्यांत त्याला जवळजवळ प्रत्येक घरचा नैवेद्य मिळत असे. घरोघरचें मीठ, मिसळणा-पासून साहित्य गोळा करून तरुण मंडळी गटागटानें स्वयंपाक करीत असत. ज्या घरचा कोणी जेवणीस जाण्यासारखा नसेल त्या घरची मंडळीसुद्धां, प्रत्यक्ष जेवणीस जाणारे मंडळीस नैवेद्यापुरतें सर्व साहित्य देऊन आपल्या वतीनें श्री-भैरवास नैवेद्य घालावयास सांगत असत. जेवण आटोपल्यावर सर्व गांवसईचा म्हणून श्रीभैरवास कौल लावण्यांत येत असे. पाखाडकर मंडळीची **श्री-पेठकरिणीची जेवणी** भैरवाचे जेवणीनंतर श्रीराममंदिरांत होते.

**दीपावली–दिवाळी:—** आश्विन व. ११ पासून कार्तिक व.२(भाऊबीज) अखेर रोज सायंकाळीं कवाडीवर व रस्त्याचे धक्क्यावर पणत्या (दिवल्या)

---

* नवें म्हणजे काय— भाताच्या नव्या लोंबी इतर म्हणजे नाचणी, वरी, कांग या धान्याचीं कणसें, कुरडू, झेंडूचीं फुलें (गोंडे) इ. अशोकाच्या अगर रामफळीच्या पानांत घट्ट गुंडाळून त्याच्या वळकट्या तयार करितात. नंतर दर-वाजाचे रुंदीपेक्षां थोडे अधिक लांब असे कळकीचे दोन चिमटे घेऊन ते सुमारें एकमेकांपासून टीचभर अंतरावर मांडून त्या दोन चिमट्यांत वरील सुरळ्या घट्ट बसवून चिमट्यांचीं तोंडें घट्ट बांधून टाकितात. दोन चिमट्यांचे मध्यें सुरळ्यांवर गणपति व सरस्वतीचीं चित्रेंहि बसवितात. अशा तऱ्हेनें तयार होणारे वस्तूस 'नवें' म्हणतात व तें घराचे मुख्य दारावर बसवितात.

घरोघर लावितात. तसेंच कवाडीवर टांगण्यासाठीं वर्तुळाकार जाळीचे व अष्टपैलू चिनी कागदांचे व आंत फिरती पायली असलेले कंदील घरोघर मुलें करितात. दिपवाळीचे सुटींतील मुलांची ही एक महत्त्वाची कामागिरीच होय. पूर्वी श्रीदेवीचे देवालयांत पत्ते, सोंगट्या, गोलगंजिफा खेळण्याकरितां आबालवृद्ध सर्व मंडळी गोळा होत असत. आतां ही चाल नामशेष झाल्यासारखीच आहे. खेळाकरितां लागणारे दिवाबत्तीची व्यवस्था, घरोघरचें तेल गोळा करून पुजारी करीत असे. एकादशीपासून लहान मुलें फटाके उडवितात व इतर दारूकामहि सोडतात. नरक-चतुर्दशीच्या दिवशीं पहांटेस मंगलस्नान करून नरकासुराचें प्रतीक म्हणून स्नान झाल्यावर पायाखालीं "कारिंट" (एक प्रकारची लहानशी कडू कांकडी) पायानें फोडण्यांत येतें.

अमावास्येचे दिवशीं परीट आरती घेऊन घरोघर ओंवाळीत फिरतो. त्याचे आरतींत यथाशक्ति पैसा, दोन पैसे ओंवाळणी टाकतात.

**लक्ष्मीपूजन :—** (अमावास्या) लक्ष्मीपूजनाचे दिवशीं सायंकाळीं लक्ष्मीपूजन होतें. या दिवशीं गुजर मारवाडी या मंडळीकडे जरा मोठ्या थाटाचें लक्ष्मीपूजन होतें. पूजा ग्रामोपाध्याय सांगतात. यावेळीं गांवांतील पुष्कळ लोकांना निमंत्रण असतें व फटाके व इतर दारूकाम उडविण्यांत येतें. आळीआळींतून मुलें मौज पहाण्याकरितां फिरत असतात.

## ८ महिना कार्तिक

**बलिप्रतिपदा:—** कार्तिक शु. १ चे दिवशीं श्रीभैरवादि ग्रामदेवतांस घरोघर नैवेद्य समर्पण करितात. गुरव नैवेद्य नेण्यास येतो. श्रीभैरवाचा नैवेद्यच कायतो तो घेतो, बाकीचे नैवेद्य गृहिणीचे मर्जीप्रमाणें गुराखी, घरची मोलकरीण इत्यादींस देण्यांत येतात. या दिवशीं सकाळीं कांहीं व्यापाऱ्यांकडे वहीपूजन होतें. पूजा सांगण्यास उपाध्यायच असतो. या दिवशीं हौशी लोक रेड्यांच्या व बैलांच्या झोंज्या लावतात.

**भाऊबीज–यमद्वितीया:—** या दिवशीं लोक बहीण गांवांत असल्यास अगर जवळपासचे गांवांत असली तरीहि भाऊबीजेनिमित्त भोजनास व ओंवाळून घेण्यास तिच्याकडे जातात.

**तुलसीविवाह :—** कार्तिक शु. ११ पासून कार्तिक शु. १५ पर्यंत व मुख्यत: कार्तिक शु. १२ च्या दिवशीं घरोघर तुलसीविवाह करण्यांत येतो.

फार क्वचित् हा विवाह मोठ्या विस्तृत प्रमाणावर म्हणजे माणसांचे विवाहाप्रमाणेंच सर्व कृत्यें करूनहि करण्यांत येतो. अशा प्रकारचा विवाह श्रीमती ताई बापट यांनीं सुमारें ५० वर्षांपूर्वीं केला होता.

चातुर्मास्य, श्रीनारायणाचे देवालयांत, चालू असलेल्या पुराणाची या दिवशीं समाप्ती होते.

**त्रिपुरी पौर्णिमाः—** या दिवशीं सूर्यास्ताबरोबर, निरनिराळ्या देवळां-समोरील त्रिपुर लावण्याची वहिवाट आहे. श्रीदुर्गादेवीसमोर त्रिपुर दोन. पैकीं उत्तरेकडील रा. यशवंत विनायक खांबेटे, व दक्षिणेकडील रा. रामकृष्ण विश्वनाथ खांबेटे यांचा आहे. दोन्हीहि त्रिपुरांची पूजा पंचमान्ये बोलावून सशास्त्र होते. पूजा उपाध्येच सांगतात. पूजा करून झाल्यावर त्रिपूर लावितात व मग आळींतील मुलें गोळा होऊन फटाके उडवितात ( वाजवितात ).

बिरवाडींत श्रीरामेश्वरापाशींहि एक त्रिपूर आहे. तो रा. केशवराव हवालदारांचा आहे. ते, तो वरीलप्रमाणेंच लावितात.

श्रीनारायणाजवळ त्रिपुर तीन पैकीं दक्षिणेकडे सुरुवात केल्यास पहिला रा. विश्वनाथ वासुदेव नित्सुरे यांचा, दक्षिणेकडून दुसरा अथवा तिहींपैकीं मधला कै. रुद्राजीपंत नित्सुरे यांचा अथवा समोरच्या सिद्धेश्वराचा व तिसरा म्हणजेच अगदीं उत्तरेकडील, श्रीवर्धनकर यशेश्वर आपाजी साठये यांचा आहे. अलीकडे कित्येक वर्षें वरील तिहींपैकीं कोणताच त्रिपुर लावण्यांत येत नाहीं.

श्रीकड्यावरील गणपतीचे शेजारचे श्रीशंकराचे देवालयासमोरचा त्रिपूर कै. हरीभाऊ जोशी यांचा आहे. फार वर्षांपासून हा लावण्याचें काम बंद आहे.

## ९ महिना मार्गशीर्ष

**थोरली दिवाळी—मार्गशीर्ष शु. १:—** या दिवशीं बहिरी, सावणेकरीण, पेठकर व दारवटकरीण अशा चार दिशांकडून गांवाचें संरक्षण करणाऱ्या ग्रामदेवतांस नैवेद्य समर्पण करण्यांत येतात. या नैवेद्य वाढण्याचे बाबतींत प्रत्येक घरीं थोडथोडी भिन्नता दिसून येते. परंतु बऱ्याच घरीं खालील प्रकार रूढ दिसतो. ( १ ) बहिरी ( भैरव ) व सावणेकरीण पान एक मुदा ( भाताच्या ) दोन. ( २ ) पेठकर दारवटकरीण वरीलप्रमाणेंच पान एक मुदा ( भाताच्या ) दोन,

पहिला म्हणजे बहिरी सावणेकरीण यांचा नैवेद्य गांवचे गुरवास देतात; क्रमांक दोनचा नैवेद्य, बऱ्याच घरीं, घरची वावरकरीण अगर मोलकरीण, अगर गुरें सांभाळणारा गुराखी यास देण्यांत येतो.

सावणेकरणीचा रुप्याचा मुखवास या दिवशीं गुरवाकडून चढविण्यांत येतो. तसेंच दातीर यांचे वागायत ठिकाणांतून सर्व्हे क्रमांक १७ हल्लीं मालक, श्रीपाद पुरुषोत्तम नित्सुरे यांचे ठिकाणांतून, नारळांची एक सबंध पेंड व सुपाऱ्यांचें एक सबंध शिंपूट अशीं सावणेकरणीस देण्यांत येतात.

या दिवशीं गुरांना वडे, आंबोळ्या इत्यादि खाऊं घालण्याची तसेंच त्यांना धुऊन माखून स्वच्छ करण्याची व त्यांचे शिंगांस तेल अथवा दुसरा कसला तरी रंग लावून त्यांना शृंगारण्याची वहिवाट आहे. या दिवशीं बैलांना सुटी असते म्हणजेच त्यांना रहाटास लावण्यांत येत नाहीं.

**गीताजयंती**:— मार्गशीर्ष शु. ११ या दिवशीं अलीकडे कित्येक वर्षें श्रीनारायणाचे देवालयांत, श्रीगीताजयंती साजरी करण्यांत येत असते.

## १० महिना पौष

**मकर संक्रांत**:— पौष महिन्यांत मकर संक्रांतीचे दिवशीं संक्रांतीचे पर्वकाळाचे वेळांत सुवासिनी स्त्रिया ब्राह्मणांस सुगडांचें ( सुघटांचें ) वाण देतात. हीं वाणें गोळा करण्याकरितां, उपाध्याय, जोशी इत्यादि निरनिराळे मानकरी घरोघर फिरतात व मागें अक्षय्य तृतीयेचे वेळचे वायनांचे वेळीं दिग्दर्शित केलेल्या वहिवाटीप्रमाणें आपआपले वांटणीचीं वायनें गोळा करितात.

सायंकाळीं सर्व सुवासिनी स्त्रिया मुलांबाळांसह श्रीदुर्गादेवीचे दर्शनास जातात व श्रीस हलवा, तिळगूळ समर्पण करून, एकमेकींनाहि देतात. आमच्या गांवांत हा सण निवळ स्त्रियांचा असें समजलें जातें. देशावरच्याप्रमाणें पुरुष मंडळी एकमेकांस हलवा अथवा तिळगूळ वांटीत फिरत नाहींत. या दिवशीं बहुतेक घरीं ‘ खापर पोळ्या ’ हें पक्कान्न करून हा सण साजरा करण्याची वहिवाट आहे.

**श्रीबहिरी पारधीस जातात** :— पौष शु. १४ रोजीं श्रीबहिरी पारधीस जातात. या दिवशीं सायंकाळीं गुरव ढोल वाजवीत सर्व वतनदार ( खुम ) लोक यांस बरोबर घेऊन देवभाटीपर्यंत जातो. तेथें सांबाची पिंडी आहे व एक आंब्याचें झाड आहे. त्या झाडावर निशाण लावतात, व देवास महानैवेद्य समर्पण

करून प्रत्येक वतनदारास पांच पांच मोदक गुरव देतो. त्याबद्दल गुरवास डुकर शेतापैकीं बारा पायली भात व १२५ पेंढे मिळतात.

## ११ महिना माघ

माघ शु. १५ चे दिवशीं **देव पारधीहून परत येतात.** या दिवशीं गुरव व खामकर ढोल वाजवीत देव भाटीपर्यंत जाऊन तेथें महानैवेद्य समर्पण करितात व परत येतात. यावेळीं मोदक इत्यादि कांहींएक देण्याची वहिवाट नाहीं. देव पारधीस नेणें व पारधीहून परत आणणें दोन्ही कामें मिळून भात ८१ मिळतें.

**श्रीभैरवादि देवतांची मिरवणूकः—** माघ व. ५ या दिवशीं श्री-भैरवादि पांच देवतांचे चांदीचे मुखवटे एका "बैल्यावर" व्यवस्थित बसवून तो बैला खामकर डोक्यावर घेतो (खामकर नसल्यास सदर कामगिरी कुंभाराकडे येते) व नंतर ढोल, झिंगटी, सूरसनई या वाद्यांसह वरील मुखवट्यांची मिरवणूक घरो-घरची पूजा घेत सर्व गांवभर फिरते. पूजा घेतांना प्रथम मानकरी म्हणजे उपाध्ये, जोशी, महाजन, वर्तक, पेंडसे (चौगुले) व साठे (चौगुले) वेळासकर यांजकडील मानाच्या पूजा प्रथम होतात. सर्व गांव फिरून झाल्यावर कोंपरींतील कै. मेघश्याम पुरुषोत्तम साठे म्हणजे हल्लीं गजानन विष्णु बापट यांचे ठिकाणांत मिरवणुकींतील सर्व मंडळी गोळा होतात व तेथें जेवण करितात.

या जेवणाची व्यवस्था करण्याची जबाबदारी डुकर शेताचे मालकांवर आहे.

**महाशिवरात्रः—** माघ व. १४ या दिवशीं बहुतेक सर्व लोक उपोषण करितात. तसेंच बरेच लोक स्वतः अगर ब्राह्मणद्वारा श्रीशंकरावर रुद्राभिषेक करितात. या दिवशीं श्रीशंकरास घरोघर आंब्याचा मोहोर वाहण्याची वहिवाट आहे. खुद्द आंजर्लें गांवांत ज्याला उत्सव म्हणतां येईल असा शंकराचा उत्सव होत नाहीं. नजीकचे गांवीं म्हणजे मुर्डी येथें श्रीविमलेश्वराचा उत्सव तेथील ग्रामस्थ मंडळीकडून सहा दिवस साजरा केला जातो. महाशिवरात्रीचे दिवशीं सायंकाळीं आंजर्ल्याहून बरीच मंडळी (स्त्रिया व पुरुष) मुर्डी येथें श्रीविमले-श्वराचे उत्सवाकरितां जाते. फाल्गुन शु. १ या दिवशीं उत्सवानिमित्त होणारें प्रयोजन असे त्याचें आमंत्रण आंजर्लेकर मंडळीस सकुटुंब सपरिवार असे व बरीच मंडळी भोजनास जात.

## १२ महिना फाल्गुन

फाल्गुन शु. ५ पासून, होळखांचर म्हणून नित्सुरे कुटुंबियांचें शेत श्रीरामजीचें देवालयासमोर आहे, त्यांत रोज सायंकाळीं होळी लावितात.

फाल्गुन शु. ७ स महाजन हे खामकरास **काटखेळ्यांस** ताकीद देणेस सांगतात. काटखेळ्यांच्या काठ्या खामकर यांजकडे असतात.

फाल्गुन शु.८ स श्रीभैरवाचा **काटखेळ** ताडाचे कोंडावरील मंडळी काढितात. खामकराकडे काठ्या असतात त्या घेण्याकरितां सर्व मंडळी जमली कीं तेथें न्हावी सगळ्या खेळ्यांच्या दाढ्या करितो व मग सर्व खेळी घरोघर खेळण्याकरितां ढोल, झिंगटी व निशाण घेऊन बाहेर पडतात. बाहेर पडण्यापूर्वी चैत्र शु. ८ चे दिवसाप्रमाणें प्रथम श्रीभैरवाचा मान देतात. नंतर मंडळी सर्व देवांचा मान देत मुर्डीचे देवांचा मान देतात व नंतर उपाध्ये, जोशी, वेळासकर, धर्माधिकारी, विद्वांस, भट महाजन, वर्तक व चौगुले–पेंडसे व चौगुले–साठे यांचे घरीं क्रमानें खेळ खेळून नंतर सर्व गांवांत घरोघर जातात. घरोघर त्यांना २ आणे ते ८ आणेपर्यंत ‘ पोस्त ’ मिळतें. हा खेळ अथवा नाच करितांना तोंडानें जीं गाणीं म्हणतात त्यांपैकीं कांहीं खालीं दिलीं आहेत. या नाचापैकीं “ भिरकवडुला ” नाच विशेष मानितात व ज्यांच्याकडे विशेष ‘ पोस्त ’ मिळेल त्यांचेकडेच तो करण्यांत येतो.

## काटखेळ्यांचीं गाणीं

आत्मन बोला कथा तु गेलारे आत्मन बोला कथा रे ।
उंबराच्या झाडाखालीं खतला डुराबा उंबराच्या झाडाखालीं खतला डुरा ॥
गुरूच्या सत्त्वान् लागला झराबा, गुरूच्या सत्त्वान् लागला झरा ॥
असा गुरू तान्हेलारे खेळिया, तपलां भरून पाणि पियाला ॥१॥
पाटाच्या कोनीं एक लावली लिंबी, पाटाच्या कोनीं एक लावली लिंबी ।
लिंबी आली रंग रसारे खेळिया, लिंबी आली रंग रसारे ॥
माळी गेला परदेशारे खेळिया माळी गेला परदेशारे ।
अशी माळिण गोमटिरे खेळिया अशी माळिण गोमटी रे ।
लिंबां तोडी दोन मोठीं रे खेळिया, लिंबां तोडी दोन मोठीं रे ॥२॥

अनुक्रम 20902 दि: ... क्रमांक ..20५...... नोंः दिः ...

घागर काळी तुझी सुन ग काळी, घागर काळी तुझी सुन ग काळी।
ढुचकिन घागर पाण्या बुडवली ॥३॥
टांग्या टांग्या फळाटे रे आपला गडी ओळखून घे ॥४॥
सुतार बारो उजत घालो। सुतार बारो उजत घालो ॥
खांद्यावर ताशणी हातीं गोलाटी। खांद्यावर ताशणी हातीं गोलाटी ॥
डोंगर पडला चंदनाचा रे, सिनल पडला सायाचा।
डोंगर पडला चंदनाचा रे सिनल पडला सायाचा ॥
सुतारीं खीळे सुत्रें दोरीं पाळणा खांबविला।
कळस, वर मोत्याचा घोस, पाळणा जोडुनियां ॥
आकाशीं मेरूच्या शिखराशीं पाळणा लोंबविला ॥
सरान् सरी, शंभर वांवा दोरी, पाळणा विणला हो ॥
या लाला, परसरामा बाला, निजरे घरिं बाला ॥
झेंपा लोटीते, राया रुक्मिण माता झेंपा लोटिते ॥५॥

६ **भिरकवडुला नाच** :— या नाचांत, पायाचे कोंडींतून जाणें, उलट सुलट फिरणें इत्यादि बऱ्याच भानगडी असल्यामुळें, हा महत्त्वाचा नाच मानण्यांत येतो व ज्या घरीं भरपूर 'पोस्त' मिळेल अशी खात्री असेल त्या घरींच तो करून दाखवितात. या नाचाचे वेळीं म्हणावयाचें गाणें—

ठांय ठांय रंगलांय गो भिरकवडुला । फासांत पडलांय गो भिरकवडुला ॥
पैशान् सोडवा गो भिरकवडुला । पावलीन्–अधेलिन्–सोडवा गो भिरकवडुला ॥
अशी पैशाची मागणी पूर्वींचे काळीं करीत असत. (हल्लीं महागाई फार झाल्या-मुळें) रुपाया मागताय गो भिरकवडुला— अशी मागणी करितात.

**होलिकापूजन** :— फाल्गुन शु. १५ चे दिवशीं श्रीभैरवाची होळी देवळासमोरचे शेतांत वतनदार सोनार हल्लीं मुक्काम हर्णै हा मुद्दाम येऊन लावतो. त्यास पूजा उपाध्याय सांगतो. त्या होळींतील विस्तव घेऊन जाखमातेची होळी कुंभार लावतो. प्रत्यक्ष विस्तव नेण्याचें काम खामकर करितो. जाखमातेच्या होळींतील विस्तव घेऊन होळखाचरांतील होळी महाजन वर्तक कारभारी लावितात. पूजा सांगण्याचें काम उपाध्याय करितो. वरीलप्रमाणेंच सावणेकरणीची होळी लावण्याकरितां भंडारी, सोनार (बाघेकरी), कांसार वगैरे मंडळी भैरवाचे

होळींतील विस्तव नेऊन लावीत असत. आतां सदर वहिवाट ( विस्तव नेण्याची ) बंद झाली आहे. वरील सर्व होळ्या लावतांना ढोल व झिंगटी बरोबर असते. होळीचें बोलावणें महाजन वर्तक व ग्रामस्थ यांस दोन प्रहरीं गुरवाकडून करण्यांत येतें. तसेंच उपाध्यायांस पूजा सांगण्यास येण्याबद्दलची विनंति, पूजा करणार सोनार करितो.

**होळीचें शीत:—** श्रीभैरवाच्या होळीचें **शीत** मुर्डी येथील भैरव भाटांतून म्हणजेच नारायण शंकर जोशी यांचे ठिकाणांतून आणितात. जाखमातेचे होळीचें शीत रा. यशवंत विनायक खांबेटे यांचे ठिकाणांतून खामकर आणितो. पेठकरणीच्या ( होळखांचरांतील ) होळीचें शीत कोंडकर जोशी यांचे ठिकाणांतून कुंभार आणतो. सावणेकरणीचे होळीचें शीत राणेवाडींतून ( शिंत्रे यांचे वाडींतून ) भंडारवाड्यांतील सर्व खेळी नेतात.

**तरुणांच्या लीला:—** फाल्गुन शु. ८ ते शु. १५—तोंडानें बीभत्स शब्द उच्चारून शंखध्वनी करण्याचा प्रकार देशावरच्या मानानें आमच्या गांवांत एकंदरीनें पहिल्यापासूनच कमी होता व तो अलीकडे आणखी बराच कमी झाला आहे. पूर्वी शहाळीं, केळीं, फणस हे जिन्नस चोरून आणून गटागटानें एकत्र जमवून खाणें हे प्रकार बरेच जोरांत होते पण ते आतां बहुतेक नामशेष झाले आहेत असें म्हटलें तरी चालेल. तसेंच ज्यांत विशेष नुकसान नाहीं पण मालकाला त्रास पडेल अशा मर्कटचेष्टा एका काळीं बऱ्याच होत असत व त्यांत थोडा व्यक्तिद्वेष व सूडबुद्धिहि असे. असले प्रकार पूर्वी बरेच होत असत. तसेंच किनरी आवाजांत ( नेहमींपेक्षां बारीक, व्यक्ति ओळखतां येणार नाहीं अशा आवाजांत ) कांहीं व्यक्तींच्या उखाळ्यापाखाळ्या काढून एक प्रकारचा सूड घेणें हे प्रकार पूर्वी होते व अजूनहि अगदींच बंद झाले नसले तरी बरेच कमी झाले आहेत असें म्हटलें तरी चालेल. समुद्रावर जाऊन आट्यापाट्या, हुतुतू हे खेळ खेळणें हे कार्यक्रम पूर्वी असत व अजूनहि आहेतच व त्यांतच पत्ते खेळण्याचीहि भर पडली आहे. पूर्वी आळीआळींत वर्गणी गोळा करून "पोपटी" नामक फराळाचा कार्यक्रम बहुतेक होत असे. यांत भाकरी व कांद्याची भाजी हे दोन जिन्नस मुख्य असत. परंतु हल्लींचे अन्नधान्याचे परिस्थितीमुळें हा प्रकारहि आतां बंद झाला आहे. तात्पर्य, शिमग्याचा पूर्वीइतका तीव्र शिमगेपणा आतां आमचे गांवांत तरी उरलेला नाहीं.

**पालख्या व तमाशे**:— फाल्गुन शु. ८ ते फाल्गुन शु. १४ या काळांत आंजर्ले गांवच्या भोंवतालच्या इळणें, सुखोंडी, माळवी इ. गांवांतील पालख्या व तमाशे, थेरणीचा म्हणजे स्त्रीवेषधारी मुलाचा नाच असे बरेच विविध खेळ घेऊन निरनिराळ्या गांवची मंडळी येतात. या मंडळीस पूर्वी घरोघरची एक पै मिळत असे, आतां एक पैसा मिळतो. या नाच-तमाशांच्या जोडीला 'डेरा' म्हणून राधाकृष्णाचें सोंग घेतलेल्यांचा विशिष्ट सुरांत गाणीं म्हणण्याचाहि एक प्रकार असतो. याशिवाय 'संकासूर' (शंखासूर) नकटे अशीं थोडीं लहान मुलांना भीति उत्पन्न करणारीं सोंगेंहि घरोघर फिरतात. अलीकडे १५-२० वर्षें ताडाचे कोंडावरील कुणबी मंडळी कोळ्याचा खेळ काढीत असतात. हा खेळ बराच प्रेक्षणीय असतो. हा खेळ फक्त आंजर्लें गांवांतच न दाखवितां, शेजारच्या आडेपाडलें, हर्णै या गांवींहि जाऊन करून दाखवितात व एकंदरींत बरेच पैसे मिळवितात. या व इतर नाचतमाशांचे सर्वच गाण्यांत त्यांचे लावणी या नांवामुळें वाटते तशी अश्लीलता नसून त्यांतील कांहीं गाणीं व लावण्या हीं ग्रामीण काव्याचे उत्कृष्ट नमुने असतात.

**साताईची पालखी**:— फाल्गुन शु. १४—इतर गांवच्या सर्व पालख्यांमध्यें या पालखीचें महत्त्व विशेष मानतात. फाल्गुन शु. १४ च्या दिवशीं भंडारवाड्यासुद्धां, सर्व गांवभर ही पालखी फिरते. दर घरचा एक एक नारळ व पैसा या पालखीला देण्यांत येतो. गांवांतील श्रीदुर्गादेवीच्या रथालाहि घरोघरचा नारळ मिळत नाहीं तो या साताईला मिळतो. यावरून पूर्वकालापासून या देवीवर सर्व जातीचे लोकांची विशेष श्रद्धा असल्याचें दिसून येतें. घरोघरचे नारळाशिवाय पुष्कळ ठिकाणीं नवसाचीं ५ अगर जास्त नारळांचीं तोरणेंहि या देवीला देण्यांत येतात. पूर्वींच्या काळीं ही पालखी शेरणें ओळखीत असे असें म्हणतात. तो प्रकार असा— "पालखीचे वाटेवर एखादे ठिकाणीं नारळ पुरून ठेवण्यांत येत, त्या ठिकाणीं पालखी आली म्हणजे पालखीवाले ती खूप वेळ इकडे तिकडे नाचवीत. खूप नाचविल्यावर ज्या ठिकाणीं नारळ (शेरणी) पुरलेली असेल त्या ठिकाणीं आल्यावर पालखी फार जड होऊन पालखीवाल्यांना खालीं ठेवावयाची वेळ येत असे व उकरलें कीं अर्थात् नारळ सांपडत हें सांगावयास नकोच. या प्रकारास "शेरणी काढणें" असें म्हणत. शेरणी काढण्याबद्दल बिदागी निदान १। रुपया

द्यावी लागे. ही पालखी कोंबडा आरवण्यापूर्वी म्हणजेच पहांटेस सुमारें ४ वाजण्याचे आंत परत जाग्यावर गेलीच पाहिजे, न गेल्यास कांहींतरी अनिष्ट प्रकार देवीचे कोपानें होतो अशी भक्तांची दृढ भावना आहे !!

**धुळवड ( धूलिवंदन )** :— मिती फाल्गुन वा। १ या दिवशीं महाजन वर्तक व सर्व ग्रामस्थ यांस गुरव बोलावणें करितात, व सुमारें ३।४ वाजतां खेळी व महाजन वर्तक कारभारी व इतर मानकरी असे सर्व जातीचे लोक येऊन श्रीभैरव देवाची मांड भरून चौक श्राण भरतात. श्राण भरून झाल्यावर देवाचे पुढें विडे मांडून देवास कौल खामकर लावतो. कळा सुटेपर्यंत काटखेळी नाचत राहतात. कळा सुटल्यावर महाजन वर्तक व ' खुम ' यांस खामकर विडे देतो. हें सर्व काम **श्रीभैरवासमोर** होतें. नंतर तेथून सर्व मंडळी निघून श्रीदेव हनुमंत पंचायतनाचे अंगणांत जाऊन त्या ठिकाणीं खेळी लोकांची ओंवाळणी खामकर यांजकडून होते. त्या ओंवाळणींत खेळी लोक एक एक पैसा ओंवाळणी टाकतात. नंतर खेळी आपसांत एकमेकांना जुन्या पद्धतीप्रमाणें आलिंगन देऊन भेटतात व रामराम करतात. नंतर देवाचें दर्शन घेऊन तेथून सर्व लोक ढोल व झिंगटी यांसह श्रीभैरवाचे होळीवर जातात व होळी शीतळविण्याचें म्हणजे पाणी शिंपून होळीची जागा सारखी सपाट करण्याचें काम सर्व मंडळी मिळून करतात. नंतर जाखमातेचे होळीवर सर्व मंडळी वाजत जाते, तेथें गेल्यावर वरीलप्रमाणेंच ती होळीहि शीतळविण्यांत येते; नंतर धुळवडीचा म्हणून जो पूर्वापार मार्ग ठरलेला आहे त्या मार्गानें गांवभर फिरून धुळवडीची मिरवणूक परत येते. या वेळीं मिरवणुकींतील मुलें कांहीं " आहे आहे शिमगा " असें म्हणतात तर कांहीं " नाहीं नाहीं शिमगा " असें म्हणतात व क्वचित् एखाद्या घराचे अंगणांत थोडी धूळ व केरकचरा फेंकतात. तसेंच या मिरवणुकीचे बरोबर खामकर हातांत लांब आंकडी घेऊन हजर असतो व रस्त्यावरील, तांबेळ व रसबेळ या दोन जातीच्या केळींखेरीज, जी केळ आंकडीनें ओढून घेतां येईल ती ओढून घेतो व केळीं बरोबरचे मंडळीस खावयास देतो. हा प्रकार मुर्डीसुद्धां सर्व गांवभर चालतो. धुळवडीचे मिरवणुकीचा पूर्वापार रस्ता खालीलप्रमाणें आहे. इकर शेताचे बाजूनें ( सुतार याचे शेताचे हद्दींतून ) चिंचेशीं बाहेर पडून नंतर गाडीरस्त्याला लागणें. तेथून सुतारआळींतून हनुमंताचे देवळावरून, श्रीभैरव याचे होळीवरून

खामकर याचे मानाकडून मुर्डी गांवचे मोठ्या पारावरून, मुर्डी गांवांतून चाचवलकरांची होळी आहे त्या जागेपर्यंत जाऊन परत फिरावयाचें व पारावरून जुन्या अरुंद मार्गानें पंचबोकळीशीं रस्त्यास मिळावयाचें. तेथून श्रीरामाचे मंदिराशीं जाऊन तेथून पेठकरणीची होळीहि पूर्वी वर्णन केल्याप्रमाणेंच शीतळवावयाची. नंतर पेठपाखाडींतून शिधये हल्लीं, नारायण विनायक बापट, यांचे ठिकाणापर्यंत जाऊन परत फिरावयाचें तें परत श्रीराम मंदिर, सरकारी मराठी शाळा यांवरून कोंपरींत यावयाचें. कोंपरींतून श्रीविठोबाचे देवळावरून समुद्रानजीक असलेले ( सावणेकरणीचे ) होळीशीं जाऊन ती होळी शीतळवावयाची व परत फिरावयाचें तें उभागरांतून रथ जेथपर्यंत जातो त्या खुणेच्या धोंडीपर्यंत ( फुटक्या धोंडीपर्यंत ) जाऊन त्या धोंडीवर धूळ फेंकावयाची, व नंतर मागें फिरावयाचें. परत फिरल्यावर महाजन व वर्तक कारभारी यांस "घरवटीवर चलाहो" अशी हांक मारावयाची. येणेंप्रमाणें हांक मारल्यावर महाजन व वर्तक हे आपले आळींतील सर्व मंडळीला घेऊन बाजारांतील पुलाजवळ मारवाडी याचे दुकानाशीं ढोल व झिंगटी थांबवून दुकानदारांकडून मुईमुगाच्या शेंगा व खजूर वसूल करण्याची व्यवस्था करितात. शेंगा, खजूर, सर्व दुकानदारांकडून वसूल होईपर्यंत त्या जाग्यावरून ढोल हालत नाहीं. बाजारपेठेंतील शेंगा, खजूर वसुली चालू असतां कांहीं मंडळी तरीबंदरचे बाजूच्या दुकानांवरील शेंगा, खजूर वसूल करण्यास पाठविलेली असते. अशा तऱ्हेनें सर्व दुकानांवरची वसुली झाली अशी खात्री झाल्यावर तेथून ढोल व झिंगटी वाजवीत सर्व मंडळी धुळवडीचे जागेवर म्हणजेच श्रीरामजीचे नजीक पेठकरणीचे मानावर जाऊन थांबते. येथें भाऊ धोंडू तेली हा २ पलेते लावून उजेडाची तजवीज करतो. नंतर कारभारी हे सर्व मंडळीस कोणाची तक्रार आहे किंवा काय असें विचारतात. तक्रार असल्यास तिचा विचार त्याच वेळीं व त्याच ठिकाणीं होतो. नंतर सर्वांस शेंगा, नारळ, खजूर, केळीं, होळीचा प्रसाद म्हणून वांटण्यांत येतात. ( पूर्वीं या ठिकाणीं तमाशा चालू असे ) नंतर हा होलिकोत्सव पुरा होतो. तेथून कारभारी यांस वाजत सरकारी शाळेपर्यंत पोहोंचविण्यांत येतें व नंतर ढोल श्रीभैरवाचे देवळांत परत जाग्यावर नेऊन ठेवण्यांत येतो. या दिवशीं भैरवादि ग्रामदेवतांस घरो-

घर नैवेद्य समर्पण करण्यांत येतो. भैरवाचा नैवेद्य गोळा करण्यास गुरव घरोघर फिरतो.

### नैमित्तिक कृत्य

**परडी काढणें–पान सोडणें :—** आजूबाजूचे गांवांत गुरांचे अगर माणसांचे सांथीचे रोग आल्यास त्यांचा उपद्रव आपल्या गांवाला होऊं नये म्हणून गुरव व इतर लोक श्रीभैरवाचे देवळांत जमतात व कौल लावून रोगापासून गांवास उपद्रव होऊं नये अशी प्रार्थना करितात. नंतर एका भेंडीचे पानावर तांदुळ, पैसा, सुपारी, हळद-कुंकू इत्यादि ठेवून वर पेटलेला कांकडा ठेवतात व तें पान एका परडींत घालून ढोल झिंगटीसह वाजत-गाजत समुद्रावर नेतात व पाण्यांत सोडतात. या विधीला परडी काढणें किंवा पान सोडणें असें म्हणतात.

---

# प्रकरण १२ वें

## देव, देवालयें, उत्सव

**१ कालभैरव अथवा बहिरी:—** ग्रामरक्षक देवांपैकीं हा प्रमुख देव होय. सर्व गांवासंबंधींचीं कृत्यें याच देवाचा कौल घेऊन करण्यांत येतात. नव्या-जुन्या पंचांगांचा वाद निघाला असतां दुर्गादेवी यात्रा नव्या पंचांगाप्रमाणें करावी कीं जुन्या ही गोष्टहि याच देवाचा कौल घेऊन ठरविण्यांत आलें. सर्व गांवावर बंधनकारक गोष्टींचा निर्णय घ्यावयाचा असला म्हणजे त्या संबंधाची गांवकी याच देवाचे देवळांत भरते. या सर्व गोष्टींचा विचार करितां कालभैरव अथवा बहिरी-बुवा हा गांवचा आद्य देव होय.

या देवाची स्थापना कधीं व कोणी केली यासंबंधीं निश्चित् माहिती उपलब्ध नाहीं; तथापि ग्रामस्थ लोकांचे मनांतील या देवाचे स्थानाचा विचार करितां गांवाचे स्थापनेबरोबरच या देवाची स्थापना झाली असली पाहिजे असें मानावयास कांहींच हरकत दिसत नाहीं. या देवाच्या बरोबरीच्या इतर ग्रामदेवतांचा विचार

करितां अगदीं आरंभीं ह्या देवाची एखाद्या झाडाखालींहि स्थापना केली असणें शक्य आहे. त्यानंतर गांवाचे वाढीबरोबर गवतारू देवालय व त्यानंतर हल्लींचें कौलारू देवालय बांधण्यांत आलें असावें, असा तर्क आहे. एका उपलब्ध झालेले खालील पावतीवरून या देवालयाची अगदीं पायापासूनची दुरुस्ती शक १६८९चे सुमारास झाली असावी असें दिसतें. ती पावतीः—

राजश्री कारभारी कसबे–आंजर्लें यांस—गोविंद सुतार वास्ति कसबे...यानें पावती लिहिली कीं श्रीबहिरीचे घरट्यापैकीं रुपये चुन्याच्या मसाल्यास रु. ३ महादेवभट सुवर्णदुर्गकर व आज गणेशपंत रुपये ४०।। येकूण ४३।। रुपये, साडे त्रेचाळीस भरून पावलों. सुरू सन समान सितेन ( शक १६८९ इ. स. १७६७ ).

**बहिरीचा आगरः**— ( हरभट उपाध्ये अग्निहोत्री यांचे जबानीवरून ) बहिरीचा आगर म्हणतात हा पुरातन देवाचा किंवा कोणाचा ? ठिकाण कोणतें ? –याचें उत्तर. आगर मुर्डीस आहे. तो पुरातन देवाचा. तेथील नारळ ५ जागर-पौर्णिमेस देवास येतात, हें आपणांस ठाऊक आहे. या देवाचे देवालयांत अथवा त्याच्यासमोर होणारे धार्मिक विधि, समारंभ यांचें त्रोटक टांचण खालीलप्रमाणें आहे. विस्तृत माहिती " गांवांतील सामाजिक व धार्मिक कृत्यें " या सदराखालीं दिली आहेः—

( १ ) चैत्र व. २ (अ) श्रीभैरव चैत्रीयात्रा. लहानथोर स्त्री-पुरुष दर्शनास येतात. ( ब ) सायंकाळीं आंकडे टोंचणी ( २ ) आषाढ व. ३०– सार्वजनिक राखण, एक बकरा ( ३ ) श्रावण शु. १४– जागरीपौर्णिमा ( ४ ) श्रावण व. १–८– अखंड नामसप्ताह ( ५ ) आश्विन शु. १० ( विजयादशमी ) – अश्मंतक ( आपटा ) पूजन ( ६ ) आश्विन तिसरा रविवार– जेवणी. ( ७ ) पौष शु. १४– देवपारधीस जातात ( ८ ) माघ शु. १५– देवपारधीहून येतात ( ९ ) माघ व. ५– भैरवादि पंचदेवतांची मिरवणूक ( १० ) फाल्गुन शु. १५– होलिकापूजन ( ११ ) फाल्गुन व. १– धूलिवंदन ( १२ ) नैमित्तिक– गुरांचे अगर माणसांचे सांथीचे रोगाचे वेळीं परडी काढणें ( पान सोडणें ). या देवाचा कायमनिधि कांहींएक नाहीं. सरकारी नेमणुकीची रक्कमहि फारच थोडी म्हणजे फक्त १ रुपयाच आहे.

२ **श्रीसावणेकरीणः**— आंजर्लें गांवाचे उत्तर भागास " सावणें " अशी संज्ञा आहे. त्या भागांत हें देवालय असल्यामुळें त्या भागाचे नांवावरून या

देवीचें सावणेकरीण असें नांव पडलें असावें. गांवच्या चार प्रमुख ग्रामदेवतांपैकीं ही एक असून ही उत्तराभिमुख आहे. म्हणजे ही गांवावर उत्तरेकडून येणारे विघ्नांचें निवारण करणारी देवता आहे. या देवतेसहि बहिरी व पेठकरीण या ग्रामदेवतांप्रमाणेंच ( १ ) वर्षप्रतिपदा ( २ ) दसरा ( ३ ) दिवाळींतील पाडवा ( ४ ) देवदिवाळी व ( ५ ) धुळवड या दिवशीं घरोघरचे नैवेद्य घालण्याची रीत आहे. हें देवालय सावण्याचे नदीचे कांठीं आहे. जुनें देऊळ केंबळी होतें. सुमारें ५० वर्षांपूर्वीं कै. गणपतशेट पतिंगे यांनीं तें दुरुस्त करून कौलारू केलें व मागील बाजूस पडवी काढली. नदीचे कांठीं देवळाजवळ सुमारें ४० वर्षांपूर्वीं कै. विष्णुपंत रानडे यांनीं वर्गणी जमवून एक विहीर बांधिली. या देवळांत उभागरांतील मंडळी पूर्वींचे काळीं जेवणीस जात. आतां तो प्रघात जवळजवळ बंद झाल्यासारखाच आहे. भंडारवाड्यांतील बरीच मंडळी अद्यापि जेवणीस जातात. त्या लोकांचीच या देवीवर जास्त भक्ति आढळून येते.

शक १८६६ चे चैत्र महिन्यांत हें देवालय पुन्हां दुरुस्त करून पूर्व व पश्चिम बाजूस पडव्या काढल्या आहेत. देऊळ दुरुस्त करण्याचे कामीं रा. गणपत महादू अथवा मुलाशेट केळसकर, रा. सखाराम फकिरा जाधव, रा. भिकोबा खेडेकर व रा. लक्ष्मण बाबालिंग गुरव या मंडळींनीं बराच पुढाकार घेतला. हल्लीं वाढविलेलें देवालय एकंदर लांबी १६ हात व रुंदी ११ हात असें झालें आहे व पुढील पडवीची रुंदी ५ हात व मागील पडवीची रुंदी सात हात आहे. म्हणजे पूर्वींचे मानानें आतां हें देवालय दुप्पट क्षेत्राचें झालें आहे. मार्गशीर्ष शु. १ म्हणजेच थोरली दिवाळी याखेरीज कधींहि या देवीला मुखवास चढवीत नाहींत.

**३ पेठकरीणः—** पेठपाखाडी आळींत श्रीरामजीचे देवळाजवळ डोंगरावर एका झाडाखालीं ही ग्रामदेवता आहे. देवीला देऊळ नसल्यामुळें, पेठपाखाडींतील एक घर बांधण्याचें काम चालू असतां, सामान्य दगड समजून बेलदारांनीं तो कपरांकरितां फोडून टाकिला. त्यांनीं चूक मागितली व ती दुभंग मूर्ति ( शिळा ) होती तेथें परत नेऊन बसविली. देवीनें नवीन मूर्ति बसविण्यास कौल दिला नाहीं. ही गोष्ट इ. स. १८७८–७९ चे सुमारास झाली असें म्हणतात. ही गांवचे चार ग्रामदेवतांपैकीं एक असून ती पश्चिमाभिमुख आहे—म्हणजेच पश्चिमेकडून गांवावर येणारे अरिष्टांपासून रक्षण करिते. या देवतेस इतर ग्राम-

देवतांबरोबरच (१) वर्षप्रतिपदा (२) दसरा (३) कार्तिक शु. १ (दिवाळी) (४) देवदिवाळी व (५) फाल्गुन व. १ धुळवड या दिवशीं नैवेद्य घालितात. तसेंच पाखाडकर मंडळी या देवतेची म्हणून आश्विन महिन्यांत जवळील श्रीरामजीचे देवालयांत जेवणी करितात.

४ **दारुवटकरीण ( म्हातारी )**:— गांवांतील फार जुन्या आद्य ग्राम-देवतांपैकीं ही एक आहे. ही देवता पूर्वाभिमुख असून तिची स्थापना श्रीबहिरीचे देवालयाजवळच आहे. कित्येक वर्षेंपर्यंत ही देवी उघड्यावरच पडलेली होती परंतु आतां छोटेसें देवालय झालें आहे.

५ **हनुमान पंचायतन**:— आंजर्लें या गांवाचे बिरवाडी भागांत " हनुमान पंचायतन " या नांवानें ओळखलें जाणारें हें सार्वजनिक पुष्कळ जुनें देवालय श्रीभैरवाचे देवळानजिक आहे. ह्या देवालयांत मारुतीची मोठी मूर्ति आहे. या देवालयास " हनुमान पंचायतन " हें नांव असलें तरी देवालयांतील मुख्य ठिकाणीं महादेवाची पिंडी असून या देवालयास कोणी रामेश्वराचें देवालय असेंहि म्हणतात. पूर्वीं या देवालयांतील मारुतीचा उत्सव होत नसे; परंतु अगदीं अलीकडे म्हणजे सुमारें गेलीं १२।१४ वर्षांपासून बिरवाडींतील गुरव, सुतार इत्यादि मंडळींनीं तो सुरू केला आहे. या हनुमंतास सरकारी नक्त नेमणूक रु. ५ आहे.

६ **श्रीलक्ष्मी-नारायण**:—हें देवालय आंजर्लें गांवचे कोंपरी या भागांत, कड्यावरचे गणपतीचे टेंकडीचे पायथ्याशीं जनसंमर्दापासून अलिप्त अशा एकांत-स्थानीं वसलेलें आहे. श्रीकालभैरव अथवा बहिरी व दुर्गादेवी या देवस्थानांचे खालोखाल महत्त्वाचें हें देवस्थान आहे. हें कधीं व कोणी बांधिलें याबद्दल कांहीं-एक माहिती उपलब्ध नाहीं. तथापि त्याचे बांधणीवरून तें फार पुरातन असावें असें वाटत नाहीं. याच कोंपरी आळींतील म्हसोबाचे गल्लींत पूर्वीं श्रीनारायणाचें एक देवालय होतें परंतु मुसलमानी अमदानींत तें नष्ट करण्यांत आलें अशी एक आख्यायिका आहे. यावरून या भागांतील मुसलमानी वर्चस्व संपल्यावर पूर्वींच्या लक्ष्मी-नारायणाचें पुनरुज्जीवन म्हणून हें देवालय बांधण्यांत आलें असावें असा तर्क आहे. ह्या देवास यावयाचें म्हणजे बाजारपेठेंतील तिठा सोडून तरीबंदराकडे जातांना डाव्या बाजूस वळून खालचे बिदीवरील नारायणाचा तिठा ओलांडावा

लागतो. तिठ्यापासून पुढें फरसबंदी रस्ता आहे. रस्त्याचे डावे बाजूस पुजाऱ्याचें घर व देवस्थानची दोन रहाटांची विहीर आहे, व त्या पुढें श्रीचें विस्तृत अंगण आहे. अंगणांत पाऊल ठेवतांच प्रथम नित्सुरे यांचा त्रिपूर लागतो व त्यापुढें एका बाजूस विठ्ठल विश्वनाथ लिमये यांची त्यांचे जांवई दिवाकर तात्या साठे यांनीं बांधिलेली समाधि व दुसऱ्या बाजूस मारुती व गरुड या दोहोंची मिळून एक लहानशी घुमटी आहे. सर्व गांवास मध्यवर्ती असा हा एकच मारुती असल्यामुळें, मारुतीवरील अभिषेक अगर शनिवारीं नारळ देणें हीं धार्मिक कृत्यें याच ठिकाणीं होतात. याच मारुतीशेजारीं पूर्वीं काळ्या दगडाची गरुडाची मूर्ति होती ती भग्न झाल्यावर, सुमारें ३० रुपये किंमतीची पांढऱ्या संगमरवरी दगडाची एक मूर्ति कै. विनायक गोविंद गोरे व त्यांची भावजय यांनीं आपल्या खर्चानें आणली व गांवकऱ्यांनीं सुमारें १० रुपये खर्च करून तिची स्थापना केली (ज्येष्ठ शु. ११ शक १८५०). गरुडाचे अंगावरील स्नानाचे पाण्यानें खरूज, नायटे, विषार इत्यादि त्वचारोग बरे होतात अशी भाविकांची श्रद्धा असल्यामुळें वरील प्रकारचे पाण्यानें स्नान करण्याकरितां वरील त्वचारोगपीडित मंडळी मधून मधून येथें गोळा झालेली दिसते. याचे पुढें, ज्या ठिकाणीं कार्तिकी उत्सवांतील देवाचीं कथाकीर्तनं, प्रयोजन इत्यादि कृत्यें होतात तें देवाचें विस्तृत अंगण येतें. या अंगणाचे पूर्वेस वर वर्णन केलेलें मारुती-गरुड देवालय व लिमये समाधी, पश्चिमेस श्रीनारायणाचें मुख्य देवालय, तसेंच उत्तरेस इंग्रजी शाळेची इमारत व दक्षिणेस साठे यांनीं बांधलेली धर्मशाळा अशा चारी बाजूला छोट्या-वड्या इमारती असल्यामुळें या अंगणास आटोपशीरपणा येऊन एकप्रकारची शोभा आलेली आहे. अंगण ओलांडून पलीकडे गेल्यावर श्रीनारायणाचा सभामंडप येतो. या सभामंडपाचें क्षेत्रफळ २०' × २०' = सुमारें ४०० चौरस फूट आहे. या सभामंडपांत एकंदर ८ लांकडी गोल खांब असून त्यांवर थोडी-बहुत नक्षी कोरलेली आहे. सभामंडपाचे पश्चिम अंगास लांकडी जाळी, तिचे आंत प्रदक्षिणे-ची वाट व नंतर लहानशी जीवनरखी असून तींत श्रीलक्ष्मी-नारायणाची काळ्या पाषाणाची चतुर्भुज मूर्ति असून तिचे शेजारीं उत्तरेस, श्रीचे समोर सप्ताह वाचणारे व तो चालू असतांच मरण पावलेले विष्णुशास्त्री वर्तक यांचे गुरु माटे-शास्त्री यांचे स्मरणार्थ बसविलेल्या पादुका आहेत. श्रीचेभोंवतीं एक पितळेची

प्रभावळ आहे. याच देवालयाचे उत्तरेचे बाजूला नित्सुरे मंडळीचा सिद्धेश्वर असून सिद्धेश्वराचे समोर तीन व मागें दोन अशा पांच समाधी आहेत. म्हणजे नारायणाचे आवारांत एकंदर सहा समाधी झाल्या. त्यांची माहिती पुढें यथावकाश दिलेली आहे.

उत्सवः— या देवालयांत श्रीकृष्ण जन्माष्टमीचा उत्सव व दुसऱ्या दिवशीं दहींकाला असतो. याबाबतची माहिती "गांवांतील सामाजिक व धार्मिक कृत्यें" या सदराखालीं विस्तृत दिली आहे. या देवस्थानचा मुख्य उत्सव कार्तिक शु. १०पासून पौर्णिमेपर्यंत होतो. या निमित्त रोज रात्रीस कीर्तन असतें. पौर्णिमेचे दिवशीं गांवप्रयोजन मुरडीसुद्धां सर्व मंडळीचें होतें. कथेचें आमंत्रण मुरडीसुद्धां सर्व गांवांस पुजारी करतो परंतु प्रयोजनाचें बोलावणें उपाध्याय करतो व पानें प्रोक्षण करून उदकहि तोच सोडतो. पाडलें येथील रा. यशवंत गणेश लिमये यांजकडून १५ मण भात येतें. पैकीं ५ मण प्रयोजनासाठीं व बाकीचें १० मण नंदादीपासाठीं आहे. भात न आल्यास तेलाची व्यवस्था त्यांचेकडून होते. उत्सवाचे सहा दिवसांत श्रीनारायणाची पूजा व नैवेद्य उपाध्याय करतो व त्यास त्याबद्दल उत्सवाचे खर्चांतून एक रुपाया मिळतो. उत्सवांत रोज रात्रीस गुरव चौघडा वाजवितो व कीर्तनाचे वेळीं पखवाज वाजविण्याचें काम करतो. नित्य पूजेकरितां सरकारी नेमणूक रुपये ३ आहे व श्रावणमासाभिषेकासंबंधीं सरकारी नेमणूक रु. ४ आहे.

## श्री लक्ष्मी-नारायण स्थावर मिळकत

| क्रमांक | जमिनीचें वर्णन | सर्व्हे क्रमांक | पोट-क्रमांक | जमीन एकर | गुंठे | आकार रु. आ. पै | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | बागाईत (कोंपरींतील) | १ | १ | .. | ९॥। | ३–१२–० | पुजाऱ्याचे ताब्यांत |
| २ | सुखोंडी खालसा गांवांतील शेतजमीन इ. | २७ | १ | ... | ७॥। | ०–४–० | |
| | | १६७ | १ | ... | ६ | ०–१–० | |
| | | १७० | १८ | ... | ५ | ०–०–६ | |
| | | १७१ | ४१ | ... | ३० | ०–२–० | |

**देवालय-दुरुस्ती:**— इ. स. १९३१ या वर्षी गांवांत व नोकरीचाकरी-निमित्त बाहेरगांवीं राहणाऱ्या लोकांकडून वर्गणी गोळा करून देवालय दुरुस्त करण्यांत आलें. कौलेंखेरीज करून इतर कामांकरितां एकंदर खर्च रु.९५० आला. गोड्याबावीजवळील नारायणाचे खारीवर श्रीच्या शाकारणीचे खर्चाचा बोजा आहे. सबब ज्या ज्या लोकांनीं हिश्याहिश्यानें सदर खार खरेदी केलेली आहे त्या त्या मंडळींनीं हिस्सेरशीनें नवीन मंगलोरी कौलें घालण्याचा खर्च सोसला.

**पुजाऱ्याचे घराची दुरुस्ती:**— वरील मुख्य देवालयाचे दुरुस्तीबरोबरच पुजाऱ्याचे घराचीहि दुरुस्ती करण्यांत आली. जोत्यासुद्धां सर्व दुरुस्ती करून व घराचें सामान नवें जुनें करून मंगलोरी कौलांचें नवीन घर उभारण्यांत आलें. एकूण खर्च २७५ रुपये आला. सर्व काम इ. स. १९३२ सालीं पूर्ण झालें.

**पुजाऱ्याचीं कामें व उत्पन्न :**— श्रीचे पूजेअर्चेचें काम बरींच वर्षे म्हणजे शक १७५२ चेहि अगोदरपासून जऊळ अथवा खोत यांजकडे होतें. शेवटचा जऊळ पुजारी नाना खोत होय. विद्यमान पुजारी शिंत्रे असून रामचंद्र भिकाजी शिंत्रे यांनीं ता. २७-२-३३ रोजीं कारभारी महाजन वर्तक यांस एक ठरावपत्र लिहून दिलेलें आहे. त्यांत पुजाऱ्यानें करावयाचीं कामें व त्यांबद्दलचें त्याचें उत्पन्न नमूद आहे तें असें:—

( १ ) श्रीनारायणाचे पुढील खास श्रीचे उपयोगाकरितां दिलेले जिन्नस सोडून इतर सर्व उत्पन्न म्हणजे नारळ, पैसा, सुपारी, तांदूळ इ.

( २ ) गजानन हरी साठ्ये यांनीं ता. १४ माहे सप्टेंबर १९३० रोजीं केलेल्या देणगी-पत्राप्रमाणें दिलेल्या शेताचा सरकारदस्त वारून उरणारें भात.

( ३ ) ठिकाण बागायत स. नं. १ पो. हि. १ जमीन ८९।।। आकार ३८१२ याचें उत्पन्न सरकारदस्त वारून राहील तें सर्व.

**नंदादीप:**— देवालयांत दोन नंदादीप आहेत. एक येथील प्राचीन दुकानदार पुरुषोत्तम शेठ गुजर यांचे नांवचा असून दुसरा लिमये-कुलकर्णी यांचा आहे. गुजर यांस गांवांत दुकान घालण्याची परवानगी महाजन ( खोत ) यांनीं दिली व त्याचे मोबदल्यांत सदर गुजर यांजवर त्यांनीं हा नंदादीपाचा बोजा ठेविला आहे. लिमये-कुलकर्णी यांचा नंदादीप स्वखुषीनें सुरू झालेला आहे.

**नित्यनैवेद्यः—** रोजचे नैवेद्याकरितां कै. गोविंदभट गोरे यांचे कुळांत नऊ मण मक्त्याचें सावणें येथील शेत दिलेलें आहे.

**श्रावणमासाभिषेकः—** श्रावणमासांतील पूजा, अभिषेक व नैवेद्य यांकरितां दापोली येथील सरकारी खजिन्यांतून दरसाल रु. ४ कै. गजानन रामकृष्ण नित्सुरे यांस आदा होत असत व ते तसेच त्यांचे वंशजांकडे चालू आहेत.

**श्रीचीं धोतरें:—** या धोतरांचा बोजा सीताराम नारायण .महाजन व गजानन हरी साठये हे हल्लीं ज्या ठिकाणांत राहतात त्या ठिकाणांवर असल्यामुळें, पाळीप्रमाणें तीं त्यांचेकडून देण्यांत येतात.

**श्रीनारायणाची विहीरः—** श्रीनारायणाचे विहिरीला, खालीं उतरण्याकरितां पायऱ्या होत्या त्यामुळें लोक आंत हातपाय धुऊन घाण करीत असत; करितां देवालयदुरुस्ती कमिटीनें त्या पायऱ्या बुजवून टाकिल्या, यामुळें विहिरीवर दोन रहाटांची व्यवस्था होऊन बागेचीहि चांगली सोय झाली आहे.

७ **श्रीसिद्धेश्वर मंदिरः—** कोपरींतील श्रीनारायणाचे मंदिराशेजारीं सदर मंदिर आहे. त्या मंदिराचें मजबूत व विशिष्ट तऱ्हेचे बांधणीवरून सदर मंदिर श्रीनारायणाचे मंदिराचेहि अगोदर बांधिलें गेलें असावें असें वाटतें.

नित्सुरे घराण्यांतील तिसऱ्या पिढींतील रामचंद्र याचा मुलगा रुद्र यानें देवालय शक १६९२ चे पूर्वीं केव्हांतरी बांधिलें. रुद्राजीपंत हे गुजराथेंत बलसाड येथें मामलेदार होते; निदान कांहींतरी मोठ्या हुद्यावर होते खास व त्यांनींच हें देवालय, खांबतळें व माळवीचे वाटेवरील पाखाडी बांधिली. या देवळाचे उत्तरेस डोंगराचे नजीक एक मोठें चिंचेचें झाड होतें व त्या झाडाच्या चिंचा नित्सुरे घराण्यांतील रुद्राजीपंत यांचे कुटांतील मंडळी हक्कानें झोडून आणीत असत. यावरून या देवळाची जागा व त्याचे उत्तरेस असलेली रिकामी जागा यांवर नित्सुरे घराण्याची मालकी होती; किंवा निदान ती जागा देवस्थानाकरितां त्यांचे खटपटीनें मिळाली होती हें निश्चित.

नित्सुरे कुटुंबीय वडीलधारीं माणसें वेळोवेळीं या देवालयाची दुरुस्ती करीत आलीं आहेत व अलीकडे ३५।४० वर्षांतसुद्धां, याप्रमाणें नित्सुरे मंडळींनीं सिंहस्थ सालांचें उपाध्येपणाचे वृत्तीचें उत्पन्न या कामीं खर्च करून

देवळावर सिमेंट घालून दुरुस्ती केलेली आहे. रुद्राजीपंताचा भाऊ शिवदेव रामचंद्र यानें रुद्राजीपंतांस शक १६९२ मध्यें लिहिलेल्या पत्राचें अर्धे-मुर्धे टांचण उपलब्ध आहे तें असें:— " रुद्राजीपंत यांहीं पत्र लिहिलें त्याचें प्रत्युत्तर देवळ बांधिलें, नांव तुमचें रुपये तुमचे—आमचे ( आमचें ) नांव नाहीं. तुम्हीं इंद्रपदीं बैसा आम्हीं मृत्युलोकीं वास करूं " या टांचणावरून, सिद्धेश्वराचें देऊळ रुद्राजी-पंतानें बांधिलें ही गोष्ट शाबीत होते.

गांवांतील सर्व देवांचे उत्सव होत असून निदान प्रत्येक शंकरावर यजमान-कृत्य म्हणून कोणाकडून तरी शिवरात्रीस लघुरुद्र होत असतो; परंतु नित्सुऱ्यांचे या सिद्धेश्वरावर आंजर्लें गांवांत इतकी नित्सुरे मंडळी असूनहि नुसता लघुरुद्रहि होत नसे हें मोठेंच वैगुण्य होतें. परंतु आतां तें घालविण्यांत आलें आहे. आतां महाशिवरात्रीस लघुरुद्र होऊं लागला आहे व अभिषेकी ब्राह्मणांस भोजनहि घालण्यांत येऊं लागलें आहे. या निमित्तानें पैशांचे व अन्यरूपानें स्वतंत्र वर्गणी गोळा करून नित्सुरे लहान-थोर स्त्री-पुरुष मंडळींचें एक छोटेंसें संमेलनहि होऊं लागलें आहे. सदर देवाची पूजाअर्चा गुरवाकडे आहे त्याबद्दलची सरकारी नेमणूक रु. ३ आहे. तसेंच श्रावणमासाभिषेक नेमणूक रु. ४ नारायण पुरुषोत्तम जोशी वेळासकर अज्ञान पालन करणार श्री. लक्ष्मीबाई भ्रतार रामचंद्र जोशी यांचे नांवावर आहे.

**श्रीसिद्धेश्वरापुढील पडवी:—** रा. विनायकराव निजसुरे हे आसन्न-मरण असतांना त्यांची इच्छा श्रीसिद्धेश्वराचे देवळापुढील फरसबंदी जोत्यावर पडवी बांधावी अशी झाली. तें काम रा. गजाननराव साठये यांनीं २ दिवसांत पुरें करून दिलें. खर्च सुमारें रु. १०० आला. आतां ही पडवी दुरुस्तीस आली आहे.

**८ कड्यावरचा श्रीगणपतिः—** फार प्राचीन काळीं समुद्रकांठीं अजरालयेश्वर व सन्निध श्रीगणपतीचें अशीं दोन देवालयें होतीं. कालांतरानें समुद्र वाढून हीं देवालयें जलमग्न होण्याचे बेतास आलीं त्यावेळीं, अगदीं सुरक्षित जागीं म्हणजेच टेंकडीचे माथ्यावर श्रीगणपतीचें ( बहुधा गवतारू ) देवालय बांधून त्या ठिकाणीं वरील गणपतीचे मूर्तीची स्थापना करण्यांत आली. कालांतरानें हें देवालय जीर्ण झाल्यावर, देवाची पूजाअर्चा करणारे रामकृष्णभट नित्सुरे यांनीं, पुण्यांतील त्यांचे यजमान दादा घाणेकर यांचेकडून देवालयाचे जीर्णोद्धारास लागणारे मदतीचें

आश्वासन घेऊन कामास सुरुवात केली. सुरुवातीपासून काम पुरें होण्यास सुमारें १०।१२ वर्षें लागलीं. हें काम शक १७०६ सालीं पूर्ण झालें. सभोंवतालचा तट अथवा पोंवळी, समोरील तलाव व शेजारील महादेवाचें देवालय यांसुद्धां सर्व खर्च ४५००० रुपये आला. देवालयाची नयनमनोहर बांधणी, टेंकडीवरील उच्चस्थान व भोंवतालचें सृष्टिसौंदर्य, अखंड झुळझुळ वाहणारा वारा या सर्वच गोष्टी फारच चित्ताकर्षक असल्यामुळें हें मंदिर नुसतें आंजर्लें गांवासच नव्हे तर सबंध कोंकणप्रांतास भूषणभूत झालें आहे.

देवळाच्या पायऱ्या चढून गेलें कीं सभामंडपाचीं तीन प्रवेशद्वारें म्हणजेच तीन कमानी येतात. यांतील मधली कमान मोठी असून बाजूच्या दोन कमानी लहान आहेत. सभामंडप चांगला विस्तृत असून त्यावर मोठा घुमट आहे व घुमटाचे आंतील अंगास पांढरा रंग देऊन त्यावर रामायण, भारत, भागवत यांमधील कथाप्रसंगांचीं सुंदर चित्रें काढलेलीं आहेत. सभामंडप ओलांडून पुढें गेलें कीं जीवरखी अथवा गाभारा येतो. यावरहि एक घुमटच आहे. गाभाऱ्याचे मध्यभागीं सिंदुरविलेपित काळ्या पाषाणाची भव्य मूर्ति आहे. या देवस्थानची व्यवस्था पूर्वापार, वेदशाळावाले निल्सुरे यांजकडे आहे. पूर्वींच्या काळीं जेव्हां वेदशाळा भरभराटींत होती त्यावेळीं वेदशाळेंतील विद्यार्थी गणपतीजवळील धर्मशाळेंत रहावयास जात व उत्सवांतील बहुतेक कामें अंगमेहनतीनें करीत. परंतु आतां वेदशाळाच बंद झाल्यामुळें बरींच कामें कामकरी लावून करून घ्यावीं लागतात. श्रीचा उत्सव माघ शु. १ पासून माघ शु. ५ पर्यंत एकंदर पांच दिवस असतो. दररोज कीर्तन असतें. पैकीं पहिले तीन किंवा ४ दिवसांचीं कीर्तनें सायंकाळीं ४ चे सुमारास असतात. श्रीचे जन्माचें कीर्तन माघ शु. ४ थी चे दिवशीं १२ वाजतां होतें व ललिताचें कीर्तन माघ शु. ५ या दिवशीं रात्रीस सुमारें २ वाजेपर्यंत चालतें. शु. ५ ला श्रीची समाराधना असे व तिचें बोलावणें आंजर्लें व मुर्डी या दोन्ही गांवीं सकुटुंब सपरिवार आगंतुक पहि-पाहुणासुद्धां असें करीत असत. परंतु मध्यंतरी बिकट अन्न-धान्य परिस्थिति व सरकारी निर्बंधामुळें बंद झालें होतें. आतां निर्बंध उठले आहेत. याकरितां कदाचित् पुन्हां सुरू होईलहि. चतुर्थीच्या दिवशीं दोन प्रहरीं श्रीचा जन्म झाल्यावर उभागरांतील मुलें एक लहानसा रथ घेऊन व रथांत एक श्रीची धातूची मूर्ति ठेवून प्रथम

मंदिराभोंवतीं प्रदक्षिणा घालतात व नंतर नारायण घाटीनें खालीं उतरून सर्व उभागर आळींत पूजा घेत घेत (रथ) फिरवितात. ही वाहिवाट अलीकडील २५।३० वर्षांतील आहे. या देवास सरकारी नक्त नेमणूक रु. ४ आहे.

श्रीचे देवालयाची बांधणी मजबूत व टिकाऊ व्हावी म्हणून चुन्याचे कामीं कोणकोणतीं द्रव्यें वापरलीं याची योग्य कल्पना यावी म्हणून हातीं आलेलें, खर्चाचें एक जुनें टांचण खालीं दिलें आहे. तें असें:—

## ८८ चुना वगैरे मसाला (तपशील)

३८|||· सिंपी खंडी १५|| दर २|| ४ काथ ८=|| २||– गुगुळ ८१||५ १०|≈ गूळ ·|१ ८ ताग ८४ ·||· हरडे ८=|| २|| डीक ८१ २|||= साखर ८||५ ·||· साबूण १|| दहीं ८१||| ५ पेंढे १००० टोणगे यांसी ३|| पेंड ·|=|||५ टोणगे ·|· टोपल्या ·|= चाळणी ५ १|| सुंभवजन ८|||· १ झिले २ ·|||· तेल ८|.

**कड्यावरील गणपतीस जाण्याचे मार्गः—** हे मार्ग तीन आहेत. पैकीं पहिला श्रीनारायणाचे देवळाजवळून तांबड्या दगडांनीं बांधिलेली नारायण घांटी होय. ही घांटी कै. मोरभटभाऊ निजसुरे यांचे सांगण्यावरून कै. नारो बचाजी बापट कोंपरींतील, जे पुण्यास वकील होते, त्यांनीं सुमारें ८०।९० वर्षांपूर्वीं बांधली. २ रा रस्ता बिदलीचा हा रा. वर्तक यांचे वाडीजवळून ताडाचे कोंडावर व गणपतीस जातो. याची पहिली दगडी पाखाडी कै. विनायक गणेश निजसुरे यांनीं ७५ रु. खर्च करून दुरुस्त केली. तिसरा रस्ता मराठी शाळेजवळील मढीजवळून जाणारा. या रस्त्यास शक १८३० सालीं कै. रामकृष्ण चिमणाजी बापट यांनीं आपली कन्या सौ. सीता इचे स्मरणार्थ ७।८ पायऱ्या कातळांत खोदविल्या आहेत. खोदीव पायऱ्या संपून थोडें पुढें गेल्यावर, एक रस्ता मढीला खेटून जातो व दुसरा डोंगराचे माथ्यावरून पूर्वेच्या बाजूनें थेट तळ्यावरून पोंवळीच्या दारापर्यंत गेला आहे.

### श्री कड्यावरचा गणपति : स्थावर मिळकत

| क्रमांक | नांव मिळकत | सर्वे नं. | पो. नं. | जमीन एकर | गुंठे | आकार रु. आ. पै | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे माळवी येथील शेत वनामकामथ | २७ | २ | ... | १८॥ | ३–११–६ | लोकल फंडासह |
| २ | ,, बनाम मालतारा | ३८ | ४ | ... | १७ | ३– १ –० | ,, |
| ३ | मौजे आंजर्ले येथील | १६६ | ८ | ... | २१ | ०– १ –० | ,, |
| ४ | सेशनकरणीनजीकची | १७५ | ६ | ... | १० | ०– १ –० | ,, |
| ५ | वरकस जमीन (परसावें) | १७५ | ७ | ... | ६ | ०– ० –६ | ,, |
| ६ | सेशनकरणीनजीकची | १५५ | ३ | ... | ६ | ०– ० –६ | ,, |
| ७ | वरकस जमीन | १६६ | २ | ... | २ | ०– ० –४ | ,, |
| ८ | परसावें | १६६ | ४ | ... | १४ | ० – ०–८ | ,, |
| ९ | ,, | १६६ | ७ | ... | १० | ०– ० –६ | ,, |
| १० | ,, | १७५ | २९ | ... | ६ | ०– ० –६ | ,, |
| | | एकूण | | २ | ३०॥ | ७– १ –६ | |

९ **पेठपाखाडींतील श्रीराम:**— हें देवस्थान पेठपाखाडींत परांजपे यांचे श्रीगणपतीचें देवालय व श्रीहरिहरेश्वराचें देवालय यांचेमध्यें आहे. देवालयाची बांधणी साधी असून छप्पर कौलारू आहे. बांधणी फारशी मजबूत नाहीं. सदर देवालय मथुराबाई भ्रतार पांडुरंग आपाजी सहस्रबुद्धे यांचे वडील (बहुधा चौगुले–साठे यांचेपैकीं) यांनीं सुमारें १००–१२५ वर्षांपूर्वीं बांधिलें. हें देवालय आरंभापासूनच पंचांचे स्वाधीन करून त्यास सार्वजनिक स्वरूप दिलेलें असावें असें दिसतें. तथापि मध्यंतरींचे काळांत लखूअण्णा बापट व त्यांचे वडील नाना बापट यांनीं देवस्थानचे मिळकतीसंबंधाचे कज्जे व वार्षिक उत्सव पदर-खर्चानें व पुष्कळशी झीज सोसून अत्यंत आपुलकीनें चालविल्यामुळें गांवांतील बहुतेक सर्व मंडळीची समजूत सदर देवस्थान लखूअण्णा बापट यांचें खाजगी असावें अशी झाली होती. परंतु इ. स. १९३३ मध्यें लखूअण्णा बापट मयत झाले. तत्पूर्वीं त्यांनीं श्रीराम मंदिरांत गांवकी भरवून देवस्थानाबद्दलची सर्व माहिती

सांगून यापुढें देवस्थानची सर्व व्यवस्था गांवकीनें आपल्या ताब्यांत घ्यावी अशी विनंती केली. त्यावरून गांवकीनें नवीन पंच नेमून सर्व व्यवस्था आपल्याकडे घेतली.

श्रीरामाचा उत्सव चैत्र महिन्यांत चैत्र शु. ८ पासून सुरू होऊन चैत्र शु. १० रोजीं रात्रीस लळीत होऊन पुरा होतो. कीर्तनाचें आमंत्रण पुजारी करतो. अष्टमीचें कीर्तन सायंकाळीं सुमारें पांच वाजतां सुरू होतें. नवमीचें मुख्य म्हणजे श्रीरामजन्माचें कीर्तन दुपारीं १२ वाजतां मंदिराच्या समोरील अंगणांत होतें. दशमीला दोन प्रहरीं सर्व गांवांत (मुर्डीसुद्धां) ब्राह्मण मंडळीचें प्रयोजन होतें. प्रयोजनाचें आमंत्रण उपाध्याय करतो. चैत्र शु. १० च्या दिवशीं श्रीरामाचे मंडपांत लळित असल्यामुळें श्रीदुर्गादेवीचे मंदिरांत कीर्तन बंद असतें. उत्सवांत तीन दिवस उपाध्याय श्रीरामजीची पूजा करितात व प्रयोजनाचीं पानें प्रोक्षण करून उदकहि तेच सोडतात. या कामगिरीबद्दल त्यांना एक रुपया मिळतो.

**श्रीरामजीचे पुजारी व त्यांचें उत्पन्नः—** मथुराबाई सहस्रबुद्धे यांनीं देवस्थानास दिलेले ३०१ रुपयांचे व्यवस्थापत्रांत नेमलेले सहा पंचांत परशुराम दादाजी साठये एक असून त्यांचे नांवापुढें पुजारी असें मुद्दाम स्पष्ट म्हटलेलें आहे. यावरून ते अगदीं पहिले पुजारी होत. त्यांचे नंतरचे पुजारी दाजी नरसिंह पेंडसे हे होते असें त्यांनीं शक १७७९ आश्विन शु. १० मितीस लिहून दिलेले करारपत्रावरून दिसतें. पेंडशांनंतर पूजेचें काम वर्तकांकडे आलें असून हल्लींचे पुजारी गणेश रामचंद्र वर्तक हे आहेत. त्यांस पूजेबद्दल कोपरींतील शिंत्रे यांचे शेजारचें बागायत ठिकाण व सावणें येथील बागायत, शेतजमीन व लाग या ठिकाणांचें उत्पन्न मिळतें. कोपरींतील ठिकाणांत पेंडसे, पुजारी असतांना केंबळीघर व गृहोपयोगी द्रोणी, शिड्या इ. सामान होतें असें त्यांचे करारपत्रावरून दिसतें.

**देवालयाची दुरुस्तीः—** आरंभीं वर्णन केल्याप्रमाणें देवालयाची बांधणी फारशी मजबूत नसल्यामुळें गेल्या १००–१२५ वर्षांत देवालयाची दोनदां दुरुस्ती करावी लागली. पहिली दुरुस्ती लखूअण्णा बापट यांचे कारकीर्दींत झाली. त्या दुरुस्तीस एकंदर खर्च सुमारें ४५० रुपये आला. त्यांपैकीं रु. १७५ वर्गणी जमली होती व बाकीचा खर्च रु. २७५ लखूअण्णा बापट यांनीं सोसला.

**दुसरी दुरुस्ती:—** इ. स. १९३८ सालीं नवीन मंगलोरी कौलें घालून व तक्तपोशी करून करण्यांत आली. एकुण वर्गणी २८५।।।≶ जमली होती.

**श्रीलक्ष्मणास चांदीचा मुकुट:—** प्रो. धुंडिराजपंत फाळके प्रमुख हिंदुस्थान सिनेमा फिल्म कंपनी यांचा मुक्काम आंजर्लें येथें असतां ते व त्यांचे बरोबरची मंडळी राममंदिरांत राहत असत. त्यांनीं पाखाडींतील श्रीराममंदिरांतील "लक्ष्मणास" चांदीचा मुकुट सुमारें २५ रुपये किंमतीचा देण्याचें कबूल केलें व त्याप्रमाणें तो शक १८५५ चे रामनवमीस पाठविला.

**१० पाखाडींतील परांजपे यांचा गणपती:—** सुमारें १२५ वर्षांपूर्वी गोविंद लक्ष्मण परांजपे या नांवाचा एक १२ वर्षांचा मुलगा आडिवरें, तालुका राजापूर येथून आंजर्लें येथें वेदाध्ययनाकरितां आला व गांवांतील महाजन यांचे आश्रयानें राहिला. त्याचें वेदाध्ययन पूर्ण झाल्यावर त्यानें पाखाडींत एक ठिकाण संपादन केलें व त्याच ठिकाणांत श्रीगणपतीचें देवालय, महाजन व इतर गांवकरी यांचे मदतीनें बांधिलें. तेव्हांपासून ते व त्यांचे वंशज स्वतः देवाची पूजाअर्चा उत्सव इत्यादि सर्व व्यवस्था खाजगी देवस्थान म्हणून पहात आले. देवास स्वतंत्र उत्पन्न कांहीं नाहीं. देवालयाची बांधणी सामान्य तऱ्हेचीच आहे. देवासमोर एक लहानशी विहीर आहे. देवालयांतील आजची संगमरवरी दगडाची सुंदर मूर्ति गोपाळ विनायक विद्वांस यांनीं ज्येष्ठ शु. ११ या दिवशीं स्थापिली. या दिवसाचें स्मरण म्हणून या दिवशीं देवालयांत कीर्तन होत असे व दुसऱ्या दिवशीं कांहीं ब्राह्मणांस भोजनहि घालण्यांत येत असे. आतां बिकट परिस्थितीमुळें सर्व बंद. हा खर्च विद्वांस करीत. या देवाचा उत्सव भाद्रपद शु. १ पासून शु. ५ अखेर पांच दिवस असतो. पंचमीचे दिवशीं प्रयोजन सर्व गांवास होत असे. परंतु सरकारी निर्बंध व बिकट अन्नधान्य परिस्थिति यांमुळें प्रयोजन आतां बंद पडलें आहे. देवस्थानास उत्पन्न नसल्यामुळें प्रत्येक वर्षीं उत्सवाकरितां गांवांत व बाहेरगांवींहि फिरून द्रव्य व इतर सहाय्य मिळवून उत्सव साजरा करण्याची वहिवाट होती. या उत्सवांत पहिले चार दिवस दिवसा कीर्तन असतें. पंचमीच्या दिवशीं दिवसा सुमारें ३-४ वाजतां सर्व गांवांत नारळाचा गोड प्रसाद वाजतगाजत वांटण्यांत येतो व तो वांटून झाल्यावर गांवांतील घरोघरचे गणपती, विसर्जनाकरितां बाहेर निघतात. या प्रसादाकरितां प्रतिवर्षीं एक रुपाया श्रीदुर्गादेवी संस्थानांतून देण्यांत येतो.

मंदिर बांधणारे गोविंदभटजी यांनीं शेवटीं संन्यास घेतला होता. त्यांची समाधि मंदिराचे पुढील बाजूस आग्नेय कोंपऱ्यांत पडवींत आहे. या समाधीचें बांधकाम कै. वासुदेवराव खरवळे ( डोंगरे ) यांच्या पत्नीनें केलें. ती संन्यासी यांची नात होती.

**देवालयाची दुरुस्ती**:— गोविंद गणेशशास्त्री तथा गोविंदबुवा परांजपे यांनीं सुमारें रुपये ५०० खर्च करून कडीपाट, वांसे, रीफ इ. दुरुस्ती केली असल्यामुळें देवालय आतां पुष्कळ सुस्थितींत आहे. वरील दुरुस्तीनंतर अलीकडे वे. रा. विनायक रामचंद्र परांजपे, मु. यवतमाळ यांनीं सुमारें ५०० रुपये खर्च करून देवापुढील विहिरीची दुरुस्ती, देवळावर मंगलोरी कौलें व कीर्तनाचे उपयोगासाठीं जाजमें केलीं आहेत.

**११ श्रीहरीहरेश्वर–पेठपाखाडी**:— हें गोखले यांचें खाजगी देवालय आहे. तें शक १७९६ इ. १८७४–७५ चे सुमारास हरीपंत गोखले यांनीं बांधिलें. कारागीर मुद्दाम गुजराथेंतून आणिले होते. खर्चाचे काटकसरीकरितां देवळाची घुमटी दगडांची न बांधितां पक्क्या विटांनीं बांधिलेली आहे. या देवालयाची बांधणी थोडक्यांत फार टुमदार आहे. यांतील नंदी, कांसव या मूर्ति संगमरवरी दगडाच्या असून फार सुबक आहेत. ह्या देवाची नित्याची पूजा गुरव करितो. देवास विशेष उत्पन्न कांहीं नाहीं. उत्सवहि होत नाहीं. महाशिवरात्रीस गोखल्यांकडून लघुरुद्र मात्र होत असतो.

**१२ श्रीदत्तमंदीर**:— आंजर्लें येथील रहिवाशी कै. मोरेश्वर आपाजी भट अथवा महाजन हे निजामाच्या राज्यांत नोकर होते. त्यांस पोटदुखी लागल्यामुळें तें श्रीक्षेत्र गाणगापूर येथें श्रीदत्ताचे सेवेकरितां राहिले होते. तेथें एका महंतानें त्यांना श्रीदत्ताच्या पादुका देऊन ' त्यांची ( पादुकांची ) सेवा करीत जा, दुःख निवारण होईल ' असें सांगितलें. ते पादुका घेऊन आंजर्ल्यास आले व हल्लीं देऊळ आहे त्याच्या मागल्या बाजूस एका औदुंबर वृक्षाखालीं त्यांनीं त्या पादुकांची स्थापना केली. पुढें त्यांचेच बंधु कै. पांडुरंग अप्पाजी महाजन हे वेंगुर्लें येथून दापोली येथें सन १८८५ चे सुमारास वकिली करण्यास आले. नंतर त्यांनीं आपल्या ठिकाणांत दक्षिणेस पाठ व उत्तरेस तोंड असें एक घर बांधिलें व या घराचे उत्तरेस पडवीलगत पश्चिमाभिमुख असें एक लहानसें

कौलारू मंदिर बांधून त्यांत उंबराखालील पादुका आणून यथाविधि स्थापन केल्या. पुढें पांडुरंग आपाजी वारल्यानंतर त्यांचे चिरंजीव उद्योगधंद्यानिमित्त पुणें, मुंबई इ. ठिकाणीं गेले; तेव्हां श्रीच्या पादुकांची पूजा व वार्षिक कृत्यें त्यांचे पुतणे कै. रंगनाथ मोरेश्वर महाजन व पुढें त्यांचे चिरंजीव रा. कृष्णाजी रंगनाथ महाजन करीत. नंतर पांडुरंग अप्पाजी यांचे चिरंजिवांनीं प्रथम घराची इमारत व मागाहून आगरासह व श्रीच्या देवालयासह सर्व इस्टेट रा. गणपत महादेव केळसकर यांस विकली. रा. केळसकर यांनीं श्रीचें मंदिर अडीच ते तीन हजार रुपये खर्च करून पुनः नवीन बांधून काढिलें व नंतर मार्गशीर्ष शु. ११ शक १८५६ (१६ डिसेंबर १९३४) या दिवशीं श्रीदत्तात्रयाची संगमरवरी दगडाची सुंदर मूर्ती आणून मोठ्या समारंभानें ती पादुकांच्या मागें बसविली. हल्लीं रा. केळसकर श्रीच्या अंगणांत मंडप घालून त्यांत श्रीचा जन्मोत्सव, सायंकाळीं कीर्तन व रात्रौ भजन असे कार्यक्रम करून मोठ्या हौसेनें साजरा करितात. आरंभापासून बरेच दिवसपर्यंत श्रीदत्ताचे पूजेअर्चेचें कांम वे. रा. गोविंदभट कोंकणे यांजकडे होतें. अलीकडे ही कामगिरी रा. आबाजी (श्रीधर) यज्ञेश्वर जोशी-अग्निहोत्री यांजकडे देण्यांत आलेली आहे.

१३ **श्री विठोबा**:— हें देऊळ बाजारपेठेंत आहे. सोनार, कांसार, भंडारी इत्यादि मंडळींनीं वर्गणी जमवून हें देवालय बांधिलें. या कामीं धोंडशेट कांसार, नवला मारवाडी, नारबा तोडणकर हे प्रमुख होते. देवाची पूजाअर्चा इत्यादि कामें गुरवाकडे आहेत. कार्तिक शु. ११ स चवथा दिवस येईल अशा बेतानें उत्सवास आरंभ करण्याची वहिवाट आहे. प्रयोजन शु. १० स करितात. शु. १२ व १३ या दिवशीं रात्रौ कीर्तन नसतें. रथयात्रा शु. १२ स असते. उजाडते पौर्णिमेस लळीत असतें.

१४ **क्षेत्रपाल**:—“एक क्षेत्रपाल शेतामध्यें आपस्याचे झाडाखालीं मुडींत असे. ग्रामदेव नव्हे. याप्रमाणें क्षेत्रपाल गांवांत आहेत. केशवभट विद्वांस यांचे आगरांत एक असे व दुसरा गणेश भाटांत कोपरीस असे. तिसरा उभागरांत पेंडसे यांचे आगरांत असे.”

१५ **संन्यासि–समाधि :—** १ श्रीलक्ष्मीनारायणासमोर श्रीगरुडाचे दक्षिणेस असलेली समाधि विठ्ठल विश्वनाथ लिमये यांची आहे.

२ व ३ नारायण व सिद्धेश्वर यांचे मागच्या बाजूला दोन समाधि आहेत. पैकीं दक्षिणेकडील कृष्णंभट जोशी अग्निहोत्रि यांची आहे व याच समाधिशेजारीं आणखी एक समाधि आहे, पण ती कोणाची हें माहीत नाहीं.

४।५।६ श्रीसिद्धेश्वराचे नंदीचे समोर एक व बाजूला दोन अशा एकंदर तीन समाधि आहेत. यांपैकीं मधली कोणा कोल्हटकराची आहे. पण बाकीच्या दोन कोणाच्या याबद्दलची माहिती उपलब्ध नाहीं.

७ पाखाडच्या गणपतीचे पडवींत आग्नेय कोंपऱ्यांत मंदिर बांधणारे गोविंदभटजी परांजपे यांची समाधि आहे.

८ व ९ वरीलप्रमाणेंच पाखाडचे श्रीगणपतिसमोर दोन समाधि शेजारीं शेजारीं आहेत. त्यांपैकीं पश्चिमेकडील मोरोकृष्ण विद्वांस (केशवराव विद्वांस यांचे पणजोबा) यांची आहे. पूर्वेकडील समाधि कोणाची याबद्दल माहिती उपलब्ध नाहीं.

१० श्रीरामजीचें व गणपतीचें मिळून होणारे विस्तृत आवारांत नारायण रामचंद्र जोशी यांची समाधि होती.

---

# प्रकरण १३ वें

## आंजर्ल्याची श्रीदुर्गादेवी

या देवीचा महोत्सव प्रतिवर्षीं चैत्र शु. प्रतिपदेला सुरू होऊन चैत्र व. चतुर्थीला सकाळीं आवारी झाल्यावर पुरा होतो.

**यात्रा कोणत्या पंचांगाप्रमाणें होते:—** शक १८४० या वर्षी शुद्ध पंचांग कै. लोकमान्य टिळक यानीं महाराष्ट्रांतील विद्वान् ज्योतिषि लोकांचे मतानें सुरू केलें तेव्हांपासून जुनें पंचांग व शुद्ध तथा नवें अथवा टिळक पंचांग असे दोन भेद उत्पन्न झाले आहेत. सुशिक्षित लोक टिळक पंचांग वापरतात व बहुतेक

अनुक्र. 20972 वि: ...
क्रमांक 205 नों: दि: ...

अब्राह्मण लोक व जुने ज्योतिषि जुनें पंचांग वापरतात. यामुळें पहिल्याच वर्षी म्हणजे शक १८४० मध्यें श्रीभैरव मांदिरांत ब्राह्मण व यात्रेशीं आजमितीस संबंध असलेले अब्राह्मण लोक यांची सभा भरली. त्या सभेंत शिमग्यांतील वार्षिक कृत्यें, श्रीदुर्गादेवीची यात्रा व इतर गांवसईचीं सार्वजनिक कृत्यें शुद्ध म्हणजेच टिळक पंचांगाप्रमाणें करावीं असा श्रीभैरवानें कौल दिला, म्हणून तेव्हांपासून आंजर्लें येथील श्रीदुर्गादेवी यात्रा शुद्ध पंचांगाप्रमाणें चालू झाली.

**उत्सवाचा थोडा पूर्वेतिहासः**— आंजर्लें, वेळास व मुरूड येथील श्रीदुर्गादेवीचा व केळशी येथील श्रीमहालक्ष्मीचा असे हे चार गांवचे उत्सव थोडथोड्या अंतराअंतरानें चैत्र महिन्यांतच होतात. या ग्रामचतुष्टयांतील उत्सवांत इतर तीन गांवचे लोकांना संस्कृत भाषेंत ठराविक मायन्यांत पत्रें ( लिखितें ) लिहून निमंत्रण करण्याची वहिवाट आहे. पुढील नमुना पहा—

॥ श्री ॥

स्वस्ति श्रीमन्निखिलगुणगणमंडनमण्डित पूजितानेकपण्डित–स्वभुजोपार्जित-वित्तवितरण कल्पपादपवृन्द–श्रौतस्मार्तकर्मानुष्ठानाचरणेन पवित्रीकृतान्तःकरण-राजसन्मानभाजन ग्रामस्थित धर्माधिकार्युपाध्यायाग्निहोत्रिज्योतिर्विदवैदिक वैद्य-महाजनवर्तकव्यापारिप्रमुखाखिलद्विजवर्यान् प्रति–अजरालयग्रामस्थित धर्माधिकार्यु-पाध्यायाग्निहोत्रिज्योतिर्विदवैदिकवैद्यमहाजनवर्तकव्यापारिप्रमुखे अस्मद्ग्रामे चैत्रवद्य-द्वितीयायां रात्रौ श्रीदुर्गादेवीमहोत्सवजागरणं, प्रातस्तृतीयायां.........वासरे श्रीरथयात्रामहोत्सवोऽस्ति । तदर्थं भवद्भिरशेषैरत्रावश्यमागन्तव्यम् । भवदागमनेन श्रीरथयात्रामहोत्सवः वयं च गौरवभाजो भविष्यामः । इतिविज्ञप्तिरवधार्यताम् । श्रीरस्तु । शुभंभवतु । शाक.. ... संवत्सर...

मुरूड गांवची बखर कै. रावसाहेब मंडलीक यांनीं प्रसिद्ध केलेली आहे. तीवरून ह्या आपले चार गांवांतील देवीचे उत्सवांची योजना कमींत कमी ४०० ते ५०० वर्षांमागची तरी असली पाहिजे असें म्हणण्यास कांहींच प्रत्यवाय नाहीं. अशारीतीनें या चार गांवांची संघटना करण्यांत आपल्या पूर्वजांचा हेतु काय असावा हें पूर्वकालीन दंग्याधोप्याची निकट परिस्थिति लक्षांत घेतां सहज समजण्यासारखें आहे.

याहूनहि मोठ्या प्रमाणावर केलेली संघटना पहावयाची असेल तर श्रीक्षेत्र परशुराम येथील उत्सवाकडे लक्ष दिलें पाहिजे. तेथेंहि उत्सव–समाप्तीचे दिवशीं अनेक गांवांतील पुढाऱ्यांना मानाचा नारळ व विडा देण्यांत येतो, इतकेंच नव्हे तर कोणत्या गांवच्या लोकांनीं समाराधनेंत कोणत्या जागीं बसावें त्या जागाहि मुक्रर केलेल्या आहेत. सुमारें ५०।६० वर्षांपूर्वीं, प्रतिवर्षीं या उत्सवाची वर्गणी म्हणजेच "परशुरामपट्टी" गोळा करण्याकरितां इकडे गांवोगांव कारकून येत असत. या आपल्या ४ गांवची ( केळशी, आंजर्लें, वेळास व मुरूड ) उत्सवाची संघटना बहुधा परशुरामाच्या उत्सवाचे संघटनेवरून घेतली असावी असें दिसतें. आपली ही उत्सवयोजना ४००।५०० वर्षांची जुनी असली तरी तिच्यांत दिसून येणारें संघटनाचातुर्य, समाजसेवा, बंधुभाव, अस्पृश्यतानिवारण, श्रमविभाग, लोकधारणा इ. अनेक बहुमोल गुणांमुळें आजच्या काळांतहि तिचें आदर्श घटना म्हणून महत्त्व फार आहे. याकरितां त्या उत्सवासंबंधी जी माहिती उपलब्ध आहे व जी व्यवस्था गेलीं शेंकडों वर्षें अव्याहतपणें चालू आहे तिचें सविस्तर वर्णन पुढें दिलेलें आहे व त्यापूर्वीं चटदिशीं नजरेंत भरण्याकरितां निरनिराळ्या ज्ञातीच्या लोकांकडे कोणकोणतीं कामें कसकशीं वांटून दिलीं आहेत याचें त्रोटक टांचण खालीं दिलें आहे:—

१ कुणबी अथवा कुळवाडी:— श्रीचें अंगण खणून चोपून सारवून ठराविक दिवशीं तयार करणें, रथ बाहेर काढून ठेवणें, घरोघरचा भाजीपाला गोळा करणें; जेवणवाडींत राखण व इतर मदत. सर्व गांवभर रथ फिरविणें.

२ भंडारी:— इ. स. १८८८ सालीं भांडण करून फुटून निघेपर्यंत श्रीचा भव्य कलमदानी मांडव घालणें.

३ शिंपी:— रथाचें कापड दुरुस्त करणें; छत शिवणें.

४ परीट:— छतास कापड पुरविणें; वातेरूं पुरविणें.

५ सोनार ( वतनदार ):— श्रीदुर्गादेवीचा व भैरवादि इतर देवांचे मुखवास उजळणें; फाल्गुनांत भैरवाची होळी लावणें.

६ कांसार:— इ. स. १८८८ सालीं भांडण होऊन फुटून बाहेर पडेपर्यंत श्रीदुर्गादेवीचीं भांडीं दुरुस्त करणें व त्यांस कल्हई करणें.

७ तेली:— कुणबी लोकांबरोबर गांवांत रथ फिरविण्यांत [illegible] घेणें; प्रत्येक घाण्यामागें ठराविक तेल श्रीदुर्गादेवीस देणें.

८ न्हावी:— श्रीचे रथापुढें अबदागीर धरणें; मंडपांत दिव्यांच्या तेल-वाती करणें; रथाला आरसा लावणें; विडेवांटणीनंतर मंडळी परत येतांना मशाल धरणें ( उजेडाकरितां ).

९ कुंभार:— श्रीचे देवळावरील कौलें चाळणें व नवीन घालणें, जेवण-वाडींत रहाटाचे माळेकरितां लोटे पुरविणें; स्वयंपाकाचे कामांत मडकीं पुरविणें.

१० सुतार:— श्रीचे मंदिरांतील व रथाची किरकोळ दुरुस्ती करणें; जरूर पडेल तेव्हां ढोल नवीन करून देणें.

११ गुरव:— यात्रेचे सुरुवातीपासून दररोज ठराविक वेळीं ढोल व झिंगटी वाजवीत ठराविक मार्गानें फिरून यात्रेचे कार्यक्रमांची आठवण देणें; कीर्तनांत पखवाज वाजविणें; गांवकीचें बोलावणें करणें; रथाचे मिरवणुकींत वाद्यें वाजविणें.

१२ खामकर ( डोंगरकोळी ):— रथ ज्या मार्गानें जावयाचा त्या मार्गा-वरील झाडांच्या रथास अडचण करणाऱ्या फांद्या तोडावयाची तजवीज करून रस्ता मोकळा करणें; रथाच्या डेलक्या पुरविणें.

१३ चांभार:— देवीचीं वाद्यें म्हणजे ढोल नगारे इत्यादि सुस्थितींत ठेवणें; फुटल्यास पुन्हां नवीन कातडें घालून देणें.

१४ ब्राह्मण:— कथा-कीर्तन, वसंतपूजा, दिवाबत्ती, मानपान, प्रयोजन इत्यादि सर्व गोष्टींची देखरेख व आतां मंडपाचीहि व्यवस्था.

**देवालय व मूर्ति**:— हें देवालय आंजर्ल्याचे सावणें या भागांत पूर्वा-भिमुख आहे. आजमितीस येथें दिसणारें श्रीदुर्गादेवीचें देवालय शक १७४० मध्यें जीर्णोद्धार केलेलें देवालय आहे. या देवालयांत आज जी गंडकी शिळेची अष्टभुजा महिषासुरमर्दिनी सुंदर मूर्ति आहे ती थोरले बाजीरावसाहेब यांचे कारकीर्दींत आषाढ शु. १ रविवार शक १६५३ या दिवशीं स्थापन केलेली आहे. तथापि ही आद्य मूर्ति नव्हे खास. कै. अण्णा शिंत्रे यांचे तोंडून ऐकलेले

दंतकथेप्रमाणें ज्या योगीबावानें आंजर्लें गांव वसविला त्या बावाचे स्वप्नांत देवी येऊन तिनें दृष्टांत दिला कीं सड्यावरील पारधुळे यांचे परसावांत हरकिणाचे राशींत मी आहें, तरी तेथून मला आणून माझी गांवांत स्थापना करावी; त्याप्रमाणें बावांनीं स्थापना केली व तीच आद्य मूर्ति होय. ही आद्य मूर्ति साध्या दगडाची असावी असें देवीच्या तळ्यांत विसर्जन करून ठेविलेल्या जुन्या सिंहासनाचे स्वरूपावरून दिसतें. देवालयाचें जोतें जांभ्या (तांबड्या) दगडाचें मजबूत गलथ्याचें दगडांनीं खालींवर बांधिलेलें असून सुमारें ३ हात उंच आहे. जोत्याची लांबी पूर्वपश्चिम सुमारें ४५ हात व दक्षिणउत्तर रुंदी सुमारें १९ हात आहे. मध्यंतरीं लांकडी जाळी करून देवालयाचे दोन भाग केलेले आहेत. एक सभामंडप व एक गाभारा. सभामंडपाची लांबी हात २५ व रुंदी हात १९ आहे. गाभाऱ्याची लांबी सुमारें २० हात व रुंदी १९ हात आहे. सभामंडपांत एकंदर १० खांब आहेत. म्हणजेच प्रत्येक रांगेंत पांच खांब आहेत. जीर्णोद्धाराचें काम काशीनाथबाबा लिमये मामलेदार राजापूर यांचे देखरेखीखालीं झालें. देवालयांतील वर वर्णन केलेले सुंदर खांब त्यांचे मामांचे घराकरितां तयार झालेले होते (मु. खांबें, ता. माणगांव) ते त्यांनीं गलबतांत घालून आंजर्लें येथें आणिले व देवळाचे जीर्णोद्धारास लाविले. या खांबांवर फारच सुंदर नक्षी कोरलेली आहे. मध्यंतरीं जाळीचे आंतील बाजूस जीवरखी असून ती जांभ्या (तांबड्या) दगडानें बांधिलेली आहे. तींत श्रीदुर्गेची वर वर्णन केलेली मूर्ति आहे. जीवरखीची लांबीरुंदी सुमारें ८ × ७ हात आहे. इमारतीचे एक-द्वितीयांश भागाला म्हणजे सभामंडपांतील एका खणापर्यंत दगडी भिंती असून त्याचे पुढील भागीं लांकडी कठडा आहे. देवालयाचें सर्व लांकडी काम सागवानाचें असून तें मजबूत आणि भव्य असें आहे. वर लिहिलेली लांकडी जाळी सुमारें शक १७६२ पूर्वीं आपाभट विनायक नित्सुरे यांनीं पुढाकार घेऊन दुरुस्त केली असा दाखला आहे. श्रीदुर्गादेवीची विद्यमान मूर्ति काळ्या गंडकी पाषाणाची असून ती अष्टभुजा व महिषासुरमर्दिनी अशी उभी आहे. ही मूर्ति फारच सुंदर आहे. मूर्तीच्या मागें तांब्याची प्रभावळ आहे. प्रभावळीचें तांबें फारच चांगल्या प्रकारचें असल्यामुळें प्रभावळ पहाणारास पितळेची असल्याचा भास होतो. प्रभावळीवर खालील लेख कोरलेला आहे:—

शाके गुणशरांगेंदौ प्रति पत्तिष्य हर्षयोः ।।
नवाषाढे शुक्ल पक्षे सूर्यवारे तुलांशके ।।१।।

या लेखावरून हल्लींच्या मूर्तीचा स्थापना शक १६५३ असा वर दिला आहे. देवीचे देवळासमोर भव्य अंगण आहे. त्याची आजची लांबी–रुंदी सुमारें ३७×३० हात आहे. या अंगणांत पूर्वीचें २३×२० हात लांबी–रुंदीचें एक जोतें आहे. हें अंगण पुरेनासें झाल्यामुळें तें तसेंच मध्यें कायम ठेवून हल्लींचें जोतें कै. त्रिंबककाका गोरे यांनीं वाढविलें. अंगणाचे ईशान्य कोंपऱ्यावर एक पिंपळ आहे. जुना पिंपळ फार जीर्ण झाला म्हणून इ. स. १९३१ सालीं तोडण्यांत आला व त्याच वर्षीं सध्याचें पिंपळाचें नवीन झाड त्याचे जागीं रा. पुरुषोत्तम गोविंद तथा भाऊ वर्तक यांनीं लाविलें. तें मोठें झाल्यावर म्हणजेच त्याला एक हजार पानें फुटल्यावर त्याची इ. स. १९३५ सालीं माघ शु. १० शक १८५७ या दिवशीं मुंज लावण्यांत आली. हें पिंपळाचें झाड फारच झपाट्यानें वाढत आहे. अंगणांतून पायऱ्या उतरून रस्त्यांत येतांना माथ्यावर रा. कृष्णाजी बाबाजी दांडेकर यांनीं शक १८४० सालीं सुमारें ३०० रुपये खर्च करून बांधिलेली लहानशी टुमदार चौघड्याची इमारत आहे. तसेंच पायऱ्यांचे दोन बाजूंस दोन, खांबेटे यांचे त्रिपुर आहेत. अंगणाचे वायव्य कोंपऱ्यावर पिंपळासमोर भव्य तुळशीवृंदावन आहे व त्यापलीकडे एक तळें असून त्याचे पलीकडे श्रीचे पुजाऱ्याचें घर आहे. सदर तळें वर्तुळाकार असून त्यास आंत उतरण्यास पूर्वेचे बाजूस पायऱ्या आहेत व आंतील बाजूस वर्तुळाकार, फिरतां येईल अशा एकाखालीं एक तीन, पोंवळ्या आहेत. तळ्याचे पश्चिम बाजूस एक विहीर असून तिचें पाणी तळ्यांत व तळ्याचें पाणी तींत जाईल अशी व्यवस्था केलेली आहे. ही विहीर व तलाव देवालय बांधिलें ते समयीं बांधिलेलीं आहेत. कांहीं वर्षांपूर्वीं हा तलाव उपसण्यांत आला तेव्हां त्यांत विहिरीकडील बाजूस एक काळ्या पाषाणाचें ओबड-धोबड सिंहासन व्यवस्थित ठेविलेलें आढळलें. हें सिंहासन आद्य मूर्तीचे वेळचें असावें असा तर्क आहे.

### श्रीदुर्गादेवी यात्रा १८ दिवस ( संक्षिप्त कार्यक्रम )

१ चैत्र शु. १ ( १ ) पंचांगश्रवण ( २ ) वसंतपूजा–महाजन यांची ( ३ ) गुरवामार्फत अंगणें करावयास येण्याबद्दल सूचना.

२ चैत्र शु. २ ( १ ) अंगण करणें ( २ ) रथ बाहेर काढणें ( ३ ) वसंतपूजा वर्तकांची.

३ चैत्र शु. ३ वसंतपूजा, पेंडसे ( चौगुले ) यांची.

४ चैत्र शु. ४ ( १ ) वसंतपूजा, नित्सुरे–उपाध्ये यांची. ( २ ) वेळास यात्रेचें लिखितवाचन.

५ चैत्र शु. ५ वसंतपूजा, जोशी यांची.

६ चैत्र शु. ६ वसंतपूजा, जोशी–वेळासकर यांची.

७ चैत्र शु. ७ ( १ ) वसंतपूजा, विद्वांस धर्माधिकारी यांची ( २ ) मुरूड यात्रा लिखितवाचन ( हल्लीं बंद ).

८ चैत्र शु. ८ वसंतपूजा, भट-महाजन यांची.

९ चैत्र शु. ९ वसंतपूजा, वेहेरे, मु. आडें यांची.

१० चैत्र शु. १० वसंतपूजा, पुरुषोत्तम लक्ष्मण जोशी यांची.

११ चैत्र शु. ११ ( १ ) वसंतपूजा, लिमये–कुळकर्णी यांची ( २ ) लिखित रवाना तुळशीस–टपालानें ( ३ ) हरकीण आणणें.

१२ चैत्र शु. १२ वसंतपूजा, घाणेकर यांची.

१३ चैत्र शु. १३ ( १ ) वसंतपूजा, रानडे यांची ( २ ) पौर्णिमेस भाजी मोडणेस येण्याबद्दल आग्रीमंडळीस ताकीद देणेंबद्दल गुरवांस सूचना ( ३ ) केळशीयात्रा लिखितवाचन.

१४ चैत्र शु. १४ केळशी यात्रेमुळें खाडा.

१५ चैत्र शु. १५ ( १ ) वसंतपूजा, खांबेटे यांची ( २ ) तांदूळ दर ठरविणें ( ३ ) लिखितें रवाना करणें ( ४ ) भाजी मोडणें.

१६ चैत्र व. १ ( १ ) वसंतपूजा, साठे–चौगुले यांची ( २ ) दुर्गादेवी वसूल ( ३ ) रथमार्ग पहाणी खामकराकडून ( ४ ) मुखवास चढविणें.

१७ चैत्र व. २ (१) यात्रेचा मुख्य दिवस (२) आंकडे गांवभर फिरविणें (३) हरकिण्या हरिदास कीर्तन (४) रथपुतळी आणणें (५) पंचांगवाचन (६) प्रयोजन (७) ग्रामदेवता नैवेद्य–समर्पण (८) भाताचीं तपेलीं व वाढलेलीं पानें यांची वांटणी (९) विडेवांटणी–ग्रामस्थ मानकरी मंडळीस ब्रिरवाडीस (१०) आसनें दाखविणें व विडेवांटणी पर-ग्रामस्थ मानकरी यांची श्रीचे मंडपांत रात्रौ.

१८ चैत्र व. ३ रथयात्रा, रथ गांवभर फिरविणें.

१९ चैत्र व. ४ (१) आवारी (२) पंचमाने पूजन (३) पंचांगवाचन (४) श्रीवर श्रीसूक्ताभिषेक (५) रथपुतळी स्वस्थानीं परत. यात्रा समाप्त.

## यात्रावर्णन

**पंचांगश्रवणः—** चैत्र शु. १– या दिवशीं सकाळीं सुमारें ८ घटका दिवसास गुरव बहिरीच्या देवळांतून ढोल घेऊन बहिरीजवळ 'बादावा' (पांच काठ्या) देऊन नजीक असलेले दारवटकरणीचे देवळांत जाऊन तेथें बादावा देतात. नंतर श्रीहनुमान पंचायतनाचे देवळांत जाऊन त्या ठिकाणीं "बादावा" देतात. नंतर जोगेश्वरीजवळ जाऊन तेथें "बादावा" देतात. नंतर खांबतळ्या-नजीकच्या जाखमातेला 'बादावा' देऊन भैरवाच्या देवळासमोरून मुरडीस डोंगराच्या बाजूनें जाणाऱ्या वाटेनें पारापर्यंत जाऊन तेथपासून फक्त ढोल वाज-वीत मराठ्याचे ठिकाणानजीकचे होळीपर्यंत जाऊन तसाच ढोल वाजवीत मराठ्याचे ठिकाणापर्यंत येतात. तेथें आल्यावर ढोल वाजविणें बंद करून राज-मार्गानें श्रीरामजीच्या देवळावरून पाखाडीआळींतून शिधये यांच्या म्हणजे हल्लीं नारायण विनायक बापट यांनीं घेतलेल्या ठिकाणापर्यंत जातात. नंतर परत फिरून गेल्यामार्गानें पुन्हां श्रीरामजीच्या देवालयापर्यंत येऊन त्या ठिकाणीं नजीकच डोंगरांत असलेल्या पेठकरणीला बादावा देतात. इतका कार्यक्रम झाल्यावर ढोल लोकलबोर्ड मराठी शाळेवरून वाजत कोपरींत येतो. तेथें आल्यावर मेघश्याम

पुरुषोत्तम साठये यांचे म्हणजेच आजमितीला रा. गजानन विष्णु बापट यांचे कवाडीशीं आल्यावर ढोलाची एक काठी अगदीं थोडा वेळ थांबविण्यांत येते; कारण सदर ठिकाणांत माघमासीं भैरव बसण्याची जागा आहे म्हणून त्या जागेचा हा मान होय. पुढें बाजारचे पुलावरून ढोल वाजत उभागरांत येऊन महाजन यांचे दारांत थांबतो. त्या ठिकाणीं पंचांगवाचन व पूजन होतें व नंतर **मानस्कोचें गंध** लावण्यांत येतें. सर्व मानकऱ्यांस गंध लावून झाल्यावर सभेंतील इतर ब्राह्मण मंडळीस गंध लावण्यांत येतें व दक्षिणा देण्यांत येते व कडुनिंबाचा रस व गणेशपूजा ( अत्यंत अल्प गूळ लावलेल्या नारळाच्या फार पातळ फोडी ) व पानसुपारी देण्याची वहिवाट आहे.

महाजन यांजकडील पंचागश्रवण आटोपल्यावर ढोल व झिंगटी यांसह सर्व मंडळी वाजतगाजत वर्तक यांचे मंडपांत पंचांगश्रवणास जाते. तेथें महाजन यांचे मंडपांतल्याप्रमाणेंच व्यवस्था होते. वर्तकांकडील पंचांगश्रवणाचा कार्यक्रम आटोपल्यावर ढोल व झिंगटी वाजवीत गुरव सतीचे तळ्याकडे जावयास निघतात. वाटेंत दातीर यांचे ठिकाणाजवळ म्हणजे हल्लींचे श्रीपाद पुरुषोत्तम नित्सुरे यांचे ठिकाणाजवळ, पूर्वीं दातीर महाजन होते त्याची स्मृति म्हणून, ढोलाची काठी अगदीं थोडा वेळ थांबवितात व नंतर पुढें सरळ सतीच्या तळ्यापर्यंत ढोल व झिंगटी वाजवीत जातात. तेथें गेल्यावर “ देशमुख पंचांगश्रवणाला चलाहो ” अशी देशमुखवाडीचे कवाडीशीं हांक मारितात ( सतीच्या तळ्यासमोरील ठिकाण देशमुखांचें आहे ). सतीच्या तळ्यापासून ढोल माघारा फिरून श्रीदुर्गादेवीचे मंदिरांत येतो. तेथें महाजन व वर्तक यांचेकडच्याप्रमाणेंच पंचांगश्रवणाचा कार्यक्रम होतो. तेथील व महाजन वर्तक यांजकडील कार्यक्रमांत फरक येवढाच कीं या ठिकाणीं दक्षिणा वांटण्यांत येत नाहीं. बाकीची देवळांतील व्यवस्था पुजारी आपले खर्चानें करितो. पंचांगश्रवण आटोपल्यावर, उभें राहून “ आज रात्रौ समस्त मंडळींनीं देवीच्या देवालयांत वसंतपूजेस यावें ” अशी प्रार्थना महाजन करितात. नंतर आरती करण्यांत येते. आरती झाल्यावर, महाजन वर्तक कारभारी इतर ग्रामस्थांसह घरोघर परत जातात. लोकलबोर्ड शाळेपर्यंत ढोल वाजवीत नेतात. नंतर ढोल व झिंगटी वाजविण्याचें बंद करून तीं श्रीभैरवाचे देवालयांत नेऊन ठेवितात. म्हणजे त्या दिवशींचा सकाळचा कार्यक्रम समाप्त होतो.

**वसंतपूजाः**— रात्रौ सुमारें ९ वाजतां गुरव ढोल व झिंगटी घेऊन भैरवाचे देवळांतून बाहेर पडतात. ते पाखाडींतील श्रीरामजीच्या (पेठकरीणहि तेथेंच वर डोंगरांत आहे) देवळापासून ढोल व झिंगटी वाजवीत कारभारी महाजन व कारभारी वर्तक यांचे घरापुढें "श्रीदेवीचे देवळांत वसंतपूजेला चला-हो" अशी त्यांचे नांवें हांक मारून पुढें श्रीदेवीच्या देवळांत जातात. तेथें गेल्या-वर बाजा करितात म्हणजे सूर सनई हीं वाद्यें वाजवितात व नंतर वसंतपूजा, कीर्तन हे कार्यक्रम होतात. कीर्तनांत पखवाज वाजविण्याचें काम गुरवानें करावयाचें असतें. त्याबद्दल आरतींतील पैसे त्याला मिळतात. कार्यक्रम समाप्त होण्यापूर्वी दुसऱ्या दिवशीं ज्याची वसंतपूजेची पाळी असेल तो उभा राहतो व "उदयीक रात्रौ समस्त मंडळींनीं देवीचे देवळांत वसंतपूजेला यावें" अशी प्रार्थना करितो. अशी प्रार्थना केली कीं सर्वांस बोलावणें झालें असें समजण्यांत येतें. परंतु प्रार्थना करण्याचें चुकून राहिल्यास मात्र घरोघर जाऊन बोलावणें करावें लागतें. याबाबत दुसरी लक्षांत ठेवण्याची गोष्ट म्हटली म्हणजे हीच कीं ज्याची वसंतपूजा असेल त्याच कुटुंबांतील माणसांपैकीं कोणीतरी प्रार्थना केली पाहिजे. असा इसम गांवीं नसल्यास दुसऱ्याकडून किंवा पुजाऱ्याकडून प्रार्थना करविल्यास हरकत नसते. ज्याची वसंतपूजा असेल त्यानें सकाळीं श्रीदेवीची षोडषोपचार पूजा करून दुपारीं देवळांत नेऊन महानैवेद्य दाखवावयाचा असतो. पूजा सांगण्याचें काम उपाध्यायां-कडे असतें. वसंतपूजेसंबंधीं सर्व खर्च दिवाबत्ती व कीर्तन असल्यास माळ, तुरा, खिरापत व दक्षिणा हा सर्व, वसंतपूजेचे पाळीवाल्यानें करावयाचा असतो. वसंतपूजेचे वेळीं वेदमंत्र म्हणणारे भिक्षुकांस यथाशक्ति विशेष दक्षिणा व इतरांस एक पैसा दक्षिणा देण्याची वहिवाट आहे. चैत्र शु. १ पासून चैत्र व. १ पर्यंत कीर्तन व रोजचे कार्यक्रम देवीचे सभामंडपांत होतात त्यावेळीं वाती सारणें, बैठका घालणें व काढणें, आरती आणणें हीं सर्व कामें पुजाऱ्यानें करावयाचीं असतात. कीर्तन मंडपांत होऊं लागल्यावर पहिल्या दिवशीं म्हणजे चैत्र व. १ चे दिवशीं चौगुले साठये यांची वसंतपूजा असते व त्या दिवशींची सर्व व्यवस्था त्यांचेकडेच आहे. चैत्र व. २ व ३ हे दोन दिवस दिवाबत्तीची व इतर सर्व व्यवस्था मंडपाची पाळी असलेले आळीकरांकडे जाते. व. २ चे दिवशीं म्हणजेच यात्रेचे मुख्य दिवशीं मंडपांत वाती सारण्याचें काम वतनदार न्हावी याचें आहे.

त्याचप्रमाणें या दिवशींची आरतीहि मंडपाचे पाळीवाले हेच आणितात. व. ३ चे दिवशीं आरती पुजारी आणतो. या दिवशीं आरत्या दोन असतात. एक पंचारति असते. यात्रेचे सर्व दिवसांचें आरतींतील उत्पन्न पखवाज वाजविणारे गुरवास मिळतें.

**वसंतपूजेविषयीं विशेष गोष्टी:—** १ अठरा दिवसांचे मुदतींत एखाद्या तिथीचा क्षय अथवा वृद्धि झाली तरी वसंतपूजांचा क्रम बदलत नाहीं. कारण चतुर्दशीला केळशीच्या यात्रेच्या दिवशीं खाडा आहे. यामुळें एखाद्या तिथीचा क्षय असल्यास हा दिवस वसंतपूजेस देतां येतो. चैत्र व. द्वितीयेच्या मुख्य यात्रेच्या दिवशीं गांवकऱ्यांची सार्वजनिक वसंतपूजा असते.

२ चैत्र शु. १० ची वसंतपूजा मूळची देवधर यांची होती, नंतर तो दिवस पटवर्धन यांजकडे होता व आतां तो दिवस रा. पु. ल. जोशी केळशीकर हल्लीं आंजर्लें येथें असतात त्यांजकडे सोंपविलेला आहे.

३ चैत्र शु. १३ ची वसंतपूजा पूर्वी काणे हवालदार यांची होती. पण वसंतपूजेचें बोलावणें कुटुंबाबाहेरील माणसाकडून करण्याचा हवालदार यांनीं हट्ट धरल्यामुळें ती बंद केली गेली असें जुने लोक सांगतात. आतां ती रानडे यांजकडे देण्यांत आलेली आहे. येथपर्यंत यात्रेच्या रोजच्या कार्यक्रमाचें दिग्दर्शन करून झालें. आतां वरील कार्यक्रमांत थोडाफार बदल कधीं व कां हें पाहूं:—

चैत्र शु. ५ या दिवशीं वेळास येथें श्रीदुर्गादेवीची यात्रा असते त्या दिवशीं आंजर्लें येथें सर्व कृत्यें रीतसर होतात. खाडा नसतो. मुरूड व केळशी येथील यात्रेच्या दिवशीं ढोल दिवसा सायंकाळीं, वर्षप्रतीपदेच्या दिवशीं सकाळीं ज्याप्रमाणें जातो ( मागें पृ. १०५ पहा ) त्याप्रमाणें जाऊन महाजन वर्तक कारभारी यांस त्यांच्या कवाडीशीं जाऊन त्या त्या ( केळशी अगर मुरूड ) यात्रांचें बोलावणें करून सतीच्या तळ्यापर्यंत वाजत जातो. नंतर न वाजवितां तसाच परत जातो. ( मुरूड येथील यात्रा सन १८९९ पासून जरी बंद असली तरी वरील ढोलाचें निमंत्रण केवळ स्मरणार्थ चालू आहे. )

चैत्र शु. ८ पासून सकाळीं रोज ढोल न वाजवितांच वर्षप्रतीपदेच्या दिवशीं सकाळीं ज्याप्रमाणें श्रीभैरव, साळबादेवी इ. सर्व ग्रामदेवतांपाशीं जाऊन

बादावा देतात तसा देऊन श्रीदेवीच्या देवळापाशीं येतात. तेथील पिंपळापाशीं जाऊन सावणेकरणीस बादावा देतात. शु. ८ सायंकाळीं सुमारें ४ घटका दिवसास ढोल दररोज रात्रीस येतो त्याप्रमाणें येऊन महाजन व वर्तक कारभारी यांस मुरूडचे यात्रेचें बोलावणें गुरव हांक मारून करतात व सतीच्या तळ्यापर्यंत जाऊन नंतर ढोल परत फिरतो. या दिवशीं देवीचे देवालयांत वसंत-पूजा मात्र होते. कीर्तन बंद असतें. चैत्र शु. १४ चे दिवशीं केळशीची यात्रा असते त्या दिवशींहि वरीलप्रमाणेंच ढोलाची व्यवस्था असते. चैत्र शु. ५ वेळासची यात्रा व चैत्र शु. १४ या दिवशीं केळशीची यात्रा असते. या दोन्ही यात्रांचीं लिखितें आदल्या दिवशीं म्हणजे अनुक्रमें चैत्र शु. ४ व चैत्र शु. १३ या दिवशीं महाजन कारभारी यांजकडे येतात. तीं ते धर्माधिकारी (विद्वांस) यांजपाशीं लगेच देतात. तीं ते वसंतपूजा व कीर्तन झाल्यावर मानस्कीचें गंध लावण्याचे पूर्वी सर्व मंडळीस, उभे राहून वाचून दाखवितात.

आंजर्लें येथील श्रीदुर्गादेवीचा उत्सव चैत्र शु. १ पासून चैत्र व. ३ अखेर एकंदर १८ दिवस असतो. त्या अठरा दिवसांत रात्रौ उत्सवाव्यतिरिक्त गांवांत दुसरे कोठेंहि कीर्तन, नाच, नाटक, तमाशा कांहीं एक करण्याची वहिवाट नाहीं. तसेंच आंजर्लें येथील यात्रेचा मुख्य दिवस चैत्र व. २ हा आहे. त्या दिवशीं रात्रीस वेळास, मुरूड व केळशी येथील गांवकऱ्यांनीं आपआपले गांवांत कीर्तन, नाच, नाटक, तमाशा कांहीं एक करावयाचें नाहीं असा निर्बंध आहे. चैत्र शु. ५ ला वेळासची यात्रा असते त्या दिवशीं मात्र आंजर्लें येथील श्रीदुर्गादेवीचे देवा-लयांत कीर्तन बंद ठेवण्याची वहिवाट नाहीं. चैत्र शु. १० ला रात्रौ पाखाडीस (आंजर्ल्यांचाच एक भाग) श्रीरामाचे देवालयांत ललित असतें याकरितां त्या दिवशीं श्रीदुर्गादेवीचे देवालयांत कीर्तन बंद असतें.

**अंगणें करणें:—** चैत्र शु. १ रोजीं रात्रीस वसंतपूजा झाल्यावर कारभारी हे श्रीदेवीचें अंगणें करण्याकरितां ताडाचे कोंडकर, कातळ कोंडकर व नवानगर-कर यांस दुसऱ्या दिवशीं येण्याबद्दल सूचना देण्याची व्यवस्था गुरवांमार्फत करितात त्याप्रमाणें चैत्र शु. २ रोजीं ताडाचे कोंडावरील कुणबी मंडळी सकाळीं अंगणें खणून भिजवून एक चोप देऊन सारवण करून जातात. दोनप्रहरीं नवा-नगरकर व कातळ कोंडकर येऊन एक चोप काढून व सारवून जातात. दर

घरचा एक मनुष्य याप्रमाणें हजर राहण्याची वहिवाट आहे. सकाळीं अंगण खणणारे ताडाचे कोंडकर मंडळीस पूर्वीं एक पैशाची तमाखू देण्याची वहिवाट होती. हल्लीं तमाखूकरितां दोन पैसे देण्यांत येतात !! ताडाचे कोंडकर सकाळीं अंगणें खणण्यास येतात, त्याचवेळीं रथ पडवींतून काढून बाहेर तळ्यासमोर रथांगणांत पश्चिमाभिमुख ठेवितात.

**मंडप व्यवस्थाः—** श्रम-विभागाचे तत्त्वाप्रमाणें उत्सव पार पाडण्याची सर्व व्यवस्था ब्राह्मण वस्तीचे दोन गट करून त्यांचेकडे सोंपविण्यांत येते. एका गटांत सावर्णेसुद्धां सबंध उभागर आळीचा व दुसऱ्या गटांत पाखाडी व कोंपरी या दोन आळ्यांचा समावेश होतो. एका गटानें मंडप घालणें, तो कापडणें, शृंगारणें, हंड्या झुंबरें व तसबिरा लावणें, चिरकदान तयार करणें, दिवाबत्तीची व्यवस्था करणें हीं कामें येतात. तसेंच मुख्य जाग्रणीच्या दिवशीं दिवाबत्ती, कीर्तन व तत्संबंधी सर्व व्यवस्था, बाहेरगांवच्या लोकांच्या मानपानाची व्यवस्था, भालदारांची व्यवस्था इत्यादि सर्व गोष्टींची जबाबदारी मंडपाची पाळी असलेले आळीकरांवर असते.

**मंडपांतील तोरणें:—** मंडपांतील प्रवेशद्वारासमोरील केळीचें मुख्य तोरण मंडपाचे पाळीवाल्यांनीं घालावयाचें. मंडपाचे आंतील उत्तरेकडील तोरण वे. शा. सं. रा. रा. वासुदेव जगन्नाथ वर्तक यांचे कुळांतील पुरुषानें घालावयाचें असतें व त्याबद्दल त्यांना तीन शेर तांदुळांचें दायतें मिळतें.

**मंडपाचें छत व रथाचें कापडः—** डोळस उपनांवाचे शिंपी घराण्याकडे छत शिवणें व जरूरीप्रमाणें रथाचें कापड दुरुस्त करून रथावर चढविणें हीं कामें वंशपरंपरागत वहिवाटीनें आहेत व त्यांबद्दल त्यांना ८१॥ पायली दायतें मिळतें.

**लिखितें पाठविणें:—** वेळास, मुरूड, केळशी, मांदिवली व तुळशी या चार गांवीं ठराविक पूर्वापार नमुन्यांत " लिखितें " पाठवावयाचीं असतात. तसेंच हर्णै, पाडलें, आडें व इळणें या ठिकाणीं उत्सवाचे आमंत्रणाचीं कारभारी यांचे सहीचीं पत्रें जातात. लिखितें धर्माधिकारी यांनीं लिहावयाचीं व तीं त्यांनीं महाजन कारभारी यांजकडे पुढील तजविजीकरितां द्यावयाचीं असतात. पूर्वीं सर्व

लिखितें मजुरीचे गड्याबरोबर पाठविण्यांत येत असत. परंतु अलिकडे तुळशीचें लिखित टपालानें पाठविण्याची प्रथा पडल्यामुळें तें चैत्र शु. ११ स रवाना होतें. बाकीचीं लिखितें चैत्र शु. १५ रोजीं मजुरीचे गडी करून त्यांचेबरोबर पाठविण्यांत येतात. याच गड्यांबरोबर वाटेंतील हर्णै, आडें, पाडलें, इळणें या गांवचीं आमंत्रणें पोंचविण्यांत येतात.

**हरकीण आणणें:—** चैत्र शु. ११ चे दिवशीं रात्रौ पूर्वापार हरकीण ( हरीक या तृणधान्याचा पेंढा ) आणण्याची वहिवाट होती. ही वहिवाट पडण्याचें कारण असें सांगतात कीं, ज्या बावानें आंजर्लें गांव वसविला अशी दंतकथा आहे त्याच बावाचे स्वप्नांत येऊन देवीनें दृष्टांत दिला कीं सड्यावरील पारधुळे यांचे परसावांत हरकिणाचे राशींत मी आहें तरी तेथून आणून माझी गांवांत स्थापना करावी. त्याप्रमाणें बावांनीं देवीची मूर्ति स्थापन केली व त्याची आठवण म्हणून पारधुळे यांचे ठिकाणांतून हरकीण आणण्याची प्रथा पडली. पुढें पारधुळे यांचे ठिकाणांत हरकिण मिळत नाहींसें झाल्यावर तें मिळेल तेथून आणण्यांत येऊं लागलें व आतां ती प्रथा बंद पडली आहे. हरकीण आणण्याची वहिवाट चालू होती तेव्हां त्याचा उपयोग त्याची माळ करून हरिदासाचे गळ्यांत घालण्याकडे करीत असत व म्हणूनच त्या हरिदासास हरकिण्या हरिदास म्हणण्याची प्रथा पडली असावी. याखेरीज या हरकिणाचे ढिगाचा उपयोग लहान मुलांस गोलांट्या उड्या मारणें, कुस्त्या खेळणें, एकमेकांना हरकिणांत पुरणें इत्यादि खेळ करण्याकडेहि होत असे.

**यात्रेचा वसूलः—** चैत्र शु. १५ रोजीं रात्रीस वसंतपूजा झाल्यावर तांदुळांचा दर ठरवावयाचा असतो. लागाठ्यांतील वसूल व सड्यावरील भरड जमीन आहे तिच्यावर व बिरवाडी येथील देवीच्या पाट्यांवर दर बिघ्यास ८४ आणेप्रमाणें वसूल घ्यावयाचा अशासारखें कांहीं पूर्वापार ठरलेलें असून कोणाकडून किती वसूल घ्यावयाचा याबद्दल श्रीदेवीचें खातेवार बोटखत आहे, त्याप्रमाणें वसूल करावयाचा असतो. या वसुलापैकीं निम्मे वसूल नक्त पैशांत व निम्मे तांदुळांत घ्यावयाचा असतो. तांदुळांचा दर बाजारांत जो भाव असेल त्याहून दर रुपायास एक शेर जास्त याप्रमाणें ठरवावयाचा व त्याप्रमाणें तांदुळांचा वसूल घ्यावयाचा. या तांदुळांचें माप गांवांतील शेट्यानें घ्यावयाचें असतें. परंतु मूळचा

शेट्या दामशेट ( वाणी ) कोकाटे यांचे घराण्यापैकीं कोणी इसम आतां विद्यमान नसल्यामुळें हल्लीं रा. रा., विठ्ठल नारायण डोळस– शिंपी यांजकडे हें काम दिलेलें आहे. त्याबद्दल त्यांना दोन पायली दायतें मिळतें.

**वसूल जमा कोणी व केव्हां करावयाचा:—** पौर्णिमेच्या दिवशीं रात्रीं वर दर्शविल्याप्रमाणें तांदुळांचा दर ठरल्यावर सदर दर काय ठरला तें समस्त ग्रामस्थांस श्रीदुर्गादेवीचे मंदिरांत पुजाऱ्यामार्फत जाहीर करण्यांत येतें व त्याप्रमाणें वसूल श्रीच्या मंदिरांत दुसऱ्या दिवशीं म्हणजे व. प्रतिपदेच्या दिवशीं घेण्यांत येतो. या वसुलाचें बोटखत व इतर कागद कुळकर्णी यांनीं तयार करावयाचे असतात. वसूल कारभारी यांनीं करावयाचा व आपले ताब्यांत ठेवावयाचा. लिहिण्याचें सर्व काम कुळकर्णी यांचें आहे. ज्यांच्याकडे भरड जमिनीचा वसूल नाहीं त्यांच्याकडून अंगावरील वसूल म्हणून चार आणे घेण्यांत येतात. कुळकर्णी यांस कागद व इतर लिहिण्याचे सामानाबद्दल आठ आणे मिळतात.

वद्य १ रोजीं कीर्तन झाल्यावर ज्यांच्याकडून वसूल आला नसेल त्यांची कुळकर्णी यांनीं तयार केलेली यादी कारभारी सर्व ग्रामस्थांस वाचून दाखवितात. ज्यांचेकडून वसूल आला नसेल, त्यांजकडे दुसऱ्या दिवशींच्या (व.२) श्रीच्या प्रयोजनाचें आमंत्रण ग्रामोपाध्याय करीत नाहींत. परंतु कांहीं अडचणीमुळें ज्यांनीं व. १ स वसूल लाविला नाहीं व म्हणून ज्यांस प्रयोजनाचें बोलावणें केलें नाहीं त्यांनीं व. २ स जेवणवाडींत प्रयोजनापूर्वीं वसूल दिला तर त्यांस कारभारी जेवणवाडींतच लगेच प्रयोजनाचें आमंत्रण देतात. व. २ लाहि ज्यांच्याकडून वसूल येणार नाहीं त्यांची रथाची पूजा घ्यावयाची नाहीं अशी वहिवाट आहे.

मे. डब्ल्यु. सी. रँड, प्रांतसाहेब यांच्या हर्णै मुक्कामच्या ता. १-४-१८८८ चे हुकुमाप्रमाणें ( पुढें पहा ) भंडारी, सोनार व कांसार या तीन जातींच्या लोकांचा श्रीदुर्गादेवीचे यात्रेंत कांहींएक संबंध राहिला नाहीं म्हणून त्यांचेकडून वसूल घेण्यांत येत नाहीं.

भंडारी, सोनार, कांसार इ. भांडण निकालपत्र:—

. . . I therefore direct under Sec. 147 of the cri. Pro. code that no person other than a Brahman enter Devi's Temple during Devi's festival viz. from the 1st day of the first fortnight of chaitra to the 3rd day of the 2nd

fortnight of chaitra or take any part in Devi's festival except with the permission of the managers of Devi's Temple. This order will hold good until the persons now prohibited from entering the temple and taking part in the festival obtain the decision of a competent civil court adjudging them to be entitled to exercise their rights.

Harnai 21-4-88 (Sd.) W. C. Rand
Mag. F. C.

**तेल्यांचे घाण्यावरील वसूलः—** तेल्याच्या दर घाण्यास दोन शेर-प्रमाणें तेल जेवणवाडींतील वेठे यांनीं वसूल करावयाचें. पैकीं दोन शेर तेल न्हाव्यास, कारभारी व ग्रामस्थ भैरव दर्शन घेऊन परत येतात त्या वेळीं मशाली-करितां द्यावयाचें व बाकीचें मंडपांतील चिरकदानें व स्वयंपाक यांसाठीं उपयोगांत आणावयाचें असतें.

**श्रीदुर्गादेवी मुखवासः—** पूर्वीचा मुखवास शक १७०१ सालीं केलेला होता. त्याचें वजन १८६।।। भार होतें (चांदीचें). हल्लीं असलेले मुखवासाचे मुखवस्त्याशिवाय बाकी भागाचें वजन ४४२।= भार आहे. दर तोळ्यास आठ आणेप्रमाणें मजुरी पडली. त्रिशूळ व हातांतील दोन सांखळ्या वजन भार ५ या जुन्याच कायम आहेत. मुखवस्त्याचें वजन ५६।।। भार आहे. फक्त मुखवस्त्याचा खर्च कै. रामकृष्ण चिमणाजी बापट यांनीं केला. बाकी खर्च रु. ६८४।।। झाला. प्रथम केळशीकर सोनार यानें मुखवास केला पण तो पसंत न पडल्यामुळें व पुढें तो सोनार मयत झाल्यामुळें पुण्यास पुनः प्रथमपासून काम करावें लागलें. या कारणानें व केळशीकर सोनाराकडे चांदी बुडाल्यामुळें, वर जो खर्च लिहिला आहे त्यांत सुमारें शंभर रुपये बुडीत खर्च आहे. पाहिल्या मुखवासाचा चेहरा, महिषासुरमर्दिनी या ध्यानास योग्य असा उग्र होता. हल्लींच्या मुखवासाचें व त्यावरील कारागिरीचें काम उत्कृष्ट आहे. पण चेहरा सौम्य दिसतो. हा मुखवास शक १८३५ त केलेला आहे. कै. बापट यांस मुखवस्त्याचा खर्च १२५ रु. झाल्याचें कळतें. देवीचा मुखवास आणणेसाठीं पुण्यास कै. विष्णु रामकृष्ण साठये हे गेले होते. मुखवास तरीबंदरावर आल्यावर पालखींत घालून पाखाडी, कोंपरी, उभागर अशा क्रमानें गांवाचे शेवटापर्यंत पूजा घेत घेत जाऊन मग श्रीदुर्गादेवी मंदिरांत आणण्यांत आला.

**मुखवास चढविणें:—** चैत्र व. १ या दिवशीं श्रीदुर्गादेवीचा, तसेंच इतर पांच ग्रामदेवता— भैरव, नागेश्वर पेठकरीण, दारवटकरीण व जोगेश्वरी— यांचे चांदीचे मुखवटे चढविणें यास मुखवास चढविणें असें म्हणतात. वरील सर्व मुखवटे, आजचे वतनदार सोनार भार्गव रामचंद्र आंजर्लेकर, हल्लीं वस्ती हर्णै, हे श्रीदुर्गादेवीचे देवालयांत बसून उजळून देतात. त्याबद्दल त्यांस ८८३।।। दायतें मिळतें. श्रीदुर्गादेवीचा मुखवास पुजारी यानें चढविल्यावर गुरव चौघडा व वाजंत्रीं वाजवितात. नंतर भैरवादि इतर ग्रामदेवतांचे मुखवटे त्या त्या देवतेवर चढविण्याकरितां महाजन, गुरवांचे स्वाधीन करितात व गुरव त्या त्या देवतेवर ते चढवितात. सावणेकरणीचा मुखवास मात्र या दिवशीं न चढवितां तो मार्गशीर्ष व. १ ला चढविण्याची वहिवाट आहे. श्रीभैरवाचा मुखवास चढल्यावर तेथें जाग्रणी होते. नंतर रीतीप्रमाणें ढोल व झिंगटी घेऊन गुरव श्रीदुर्गादेवीचे देवालयांत येतात. श्रीभैरवाचे जाग्रणीकरितां दोन शेर तेल गुरव यास इस्मायल तेली बद्रुद्दीन यांचे घराण्याकडून पूर्वीं मिळत असे व त्याबद्दल त्यांस गुरवाकडून पांच नारळ व पांच सुपाऱ्या मिळत असत. श्रीभैरवाचा मुखवास राखण्याचें काम त्या ठिकाणीं राहणारे सर्व वतनदारांनीं मिळून करावयाचें असतें. श्रीदुर्गादेवीचा मुखवास राखण्याकरितां पूर्वीं दोन वेठे असत. परंतु अलीकडे कित्येक वर्षें सदर काम पुजारीच करितो व त्याबद्दल त्याला सहा आणे मिळतात. श्रीदुर्गादेवीचा मुखवास चढवून होतांच गुरवांनीं चौघडा वाजविल्याबद्दल प्रत्येक इसमास एक मापटें ( निठवें ) याप्रमाणें ५ इसमांस शिधा ताबडतोब देण्यांत येतो.

चैत्र व. १ च्या दिवशीं रात्रीं ढोल भैरवाचे देवळांतून निघून शु. १ चे दिवशींप्रमाणें पाखाडींतून लोकलबोर्ड मराठी शाळेवरून बाजारचे तिठ्यावरून उभागरांत येतो. उभागरांत आल्यावर महाजन यांचे कवाडीशीं थांबतो. तेथून महाजन यांस बरोबर घेऊन वाजत गाजत वर्तक यांचे कवाडीशीं जातो. तेथून वर्तक यांस बरोबर घेऊन वाजत गाजत श्रीदुर्गादेवी मंदिराशीं जातो. तेथें महाजन व वर्तक यांस सोडून झिंगटीसह सतीचे तळ्यापर्यंत जातो व तेथून परत फिरतो. परत येतांना, देशमुखवाडीचे कवाडीशीं ढोलाची काठी बंद करून " देशमूख जाग्रणीला चला " अशी देशमुखांना हांक मारून परत श्रीदुर्गादेवी मंदिरांत येतो.

**हरकिण्या हरदासः**— चैत्र व. २ ला दुपारीं मंडपांत कीर्तन असतें. यावेळीं जो हरदास असतो त्याचे गळ्यांत हरकिणाची माळ घालण्याची वहिवाट आहे. ( मागें हरकीण पान १११ पहा ) यावेळीं एकंदरींत कीर्तनांतील वातावरण नेहमींप्रमाणें गंभीर नसतें. श्रोतृवृंद म्हणजे पोरेंबाळेंच असतात. तसेंच कथाश्रवणास बसलेली मंडळी डोक्यास कांहीं न घालतां तशीच बसतात. या कथेचा आणखी एक विशेष म्हणजे ही कथा संपल्यावर होणारे आरतींत नीरांजन नसतें. नुस्तीच आरती होऊन कथा समाप्त होते. कथा समाप्त झाल्यावर जोशी मंडपांत पंचांग वाचतो. पंचांगश्रवण जाहल्यावर उपाध्याय वेदोक्त मंत्रानें सर्वांस भोजनाचें आमंत्रण करतो; तो मंत्र म्हणजे ऋक्संहिता अष्टक ३, अध्याय २, वर्ग ३, मंत्र ४ हा होय. तो असाः—

म हि ज्यो ति र्नि हि तं व क्ष णा स्वा मा प क्वं च र ति बि भ्र ती गौः ।

वि श्वं स्वा द्म सं भृ त मु स्त्रि या यां य त्सी मिं द्रो ऽ अ द धा द्भो ज ना य ॥

**रथपुतळी आणणें**:— रथपुतळी, म्हणजे रथांत बसवून सर्व गांवभर, सभारंभानें मिरवावयाची मूर्ति. ही पूर्वापार वहिवाटीप्रमाणें नित्यपूजेकरितां वेदशाळेचे नित्सुरे—ज्यांस भट असेंहि म्हणतात— यांजकडे असते. चैत्र व. २ या दिवशीं वर वर्णन केलेलें हरकिण्या हरदासाचें कीर्तन सुरू झाल्यावर, प्रयोजनापूर्वीं पुजारी व इतर ग्रामस्थ मंडळी बालगोपालांसह वरील वेदशाळेचे नित्सुरे यांजकडे ढोल, झिंगटी, अब्दागीर व वाजंत्री यांसह रथपुतळी आणण्यासाठीं जातात. तेथें श्रीची आरती केल्यावर पुजारी मूर्ति उचलून घेतो व सर्व मंडळीसह वाजत गाजत जेवणवाडींत आणून पूर्वाभिमुख ठरलेल्या ठिकाणीं ठेवतो. रथपुतळी आणतांना वाटेंत प्रत्येक घरीं रथपुतळीस पूजा देण्यांत येते. रथपुतळी जेवणवाडींत आणून ठेविल्यापासून सायंकाळीं देवळांत नेऊन ठेवीपर्यंत तिची रखवाली जेवणवाडी ठिकाणाचे पाळीदार करितात.

**प्रयोजनाची व्यवस्था**:— यात्रेपैकीं दुसरा महत्त्वाचा भाग प्रयोजनाची व्यवस्था हा होय व ही दुसऱ्या गटाकडे एक वर्षाआड आलटून पालटून येते. तात्पर्य, एका गटाकडे एक वर्ष मंडप व तदंगभूत इतर कामें तर दुसऱ्या गटाकडे

**मुखवास चढविणें:—** चैत्र व. १ या दिवशीं श्रीदुर्गादेवीचा, तसेंच इतर पांच ग्रामदेवता— भैरव, नागेश्वर पेठकरीण, दारवटकरीण व जोगेश्वरी— यांचे चांदीचे मुखवटे चढविणें यास मुखवास चढविणें असें म्हणतात. वरील सर्व मुखवटे, आजचे वतनदार सोनार भार्गव रामचंद्र आंजर्लेकर, हल्लीं वस्ती हर्णै, हे श्रीदुर्गादेवीचे देवालयांत बसून उजळून देतात. त्याबद्दल त्यांस ८८३।।। दायतें मिळतें. श्रीदुर्गादेवीचा मुखवास पुजारी यानें चढविल्यावर गुरव चौघडा व वाजंत्रीं वाजवितात. नंतर भैरवादि इतर ग्रामदेवतांचे मुखवटे त्या त्या देवतेवर चढविण्याकरितां महाजन, गुरवांचे स्वाधीन करितात व गुरव त्या त्या देवतेवर ते चढवितात. सावणेकरणीचा मुखवास मात्र या दिवशीं न चढवितां तो मार्गशीर्ष व. १ ला चढविण्याची वहिवाट आहे. श्रीभैरवाचा मुखवास चढल्यावर तेथें जाग्रणी होते. नंतर रीतीप्रमाणें ढोल व झिंगटी घेऊन गुरव श्रीदुर्गादेवीचे देवालयांत येतात. श्रीभैरवाचे जाग्रणीकरितां दोन शेर तेल गुरव यास इस्मायल तेली बदरुद्दीन यांचे घराण्याकडून पूर्वी मिळत असे व त्याबद्दल त्यांस गुरवाकडून पांच नारळ व पांच सुपाऱ्या मिळत असत. श्रीभैरवाचा मुखवास राखण्याचें काम त्या ठिकाणीं राहणारे सर्व वतनदारांनीं मिळून करावयाचें असतें. श्रीदुर्गादेवीचा मुखवास राखण्याकरितां पूर्वी दोन वेठे असत. परंतु अलीकडे कित्येक वर्षे सदर काम पुजारीच करितो व त्याबद्दल त्याला सहा आणे मिळतात. श्रीदुर्गादेवीचा मुखवास चढवून होतांच गुरवांनीं चौघडा वाजविल्याबद्दल प्रत्येक इसमास एक मापटें ( निठवें ) याप्रमाणें ५ इसमांस शिधा ताबडतोब देण्यांत येतो.

चैत्र व. १ च्या दिवशीं रात्रीं ढोल भैरवाचे देवळांतून निघून शु. १ चे दिवशींप्रमाणें पाखाडींतून लोकलबोर्ड मराठी शाळेवरून बाजारचे तिठ्यावरून उभागरांत येतो. उभागरांत आल्यावर महाजन यांचे कवाडीशीं थांबतो. तेथून महाजन यांस बरोबर घेऊन वाजत गाजत वर्तक यांचे कवाडीशीं जातो. तेथून वर्तक यांस बरोबर घेऊन वाजत गाजत श्रीदुर्गादेवी मंदिराशीं जातो. तेथें महाजन व वर्तक यांस सोडून झिंगटीसह सतीचे तळ्यापर्यंत जातो व तेथून परत फिरतो. परत येतांना, देशमुखवाडीचे कवाडीशीं ढोलाची काठी बंद करून " देशमूख जाग्रणीला चला " अशी देशमुखांना हांक मारून परत श्रीदुर्गादेवी मंदिरांत येतो.

**हरकिण्या हरदासः—** चैत्र व. २ ला दुपारीं मंडपांत कीर्तन असतें. यावेळीं जो हरदास असतो त्याचे गळ्यांत हरकिणाची माळ घालण्याची वहिवाट आहे. (मागें हरकीण पान १११ पहा) यावेळीं एकंदरींत कीर्तनांतील वातावरण नेहमींप्रमाणें गंभीर नसतें. श्रोतृवृंद म्हणजे पोरेंबाळेंच असतात. तसेंच कथाश्रवणास बसलेली मंडळी डोक्यास कांहीं न घालतां तशीच बसतात. या कथेचा आणखी एक विशेष म्हणजे ही कथा संपल्यावर होणारे आरतींत नीरांजन नसतें. नुस्तीच आरती होऊन कथा समाप्त होते. कथा समाप्त झाल्यावर जोशी मंडपांत पंचांग वाचतो. पंचांगश्रवण जाहल्यावर उपाध्याय वेदोक्त मंत्रानें सर्वांस भोजनाचें आमंत्रण करतो; तो मंत्र म्हणजे ऋक्संहिता अष्टक ३, अध्याय २, वर्ग ३, मंत्र ४ हा होय. तो असाः—

म हि ज्यो ति र्नि हि तं व क्ष णा स्वा मा प क्वं च र ति बि भ्र ती गौः ।

वि श्वं स्वा द्म सं भृ त मु स्रि या यां य त्सी मिं द्रो ऽ अ द धा द्भो ज ना य ॥

**रथपुतळी आणणें:—** रथपुतळी, म्हणजे रथांत बसवून सर्व गांवभर, सभारंभानें मिरवावयाची मूर्ति. ही पूर्वापार वहिवाटीप्रमाणें नित्यपूजेकरितां वेदशाळेचे नित्सुरे–ज्यांस भट असेंहि म्हणतात– यांजकडे असते. चैत्र व. २ या दिवशीं वर वर्णन केलेलें हरकिण्या हरदासाचें कीर्तन सुरू झाल्यावर, प्रयोजनापूर्वीं पुजारी व इतर ग्रामस्थ मंडळी बालगोपालांसह वरील वेदशाळेचे नित्सुरे यांजकडे ढोल, झिंगटी, अब्दागीर व वाजंत्री यांसह रथपुतळी आणण्यासाठीं जातात. तेथें श्रीची आरती केल्यावर पुजारी मूर्ति उचलून घेतो व सर्व मंडळीसह वाजत गाजत जेवणवाडींत आणून पूर्वाभिमुख ठरलेल्या ठिकाणीं ठेवतो. रथपुतळी आणतांना वाटेंत प्रत्येक घरीं रथपुतळीस पूजा देण्यांत येते. रथपुतळी जेवणवाडींत आणून ठेविल्यापासून सायंकाळीं देवळांत नेऊन ठेवीपर्यंत तिची रखवाली जेवणवाडी ठिकाणाचे पाळीदार करितात.

**प्रयोजनाची व्यवस्थाः—** यात्रेपैकीं दुसरा महत्त्वाचा भाग प्रयोजनाची व्यवस्था हा होय व ही दुसऱ्या गटाकडे एक वर्षाआड आलटून पालटून येते. तात्पर्य, एका गटाकडे एक वर्ष मंडप व तदंगभूत इतर कामें तर दुसऱ्या गटाकडे

प्रयोजनाची व्यवस्था; पुढच्या वर्षी याच्या उलट, असा क्रम चालतो. प्रयोजनाची व्यवस्था असलेले गटाकडे भाजीपाला मोडणें, स्वयंपाक व वाढप याची व्यवस्था हीं कामें मुख्यतः येतात. या सर्व कामांना प्रथम चालना देणें, व तीं व्यवस्थित चालली आहेत कीं नाहीं यावर नजर ठेवणें ही जबाबदारी महाजन व वर्तक कारभारी यांची होय. म्हणून चैत्र शु. १३ च्या दिवशीं रात्रीस ढोल आल्यावर पौर्णिमेचे दिवशीं सकाळीं चारी वाड्यांवरील आगरी लोकांस लवकर भाजी मोडण्यास या अशी ताकीद देण्यास गुरवांस कारभाऱ्यांकडून सांगण्यांत येतें.

**यात्रेंतील भाजीपाल्यासंबंधी नियमः—** मिती आषाढ व. ३० शक १८६६ रोजीं श्रीदुर्गादेवीचे देवालयांत कारभारी यांनीं 'गांवकी' बोलाविली होती. "आवारीचे" वेळीं नेमलेल्या कमेटीनें भाजीपाल्याचे वसुलाबद्दलचे दुरुस्त नियम गांवकीपुढें पसंतीकरितां मांडले; त्याप्रमाणें सर्व नियम एकमतानें मंजूर झाले ते खालीं दिल्याप्रमाणें:—

१ आंजर्ले गांवांतील प्रत्येक बागायतदार कुटुंबाकडून एक भाजी मोडावी.

(अ) एकाच कुटुंबाचे मालकीचीं एकापेक्षां जास्त बागायत ठिकाणें असलीं व तीं घरींच करण्यांत येत असतील तर भाजी फक्त एकच मोडावी.

(ब) एकाच कुटुंबाचे मालकीचीं एकापेक्षां जास्त ठिकाणें असून तीं मक्त्यानें दिलीं असतील तर प्रत्येक मक्तेदाराकडून निराळी भाजी मोडावी.

(क) विभक्त कुटुंब—व्याख्याः— रजिष्टर्ड अथवा अन्‌रजिष्टर्ड फारखतीनें अगर अन्य कोणत्याहि, लेखानें अथवा हुकुमनाम्यानें विभक्त होऊन निराळें जेवण करणारें जें कुटुंब असेल तें विभक्त कुटुंब समजावें.

२ भाजी कोणती घ्यावीः— प्रथम केळ (रसबेळ, तांबेळ, मंगेळशिवाय कोणतीहि). केळ नसेल तर फणस, फणस नसेल तर ४ नारळ घ्यावे. यांपैकीं कांहींच नसेल तर अथवा देण्यास योग्य नसेल तर मालकाकडून अथवा त्याचे मक्तेदाराकडून भाजीऐवजीं सहा आणे घ्यावे.

(अ) केळ, फणस अथवा नारळ घेण्यासारखे आहेत कीं नाहींत याबद्दलचा महाजन व वर्तक कारभारी यांचा निकाल अखेरचा समजावा.

(ब) नारळ मालकानें आणून दिल्यास चार घ्यावे. पाडून घ्यावयाचे असल्यास पाडणावळ म्हणून एक जास्त घ्यावा.

३ वरील नियम एक यास अनुसरून दर घरीं १५ केळीचीं पानें घ्यावीं. पानें नसतील तर किंमतीबद्दल दोन आणे घ्यावे.

४ चैत्र शु. १३ रोजीं सायंकाळीं गांवांतील सर्व आगरी यांस भाजी मोडणेंसाठीं १५ व्या दिवशीं येण्याबद्दल कारभारी यांणीं गुरवाकडून ताकीद देववावी.

५ ज्यांची जेवण तयार करण्याची पाळी असेल त्या आळींतील मंडळींनीं आपल्या बाजूनें म्हणून दिलेले इसम, कारभारी महाजन वर्तक व आगरी यांणीं भाज्या मोडण्याचें काम चालू करावयाचें असतें.

६ आगरी यांणीं वरीलप्रमाणें भाजी मोडून कारभारी सांगतील तेथें नेऊन ठेवावी व त्याबद्दल श्रीदुर्गादेवी संस्थानाकडून आगरी यांचे मेहनतीबद्दल मेहनताना म्हणून जमलेल्या भाजीच्या राशींतून वाटेल ती एक केळवंड, एक फणस, एक पानांची पुडी व नारळ पाडण्याबद्दल मिळालेले सर्व नारळ त्यांस द्यावे.

७ कारभारी मंडळीपैकीं ज्यांचे घरीं हरिदास मुक्कामास असतील त्यांचेकडची भाजी मोडूं नये. तसेंच गांवांतील कोणत्याहि देवस्थानचें बागाइत, जेवणवाडी, रथपुतळी ज्यांचेकडे असते त्यांचें ठिकाण यांतून भाजी मोडूं नये.

येणेंप्रमाणें नियम पसंत होऊन गांवकी पुरी झाली.

**प्रयोजनाची तयारी व जेवणवाडींतील व्यवस्था:—** चैत्र व. २ रोजीं दोनप्रहरीं श्रीचें प्रयोजन असतें. त्याचें बोलावणें आंजर्लें व मुर्डी येथील सर्व ब्राह्मण ग्रामस्थांस " सकुटुंब सपरिवार आगंतुक पै पाहुणासुद्धां " सर्वांस असतें. हें आमंत्रण ग्रामोपाध्याय " नित्सुरे " हे करितात. जेवण करण्याची जागा श्री-देवीच्या देवळासमोरील ठिकाण ही पूर्वापार ठरलेली आहे. सदर ठिकाणास " जेवणवाडी " हेंच नांव आहे. हल्लीं त्या ठिकाणाचे दक्षिणेकडील दोन हिस्से वे. शा. सं. विनायक गणेश ओक यांजकडे आहेत व उत्तरेकडील एक हिस्सा रा. नारायण बाळकृष्ण नित्सुरे पेन्शनर यांजकडे आहे. जेवण करण्याची जागा रा. ओक यांचे घराचे मागील आंगण ही ठरलेली आहे. तेथील जमीन करणें,

मंडप घालणें, कूड घालणें हीं कामें करण्याची कामगिरी वरील दोन इसमांवर यथाप्रमाण येते. म्हणजे २ वर्षे ओक यांची पाळी व तिसरे वर्षीं नित्सुरे यांची व पुन्हां दोन वर्षें ओक व एक वर्ष नित्सुरे असा क्रम चालतो. वरील मांडवाचे व्यवस्थेखेरीज पाळीवाल्यानें ०८३॥। मीठ एक रुमाल, १ रोवळी, तांदूळ ठेवण्याकरितां बाज व धोतर, तसेंच भात उपसल्यावर ठेवण्याकरितां जरूर त्या केळीच्या डांगा इतकें सामान पुरवावयाचें असतें (देवीच्या ठिकाणांतूनहि रसईकरितां पंधरा डांगा येतात ). वरील साहित्य पुरविण्याबद्दल पाळीवाल्या इसमास ०८३।॥ पायली तांदुळांचें दायतें आहे. वरील सामानापैकीं धोतर, रुमाल, रोळी, बाज काम झाल्यावर ज्याचें त्याजकडे परत करावयाचें. या ठिकाणांत पाण्याकरितां दोन व साराकरितां एक अशा एकूण ३ द्रोणी गांवसईच्या प्रयोजनाचे कामाकरितां म्हणून ठेविलेल्या आहेत. पाणी भरण्याकरितां या ठिकाणांतील विहिरीवर रहाट पाळीवाल्या इसमानें करून दिला पाहिजे अशी आजपर्यंतची वहिवाट होती. परंतु अलीकडे रा. नारायण बाळकृष्ण नित्सुरे व ओक यांचेमध्यें आपसांत झालेले कराराप्रमाणें कोणाचीहि पाळी असली तरी रहाटाची व्यवस्था ओकांनींच करावयाची असें ठरलें आहे. रहाटाचे माळेकरितां २५ लोटे व सार वाढण्याकरितां १० मडक्ीं वतनदार कुंभाराकडून येतात. चैत्र व. १ रोजीं रात्रीस ताडाचे कोंडावरील वेठे इसम ७ जेवणवाडींत सामानाच्या राखणेकरितां येतात व ते व. २ रोजीं सायंकाळीं प्रयोजनाचें सर्व काम आटपेपर्यंत तेथेंच असतात. या कामगिरीबद्दल त्यांस व. २ रोजीं सकाळीं न्याहारीकरितां प्रत्येकीं एक मापटें तांदूळ देण्यांत येतात व तमाखूकरितां सर्वांस मिळून एक पैसा देण्यांत येतो. या वेठे मंडळीकडे खालील कामें असतातः— ( १ ) भांडींकुंडीं व इतर सामान आणणें; घांसणें, परत नेऊन पोहोंचविणें. ( २ ) घाणेवाले तेल्यांकडून तेल वसूल करून आणणें. ( ३ ) चैत्र व. १ रात्रौ व दुसऱ्या दिवशीं प्रयोजनाचें सर्व काम आटपेपर्यंत सामानावर देखरेख ठेवणें. ( ४ ) पाणी लाटणें. ( ५ ) जेवणवाडींत कारभारी वसुलास बसल्यावर ते सांगतील त्या इसमास बोलवून आणणें. इ.

**रथपुतळी व रसईची पूजा व ग्रामदेवतांस नैवेद्यसमर्पणः—** जेवणवाडींत उपाध्याय रथपुतळीची व रसईची पूजा करितात. नंतर सर्व ग्रामदेवतांस निरनिराळीं पानें मांडून उपाध्यायच नैवेद्य दाखवितो. ग्रामदेवतांची यादी

श्रीचे दप्तरांत ठेविलेली आहे व तींत जरूरीप्रमाणें भर घालण्यांत येते. यादीप्रमाणें ग्रामदेवतांस नैवेद्यसमर्पण झाल्यावर श्रीच्या मंदिरांतील व मंडपांतील पानें वाढण्यांत येतात. सर्व वाढप झाल्यावर अन्नशुद्धीचें म्हणजेच तूप वाढण्याचें काम वर्तक कारभारी करितात. अन्नशुद्धि झाल्यावर महाजन कारभारी पानें प्रोक्षण करितात व उदक सोडतात. मंत्र सांगण्याचें काम ग्रामोपाध्याय करितात.

**अब्राह्मण मंडळीस प्रसादः—** अब्राह्मण जातीचे वतनदार (खुम)- गुरव, सुतार, कुंभार, न्हावी, शिंपी, सोनार व वेळ्ये यांस जेवणवाडींत जेवण वाढतात. खामकर, परीट, चांभार व ताशेकरी यांस जेवणाचीं पानें वाढून देतात. बाहेर वाडीचे लोकांस प्रत्येकीं ४ पायलींचें एक याप्रमाणें, एकंदर तीन तपेलीं देण्याची वहिवाट आहे. त्यांचा तपशील असाः— ( १ ) ताडाचा कोंड १ ( २ ) चिखलतळें व कातळकोंड मिळून १. ( ३ ) नवानगर व पाखाडी आळींतील सर्व तेली मिळून एक. एकूण तपेलीं तीन. तसेंच शिजलेली भाजी, वरण, केळीचीं पानेंहि देण्यांत येतात. वरील निरनिराळे लोक वरील अन्न मानाचें, हक्काचें व श्रीदुर्गादेवीचा प्रसाद म्हणून भक्तिभावानें वांटून घेतात.

**भैरवाचे आंकडेः—** चैत्र व. २ चे दिवशीं सकाळीं खामकर वतनदार हा भैरवाचे लोखंडी "आंकडे" एका परडींत घालून घरोघर फिरवितो. त्यास घरोघर पैसा, सुपारी व थोडे तांदूळ देण्याची वहिवाट आहे. हें नुस्तें आतां पूर्वीं "आंकडे टोंचणी" म्हणून एक देवावरच्या भक्तीचा अथवा निष्ठेचा प्रकार असे, (ज्याचें वर्णन पुढें दिलें आहे) त्याचें प्रतीक आहे.

श्रीचें प्रयोजन आटोपल्यावर सायंकाळीं, कारभारी महाजन वर्तक इतर ग्रामस्थ मंडळींसह देवीचे देवालयापासून निघून ढोल, झिंगटी, वाजंत्रीं व ताशा अशा वाद्यांसह श्रीभैरवाचे दर्शनास जातात. श्रीभैरवाचें दर्शन घेतल्यावर गुरव यानें महाजन वर्तक कारभारी यांस एक एक नारळ देऊन राम राम करावयाचा. तो नारळ कारभारी घरीं नेतात. देवळांतून बाहेर आल्यावर एक नारळ गुरवानें "थळ-बारदान" यावर फोडावयाचा. (थळ-बारदान म्हणजे भैरवाचे अंगणासमोर पाराला लागून एक दगड आहे त्यावर सर्व देणीं देतात तो दगड) या नंतरचा कार्यक्रम म्हणजे "आंकड्यांचा" होय. श्रीभैरवाचे देवळानजीकच,

आंकड्यांचा खांब उंच चौथऱ्यावर आहे. तेथें अंगणांत बैठक गुरवानें घालावयाची व त्यावर कारभारी व ग्रामस्थ यांनीं थोडा वेळ बसावयाचें इतकाच विधी तूर्त आंकड्यांचे बाबतींत स्मारक म्हणून राहिला आहे. सुमारें १०० वर्षांपूर्वी बहुधा अब्राह्मण लोक " श्रीभैरवास, " माझी इच्छा पुरी झाली म्हणजे, उदाहरणार्थ, " मला मुलगा होऊं दे म्हणजे मीं आंकडे टोंचून घेऊन लाटेच्या पांच फेऱ्या घालीन " असा नवस करीत, व देव नवसास पावल्यावर हे लोक आंकडे टोंचून घेत. तो प्रकार असाः— गळ टोंचतांना सुतारानें पाठीवर थाप मारावयाची व कातडी पकडावयाची. कुंभारानें गळ ( आंकडे ) टोंचावयाचे; **चांभाराचें** काम नवस फेडणारास लाटेला नेऊन बांधावयाचें असे ( **येथें अस्पृश्यता आड येत नसे** ही लक्षांत घेण्यासारखी गोष्ट आहे ), नंतर सरनौबत न्हावी यानें लाट फिरविण्यास सुरुवात करावयाची. नंतर सर्व वतनदार व इतर ग्रामस्थ, श्रीभैरवाची हात जोडून नवस फेडणाऱ्या माणसाला व सर्व रयतेला सुखी राख अशी प्रार्थना करीत. आतां प्रत्यक्ष आंकडे टोंचण्याचा प्रकार बंदच आहे. वर वर्णन केल्याप्रमाणें त्याचें प्रतीक म्हणून कांहीं गोष्टीच आतां कायत्या चालू आहेत. वरील वर्णन खालील पोवाड्यांत पद्यरूपानें केलेलें आहे.

## जुना आंकडे टोंचणीचा पोवाडा

आंजर्ल्यांमधी सवरी घोष धिम धिम वाजे चौघडा ॥
बहिरीदेव गणपती करितो आल्या विघ्नांचा निवाडा ॥ १ ॥

सुतारानें दिली थापटी, कुंभारानें गळ टोंचिला पाठीला ॥
**चांभारानें नेऊन बांधिला लाटेला** ॥ २ ॥

सरनौबत न्हावी वतनदार आरंभ कृत्यासि केला ॥
भोरू खामकर वतनदार गेले लाट तोलायला ॥ ३ ॥

भगवंताची कला जी कौतुक लाट लागली पोंहायला ॥
मग चक्कर फिरतें गरगरां ॥ ४ ॥

सर्व वतनदार मिळुनि हात जोडिले बहिरीला ॥
देवा आतां सांभाळ आमुच्या रयतेला ॥ ५ ॥

आई जगदंबा कृपावंती बसली उभ्या आगराला ।।
सांजसकाळ नित्य येती ब्राह्मण तीच्या दरशनाला ।। ६ ।।

गोविंद घडशा करितो फडशा चवलाच्या तमाखूचा ।।
बाबू निवाजी बारिक सरडा हातभर बटवा ढुंगणाला ।। ७ ।।
मी बाळ अज्ञान माझे रामराम सभेला ।।

**दाम व विडेवांटणी:—** वर लिहिल्याप्रमाणें आंकड्यांच्या खांबाजवळ थोडा वेळ बैठक झाल्यावर कारभारी व ग्रामस्थ, ढोलाच्या दोरीकरितां म्हणून जी जागा तुकाराम भिकू कुंभार पाटील याचेकडे आहे, तेथें मानकरी मंडळीस, विडे वांटण्याकरितां जातात. तेथें बैठक घालण्याचें काम सुताराचें आहे. बैठकीवर बसून "खुंन" यांस दाम व विडे महाजन कारभारी यांचे हस्तें देण्यांत येतात. त्या विड्यांचा अनुक्रम व दामवांटणीचे पैसे खालीं लिहिल्याप्रमाणें:—

| नांव | दाम | विडा | नांव | दाम | विडा |
|---|---|---|---|---|---|
| १ खामकर | ०— | १ | ६ धोबी | ० | १ |
| २ सोनार | ० | १ | ७ खेळी | ० | १ |
| ३ कुंभार | ०॥· | १ | ८ चांभार | ०॥· | १ |
| ४ सुतार | ०॥· | १ | ९ गुरव (ढोलवाला) | ०— | १ |
| ५ न्हावी | ०॥· | १ | | | |

विडा म्हणजे ५—६ विड्याचीं पानें व सुमारें मूठभर फोडलेली सुपारी. पानें व सुपारी मांडवाची पाळी असलेले मंडळीकडून येतात; प्रत्येक मानकरी, विडा घेण्यापूर्वीं उठून महाजन व वर्तक कारभारी यांस रामराम करितो व विडा घेतल्यावर पुन्हां रामराम करून आपल्या जागेवर जाऊन बसतो.

गुरव ढोलवाला यास विडा व दाम त्याचे दारासमोर पिंपळाचा पार आहे त्या ठिकाणीं देण्याची वहिवाट आहे. विडे व दामवांटणीच्या पूर्वीं मंडळी बैठकीवर येऊन बसल्यावर खामकर हा हातांत एक काठी घेऊन "हो, होस बाय" असे शब्द उच्चारून महाजन यांचे अंगावर जणूं काय मारण्यासाठीं धांवत जाण्याचा देखावा करितो. त्यावेळीं सुतार, कुंभार इ. मानकरी त्यास आवरून

भरितात. या कृतीची नीटशी उपपत्ती लागत नाहीं. वरील प्रकार झाल्यावर खामकर, महाजन यांस रामराम करितो व विडा घेऊन व पुन्हां रामराम करून आपले जाग्यावर जाऊन बसतो. नंतर इतर मानकऱ्यांस यथाक्रम विडे वांटण्यांत येतात. विडेवांटणी झाल्यावर न्हावी यानें धरलेले मशालीचे उजेडांत सर्व ग्रामस्थ मंडळी परत देवीस यावयास निघतात. वाटेंत गुरव यास दाम व विडा दिल्यावर सर्व मंडळी वाजत गाजत लोकलबोर्ड मराठी शाळेपर्यंत येतात. तेथें आल्यावर गुरव, कारभारी यांस रामराम करून ढोल व झिंगटी घेऊन परत जातात व वाजंत्री व ताशे या वाद्यांसह सर्व मंडळी देवीचे देवालयांत येतात व श्रीदेवीचें दर्शन घेऊन घरोघर जातात.

**यात्रेच्या मुख्य दिवशीं प्रसाद वांटणें:—** चैत्र व. २ हा यात्रेचा मुख्य दिवस होय. या दिवशीं सकाळदासून रात्रौ उत्सवाचा कार्यक्रम सुरू होईपर्यंत जे जे लोक श्रीचे दर्शनास येतील त्या सर्वांस पुजाऱ्याकडून प्रसाद देण्यांत येतो. ही व्यवस्था अगदीं अलीकडील काळांत करण्यांत आली आहे.

**प्रयोजनानंतरचा कार्यक्रम :—** जेवणवाडींतील प्रयोजनाचें काम संपल्यावर सायंकाळीं पुजारी रथपुतळी श्रीदुर्गादेवीचे देवालयांत आणितो व मुख्य मूर्तीच्या सन्निध पूर्वाभिमुख ठेवितो. या दिवशीं मुख्य यात्रेचा दिवस यामुळें परगांवचे व गांवचे लोकांचीहि रस्त्यांतून बरीच ये-जा चालू असते. त्यांचे सोयीकरितां रस्त्यावर घरोघर दिवल्या ( पणत्या ) लावण्याची नवीन प्रथा अलीकडे सुरू झाली आहे.

**परगांवचे मंडळीची बसण्याची जागा:—** रात्रौ वसंतपूजा झाल्यावर महाजन यांचे सूचनेप्रमाणें कीर्तनास सुरुवात होते. हा यात्रेचा मुख्य दिवस असल्यामुळें परगांवची मंडळी यात्रेस यावयाची असते. त्यांची गर्दीमुळें गैरसोय होऊं नये म्हणून निरनिराळ्या मुख्य गांवचे मंडळीच्या मंडपांत बसावयाच्या जागा ठरवून टाकलेल्या आहेत त्या अशा:—

( १ ) केळशीकर मंडळी हरदासाच्यापुढें; ( २ ) मुरूडकर केळशीकरांच्या पाठीमागें मांडवाच्या दक्षिणेकडे; ( ३ ) व वेळासकर मांडवाच्या नैऋत्य कोनाला.

**दरस्थांचें स्वागत व मानपान:**— निरनिराळ्या गांवची मंडळी स्थानापन्न झाल्यावर कीर्तन थोडा वेळ बंद ठेवण्यांत येतें व पुजारी अंगावर उपरणें पांघरून व बगलेंत ठराविक आसनांचीं प्रतीकें घेऊन मंडपांत येऊन उभा राहतो व एकएका गांवाचें नांव पुकारून त्या त्या गांवाला द्यावयाचे आसनाचें प्रतीक बगलेंतून काढून व गांवाचें नांव पुकारून पुढें करून दाखवितो. याप्रमाणें आसनांची व्यवस्था झाल्यावर परगांवचे मंडळीला मानाचा विडा देण्याचा समारंभ होतो. या कामाकरितां पुजारी एका ताटांत बरीचशी फोडलेली सुपारी व विड्याचीं पानें घेऊन उभा रहातो व वेळास, मुरूड, केळशी, मांदिवली व तुळशी या क्रमानें गांवाचीं नांवें घेतो व महाजन, त्या त्या गांवच्या मानकऱ्यास अथवा हजर असलेली मंडळी ज्या कोणास द्यावयास सांगतील त्याला, मानाचा विडा देतात. नंतर जमलेले सर्व मंडळीस बुक्का लावण्यांत येतो व पानसुपारी, अत्तर, साखर, प्रसाद वांटण्यांत येतो.

**रथाचे मार्गावरील कीस ( बलिदान ):**— मंडपांत कीर्तन चालू असतांनाच, रथयात्रेची पूर्वतयारी म्हणून उपाध्याय सोंवळें नेसून रथपुतळीची पूजा करितो, त्याचवेळीं रथाचे वाटेवरील बलिदान अथवा "कीस" याचीहि तयारी होते. जेवणवाडींत दोन पायली तांदुळांचा भात शिजविलेला असतो तो एका टोपलींत घालून त्याजवर गुलाल घालतात व एक कांकडाहि ठेवितात व त्याची म्हणजे बलीची उपाध्याय पूजा करितात. नंतर ती टोपली एका लहानशा वांशाला बांधून दोन गडी (तळवटकर घराण्यांतील) तो खांद्यावर घेतात; तिसरा गडी टिमकी वाजवितो. अशा समारंभानें हा "कीस अथवा बलि" रथ ज्या ज्या रस्त्यानें जावयाचा असतो त्या त्या रस्त्यानें टोपलींतील थोडा थोडा भात टाकीत व तोंडानें "सालकाय घोलकाय चलाहो चला" असें म्हणत टिमकी वाजवीत नेतात.

**रथ-मिरवणूक:**— वर वर्णन केल्याप्रमाणें बलि रवाना झाल्यावर पुजारी आपल्या घरांतून महानैवेद्य आणून रथपुतळीस समर्पण करितो. याच वेळीं रथाला कापड लावण्याचें काम शिंपी करितो. कापड लावून झाल्यावर न्हावी रथाला आरसा बांधितो. इकडे पुजाऱ्यानें रथपुतळीस महानैवेद्य दाखविल्यावर देवळांत रथपुतळीची आरती करण्यांत येते. आरती झाल्यावर वर्तक

कारभारी रथपुतळी रथांत आणून ठेवितात. हा रथपुतळी रथांत आणून ठेवण्याचा मान, वर्तकांपैकीं पुरुषोत्तम गोविंद वर्तक या कुटांतील मंडळीकडेच फक्त आहे, सर्व वर्तक घराण्यांकडे नाहीं. इतकी तयारी झाल्यावर मंडपांत कीर्तन समाप्त होऊन आरती होते. आरती झाल्यावर प्रसाद वांटण्यांत येतो. नंतर गुलाल उधळतात व गुलाबपाणीहि शिंपडतात व सर्व मंडळी रथ उचलण्याकरितां रथांगणांत जमतात. तसेंच पुजारी व भालदार रथावर चढतात. रथपुतळीची पुन्हां एकवार आरती होते व ती संपते न संपते तोंच प्रत्येक भायीशीं लोक तयार असतातच, ते हरहर महादेव असा घोष करून रथ उचलतात. रथ पश्चिमाभिमुख ठेविलेला असतो, तो प्रथम पूर्वाभिमुख करून घ्यावा लागतो व नंतर तो उत्तराभिमुख जावयाचा असतो. यामुळें या ठिकाणीं बरीच खेंचाखेंची होते. रथाच्या भाया निरनिराळे गांवचे लोकांस नेमून दिलेल्या आहेत. तो क्रम पुढील आर्येत दिलेला आहे:—

रथ चालतांच डावी कदलीला, मुळवटास हो उजवी ॥
वेलातटास मागें, दिधली अजरालयास ती उजवी ॥ १ ॥

याचा अर्थ रथ ज्या दिशेकडे जात आहे त्या दिशेकडे तोंड करून उभें राहिलें असतां, पुढच्या बाजूची डाव्या आंगची भायी केळशीची व उजवी मुरुडची, मागच्या दोन भायांपैकीं वेळासची डावी व आंजर्ल्याची उजवी.

याप्रमाणें उपरिनिर्दिष्ट निरनिराळ्या ४ गांवची मंडळी रथ खांद्यावर घेऊन वर्तक यांचे ठिकाणापाशीं ताडाचे कोंडावर जाण्याचा रस्ता आहे तेथपर्यंत वाहून नेतात. "श्रीचा रथ खांद्यावर घेऊन वाहून नेतात" हा शब्दप्रयोग वाचून घाटावरील मंडळीला आश्चर्य वाटण्याचा संभव आहे. देश, काल, वर्तमान, भोंवतालची परिस्थिति यांचे योगानें शब्दांचे अर्थांत अथवा वस्तूंचे स्वरूपांत कसे फरक घडून येतात, याचें आमच्या गांवांतील खांद्यावर वाहून नेण्याचा श्रीचा रथ हें एक उत्कृष्ट उदाहरण आहे. आमचे गांवचे ज्या निरनिराळ्या भागांत श्रीची मिरवणूक जावयाची त्यांपैकीं बऱ्याच भागांत चांगलेसे रस्तेच नाहींत. कित्येक ठिकाणीं शेतांतील पाऊलवाटांवरून व बांधांवरून मिरवणूक जावयाची असते. गेल्या पांच-पंचवीस वर्षांत आमच्या गांवांतून बैलगाड्यांची वाहतूक सुरू झाली आहे. परंतु तत्पूर्वीं आमच्या गांवाला गाडीचा

स्पर्श नव्हता. यामुळें आमच्या देवीच्या रथाला गाडीसारखीं चाकें नाहींत. अगदीं थोडक्यांत बाहेरच्या मंडळीला आमचे येथील रथाची कल्पना द्यावयाची म्हटली तर असें सांगतां येईल कीं आमचा रथ म्हणजे लांकडी डोला अगर ताबूत होय. ताबूतांत अगर डोल्यांत मूर्तींची सोय नसते व मूर्तीहि नसतेच. परंतु आमचे रथांत (लांकडी ताबुतांत) श्रीदुर्गादेवीची धातूची लहानशी "रथपुतळी" या नांवानें ओळखली जाणारी मूर्ति असते व त्या मूर्तीकरितां देव्हाऱ्यासारखा भागहि असतो. हा रथ खांद्यावर घेतां यावा म्हणून त्याला खालच्या बाजूला मजबूत चांगले जाड गोल व घडीव वांसे बसविलेले आहेत. या वांशांना 'भाया' असें म्हणतात. या चार भायांपैकीं कोणती भायी कोणत्या गांवाची हें कायमचें ठरलेलें आहे व त्याचा निर्देश मागें दिलेले आर्येत आलेला आहे. सर्व गांवभर रथ फिरविण्याची कामगिरी ठराविक अब्राह्मण मंडळीची आहे. ते लोक ठराविक जागीं आपले जागेवर तयार असतात. त्यांच्यांतहि निरनिराळ्या भायांची वांटणी आहेच. ती अशी :—पुढील दोन भाया चिखलतळेकर, भाटवाडकर, बिरवाडकर, कातळकोंडकर (तेली व इतर) मिळून सांभाळतात. मागील दोन भायांपैकीं उजवी चाचवलकर यांची व डावी ताडाचाकोंडकर यांची ठरलेली आहे. याप्रमाणें भाईकर लोक रथ उचलून तो उत्तरेकडे सतीच्या तळ्यापुढें पुळणीवर फुटक्या धोंडीपर्यंत नेतात. तेथें रथ थोडा वेळ उभा करण्यांत येतो. रथाची फक्त एक डेलकी सावणेकरणीचा मान म्हणून थोडीशी पुढें नेतात. डेलकी परत आल्यावर रथ परत फिरतो. परत फिरल्यावर देशमूखवाडीपासून क्रमानें पूजा घेण्यास सुरुवात होते. ती जेवणवाडींतील पूजा होईपर्यंत क्रमानें चालते. जेवणवाडींतील पूजा झाल्यावर एकदम वर्तक कारभारी यांजकडील व नंतर महाजन कारभारी यांजकडील पूजा होतात. जेवणवाडींतील पूजा व महाजन व वर्तक यांच्याकडील पूजा अशा या तीन पूजा मानाच्या पूजा असल्यामुळें या पूजांच्या वेळीं इतर घरच्या पूजांप्रमाणें भायीवाल्यांस पैसा देण्याची वहिवाट नाहीं. महाजन कारभारी यांजकडील पूजा झाल्यावर रथ बाजारांतील पुलावरून कोंपरींत, कोंपरींतून लो. बो. शाळेवरून रामजीच्या देवळा-वरून सबंध पाखाडी आळींतून पूजा न घेतांच थेट खांबेट्यांचें घरापाशीं जाऊन खांबेटे व म्हसोबाचे गल्लीसमोरील दोन जोश्यांकडील पूजा घेतो. यावेळीं ढोल

व झिंगटी शिधये (हल्लीं वापट) यांचे ठिकाणाजवळ थांबतात. वाजंत्री व ताशेकरी मात्र तसेच पुढें रथाबरोबर जातात. खांबेटे यांचे घराशीं पूजा झाल्यावर रथ परत फिरतो व सखाराम वामन बापट यांजकडील पूजा घेतो व नंतर पाखाडींतील ब्राह्मण व अब्राह्मण अशा सर्व मंडळीकडील पूजा घेत घेत रथ रामजीच्या देवळाशीं येतो. येथें आल्यावर पूर्वीच्या काळीं दोन भाया पिंपळाचे पारावर व दोन भाया समोरील वडाचे पारावर ठेवीत असत. परंतु आतां वडाचा पार मोडला असल्यामुळें रथ श्रीरामाचे अंगणांत ठेवतात. या ठिकाणीं रथ ठेविल्यापासून तो परत उचलीपर्यंत त्याची रखवाली करण्याची जबाबदारी गुरवाची होय. पूर्वीच्या काळीं रथ बसला तरी ढोल व झिंगटी बंद करीत नसत; हल्लीं करितात. रथ बसल्यावर भाईकर व इतर मंडळी जेवणाकरितां घरोघर परत जातात ते सुमारें १२ वाजतां जेऊनखाऊन परत येतात. रामजीचे मंडपांत रथ बसण्याची ही नवीन प्रथा असल्यामुळें, रामनवमीचा उत्सव होऊन गेल्यावरहि रथयात्रेचे दिवसापर्यंत मंडप मुद्दाम ठेवावा लागतो. त्याबद्दल श्रीरामजीस १ रुपया देणगी द्यावी लागते. तिचा खर्च श्रीदुर्गादेवी देवस्थानांतून करण्यांत येतो.

यानंतर रथ मुर्डीस जाण्याकरितां उठतो तो निसण्याचे धोंडीनजीक जो रस्ता आहे त्या रस्त्यानें जाऊन नदींतून व बांधावरून भाटकर यांचे शेतांत उतरतो व पुढें जुन्या ठराविक मार्गानें मुरडींत शिरतो. मुरडीच्या हद्दींत रथ गेल्यावर मुरडीचे उपाध्ये विद्वांस नदीजवळ रथावर चढतात. मुरडींत शिरल्यावर रथ प्रथम पूजा न घेतां एकदम होळीपाशीं जातो. तेथून रथाची एक डेली ढोल झिंगटीसह “ सायंकरणीला ” नेतात. नंतर प्रथम सांबरे पाटील यांचेकडील पूजा सर्व चाचवलकरांची म्हणून देण्यांत येते. वरील पूजा झाल्यावर तेथून रथ मागें फिरून आठवले यांचे ठिकाणापाशीं पूजा घेत येतो. तेथें त्यांचेकडील पूजा झाल्यावर परांजपे व पेंडसे यांचीं घरें पश्चिमेकडे आहेत. तिकडे रथ नेण्याची वहिवाट नाहीं, याकरितां त्यांचेकडील पूजाहि आठवले यांचे घराशींच होतात. नंतर रथ पूजा घेत घेत “ **नवखंडाचे** ” शेतांतून **चांभाराच्या मानावर येऊन उभा राहतो. तेथें चांभार धुपारती ओंवाळितो.** या यात्रेंतील एकंदर योजना ३००-४०० वर्षांपूर्वीच्या आहेत; पण त्यावेळींहि आपल्या पूर्वजांनीं समोर उभें राहून समक्ष धुपारती ओंबाळण्याचा चांभारास मान दिला ही गोष्ट मोठीच

मुत्सद्दीपणाची व लोकसंग्रहाची करून ठेविली यांत बिलकूल शंका नाहीं. हा त्यांचा त्यांचे काळांतील अस्पृश्योद्धाराचा मोठाच प्रयत्न होय. चांभाराचे मानावरून निघाल्यावर रथ खामकराचे मानाचे जागेवर जातो. तेथें रथ साफ अगदीं जमिनीवर ठेवण्याची वहिवाट आहे. तेथें खामकरकडील पूजा झाल्यावर खामकर रथावर बसतो व मुर्डीचे उपाध्याय खालीं उतरतात. इतकें झाल्यावर हल्लींचे वहिवाटदार भाटकर यांचे शेतांतून पायऱ्या उतरून बहिरीच्या होळीस प्रदक्षिणा घालून शेतांतून रथ बहिरीचे देवळापाशीं येतो. तेथें पुढील दोन भाया बहिरीचे पडवींत व मागच्या भाया डेल्यांवर अशारीतीनें रथ उभा करण्यांत येतो. येथें खामकर रथावरून खालीं उतरतो व श्रीदेवीचा पुजारी वर चढतो. येथून रथ निघाल्यावर पायऱ्या उतरून शेतांतून जाखमातेजवळ होळीवर जातो. तेथें होळीस उजवी प्रदक्षिणा घालून सखाराम म्हाडिक यांचे कलमांजवळ कुंभारवाड्यांत जातो; तेथील पूजा घेऊन परिटाचे मानावर जातो. तेथील पूजा घेतल्यावर सुतारांच्या घरांवरून त्यांच्याकडील पूजा घेतल्यावर रथ मानकरी सोनार हल्लीं वस्ती हर्णै यांचेकडील पूजा घेऊन रथ न्हाव्याचे मानावर येतो. तेथें दोन भाया जोत्यावर ठेवून न्हाव्याकडील पूजा होते. नंतर हनुमान पंचायतनाचे देवळासमोर गुरवाचे मानाची पूजा होते व नंतर इतर न्हावी, गुरव यांच्याकडील पूजा घेत घेत रथ गोड्या विहिरीवरून निशण्याच्या धोंडीजवळ उभा राहतो. तेथें कातळकोंडावरील मंडळी पूजा देतात. तेथून निघाल्यावर मराठी शाळेवरून रथ कोंपरींतील, वाटेवरील घरांच्या पूजा घेत घेत जातो. तो गोपाळकृष्ण साठे यांजकडील पूजा झाल्यावर थोडा पुढें जाऊन कोंपऱ्यावर उभा राहतो व त्या ठिकाणीं जोशी, कानिटकर, शिंपी या मंडळीकडील पूजा होतात. नंतर रथ श्री-नारायणाचे पुलाजवळ उभा राहतो. या ठिकाणीं ताडाचे कोंडावरील मंडळीकडील पूजा होतात. तेथून पुन्हां रथ निघाला कीं वाटेंतील पूजा घेत घेत उभागरांतून देवीचे देवळासमोर येतो. तेथें वर्तक कारभारी रथपुतळी रथांतून काढून वाजत-गाजत मांडवांतील वर्तक यांचे तोरणांतून श्रीदेवीच्या देवळांत नेऊन ठेवितात. नंतर रथ जाग्यावर हरहर महादेव व श्रीजगदंबेचा नामघोष करून पश्चिमाभिमुख पूर्वीप्रमाणेंच ठेवितात. रथ खालीं बसल्यावर अर्धा मण शेंगा उडविण्यांत येतात.

**रथयात्रेंतील शेंगा उडविणें:**— रथयात्रेचे दिवशीं एकंदर तीन ठिकाणीं भुइमुगाच्या शेंगा बाळगोपाळांस मिळाव्या म्हणून उडविण्यांत येतात.

त्याचा कार्यक्रम असाः— ( १ ) श्रीदेव रामजीचे अंगणांत रथ बसल्यावर, रथ पुन्हां उठून मुरडीस जाण्यापूर्वी १० शेर शेंगा ( २ ) श्रीभैरवाचे अंगणांत रथ गेल्यावर १ मण शेंगा ( ३ ) रथ गांवांत फिरून परत जाग्यावर येऊन बसल्यावर अर्धा मण शेंगा उडविण्यांत येतात. यानंतर भाईवाले व इतर कामगार व मानकरी यांस लगेच दायतें देण्यांत येतें.

## यादी दायतें खर्चाची चैत्र व. ३, शके १८६६

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | रथाचे पुढील भाईवाले यांस | पायली | ७॥ | नक्त | ॥ |
| २ | रथाचे मागील भाईवाले ताडाचे कोंडकर यांस | ,, | ३॥। | ,, | ८= |
| ३ | रथाचे मागील भाईवाले चाचवलकर यांस | ,, | ३॥। | ,, | ८= |
| ४ | सोनार यास मुखवास उजळणेबद्दल | ,, | ३॥। | | ... |
| ५ | खामकर यास डेल्यांबद्दल | ,, | १॥। | | ... |
| ६ | गुरव असामी ५ यांस एकंदर ५ वेळांचे कामगिरीबद्दल [प्रातःकाळ व. २ पाऊण शेरप्रमाणें, व सायंकाळ वेळा तीनबद्दल १ निठवेंप्रमाणें.] | ,, | ३॥। | | ... |
| ७ | मांडवाचे आंतील तोरणाबद्दल | ,, | ८८॥। | | ... |
| ८ | जेवणवाडींतील मांडव इत्यादींबद्दल | ,, | ३॥। | | ... |
| ९ | परीट यास वातेरूं पुरविल्याबद्दल | ,, | ॥। | | ... |
| १० | शिंपी यास छत व रथाचे कापडदुरुस्तीबद्दल | ,, | १॥ | | ... |
| ११ | आवारीबद्दल पुजारी यास | ,, | १। | | ... |
| १२ | वेठे आसामी ३ न्याहारीबद्दल, जेवणवाडींत | ,, | । | | ... |
| १३ | शेटेपणाबद्दल मापारी यास | ,, | २ | | ... |
| १४ | ताशेकरी मुसलमान व इस्राइल तेली (हल्लीं बंद) | | | | |

**रथाचे भाईवाले, पुजारी व गुरव यांचा रथाचे ( रथपुतळीचे ) पूजेचा हिस्साः**— प्रत्येक घरचे पूजेचे वेळीं दोन दोन पैसे देण्याची वहिवाट आहे. पैकीं दर घरचा एक पैसाप्रमाणें भाईवाले यांस मिळतो. त्याचा क्रम असाः— ( १ ) ताडाचे कोंडकर यांस सावण्यांतील म्हणजेच सतीचे तळ्यापासून

तों पेंडसे यांचे घरासमोरील पऱ्ह्यापर्यंतचे घरचे पैसे मिळतात. ( २ ) चाचवलकर यांस मुर्डी येथील पूजेपैकीं घरोघरचा एक पैसा मिळतो. याप्रमाणें मागील दोन भाईवाले यांची व्यवस्था झाली. पुढील दोन भाईवाल्यांस नाकीचे आळींतील घरांचे पूजेंतून एक पैसा मिळतो. गुरव यांस भुसार भाळ्यांतील, व कोंपरींतील घरांचे पूजेपैकीं एक एक पैसा मिळतो व मुर्डी व आंजर्लें येथील दर घरचे पूजेचा एक पैसा पुजारी यास मिळतो.

**चैत्र व. २ द्वितीया दोन आल्यास यात्रा केव्हां करावी ?:—** शक १८५८ सालीं द्वितीया दोन आल्यानें हा प्रश्न उत्पन्न झाला होता. या वर्षी चैत्र व. १, ५९ घ. प. ४८ होती. यामुळें द्वितीया दोन आल्या. त्या अशा, पहिल्या द्वितीयेस द्वितीया ६० घटका, व दुसरे दिवशीं द्वितीया घ. ५, प. २३ व नंतर तृतीया व दुसरे दिवशीं तृतीया घ. १० प. ३१ अशी परिस्थिति आल्यामुळें यात्रा पहिल्या द्वितीयेस करावी कीं दुसऱ्या द्वितीयेस करावी असा वाद निघाला. त्याचा निर्णय पुढीलप्रमाणें होऊन यात्रा दुसरे द्वितीयेस झाली. आंजर्लें येथील यात्रेंत देवीचा मुखवास चैत्र व. १ ( प्रतिपदेस ) चढतो व रथ व. ३ ( तृतीयेस ) उठतो. यात्रेला रात्रीं द्वितीया असतेच असें नाहीं. पण मुखवास चढवावयास मात्र प्रतिपदाच पाहिजे; तसेंच रथ उठण्यास तृतीयाच पाहिजे असें मत पडलें. यामुळें मुखवास शक १८५८ धातृनाम संवत्सरे मंगळवार चैत्र व. १ या दिवशीं चढला, व रथयात्रा शुक्रवार चैत्र व. ३ या दिवशीं झाली. म्हणजे यात्रेचे मुख्य दिवस ३ चे ऐवजीं चार झाले. उत्सव केव्हांहि वाढता असावा !

**आवारी अथवा उत्सवसमाप्तिः—** चैत्र व. ३ रोजीं रात्रीस कीर्तन जाहल्यावर पहांटे शेवटचें कीर्तन करून आरती करण्याचा मान कांसें बुरबाड येथील भागवत उपनांवाचे हरिदासांचा होता. ते हजर नसले तरच सदर कामगिरी दुसऱ्या हरदासाकडे जात असे. परंतु ते हजर असले म्हणजे हा मान त्यांचा होता. सध्यां हा हक्क कोणासच दिलेला नाहीं. या वेळीं कीर्तनास बसलेल्या मंडळीस आरतींत टाकण्याकरितां चार आण्यांचे पैसे देण्यांत येतात. आरती झाल्यावर जोशी चतुर्थीचें पंचांग वाचितो. पंचांगाची पूजा झाल्यावर पुजारी

जोशी यांस गंध लावितो. नंतर जहाजमावर एक घोंगडी पसरून तीवर उपाध्याय, जोशी ( पंचांग वाचणारा नव्हे ), वेळासकर जोशी, धर्माधिकारी–विद्वांस व भट महाजन असे पंचमाने अनुक्रमानें श्री देवीकडे तोंड करून बसतात. त्यांस अनुक्रमानें गंध लावून प्रत्येकाचे पदरांत १।१ शेरप्रमाणें तांदूळ घालून त्यांतून प्रत्येकीं एक पसाप्रमाणें पुजारी स्वतःचा शिधा म्हणून काढून घेतो. नंतर मानस्कीचें गंध लावण्यांत येतें. तें लावल्यावर पुजारी ताम्हनांत कांहीं पैसे घेऊन मंडपांत बसलेल्या वरील मानकऱ्यांचे मागें उभा राहतो व धान्य पाखडतांना सूप हालवितात त्याप्रमाणें ताम्हन हालवून ताम्हनांतील पैसे वाजवितो. मग ग्रामस्थांपैकीं एकजण " हो रे हो " असें म्हणतो. त्यावर पुजारी " कायरे हो " असें म्हणतो. यावर आंजर्ल्याची देवी (श्रीदुर्गा) महोत्सव पावली. वेळासची लाहिरी* आली; " देवार्पण कृष्णार्पण " असें म्हणण्यांत येतें. नंतर वरीलप्रमाणेंच परंतु वेळासच्या ऐवजीं मुरूड, केळशी, मांदिवली, तुळशी या गांवांचीं नांवें घेऊन वरीलप्रमाणेंच म्हणतात व शेवटीं " चौऱ्यायशीं गांवची लाहरी आली " असें म्हणतात. नंतर उत्सवाचें काम पूर्ण झालें असें समजण्यात येतें.

**श्रीदुर्गादेवी साड्या व इतर जादा सामान लिलांवः—** शक १८६६ या वर्षीं आवारीचे वेळीं श्रीदुर्गादेवीच्या गरजेपेक्षां जास्त साड्या, इतर वस्त्रें व किरकोळ जिन्नस यांचा मंडपात लिलांव करण्यात आला. एकंदर उत्पन्न ६७॥ रुपये झालें. यात्रेचे इतिहासांत ही गोष्ट बहुधा प्रथमच झाली असावी. कांहीं लोकांच्या प्रामाणिक धार्मिक भावना व पुजाऱ्याचा स्वार्थ यांस यामुळें धक्का बसणार ही गोष्ट खरी असली तरी श्रीदुर्गादेवीचे उत्पन्नांत चांगलीच भर पडत जाणार ही स्पृहणीय गोष्ट होय.

---

* **टीपः—** लाहिरी अथवा लारी हें प्राचीन काळचें चांदीचें विशिष्ट आकाराचें नाणें असून त्याची किंमत सुमारें दोन ते चार आणे असे. निरनिराळ्या ठिकाणच्या 'लाऱ्या' निरनिराळ्या किंमतीच्या असत. आमच्या भागांत दाभोळी " लाहिरी अथवा लारी " प्रचलित असून तिची किंमत सुमारें चार आणे होती. हें नाणें हल्लीं उपलब्ध नाहीं तथापि तें पुणें येथील भारत-इतिहास–संशोधक मंडळांत जिज्ञासूंस पहावयास मिळेल.

**हरिदास गवई इत्यादींची बिदागी:—** चैत्र व. ४ रोजीं सकाळीं म्हणजेच आवारी संपल्यावर ग्रामस्थ व कारभारी मिळून हरिदास, गवई इ. मंडळीस त्यांचे योग्यतेप्रमाणें बिदागी देतात. कोणी हरिदास अगर गवई गैरहजर असल्यास त्याची बिदागी पोहोंचती करण्याची व्यवस्था कारभारी यांनीं करावयाची असते.

**श्रीसूक्ताभिषेक:—** चैत्र व. ४ रोजीं सकाळीं पंचमाने यांनीं देवळांतील श्रीदुर्गादेवीची मूर्ति व रथपुतळी यांवर श्रीसूक्ताचा अभिषेक करावयाचा असतो. तो झाल्यावर पुजारी प्रत्येकास पांच केळीं व पांच पैसे देतो. केळीं जेवणाची पाळी असणारे मंडळीकडून येतात. हा कार्यक्रम संपल्यावर रथपुतळी जेथून आणली तेथें म्हणजे वेदशाळेंत पोहोंचविण्यांत येते व यात्रा पूर्णपणें समाप्त होते.

## श्रीदुर्गादेवी : स्थावर मिळकत

| क्रमांक | जमिनीचें वर्णन | सर्व्हे क्रमांक | पोट क्रमांक | जमीन एकर | गुंठे | आकार रु. आ. पै | ताब्यांत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | बागाईत | २० | १४ | ... | ३६। | १३– ८ –० | कै. नारायण जोशी पुजारी |
| २ | वरकस | ६२ | ६ | ... | ३५ | ०– ३ –० | |
| ३ | ,, | ६३ | २ | ... | ६ | ०– ५ –० | |
| ४ | ,, | ६४ | ५ | ... | ३ | ०– ० –६ | |
| ५ | भातशेत | ६५ | १ | १ | २४। | ९–१२–६ | |
| ६ | बागाईत सराफवाडी पेठपाखाडींतील | १२३ | १० | ... | ५।\|\| | २– ४ –० | |
| | | एकूण | ... | ३ | ३०। | २६– १ –० | |

**यात्रेचे १८ दिवसांतील गांवसई:—** यात्रेचे १८ दिवसांत वसंतपूजा व कीर्तन आटोपल्यावर गांवसईचे प्रश्न काढितां येतात; परंतु मानस्कीचें गंध लावून झाल्यावर मात्र गांवसईचा कोणताहि प्रश्न काढितां येत नाहीं. व. २ चे दिवशीं जेवणवाडींत प्रयोजनापूर्वीं गांवसई असते. वादग्रस्त मुद्यांचा जो कांहीं निर्णय ठरेल तो महाजन कारभारी यांचे सांगण्याप्रमाणें, पुजारी यानें उभें राहून सर्वांस जाहीर करावयाचा असतो.

**सध्यांचा श्रीदुर्गादेवी रथः—** आजचा रथ कै. विनायक गोपाळ आठवले, रा. मुर्डी यांचे वडील गोपाळराव अथवा पिलोबा आठवले यांनीं सुमारें ७५ वर्षांपूर्वी केला. त्याचा खर्च त्यावेळीं सुमारें रु. १०० आला. हा रथ पूर्वींच्या रथापेक्षां जड झाला आहे. सध्यां ४ गांवच्या ( केळशी, आंजर्लें, मुरूड व वेळास ) रथांत हाच रथ मोठा व जड आहे. याबाबत प्रचलित म्हण— "केळशीचा रथ, आंजर्ल्यांचा महारथ, मुरूडची रथूकली, वेळासची भातुकली."

**यात्रेचे रचनेंतील वैशिष्टें:—**१ ढोलाची दोरीः— बिरवाडीस, विडे-वांटणीची जागा म्हणून जी लहानशी शेतजमीन सुतार-शाळेजवळ आहे तिचें उत्पन्न ढोलाच्या दोरीकरितां लावून दिलेलें आहे. सध्यां ही जमीन तुकाराम भिकू कुंभार पाटील यांजकडे आहे व ते ढोलाकरितां लागणारी दोरी पुरवितात.

२ रथाच्या डेलक्याः— रथयात्रेचे दिवशीं रथ सर्व गांवभर फिरतो व पूजेकरितां प्रत्येक घरासमोर उभा राहतो त्यावेळीं भायीवाले रथाची भायी खांद्यावर न ठेवितां " डेलकीवर " आधारून धरून ठेवितात. यामुळें त्यांस विश्रांति मिळते. ह्या डेलक्या पुरविण्याची कामगिरी खामकर याची आहे व त्या-बद्दल त्यास श्रीदुर्गादेवी संस्थानांतून १॥ पायली दायतें ( तांदूळ ) मिळतें.

३ रथमार्गाची पहाणीः— वरील डेलक्यांप्रमाणेंच रथमार्गाची पहाणी करण्याची कामगिरीहि खामकराकडेच आहे. रथयात्रेचे आदले दिवशीं म्हणजेच चैत्र व. २ या दिवशीं, खामकर हातांत आंकडी व कोयती घेऊन दुसऱ्या दिवशीं रथाची मिरवणूक ज्या मार्गानें जावयाची त्या मार्गानें सर्व गांवभर हिंडून रथास नडणाऱ्या झाडांच्या फांद्या तोडून रथाचा मार्ग निर्वेध करितो.

४ पणत्यांचें वातेरूः— मंडपांतील पणत्यांचे वातींकरितां लागणारें वातेरूं ( जुना कपडा ) धोब्यानें पुरवावयाचें असतें. त्याबद्दल त्याला दायतें मिळतेंच.

अशा तऱ्हेनें अगदीं बारीक सारीक गोष्टींकडे काळजीपूर्वक लक्ष देऊन त्यांची योजनाबद्ध कायमची व बिनबोभाट व्यवस्था लावण्यांत आमच्या पूर्वजांनीं दाखविलेलें घटनाचातुर्य अप्रतीम होय ! व हाच आमच्या दुर्गादेवीयात्रेचा विशेष आहे.

# प्रकरण १४ वें

## आमचं आंजलं–आजचें व ५०–६० वर्षांपूर्वीचें

### ( विहंगमावलोकन )

**१ आंजल्यांत, गाडी** माहीत नव्हती ती रात्रंदिवस चालू झाली येवढेंच नव्हे तर आतां क्वचित् रस्त्यावरून मोटारीहि धांवूं लागल्या.

**२ घरें:—** बरींच घरें झांप व पोफळीच्या झांवळ्यांनीं शाकारलेलीं असत, व कांहीं तर केंबळी म्हणजे गवत व पेंढा यांनीं शाकारलेलीं असत. गांवांत कौलारू घरें हाताचे बोटांवर मोजण्याइतकींच होतीं व कौलारू घर हें श्रीमंतीचें लक्षण मानिलें जात असे. कौलारू घरांवरील कौलें स्थानिक कुंभारानें केलेलीं असत. आतां केंबळी म्हणजे गवत पेंढ्यानें शाकारलेले गुरांचे गोठेहि उरले नाहींत, मग घरांची गोष्टच नको. सबंध गांवांत झांपांनीं शाकारलेलीं फार फार तर आतां १०।५ घरेंच उरलीं असतील. कौलारू घरें, देवळें व धर्मशाळा इत्यादींचे बाबतींतहि मोठीच क्रांती घडून आलेली आहे. ती म्हटली म्हणजे, गांवठी म्हणजेच गांवांतले कुंभारानें गांवांत तयार केलेलीं कौलें जाऊन त्यांची जागा आतां मंगलोरी कौलांनीं पटकावली असून गांवांतील कुंभारांस बेकार करण्याची व गांवांतील लक्ष्मी बाहेर जाण्याची उत्तम सोय झाली आहे. घरांतील अंधार मात्र नव्या घरांतून बराच कमी करण्यांत आलेला आहे.

**३ कपडेलत्ते:—** सर्व जातीच्या स्त्रिया व पुरुष यांचे कपड्यालत्त्याचे बाबतींत मोठीच क्रांती घडून आलेली आहे. स्त्रियांचीं जुन्या तऱ्हेचीं लुगडीं जाऊन त्यांची जागा आतां पातळांनीं घेतली आहे व बासनांतील अगर तगवणीचे म्हणजेच लग्न, मुंज इत्यादि समारंभांचे वेळीं नेसण्याचीं इरकली, टोपपदरी, महेश्वरी, धनवडी इ. पेठांचीं लुगडीं जाऊन त्या ठिकाणीं खोट्या जरीचीं पातळें आलीं आहेत. तशीच चोळ्यांची जागा पोलकीं, जंपर यांनीं घेतली आहे. कुळ-

वाडी बायांचे बाबतींत लुगडीं जाऊन पातळें आलीं असलीं तरी, तीं नेसण्याचे तऱ्हेंत फरक झालेला नाहीं. परंतु ब्राह्मण, भंडारी, गुरव इत्यादि मंडळीचे स्त्रियांचे बाबतींत पातळें नेसण्याचे तऱ्हेंतहि मोठीच क्रांती घडून आली आहे. उपवर मुली किंवा नुक्तेंच लग्न झालेल्या मुली व कांहीं अत्यंत अल्प प्रौढाहि पांचवारी पातळ विकच्छ वापरणाऱ्या झाल्या आहेत व थोड्या विशिष्ट तऱ्हेनें कांसोटा घालून, तो शेंपटीसारखा हातांत धरून चालणाऱ्या झाल्या आहेत. केश-रचनेचे बाबतींतहि अशाच तऱ्हेची क्रांती घडून आलेली आहे. वयस्कर स्त्रियांनीं आपले खोंपे कायम ठेविले आहेत, तर मध्यमवयीन स्त्रियांमध्यें आंबाडा व चक्कर यांचें महात्म्य वाढलें आहे. तरुण मुली सर्रास शेंपटेवाल्या झाल्या आहेत, तर लहान मुली दोन शेपटेवाल्या झाल्या आहेत. कुळवाडी व इतर स्त्रियांत, ब्राह्मणी 'खोंपा' कधींच नव्हता व अजूनहि नाहींच पण त्यांचे शाळेंत जाणारे मुलींत मात्र आंबाडा जाऊन शेंपटा आला आहे.

पुरुषांचे कपड्यांचे व वेशभूषेचे बाबतींत अशीच क्रांती झालेली आहे. पूर्वींच्या काळीं प्रौढ पुरुष धोतर नेसत, अंगावर दुहेरी जुनें धोतर पांघरीत व शिवलेला कपडा एकंदरींत कमी वापरीत व वापरलाच तर तो बाराबंदी बंडी, अगर कळीचा पिशवीचे खिशाचा व क्वचित् खांद्यावर बंद असलेला सदरा वापरीत व लग्न, मुंज, कथा, कीर्तन वगैरे प्रसंगीं कंगणीदार व बंदांचा अंगरखा वापरीत व त्यावर उपरणें घेत. पूर्वींच्या काळीं शिरोभूषण म्हणून ढालीसारखें मोठें पागोटें, टिळक, रानडे तऱ्हेचें पागोटें, गोखले तऱ्हेची पगडी व फेटा अथवा रुमाल इतके निरनिराळे प्रकार वयोमानाप्रमाणें वापरांत होते. अद्यापि थोड्या पगड्या व त्याहून जरा ज्यास्त फेटे समारंभांतून आढळतात. परंतु एकंदरींत सर्व वयाचे मंडळींत आतां इंग्रज गेला तरी त्यानें घातलेली टोपी कायम आहे. लहान मुलगे व तरुण यांनीं त्या टोपीला रजा दिली असली तरी इंग्रजांची केशरचना डोक्यावर ठेविली आहेच. ब्राह्मणांत मुंज झाल्याशिवाय लंगोटी नेसण्याची चाल नसल्यामुळें त्यांचीं मुलें सुमारें ५०-६० वर्षांपूर्वीं शाळेंत व इतर सर्वत्र नागवींच वावरत, अंगांत सदरा घालून अथवा उपरणें किंवा दुहेरी धोतर अंगावर घेऊन शाळेंत जात. शाळेंत जातांना टोप्या घालण्याची कोणास जरूरी भासली नाहीं. "विजिटर" (व्हिजिटर) येण्याचे दिवशीं काय तीं शाळेंतील मुलें टोप्या घालीत

परंतु या टोप्यांतहि आधुनिक तऱ्हेच्या कमीच असत. बऱ्याचशा पिशवीच्या कानटोप्याच असत. आधुनिक तऱ्हेचे टोप्यांत व त्यावेळचे टोप्यांतहि फरक पडला आहेच. पूर्वी कांहीं टोप्या टिकल्या, खोटीं मोतीं इत्यादींनीं सुशोभित केलेल्या असत, तर कांहींवर रेशमी वेलबुट्टी काढलेली असे, तर कांहीं लोंकरीच्या विणलेल्या असून त्यांना गोंडा लावलेला असे. स्त्रियांप्रमाणेंच पुरुषांचे केशरचनेंतहि मोठीच क्रांति घडून आलेली आहे. पूर्वीचे काळीं लांब शेंडी हें भूषण होतें, त्यानंतर लांब शेंडी व तिच्याभोंवतीं घेरा ही तऱ्हा आली, त्यानंतर शेंडी संकोच पावून घेऱ्यानें डोक्याचे बऱ्याच भागाचें आक्रमण केलें व आतां शेंडीला पूर्ण रजा मिळाली असून साहेबी केसांची वाढ झाली आहे. फार थोडे वृद्ध लोक अजून शेंडीवाले व गुळगुळीत हजामतवाले आहेत. त्यांचे खालचे वयाचे लोकांत बारीकशी शेंडी व बाकी डोक्यावर जंगल अशी मंडळी बरीच आहेत परंतु तरुण मंडळींत वस्तऱ्यानें गुळगुळित हजामत करून घेणारा असा आतां कोणीच उरला नाहीं. लहान मुलांचे कानांवरील झुलपें व टाळूवरील शेंडी आतां कोठेंच दिसत नाहीं. तरुण व तरुणी, कुमार व कुमारी यांची केशरचना एकमेकांचे बरीच जवळ आल्यानें त्या दोघांचेहि संग्रहांत कंगवा, फेस पॉवडर, निरनिराळ्या प्रकारचीं तेलें, छोटे बडे आरसे इत्यादि वस्तु वाढल्या आहेत. तसेंच कपड्याचे व अंगास लावण्याचे साबणाचाहि खप फारच वाढला आहे. मुलगे कितीहि लहान असले तरी नुसती लंगोटी नेसून अथवा नागवे हिंडत नाहींत. अगदीं लहानपणापासूनच आतां सर्व जातीचीं मुलें चड्डयाच वापरतात. प्रौढांतसुद्धां धोतरावर लेंग्याचें व चड्डीचें पद्धतशीरपणें आक्रमण चालू आहेच. ज्या अत्यंत अल्पसंख्य ब्राह्मण मुलांना सोंवळ्याची जरूरी भासते त्यांचेकरितां मुकटा, पीतांबर, कद यांचेऐवजीं कुठें कुठें सोंवळ्याच्या चड्डया दिसूं लागल्या आहेत. पादत्राणांचे बाबतींतहि, पूर्वीच्या काळच्या कुरकुर वाजणाऱ्या, पूर्ण स्वदेशी म्हणजेच गांवांतल्या चांभारानें तयार केलेल्या गांवांतल्याच कातड्याच्या मजबूत वहाणा जाऊन त्यांची जागा बाहेरून आयतें कमावून आणलेल्या कातड्याच्या निरनिराळ्या तऱ्हांच्या "चपलांनीं" घेतली आहे. अलीकडे सुधारणेच्या नांवाखालीं गांवांतील चांभारांनीं गांवांतील मेलेलीं ढोरें फोडण्याचें सोडून दिल्यामुळें, गांवांतील कांतडें-

रूपी संपत्ति कुजून जाते व आयतें कमावलेलें कातडें विकत आणण्यांत घरांतील लक्ष्मी बाहेर जाते असें हें दुहेरी नुकसान सुधारणेच्या नांवाखालीं चालू आहे. पूर्वींचे काळीं कुळवाडी गड्याचे बाबतींत मुख्य कपडे म्हणजे, नेसण्याचा रंगीत रुमाल ( चौकोनी ) त्यावर कमरेभोंवतीं बांधलेलें घट्ट धोतर व त्यावर आंकडी व कोयती व पांघरण्यास, अंथरण्यास व पावसापासून रक्षण करण्यास उपयोगी पडणारी घोंगडी, असे असत. आतां घोंगडीची जागा एखाद्या लहानसे टॉवेलानें घेतली आहे. तसेंच आंकडी कोयतीला आतां बऱ्याच जणांनीं रजा दिली आहे. एका काळीं म्हणजे, निशाणीचा अंगठा उठविण्याचा प्रघात पडला नव्हता तेव्हां गडी म्हटला म्हणजे त्याची निशाणी आंकडी असे. इतकें आंकडी कोयतीचें व गड्यांचें साहचर्य होतें. आतां तें साफ सुटलें आहे. चड्डीचा प्रादुर्भाव या ज्ञातीचे प्रौढांत अद्याप विशेष झाला नसला तरी तिचें पद्धतशीर आक्रमण, लंगोटी व कमरेचें धोतर यांवर हळूहळू चालू आहे.

४ **दागिने**:— सांपत्तिक दृष्ट्या निकृष्टावस्थेंत असलेल्या कुळवाडी लोकांचे स्त्रियांचे दागिन्यांचे बाबतींत म्हणण्यासारखा फरक झालेला नाहीं. त्यांचे प्रचलित दागिने खालीलप्रमाणें आहेत:— मनगटांत चांदीच्या बांगड्या, गोठ, कोपरांत चांदीच्या वेळा, दंडांत चांदीच्या वांकी व गळ्यांत निदान एक तरी सोन्याची पुतळी. ब्राह्मण मंडळीचे दागदागिन्यांचे बाबतींत फारच मोठी क्रांती घडून आलेली आहे. पूर्वींच्या काळीं मुलांचे अंगावर खालील दागिने साधारणपणें आढळत— पायांत, साधे साखळदंडाप्रमाणें अथवा शिंदेशाई चांदीचे तोडे; कमरेंत वयपरत्वें चांदीची सांखळी, घागऱ्या, तारेचा विणून तयार केलेला करगोटा; हातांत कडीं व तोडे, कानांत भिकबाळी व गळ्यांत सोन्याचा गोफ अथवा कंठी अगर चांदीची हांसोळी. आतां यांपैकीं कांहींहि कोणत्याहि मुलाचे अंगावर दिसत नाहीं. मुलींचे बाबतींत पूर्वींचे काळीं विवाहापूर्वीं फारसे दागिने नसत व आजहि नसतातच. तथापि हातांतील कांचेचे बांगड्यांची संख्या बरीच कमी झाली असून हातांत एक एक बारीकशी सोन्याची अगर सोन्यासारखी दिसणारी बांगडी घालण्याचा प्रघात वाढत आहे. कांहीं मुलींचे पायांत क्वचित् चांदीच्या तोरड्या दिसतात. नवीन लग्न झालेले मुलीचे अंगावर, पायांत सांखळ्या ( तोडे ), वाळे, हातांत कांकणें व पाटल्या, कमरेभोंवतीं कमरपट्टा, गळ्यांत सरी,

गळसरी, ठुशी, तायतळें, कोल्हापुरी साज, जोंधळी पोत, दंडांत वांकी, डोक्यांत केतक, राखडी, अग्रफूल, फिरकीचें फूल व वरातीचे वेळीं गोंडेबोरें असत. कानांत कुड्ई, कुडूक, मुगड्या, बाळ्या व कुडीं व नाकांत नथ अवश्य असे. गरिबींतील प्रौढ स्त्रियांचे हातांत खडकपाटें असत. तर जरा बऱ्या स्थितींतील स्त्रियांचे हातांत पाटल्या, केंसाचा खोंपा व त्यांत मूद व अग्रफूल अवश्य असे. नाकांत बारिकशी नथ कायमची घातलेली असे. बुच्या नाकानें म्हणजेच नथी-शिवाय हिंडणें पाप समजत असत. परंतु आतां वरील दागिन्यांपैकीं बहुतेक दागिने नुसते पहावयास मिळणेंहि जवळ जवळ अशक्य झालें आहे. हिंदुस्तान सोडण्यापूर्वी इंग्रजांनीं हिंदुस्तानांतलें सोनें धुऊन नेल्यामुळें आधुनिक स्त्रियांना दागिने सांभाळण्याची दगदग उरली नाहीं. प्रत्येक हातांत एक एक बारिकशी व सैल अशी सोन्याची अथवा सोन्यासारखी दिसणारी बांगडी, एवढा एकच दागिना मुख्यतः बहुतेक स्त्रियांचे अंगावर असतो व विशेषप्रसंगीं गळ्यांत चपलाहार, अथवा सांखळी अगर असेंच कांहींतरी, नाकांत कधीं मधीं कल्चर्ड मोत्यांची नथ व कानांत तशाच प्रकारचीं कुडीं येवढेच दागिने काय ते पहावयास मिळतात. पूर्वीचे काळीं विवाहित स्त्रीनें दहाचे दहा पायांचीं बोटें मोकळीं ठेवून चालणें पाप समजत. पायांचे बोटांत जोडवीं, वांकडे, विरवल्या अथवा मासोळ्या यां-पैकीं कांहींच न घालतां वावरणारी स्त्री फारच क्वचित् आढळे. आतां या पायाचे बोटांतील अडगळीला साफ रजा मिळालेली आहे.

५ **घरांतील सामानसुमानाचे** बाबतींतहि बरीच क्रांती घडून आलेली आहे. बऱ्याच घरीं बांक, घडवंची, ओटीवरील दोन खांबाचेमध्यें बसविलेली फळी, ओटीवरील माचा व माजघरांतील बाज यांचा बसण्यास उपयोग होत असे. आजहि या वस्तु टिकाव धरून आहेतच. तसेंच घरोघरचा झोंपाळाहि आपले जाग्यावर कायम आहेच. परंतु या सर्वांचे जोडीला टेबल, स्टूल, एखादी-तरी साधी खुर्ची व एक आरामखुर्ची येवढ्या वस्तु आवश्यक होऊन बसल्या आहेत. पूर्वी, कडधान्य सुरक्षित ठेवण्याकरितां त्यांचे मुडे बांधून ठेवीत परंतु इंग्रजी राज्यांत टिनचे लहानमोठे नानाप्रकारचे डब्यांचा सुकाळ झाल्यामुळें त्यांनीं मुडयांचें उच्चाटन करून टाकलें आहे. पूर्वीचे काळीं घरांत तांब्याचीं भांडीं

जास्त असत, परंतु आधुनिक घरांत पितळेचीं, व अल्युमीनिअमचीं भांडीं घेण्याची प्रवृत्ति वाढत आहे व क्वचित् अगदीं आधुनिक "स्टेनलेस स्टील" चीं भांडीं डोकावूं लागलीं आहेत. ओलाणचे दिवे, लामणदिवे, समया यांची जागा आतां नानाप्रकारचे घासलेटी दिव्यांनीं घेतली आहे.

६ **धार्मिक आचारविचार:—** कोंकण म्हटलें म्हणजे कर्मठ ब्राह्मणांचें एकेकाळीं आगर होतें व आमचे गांवांत नामांकित गुरूंचे देखरेखीखालीं वेदाध्ययनाची उत्तम सोय असल्यामुळें गांवांत, दशग्रंथी विद्वान् पट्टीचे ब्राह्मण पुष्कळ असत व त्यांचे अनुषंगानें ब्राह्मण, अब्राह्मण इत्यादि सर्व जातींचे लोक धार्मिक आचार-विचार फार कसोशीनें पाळीत असत. परंतु आतां या बाबतींत फार शैथिल्य आलें आहे व तेंहि ब्राह्मणांतच व तेंहि पुरुषांत जास्त आलें आहे ही दुःखाची गोष्ट आहे.

७ **भाषा:—** पूर्वींच्या काळीं कोंकणांतील माणूस त्याचे बोलण्यांतील अनुनासिकांचे सुकाळामुळें म्हणजेच "नाकांत" बोलण्यामुळें, कोठेंहि गेला तरी सहज ओळखून येत असे, परंतु आतां दळणवळणाचीं निरनिराळीं साधनें, चाकरी नोकरी व साक्षरताप्रसार यामुळें आमच्या गांवांतील मंडळीचा बाह्य जगाशीं पुष्कळच संबंध वाढल्यामुळें, त्यांचे भाषेंतील अनुनासिकें फारच कमी झालीं आहेत. अब्राह्मणांतील तरुणांतहि बरीच भाषाशुद्धि झाल्याचें स्पष्ट आढळून येतें. यामुळें पूर्वींच्या काळीं नित्य ऐकूं येणारे शब्द व शब्दसमुच्चय आतांच्या तरुण पिढीस दुर्बोध झाले आहेत. नमुन्याकरितां कांहीं थोडीं उदाहरणें खालीं दिलीं आहेत:—

( १ ) चेडी ( मुलगी ); ( २ ) झांटलीमन ( जंटलमनचा अपभ्रंश ); ( ३ ) धिंगड ( बावळट, मूर्ख ) ( ४ ) एखाद्या **ह्याच्या** सारखें करूं नकोस. ( ५ ) कायरे तूं आंघोळ **केलास** वाटतं ! ( ६ ) अशानीं मीं उद्यांपासून तुझ्याशीं बोलायचोंच नाहीं. ( ७ ) हें रे काय, **अचका** नारळ एकस्यान् खाऊन टाकलास वाटतं ? ( ८ ) अगो, रांडानूं ह्यां काय, समदांच **अक्रित.** ( ९ ) झांकी ( ऐट ) ( १० ) इस्की ( ऐट ) ( ११ ) शेमणामेरी ( प्रतिष्ठा, गडबड, मोठेपणा). ( १२ ) हें रे काय **भेलकंड** गेली वाटतं ! ( १३ ) कसा चाललाय मिरी मिरी !

# प्रकरण १५ वें

## कांहीं आवश्यक सुधारणा

१ गांवांतून गाड्या सुरू झाल्या परंतु रस्ता मात्र पूर्वीचाच पादचारी लोकांकरितां बांधिलेला कायम असल्यामुळें, पायीं जाणारे लोकांचे, समोरून गाडी आली म्हणजे विशेषतः पावसाळ्यांत, फार हाल होतात. ते थांबविण्याकरितां रस्ता रुंद करणें फार जरूर आहे. तसेंच मूळचे पादचारी लोकांचेकरितां बांधलेले रस्त्यावरूनच त्या रस्त्यांत गाड्यांचे वर्दळीस तोंड देणारी खडी घालून रस्ता-दुरुस्ती न करितांच रहदारी सुरू केल्यामुळें रस्ता फारच खराब होतो. हा रस्ता बोर्डाचा असल्यामुळें ग्रामपंचायत तो दुरुस्त करीत नाहीं व बोर्डाजवळ पुरेसे पैसे नसल्यामुळें बोर्डाकडूनहि तो दुरुस्त होत नाहीं. यावर एकच उपाय आहे व तो म्हणजे प्रत्येक घरवाल्यानें आपले घराकडील चाकोरींत लहान लहान दगड बसवून त्यावर पावसांत रेवसा टाकून व उन्हाळ्यांत माती टाकून चाकोरी नेहमीं भरून काढणें व पावसाळ्यांत तींत पाणी सांचून चिखल न होईल अशी तजवीज अंग-मेहनतीनें वा मजुरीनें स्वखर्चानें करणें एवढा एकच स्वाधीनचा उपाय आहे.

गाड्यांचे सोईकरितां बाजारपेठेंतील तिष्ठा अथवा जुना उंच पूल काढून टाकण्यांत आला आहे. परंतु नव्या पुलाची उंची कमी व पाणी जाण्याकरितां ठेवलेले मार्ग फार अरुंद यामुळें बिदींतील सर्व केरकचरा पुलाखालीं अडकून बसतो, त्यामुळें गटारांतील पाणी तुंबून रस्त्यावर येतें व शाळेंत जाणारीं मुलें, स्त्रिया, टेंगणीं माणसें यांचे फारच हाल होतात. हा प्रश्न मुख्यतः उभागर आळींतील मंडळीचा आहे. तरी त्यांनीं आपले आळीची गांवकी भरवून, त्यांचे आळीकर, त्यांचे घरचा केरकचरा रस्त्यावरील गटारांत न टाकतील अशी व्यवस्था करावी. हा केरकेचरा रस्त्यावर न टाकतां माडांखालीं टाकला अथवा खड्डे करून त्यांत कुजवला तर त्याचा उत्तम खत म्हणून उपयोग होईल व " एक पंथ दो काज "

असा सर्वांचा दुहेरी फायदा होईल. तरी सर्व उभागरकर मंडळींनीं या गोष्टीचा आपलेपणानें विचार करावा अशी नम्र सूचना आहे.

२ **गाईम्हशींचे शेणाचा** उपयोग, त्याच्या गंवऱ्या अथवा थावडे करून जाळण्याकडे सर्पण म्हणून करण्यांत येतो. यामुळें शेती व बागायत यांस पुरेसें खत मिळत नाहीं. सध्यां जोशी नामक एका शास्त्रीय संशोधकानें एक यंत्र शोधून काढिलें आहे. त्यांत गाईम्हशींचें शेण टाकिलें असतां त्यापासून निघणारे वायूचा जळण म्हणून उपयोग करितां येतो व त्याच वेळीं, गॅस काढून घेतलेले शेणाचा शेणपणा कायम रहात असल्यामुळें त्याचा खताकडे उपयोग होतोच. या यंत्राचा उपयोग केल्यास सरपणाकरितां तुटणारीं झाडें बंद होऊन त्यांचा उपयोग झाडें तुटल्यामुळें, दरसाल कमी कमी होत चाललेला पाऊस वाढविण्याकडे होईल, जमिनीची ‘ धूप ’ थांबेल, भरपूर फार सोयीचें, धुराचा त्रास न देणारें सरपण मिळेल व शेतीस व बागाइतास भरपूर खत मिळेल. तरी अशा तऱ्हेच्या अनेक दृष्टीनें फायदा करून देणारे यंत्राचा आमचे ग्रामबंधूंनीं ग्रामहिताचे व आत्महिताचे दृष्टीनें अवश्य उपयोग करावा अशी त्यांस आग्रहाची सूचना आहे.

३ **नारळाचीं चोडें**— आमचे गांवांत नारळीचीं झाडें जवळ जवळ घरोघर आहेत. उभागरआळींत तर घरोघर मोठाले नारळीचे बाग आहेत. त्यांचे चोडांचा उपयोग फक्त सरपण म्हणून करण्यांत येतो. परंतु हा या वस्तूचा उपयोग नसून दुरुपयोग होय. चोडांपासून काथ्या तयार करून त्याचेपासून सुंभ व सुंभापासून नित्योपयोगी कितीतरी वस्तु तयार करितां येतात. सध्यां सरकारनें कांहीं विशिष्ट वर्गांतील मुलांना काथ्याचें काम शिकविण्याकरितां सरकारी शाळा काढली आहे. ह्या गोष्टीचा फायदा घेऊन गांवांतल्या चोडांपासून नुस्तें सुंभ तयार करण्याचा एखादा कारखाना गांवांत निघाला तरी सुंभ खरेदींत दरसाल गांवाबाहेर जाणारे हजारों रुपये वांचतील व गांवांतील कित्येक लोकांस गांवांतल्या गांवांत उद्योग मिळेल व गांवचे संपत्तींत भरहि पडेल.

४ **कशील त्याची जमीन**— नुकत्याच झालेल्या महाराष्ट्र कॉंग्रेस कमिटींतील ठरावाप्रमाणें “ कशील त्याची जमीन ” हें तत्त्व लवकरच अमलांत येणार खास. आंजर्ल्यांतील बऱ्याच लोकांच्या शेतजमिनी जवळपासचे खेड्यांत आहेत व वरील तत्त्वाप्रमाणें त्या त्यांचे हातून जाणार खास, परंतु आजपासून उद्योगाला

अनुक्रमांक 20902 दि: 25 ... प्रवास
क्रमांक 205 ... नों: दि: १४१ ... १६।७।५४



लागल्यास गांवांतील शेतजमिनी महत्प्रयास केल्यास कदाचित् हातीं येऊं शकतील व उद्यां गांव सोडून जाण्याची येणारी पाळी कदाचित् टाळतां येईल.

गांवांत दस्ती व बिनदस्ती अशी गुरचाराची पुष्कळच जमीन आहे. तींत सध्यां तरी गवतहि होत नाहीं. थोडें तोंड चाळवीत तींतून हवा फुंकित हिंडण्याला तिचा गुरांना उपयोग होतो येवढेंच. ही जमीन डोंगराचे उतारावर असल्यामुळें ती सारखी धुपून जात असते. तरी तींत मधून मधून बांध घालून व कडेनें झाडें लावून धूप थांबविणें अत्यंत जरूर आहे, म्हणजे तींत हळूहळू गवत वाढूं लागेल व कालांतरानें नाचणी, वरी, हरीक इत्यादि अन्नधान्यांचें उत्पन्नहि करितां येऊं लागेल.

**५ अर्धवट समुद्रगर्क जमिनीचें पुनरुज्जीवनः**— आंजर्ल्याहून आडें येथें जाण्याचा जो राजमार्ग आहे त्या मार्गावर सावण्याजवळ एक वाळूचें मैदान आहे. समुद्राचे बाजूला पुष्कळ दगडधोंडेहि आहेत. या दगडांचा उपयोग करून समुद्राचे बाजूनें मजबूत बांध घालून निर्माण होणारे जागेंत पुष्कळच नारळीचीं झाडें लावतां येतील व ती एक चांगलीच उत्पन्नाची बाब होईल. अशा तऱ्हेनें "वेळेवर" केलेल्या पुष्कळ बागा मालवण–वेंगुर्ल्याकडे आम्हीं पाहिलेल्या आहेत. वरीलप्रमाणेंच अजरालयेश्वर समुद्रगर्क जागेचेंहि पुनरुज्जीवन केल्यास गांवांतील लोकांस गांवांतल्या गांवांत नवीन उद्योग मिळून गांवचे संपत्तींतहि भर पडेल.

**६ तागाची लागवडः**— आमचे लहानपणीं उभागरआळींतील नारळींचे बागांतील, नारळींचे झाडांखालील रिकाम्या जागेंत कोळी लोक पावसाळ्यांत तागाची लावगड करून त्या पूर्ण स्वदेशी तागाचा उपयोग आपलीं जाळीं करण्याकडे करीत असत. ही प्रथा बंद कां पडली, व मार्गांतील अडचणी काय याची चौकशी करून व अडचणींचें शेती खात्यामार्फत निराकरण करून घेऊन वरील तागाच्या लावगडीचें पुनरुज्जीवन करणें अत्यंत जरूर आहे.

**७ जनावरांचे खाद्यांत भरः**— पोफळीचे बागांत पोफळीचे अळ्याभोंवतीं व मधल्या रिकामे जागेंत तसेंच दांड्याचे बाजूला शेती खात्याकडून मिळूं शकणारे एका विशिष्ट प्रकारचे पौष्टिक गवताची लागवड करून जनावरांस बाराहि महिने ओला पौष्टिक चारा देतां येईल. वरीलप्रमाणेंच देशावर पानवेलींचे मळ्यांत आडोश्याकरितां "सावरी" नांवाच्या बेतवार वाढणाऱ्या वनस्पतीची लागवड

करितात, त्याचे पाल्याचा विशेषतः बकऱ्यांना चारा म्हणून उपयोग करितात. सदर वनस्पति दोन बागांमधील कुंपणीला लावल्यास तिच्या फांद्यांचा उपयोग जनावरांस चारा म्हणूनहि करितां येईल.

**८ लहान धंदे:—** ( १ ) आंब्याचा रस व फोडी डब्यांत भरून ठेवणें व हंगाम संपल्यावर विकणें ( २ ) कचेऱ्याचें सत्त्व काढणें ( ३ ) आमसुलें व त्यांचे बियांचें तेल ( ४ ) आंब्याच्या कोयांचे गराचा उपयोग ( ५ ) फुकट जाणारे चिंचोक्यांची गिरणींतील कापडाकरितां खळ करणें ( ६ ) केळीचे सोपांपासून रेशमी कापड करणें ( ७ ) केळीचे बुंध्याचा, मधील काल्याचा, वाळवून भुगा करून त्याचा व कचेऱ्याचें सत्त्व काढतांना फुकट जाणारे चोंथ्याचा भुगा करून, त्यास पतंगाचे सालीचा अगर विलायती रंग देऊन गुलाल करणें हे छोटे धंदे करितां येण्यासारखे आहेत. वरीलप्रमाणें गुलालाचे मोठाले कारखाने राजापूर येथें पूर्वीच्या काळीं चालू असल्याचा रत्नागिरी गॅझिटिअरमध्यें उल्लेख आहे. ( ८ ) मधमाशा पाळून मध तयार करणें ( ९ ) सिंगापुरी अननसांची लागवड करून त्यांच्या फोडी नवीन आधुनिक पद्धतीनें डब्यांत भरून विकणें ( १० ) फणसाचे कच्चे तसेंच पक्के गरे वाळवून डब्यांत भरून मोठाल्या शहरांत पाठवून विकणें ( ११ ) आगाशीकडील केळ्यांची मुद्दाम लागवड करून त्यांचीं सुकीं केळीं करून विकणें ( १२ ) हल्लीं मोठाल्या शहरांतून घरांना रंग देण्याकरितां पिवळ्या मातीचा उपयोग करितात, तशाच तऱ्हेनें उपयोग करण्याकरितां गांवांत मिळणारी तांबडी माती नीटनेटकी करून शहरांत भिंती रंगविण्याकरितां पाठविणें ( १३ ) आधुनिक पद्धतीप्रमाणें मोठ्या प्रमाणावर कोंबड्या पाळून अंडीं शहरांत पाठविणें अशा तऱ्हेचे छोटे छोटे बरेच धंदे गांवांत सुरू करून ग्रामसुधारणा होणें शक्य आहे.

**९ शारीरिक शिक्षण—वजन उचलणें:—** जागतिक शक्तीचे खेळांचे सामन्यांत वजन उचलण्याचेहि कार्यक्रम असतात. अशा प्रकारच्या सामन्यांत तेलंग हे हिंदी मल्ल ६३० पौंड वजन उचलणारे म्हणून प्रसिद्ध आहेत, तर इजिप्तमधील नामांकित मल्लानें त्यांचेहिपेक्षां २०२ पौंड जास्त वजन उचलल्याचा दाखला आहे. आपल्या श्रीदुर्गादेवीचे आवारांत सात मण, नऊ मण अशा वजनाच्या दोन धोंडी व दोन काने असलेली एक तोफ व लहान मुलांकरितां

एक केळें ( लांबट दगड ) इतकीं वजन उचलण्याची संवय करण्याचीं साधनें उपलब्ध आहेत. या सर्व साधनांचा आमचे लहानपणीं, देवीचे यात्रेंत व इतर वेळींहि लोक उपयोग करीत असत. परंतु ही प्रथा आतां बंद पडली आहे ही दुःखाची गोष्ट होय. या प्रथेचा पुनरुद्धार करणें अत्यंत आवश्यक आहे. या धोंडी उचलण्याचे कामांत कै. बापूराव कोल्हटकर फार पटाईत होते व ते त्या कामांतील निरनिराळे प्रकार करून दाखवीत, तसेंच कै. गोविंदभट काळे, व कै. गोविंदभट खांबेटे यांनाहि धोंडी उचलतांना व थोडेंबहुत कौशल्य दाखविण्याचा प्रयत्न करितांना आमच्या लहानपणीं पाहिल्याचें आम्हांस आठवतें.

१० **धार्मिक कृत्यें**:— आपला गांव वैदिक परंपरा व वेदशाळा या करितां प्रसिद्ध होता. परंतु ही परंपरा आतां हळुहळू नष्ट होत आहे; परंतु अद्याप साफ नष्ट झाली नाहीं तोंच ती टिकविण्याचा कसून प्रयत्न होणें जरूर आहे. आपले गांवचे संघटनेप्रमाणें धार्मिक प्रमुख म्हणून पंचमान्यांची योजना आहे. त्यांपैकीं निदान दोन म्हणजे उपाध्ये व जोशी या जोडीची तरी अत्यंत आवश्यकता आहे व त्यांची परंपरा तरी चालू ठेवणें अत्यंत जरूर आहे. मुख्य प्रश्न योगक्षेम चालण्याचा येतो. त्याला निश्चित स्वरूप आणण्याकरितां ग्रामस्थ व वरील दोन घराण्यांतील मंडळी यांनीं एकत्र बसून व विचारविनिमय करून, गांवांतील धार्मिक कृत्यें चालविणारे वरील दोन घराण्यांतील मंडळीचे योग-क्षेमाची कांहीं निश्चित योजना आंखणें अत्यंत जरूर आहे. मात्र चाकरी केली तरच भाकरी हें तत्त्व त्यांत आधुनिक काळाला धरून अगदीं कायदेशीररीतीनें गोंवून घेतलें पाहिजे.

वर दर्शविलेल्या अनेक सुधारणा घडून याव्या म्हणून चाकरी, नोकरी व अन्य उद्योगधंद्यानिमित्त तरुणपणीं बाहेर गेलेले ग्रामस्थांनीं सेवानिवृत्तीनंतर मोठ्या शहरांत न राहतां वयाचे उत्तरार्धांत आपले जन्मभूमींत येऊन राहिलें पाहिजे व आपली पुंजी गांवांतच खर्च केली पाहिजे तरच गांव सुधारेल. त्याच-बरोबर गांवांतील मंडळींनींहि शहरी जीवनांतून ग्रामीण जीवनांत येणारे आपले ग्रामबंधूंस गांवांत आल्याबद्दल पश्चात्तापाची पाळी येणार नाहीं याबद्दल जरूर ती खबरदारी अवश्य घेतली पाहिजे. अशा तऱ्हेनें आमचे ग्रामस्थांमधील बंधुभाव व

जास्त असत, परंतु आधुनिक घरांत पितळेचीं, व अल्युमीनिअमचीं भांडीं घेण्याची प्रवृत्ति वाढत आहे व क्वचित् अगदीं आधुनिक " स्टेनलेस स्टील " चीं भांडीं डोकावूं लागलीं, आहेत. ओलाणचे दिवे, लामणदिवे, समया यांची जागा आतां नानाप्रकारचे घासलेटी दिव्यांनीं घेतली आहे.

६ **धार्मिक आचारविचार**:— कोंकण म्हटलें म्हणजे कर्मठ ब्राह्मणांचें एकेकाळीं आगर होतें व आमचे गांवांत नामांकित गुरूंचे देखरेखीखालीं वेदाध्ययनाची उत्तम सोय असल्यामुळें गांवांत, दशग्रंथी विद्वान् पट्टीचे ब्राह्मण पुष्कळ असत व त्यांचे अनुषंगानें ब्राह्मण, अब्राह्मण इत्यादि सर्व जातींचे लोक धार्मिक आचार-विचार फार कसोशीनें पाळीत असत. परंतु आतां या बाबतींत फार शैथिल्य आलें आहे व तेंहि ब्राह्मणांतच व तेंहि पुरुषांत जास्त आलें आहे ही दुःखाची गोष्ट आहे.

७ **भाषा**:— पूर्वींच्या काळीं कोकणांतील माणूस त्याचे बोलण्यांतील अनुनासिकांचे सुकाळामुळें म्हणजेच " नाकांत " बोलण्यामुळें, कोठेंहि गेला तरी सहज ओळखून येत असे, परंतु आतां दळणवळणाचीं निरनिराळीं साधनें, चाकरी नोकरी व साक्षरताप्रसार यामुळें आमच्या गांवांतील मंडळीचा बाह्य जगाशीं पुष्कळच संबंध वाढल्यामुळें, त्यांचे भाषेंतील अनुनासिकें फारच कमी झालीं आहेत. अब्राह्मणांतील तरुणांतहि बरीच भाषाशुद्धि झाल्याचें स्पष्ट आढळून येतें. यामुळें पूर्वींच्या काळीं नित्य ऐकूं येणारे शब्द व शब्दसमुच्चय आतांच्या तरुण पिढीस दुर्बोध झाले आहेत. नमुन्याकरितां कांहीं थोडीं उदाहरणें खालीं दिलीं आहेत:—

( १ ) चेडी ( मुलगी ); ( २ ) झांटलीमन ( जंटलमनचा अपभ्रंश ); ( ३ ) धिंगड ( बावळट, मूर्ख ) ( ४ ) एखाद्या **ह्याच्या** सारखें करूं नकोस. ( ५ ) कायरे तूं आंधोळ **केलास** वाटतं ! ( ६ ) अशानीं मीं उद्यांपासून तुझ्याशीं बोलायचोंच नाहीं. ( ७ ) हें रे काय, **अचका** नारळ एकट्यान् खाऊन टाकलास वाटतं ? ( ८ ) अगो, रांडानूं ह्यां काय, समदांच अक्रित. ( ९ ) झांकी ( ऐट ) ( १० ) इस्की ( ऐट ) ( ११ ) शेमणामेरी ( प्रतिष्ठा, गडबड, मोठेपणा). ( १२ ) हें रे काय **भेलकंड** गेली वाटतं ! ( १३ ) कसा चाललाय मिरी मिरी !

# प्रकरण १५ वें

## कांहीं आवश्यक सुधारणा

१ गांवांतून गाड्या सुरू झाल्या परंतु रस्ता मात्र पूर्वीचाच पादचारी लोकांकरितां बांधिलेला कायम असल्यामुळें, पायीं जाणारे लोकांचे, समोरून गाडी आली म्हणजे विशेषतः पावसाळ्यांत, फार हाल होतात. ते थांबविण्याकरितां रस्ता रुंद करणें फार जरूर आहे. तसेंच मूळचे पादचारी लोकांचेकरितां बांधलेले रस्त्यावरूनच त्या रस्त्यांत गाड्यांचे वर्दळीस तोंड देणारी खडी घालून रस्ता-दुरुस्ती न करितांच रहदारी सुरू केल्यामुळें रस्ता फारच खराब होतो. हा रस्ता बोर्डाचा असल्यामुळें ग्रामपंचायत तो दुरुस्त करीत नाहीं व बोर्डाजवळ पुरेसे पैसे नसल्यामुळें बोर्डाकडूनहि तो दुरुस्त होत नाहीं. यावर एकच उपाय आहे व तो म्हणजे प्रत्येक घरवाल्यानें आपले घराकडील चाकोरींत लहान लहान दगड बसवून त्यावर पावसांत रेवसा टाकून व उन्हाळ्यांत माती टाकून चाकोरी नेहमीं भरून काढणें व पावसाळ्यांत तींत पाणी सांचून चिखल न होईल अशी तजवीज अंग-मेहनतीनें वा मजुरीनें स्वखर्चानें करणें एवढा एकच स्वाधीनचा उपाय आहे.

गाड्यांचे सोईकरितां बाजारपेठेंतील तिठा अथवा जुना उंच पूल काढून टाकण्यांत आला आहे. परंतु नव्या पुलाची उंची कमी व पाणी जाण्याकरितां ठेवलेले मार्ग फार अरुंद यामुळें त्रिदींतील सर्व केरकचरा पुलाखालीं अडकून बसतो, त्यामुळें गटारांतील पाणी तुंबून रस्त्यावर येतें व शाळेंत जाणारीं मुलें, स्त्रिया, ठेंगणीं माणसें यांचे फारच हाल होतात. हा प्रश्न मुख्यतः उभागर आळींतील मंडळीचा आहे. तरी त्यांनीं आपले आळीची गांवकी भरवून, त्यांचे आळीकर, त्यांचे घरचा केरकचरा रस्त्यावरील गटारांत न टाकतील अशी व्यवस्था करावी. हा केरकेचरा रस्त्यावर न टाकतां माडांखालीं टाकला अथवा खड्डे करून त्यांत कुजवला तर त्याचा उत्तम खत म्हणून उपयोग होईल व " एक पंथ दो काज "

असा सर्वांचा दुहेरी फायदा होईल. तरी सर्व उभागरकर मंडळींनीं या गोष्टीचा आपलेपणानें विचार करावा अशी नम्र सूचना आहे.

२ **गाईम्हशींचे शेणाचा** उपयोग, त्याच्या गंवऱ्या अथवा थावडे करून जाळण्याकडे सर्पण म्हणून करण्यांत येतो. यामुळें शेती व बागायत यांस पुरेसें खत मिळत नाहीं. सध्यां जोशी नामक एका शास्त्रीय संशोधकानें एक यंत्र शोधून काढिलें आहे. त्यांत गाईम्हशींचें शेण टाकिलें असतां त्यापासून निघणारे वायूचा जळण म्हणून उपयोग करितां येतो व त्याच वेळीं, गॅस काढून घेतलेले शेणाचा शेणपणा कायम रहात असल्यामुळें त्याचा खताकडे उपयोग होतोच. या यंत्राचा उपयोग केल्यास सरपणाकरितां तुटणारीं झाडें बंद होऊन त्यांचा उपयोग झाडें तुटल्यामुळें, दरसाल कमी कमी होत चाललेला पाऊस वाढविण्याकडे होईल, जमिनीची ' धूप ' थांबेल, भरपूर फार सोयीचें, धुराचा त्रास न देणारें सरपण मिळेल व शेतीस व बागाइतास भरपूर खत मिळेल. तरी अशा तऱ्हेच्या अनेक दृष्टीनें फायदा करून देणारे यंत्राचा आमचे ग्रामबंधूंनीं ग्रामहिताचे व आत्महिताचे दृष्टीनें अवश्य उपयोग करावा अशी त्यांस आग्रहाची सूचना आहे.

३ **नारळाचीं चोडें**— आमचे गांवांत नारळीचीं झाडें जवळ जवळ घरोघर आहेत. उभागरआळींत तर घरोघर मोठाले नारळीचे बाग आहेत. त्यांचे चोडांचा उपयोग फक्त सरपण म्हणून करण्यांत येतो. परंतु हा या वस्तूचा उपयोग नसून दुरुपयोग होय. चोडांपासून काथ्या तयार करून त्याचेपासून सुंभ व सुंभापासून नित्योपयोगी कितीतरी वस्तु तयार करितां येतात. सध्यां सरकारनें कांहीं विशिष्ट वर्गातील मुलांना काथ्याचें काम शिकविण्याकरितां सरकारी शाळा काढली आहे. ह्या गोष्टीचा फायदा घेऊन गांवांतल्या चोडांपासून नुस्तें सुंभ तयार करण्याचा एखादा कारखाना गांवांत निघाला तरी सुंभ खरेदींत दरसाल गांवा-बाहेर जाणारे हजारों रुपये वांचतील व गांवांतील कित्येक लोकांस गांवांतल्या गांवांत उद्योग मिळेल व गांवचे संपत्तींत भरहि पडेल.

४ **कशील त्याची जमीन**— नुकत्याच झालेल्या महाराष्ट्र कॉंग्रेस कमि-टींतील ठरावाप्रमाणें "कशील त्याची जमीन" हें तत्त्व लवकरच अमलांत येणार खास. आंजर्ल्यांतील बऱ्याच लोकांच्या शेतजमिनी जवळपासचे खेड्यांत आहेत व वरील तत्त्वाप्रमाणें त्या त्यांचे हातून जाणार खास, परंतु आजपासून उद्योगाला

अनुक्रम २०९८२ दि: १५ ऑगस्ट
 क्रमांक २०५ नों: दि: १४१ १९/७/५४

लागल्यास गांवांतील शेतजमिनी महत्प्रयास केल्यास कदाचित् हातीं येऊं शकतील व उद्यां गांव सोडून जाण्याची येणारी पाळी कदाचित् टाळतां येईल.

गांवांत दस्ती व बिनदस्ती अशी गुरचाराची पुष्कळच जमीन आहे. तींत सध्यां तरी गवतहि होत नाहीं. थोडें तोंड चाळवीत तींतून हवा फुंकित हिंडण्याला तिचा गुरांना उपयोग होतो येवढेंच. ही जमीन डोंगराचे उतारावर असल्यामुळें ती सारखी धुपून जात असते. तरी तींत मधून मधून बांध घालून व कडेनें झाडें लावून धूप थांबविणें अत्यंत जरूर आहे, म्हणजे तींत हळूहळू गवत वाढूं लागेल व कालांतरानें नाचणी, वरी, हरीक इत्यादि अन्नधान्यांचें उत्पन्नहि करितां येऊं लागेल.

**५ अर्धवट समुद्रगर्क जमिनीचें पुनरुज्जीवनः—** आंजर्ल्याहून आडें येथें जाण्याचा जो राजमार्ग आहे त्या मार्गावर सावण्याजवळ एक वाळूचें मैदान आहे. समुद्राचे बाजूला पुष्कळ दगडधोंडेहि आहेत. या दगडांचा उपयोग करून समुद्राचे बाजूनें मजबूत बांध घालून निर्माण होणारे जागेंत पुष्कळच नारळीचीं झाडें लावतां येतील व ती एक चांगलीच उत्पन्नाची बाब होईल. अशा तऱ्हेनें "वेळेवर" केलेल्या पुष्कळ बागा मालवण—वेंगुर्ल्याकडे आम्हीं पाहिलेल्या आहेत. वरीलप्रमाणेंच अजरालयेश्वर समुद्रगर्क जागेचेंहि पुनरुज्जीवन केल्यास गांवांतील लोकांस गांवांतल्या गांवांत नवीन उद्योग मिळून गांवचे संपत्तींतहि भर पडेल.

**६ तागाची लागवडः—** आमचे लहानपणीं उभागरआळींतील नारळींचे बागांतील, नारळींचे झाडांखालील रिकाम्या जागेंत कोळी लोक पावसाळ्यांत तागाची लावगड करून त्या पूर्ण स्वदेशी तागाचा उपयोग आपलीं जाळीं करण्याकडे करीत असत. ही प्रथा बंद कां पडली, व मार्गातील अडचणी काय याची चौकशी करून व अडचणींचें शेती खात्यामार्फत निराकरण करून घेऊन वरील तागाच्या लावगडीचें पुनरुज्जीवन करणें अत्यंत जरूर आहे.

**७ जनावरांचे चाऱ्यांत भरः—** पोफळीचे बागांत पोफळीचे अळ्याभोंवतीं व मधल्या रिकामे जागेंत तसेंच दांड्याचे बाजूला शेती खात्याकडून मिळूं शकणारे एका विशिष्ट प्रकारचे पौष्टिक गवताची लागवड करून जनावरांस बाराहि महिने ओला पौष्टिक चारा देतां येईल. वरीलप्रमाणेंच देशावर पानवेलींचे मळ्यांत आडोश्याकरितां "सावरी" नांवाच्या बेतवार वाढणाऱ्या वनस्पतीची लागवड

करितात, त्याचे पाल्याचा विशेषतः बकऱ्यांना चारा म्हणून उपयोग करितात. सदर वनस्पति दोन बागांमधील कुंपणीला लावल्यास तिच्या फांद्यांचा उपयोग जनावरांस चारा म्हणूनहि करितां येईल.

**८ लहान धंदे**:— (१) आंब्याचा रस व फोडी डब्यांत भरून ठेवणें व हंगाम संपल्यावर विकणें (२) कचेऱ्याचें सत्त्व काढणें (३) आमसुलें व त्यांचे बियांचें तेल (४) आंब्याच्या कोयांचे गराचा उपयोग (५) फुकट जाणारे चिंचोक्यांची गिरणींतील कापडाकरितां खळ करणें (६) केळीचे सोपांपासून रेशमी कापड करणें (७) केळीचे बुंध्याचा, मधील काल्याचा, वाळवून भुगा करून त्याचा व कचेऱ्याचें सत्त्व काढतांना फुकट जाणारे चोंथ्याचा भुगा करून, त्यास पतंगाचे सालीचा अगर विलायती रंग देऊन गुलाल करणें हे छोटे धंदे करितां येण्यासारखे आहेत. वरीलप्रमाणें गुलालाचे मोठाले कारखाने राजापूर येथें पूर्वीच्या काळीं चालू असल्याचा रत्नागिरी गॅझिटिअरमध्यें उल्लेख आहे. (८) मधमाशा पाळून मध तयार करणें (९) सिंगापुरी अननसांची लागवड करून त्यांच्या फोडी नवीन आधुनिक पद्धतीनें डब्यांत भरून विकणें (१०) फणसाचे कच्चे तसेंच पक्के गरे वाळवून डब्यांत भरून मोठाल्या शहरांत पाठवून विकणें (११) आगाशीकडील केळ्यांची मुद्दाम लागवड करून त्यांचीं सुकीं केळीं करून विकणें (१२) हल्लीं मोठाल्या शहरांतून घरांना रंग देण्याकरितां पिवळ्या मातीचा उपयोग करितात, तशाच तऱ्हेनें उपयोग करण्याकरितां गांवांत मिळणारी तांबडी माती नीटनेटकी करून शहरांत भिंती रंगविण्याकरितां पाठविणें (१३) आधुनिक पद्धतीप्रमाणें मोठ्या प्रमाणावर कोंबड्या पाळून अंडीं शहरांत पाठविणें अशा तऱ्हेचे छोटे छोटे बरेच धंदे गांवांत सुरू करून ग्रामसुधारणा होणें शक्य आहे.

**९ शारीरिक शिक्षण—वजन उचलणें**:— जागतिक शक्तीचे खेळांचे सामन्यांत वजन उचलण्याचेहि कार्यक्रम असतात. अशा प्रकारच्या सामन्यांत तेलंग हे हिंदी मल्ल ६३० पौंड वजन उचलणारे म्हणून प्रसिद्ध आहेत, तर इजिप्तमधील नामांकित मल्लानें त्यांचेहिपेक्षां २०२ पौंड जास्त वजन उचलल्याचा दाखला आहे. आपल्या श्रीदुर्गादेवीचे आवारांत सात मण, नऊ मण अशा वजनाच्या दोन धोंडी व दोन काने असलेली एक तोफ व लहान मुलांकरितां

एक केळें ( लांबट दगड ) इतकीं वजन उचलण्याची संवय करण्याचीं साधनें उपलब्ध आहेत. या सर्व साधनांचा आमचे लहानपणीं, देवीचे यात्रेंत व इतर वेळींहि लोक उपयोग करीत असत. परंतु ही प्रथा आतां बंद पडली आहे ही दुःखाची गोष्ट होय. या प्रथेचा पुनरुद्धार करणें अत्यंत आवश्यक आहे. या धोंडी उचलण्याचे कामांत कै. बापूराव कोल्हटकर फार पटाईत होते व ते त्या कामांतील निरनिराळे प्रकार करून दाखवीत, तसेंच कै. गोविंदभट काळे, व कै. गोविंदभट खांबेटे यांनाहि धोंडी उचलतांना व थोडेंबहुत कौशल्य दाखविण्याचा प्रयत्न करितांना आमच्या लहानपणीं पाहिल्याचें आम्हांस आठवतें.

१० **धार्मिक कृत्यें**:— आपला गांव वैदिक परंपरा व वेदशाळा या करितां प्रसिद्ध होता. परंतु ही परंपरा आतां हळुहळू नष्ट होत आहे; परंतु अद्याप साफ नष्ट झाली नाहीं तोंच ती टिकविण्याचा कसून प्रयत्न होणें जरूर आहे. आपले गांवचे संघटनेप्रमाणें धार्मिक प्रमुख म्हणून पंचमान्यांची योजना आहे. त्यांपैकीं निदान दोन म्हणजे उपाध्ये व जोशी या जोडीची तरी अत्यंत आवश्यकता आहे व त्यांची परंपरा तरी चालू ठेवणें अत्यंत जरूर आहे. मुख्य प्रश्न योगक्षेम चालण्याचा येतो. त्याला निश्चित स्वरूप आणण्याकरितां ग्रामस्थ व वरील दोन घराण्यांतील मंडळी यांनीं एकत्र बसून व विचारविनिमय करून, गांवांतील धार्मिक कृत्यें चालविणारे वरील दोन घराण्यांतील मंडळीचे योगक्षेमाची कांहीं निश्चित योजना आंखणें अत्यंत जरूर आहे. मात्र चाकरी केली तरच भाकरी हें तत्त्व त्यांत आधुनिक काळाला धरून अगदीं कायदेशीररीतीनें गोंवून घेतलें पाहिजे.

वर दर्शविलेल्या अनेक सुधारणा घडून याव्या म्हणून चाकरी, नोकरी व अन्य उद्योगधंद्यानिमित्त तरुणपणीं बाहेर गेलेले ग्रामस्थांनीं सेवानिवृत्तीनंतर मोठ्या शहरांत न राहतां वयाचे उत्तरार्धांत आपले जन्मभूमींत येऊन राहिलें पाहिजे व आपली पुंजी गांवांतच खर्च केली पाहिजे तरच गांव सुधारेल. त्याचबरोबर गांवांतील मंडळींनींहि शहरी जीवनांतून ग्रामीण जीवनांत येणारे आपले ग्रामबंधूंस गांवांत आल्याबद्दल पश्चात्तापाची पाळी येणार नाहीं याबद्दल जरूर ती खबरदारी अवश्य घेतली पाहिजे. अशा तऱ्हेनें आमचे ग्रामस्थांमधील बंधुभाव व

सहकार्य दिवसेंदिवस वृद्धिंगत होऊन आमचे गांवाचा उत्कर्ष होत रहावा म्ह
त्या जगन्नियंत्या परमेश्वराची प्रार्थना करून हें लिखाण पुरें करितों.

सहनाववतु । सहनौभुनक्तु । सहवीर्यं करवावहै ॥
तेजस्विनावधीतमस्तु । मा विद्विषावहै ॥ १ ॥

सर्वे भवन्तु सुखिनः । सर्वे सन्तु निरामयाः ॥
सर्वे भद्राणि पश्यन्तु । मा कश्चिदुःखमाप्नुयात् ॥ १ ॥

---

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 209102 वि.
क्रमांक 20४ नों: दि:

REFBK-0008488